(सभापतीस्थानी माननीय सभापती)

पृ.शी./मु.शी.: सदस्यांचा परिचय व शपथविधी

श्री. छगन भुजबळ (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था मतदार संघातर्फे निर्वाचित केलेल्या श्री. अनिल दत्तात्रय तटकरे यांचा आपणास व आपल्यामार्फत सभागृहास परिचय करुन देताना मला अतिशय आनंद होत आहे.

श्री. अनिल तटकरे यांनी शपथ घेतली.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 289 अन्वयेच्या सुचनेसंबंधी

सभापती : आज माझ्याकडे नियम 289 अन्वये एक प्रस्ताव आलेला आहे. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत, श्री. दिवाकर रावते, ॲड. अनिल परब, श्री. किरण पावसकर, डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "मुंबईतील जुन्या इमारतीत कार्यरत असलेल्या 1100 नर्सिंग होम्सच्या संदर्भात सुप्रिम कोर्टात दाखल केलेल्या याचिकेवर डॉक्टरांच्या बाजूने दिलेला निकाल" या विषयासंबंधी सूचना दिलेली आहे.

कामकाज पत्रिकेमध्ये अशा प्रकारचा कोणताही प्रस्ताव अंतर्भूत नसल्यामुळे मी या प्रस्तावाल मान्यता देऊ शकणार नाही. पण हा प्रस्ताव अत्यंत महत्वाचा असून सुप्रिम कोर्टाने या अनुषंगाने दिलेला निर्णय महत्वाचा असल्यामुळे प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर या विषयावर सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांना चार-पाच मिनिटे विवेचन करण्याची अनुमती देईन.

डॉ. दीपक सावंत : महोदय, माझी अशी विनंती आहे की, या प्रस्तावाच्या संदर्भात जेव्हा थोडक्यात माझे विचार मांडण्याची परवानगी मला दिली जाईल तेव्हा संबंधित विभागाचे मंत्री महोदय किंवा माननीय मुख्यमंत्री उपस्थित राहतील असे निदेश आपण त्यांना द्यावेत.

सभापती : ठीक आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

राज्यातील थकबाकीदार साखर कारखान्यांकडून कर्जे वसूल करणेबाबतची कार्यवाही

(१) * २८५२ श्री.दिवाकर रावते, डॉ.दीपक सावंत, श्री.रामदास कदम, डॉ.निलम गोऱ्हे, श्री.गोपीकिसन बाजोरिया, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.गुरुनाथ कुलकर्णी, श्री.अरुण गुजराथी : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना राज्य सहकारी बँकेने दिलेले कर्ज वसूल न झाल्याने सदर बँकांचे नुकसान होवून त्या दिवाळखोरीत निघत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लिमिटेड आणि मुंबई जिल्हा केंद्रिय सहकारी बँक यांच्याकडून १५ वर्षापूर्वी घेतलेली २०९ कोटी रुपयांची कर्जे राज्यातील १५ सहकारी साखर कारखान्यांनी बुडविल्याची बाब उघडकीस आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी साखर कारखान्यांची मालमत्ता विकून थकित रक्कम वसूल करण्याची कारवाई करण्याचे मा.उच्च न्यायालयाने शासनास दिनांक १५ जानेवारी, २०१० रोजी वा त्या सुमारास आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन थकबाकीदार साखर कारखान्यांकडून कर्जे वसूल करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.हर्षवर्धन पाटील : (१) अशंत: खरे आहे.

(२) महाराष्ट्र राज्य सहाकारी बॅकेंच्या नेतृत्वाखाली सहभाग योजनेंतर्गत कर्जपुरवठा केलेल्या १५ सहकारी साखर कारखान्यांकडून दि.३१-३-२००९ अखेर कर्ज येणे बाकी रु.८८८.८७ कोटी असून थकबाकी कर्ज रु.६३९.८१ कोटी आहे. सदर थकीत कर्जाच्या वसूलीसाठी महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने संबंधित कारखान्यांविरुध्द सिक्युरिटायझेशन कायद्यांतर्गत कारवाई सुरु केली आहे.

(३) थकबाकीदार झालेल्या सहकारी साखर कारखान्यांची मालमत्ता विकून थकीत रक्कम वसूल करण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाने दिनांक १४ जानेवारी, २०१० रोजी महाराष्ट्र राज्य सहकारी बॅकेंस दिले आहेत.

(४) व (५) मा.उच्च न्यायालयाचे उक्त आदेश विचारात घेता सदर प्रकरणी शासन स्तरावर कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, साखर कारखान्यांची रु. 888.87 कोटी थकबाकी केव्हा पासूनची आहे? कोणकोणत्या साखर कारखान्यांकडे थकबाकी आहे ? ही थकबाकी वसूल करण्यासाठी शासनाने कोणते प्रयत्न केलेले आहेत ? तसेच या संदर्भात साखर आयुक्तांनी कोणते प्रयत्न केलेले आहेत तसेच थकबाकी वसूल न करण्यामध्ये जबाबदार कोण आहेत ?

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2852.....

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, थकबाकीदार साखर कारखान्यांची संख्या 15 असून थकबाकीतील काही कारखाने 10-15-20वर्षापूवीचे आहेत. थकीत कारखाने किती व त्यांची नावे काय आहेत असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारलेला असल्यामुळे मी यासंदर्भात सांगू इच्छितो की, 1)कोंडेश्वर सहकारी साखर कारखाना, अमरावती, 2) शिवशक्ती आदिवासी सहकारी साखर कारखाना, बुलढाणा, 3) बालाघाट सहकारी साखर कारखाना, नांदेड, 4) श्री. बागेश्वरी सहकारी साखर कारखाना, जालना, 5) सुधाकरराव नाईक सहकारी साखर कारखाना, यवतमाळ, 6) श्री. अंबादेवी सहकारी साखर कारखाना, अमरावती, 7) हुतात्मा जयवंतराव पाटील सहकारी साखर कारखाना, नांदेड, 8) राम गणेश गडकरी सहकारी साखर कारखाना, नागपूर, 9) जरंडेश्वर सहकारी साखर कारखाना, सातारा, 10) नरसिंह सहकारी साखर कारखाना, परभणी, 11) पुष्पदंतेश्वर सहकारी साखर कारखाना, नंदुरबार, 12) श्री संत मुक्ताई सहकारी साखर कारखाना, जळगाव, 13) डॉ.वि.वि.पाटील सहकारी साखर कारखाना, बीड, 14) राजे विजयसिंह डफळे सहकारी साखर कारखाना 15) जय अंबिका सहकारी साखर कारखाना, नांदेड हे 15 साखर कारखाने थकबाकीदार असून उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे कारखान्यांकडून वसूली होण्याची कार्यवाही नियमाप्रमाणे सुरु आहे.

श्री. राजन तेली : सभापती महोदय, सगळयाच जिल्हा बँका या साखर कारखान्यामुळे अडचणीत आलेल्या आहेत. सिंधुदुर्ग जिल्हयातील 4 साखर काखाने म्हणजे 1) जयशिवशंकर, 2) प्रतापगड, 3) उदयसिंगराव गायकवाड 4) रयत या चारही साखर कारखान्यांना जिल्हा बँकेने कर्ज दिलेले आहे. या चारही साखर कारखान्यांची जबाबदारी राज्य शासनाने घेतलेली आहे. जिल्हा बँकेचे अकाऊंट इयर एंडींगला एनपीएमध्ये जाते. या बँकेचा एनपीए 17-17,18-18 कोटी रुपयांचा आहे. त्यामुळे माझी अशी विनंती आहे की, राज्य सरकार या थकबाकी असलेल्या साखर कारखान्यांच्या संदर्भात कोणती ठोस भूमिका घेणार आहे? तसेच बँका वाचविण्यासाठी राज्य शासनाकडून कोणते प्रयत्न केले जाणार आहेत ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अत्यंत महत्वाचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. सातत्याने त्या संस्था अडचणीत आलेल्या आहेत, जिल्हा बँका अडचणीत आलेल्या आहेत, राज्य सहकारी बँका सुध्दा अडचणीत आलेल्या आहेत. त्यामुळे

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील..... ता.प्र.क्र.2852.....

वनटाईम सेटलमेंट करण्याच्या संदर्भातील पॉलिसी आपल्याला तयार करावी लागेल. वन टाईम सेटलमेंट पॉलिसी तयार करीत असतांना ब-याच वेळा असे होते की, यासंदर्भात नाबार्डचे काही निकष असतात, आरबीआयचे काही निकष असतात तसेच जिल्हा बँका आणि सहकारी बँकांना नाबार्ड, आरबीआयच्या गाईडलाईन्सप्रमाणे कारवाई करावी लागत असते. यासंदर्भात एकंदरित 3875 कोटी रुपयांची गव्हर्मेंट गॅरंटीची डिफॉल्ट गॅरंटी यामध्ये आहे. हा प्रश्न केवळ 15 कारखान्यांपुरता मर्यादित नसून एकंदरित थकलेल्या कर्जाच्या बाबतीत शासनाला धोरण स्वीकारण्याची आवश्यकता आहे व त्याप्रमाणे प्रस्ताव विभागीय स्तरावर आम्ही तयार करीत आहोत ,लवकरच यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न राज्य शासन करेल.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, राज्यामध्ये 140 सहकारी कारखाने आहेत. यातील केवळ 15 साखर कारखाने अडचणीत आहेत असे माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितलेले आहे. माझ या माहिती प्रमाणे जवळ जवळ 60 साखर कारखाने अडचणीत आहेत. कारखान्याची मालमत्ता 30-40 कोटी रुपयांची असतांना कारखान्यांना 150 कोटी रुपयांचे कर्ज मंजूर झालेले आहे. काही कारखान्यांकडे तर 100-150 कोटी रुपये कर्ज आहे. या साखर कारखान्यांना कर्ज देतांना त्यासंदर्भात राज्यशासनाने हमी घेतलेली होती. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी सांगितल्या प्रमाणे ज्या बँका कर्ज वितरणामध्ये समाविष्ट झाल्या होत्या. ज्या बँकाकडे जास्त पैसे होते त्यांना वितरणासाठी शासनानेच बोलावले होते.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तेव्हा वन टाईम सेटलमेन्ट होईपर्यंत या बॅका एन.पी.ए.मध्ये जाणार नाहीत या दृष्टीने खास बाब म्हणून नाबार्डकडे राज्य सरकार प्रयत्न करण्यात येणार आहे काय ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, राज्यामध्ये 140 सहकारी साखर कारखाने नसून 162 सहकारी साखर कारखाने आहेत आणि जवळजवळ 24 खाजगी साखर कारखाने आहेत.या वर्षी जवळजवळ 102 साखर काराखाने चालू झाले आहेत आणि बाकीचे कारखाने सुरु होऊ शकले नाहीत त्यामुळे हा आकडा मोठा आहे ही गोष्ट खरी आहे. दरवर्षी या रक्कमा वाढत चालल्या आहेत त्यामुळे नाबार्डचे अधिकारी , साखर आयुक्त, सहकार विभागाचे सचिव, बॅन्केचे अधिकारी मी स्वत: आणि राज्य मंत्री यांची एकत्रित बैठक घेण्यात येईल आणि यातून कशा प्रकारे मार्ग काढता येण्या सारखा आहे यासबंधी त्या बैठकीत चर्चा करण्यात येईल. शासनाने गॅरन्टी दिलेली असल्यामुळे यातून निश्चितपणे मार्ग काढावा लागणार आहे. त्याचबरोबर असेटस मॅनेजमेन्ट कंपनीसुध्दा निर्माण करावी लागेल. एखाद्या साखर कारखान्याचा लिलाव करावयाचे म्हटल्यानंतर जमिनीची किंमत किती असावी त्याचप्रमाणे प्लॅन्ट आणि मशिनरीची किंमत किती असावी या सगळया गोष्टीचा अंतर्भाव त्यात करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर बॅन्केकडून अशीही मागणी करण्यात येते की, या कर्जाची राज्य सरकारने गॅरटी घेतली असल्यामुळे राज्य सरकारने हे पैसे द्यावेत. त्यामुळे या सदर्भात व्यापक धोरण आखण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते.त्या दृष्टीने सहकार विभाग निश्चितपणे प्रयत्न करील.

श्री.पांडुरंग फुंडकर :सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी 15 साखर कारखान्यांचा उल्लेख केलेला आहे.सन्माननीय सदस्य श्री जयंत प्र.पाटील यांनी सांगितल्या प्रमाणे बरेच सहकारी साखर कारखाने अडचणीत आलेले आहेत.15 सहकारी साखर काराखान्याना राज्य सहकारी बॅक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅका तसेच नागरी सहकारी बॅकानी सुध्दा कर्ज दिलेले आहेत याची माहिती माननीय सहकार मंत्र्यांना आहेच. ज्या सहकारी साखर कारखान्यांवर थकीत कर्ज आहेत ते कारखाने प्रायव्हेट कंपन्यांना विकण्याचा सपाटा सुरु झाला आहे.माझी माहिती जर चुकीची नसेल तर अमरावती जवळील अंबादेवी सहकारी साखर कारखाना 15 कोटी रुपयास विकला गेला होता. त्या बॅकेवर 40 ते 45 कोटी रुपयांचे कर्ज असल्यामुळे ज्या बॅकांनी या साखर कारख्ांन्यांना कर्ज दिलेले आहे त्या बॅका मात्र बुडणार आहेत. चार पाच नागरी सहकारी बॅका

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

एकत्र येऊन त्यांनी या साखर कारखान्यास कन्सोरशियम कर्ज पुरवठा केलेला आहे. या कारखान्याची किंमत 15 कोटी रुपये येत असेल तर बॅकांनी दिलेल्या कर्जाची विल्हेवाट कशी लागणार आहे ? मला माननीय मंत्री महोदयांना असे विचारावयाचे आहे की , हे साखर कारखाने विकण्याचा सपाटा आता सुरु झालेला आहे या कारखान्याची मूळ किंमत कमी येणार आहे.या साखर कारन्याला 100 कोटी रुपयांचे कर्ज दिलेले आहे आणि त्याची किंमत 30 कोटी रुपये येणार असेल तर कर्जाचे वा शेतक-यांच्या भाग भांडवलाचे काय होणार आहे.? बुलढाणा जिल्हयातील शिवशक्ती सहकारी साखर कारखान्यामध्ये गरीब शेतक-यांचे शेअर्स आहेत तेव्हा या शेअर्सचे आणि बॅकांनी दिलेल्या कर्जाचे काय होणार आहे या बाबतीत माननीय मंत्री महोदय खुलासा करणार आहेत काय

श्री.हर्षवर्धन पाटील :सभापती महोदय सन्माननीय विरोधी पक्षं नेते श्री. पांडुरंगs फुंडकर यांनी अंबादेवी सहकारी साखर कारखान्याचा उल्लेख केला असून त्या कारखान्याचे मुद्दल 14.84 लाख रुपये असून व्याजाची रक्कम 10.16 लाख रुपये झालेले आहे त्याचबरोबर शिवशक्ती सहकारी साखर कारखान्याचे मुद्दल 7.22 लाख् रुपये असून राज्य सहकारी बॅकेच्या माध्यमातून माझ्याकडे ही लेटेस्ट आकडेवारी प्राप्त झालेली आहे. मी मघाशीच सांगितले होते की, प्रथम तो कारखाना लिक्वीडिशनमध्ये असल्याचे जाहीर करतो आणि त्यानंतर सिक्युरिटायझेशन ॲक्ट नुसार प्रोसेस सुरु करतो. त्यामुळे असेट मॅनेजमेन्ट कंपनी स्थापन करण्या मागचा उदेश हाच आहे की ,वित्त विभाग, सहकारी विभाग , संबंधित बॅक तसेच त्या बॅन्केच्या कन्सोशियम असलेले इतर पार्टनर यांनी एकत्र आले पाहिजे. काही प्रकरणात राज्य सहकारी बॅक ही लीड बॅक असते तर काही प्रकरणामध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक ही लीड बॅक म्हणून काम करीत असते त्यावेळी इतर बॅकासुध्दा त्या बॅकेच्या कार्यकक्षेमध्ये येत असतात म्हणून या संदर्भात एक व्यापक धोरण आखण्याची गरज आहे. त्याचबरोबर ऑक्शन करण्याची जी पध्दत आहे त्याबाबतीत सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला होता त्या बाबतीत मी सांगू इच्छितो की, ऑक्शन करण्याच्या पध्दतीमध्ये एक सारखेपणा कशा प्रकारे आणता येईल याचा देखील विचार करावा लागणार आहे.

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्याच बरोबर एका ठराविक रक्कमेस लिलाव केल्यानंतर राहिलेल्या पैशाच्या बाबतीत काय करावयाचे ? त्याचबरेाबर सभासदांच्या शेअर्सच्या बाबतीत काय करावयाचे ? याचासुध्दा विचार करावा लागणार आहे. काही ठिकाणी स्थानिक बॅका तर काही ठिकाणी अर्बन बॅका सुध्दा कॉन्सेशियममध्ये पुढे आलेल्या आहेत तेव्हा या सगळया गोष्टींचा एकत्रितपणे विचार करावा लागणार आहे व त्यासाठी एक धोरण स्वीकारण्याची आवश्यकता आहे त्या संदर्भात विभागाच्या स्तरावर विचार सुरु असून लवकरात लवकर यासबंधीची कार्यवाही करण्याचा प्रस्ताव आणण्यात येईल.

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, छापील उत्तरामध्ये "मा. उच्च न्यायालयाचे उक्त आदेश विचारात घेता सदर प्रकरणी शासन स्तरावर कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही" असे म्हटले आहे. मा. उच्च न्यायालयाने असा निर्णय दिला की, हे कारखाने अवसानयात निघाले आहेत त्यांची मालमत्ता विकून सरकारने वसूली करावी हे उत्तर कसे येऊ शकते? राज्य सरकार सहकारी साखर कारखान्यांना भाग भांडवलाच्या स्वरुपात अर्थसहाय्य पुरविते. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व अल्पभूधारक शेतकऱ्यांना सहकारी साखर कारखान्यांचे भागभांडवलदार सदस्य होता यावे म्हणून अर्थसहाय्य देते, साधन सामुग्रीसाठी अनुदान देते, खरेदी कराचे कर्जामध्ये रुपांतर करते, साखरेच्या कमी उताऱ्यासाठी अर्थसहाय्य, अतिरिक्त वहातूक, सुकाळाच्या वर्षामध्ये गाळप न झालेल्या ऊसावर आणि साखरेच्या निर्यातीसाठी कर्ज, आणि ऊसाच्या किंमतीसाठी थकित रक्कमेच्या देयासाठी अर्थसहाय्य, अशाप्रकारे सहकारी साखर कारखान्यांनी उभारलेल्या कर्जाला शासन हमी देते. हे शासन साखर कारखान्यांसाठी एवढे सर्व करीत असतांना शासन स्तरावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही असे उत्तर कसे दिले? अशाप्रकारचे उत्तर आपण दिले असेल तर मा. उच्च न्यायालयाने आदेश दिल्यानंतर किती कारखान्यांवर जप्ती बजावली? किती कारखान्यांवर कारवाई केली? या साखर कारखान्यांना आपण अर्थसहाय्य देत असतांना त्यांच्या बाबतीत साखर आयुक्तांनी नक्की कोणत्या कारवाईची भूमिका बजावली?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, शासनाने या संदर्भात कोणती कार्यवाही केली असा प्रश्न विचारण्यात आलेला आहे. सिक्युरिटायझेशन कायद्याखाली कारवाई करण्याचे अधिकार संबंधित लीड बँकेला आहेत म्हणून तशाप्रकारचे उत्तर देण्यात आले आहे. तसेच, "15 सहकारी साखर कारखान्यांच्या बाबतीत आपण काय कारवाई केली"? असा दुसरा प्रश्न विचारण्यात आला . त्याबाबत सिक्युरिटायझेशन कायद्यांतर्गत विक्री केलेले 2 कारखाने आहेत, सिक्युरिटायझेशन कायद्याखाली मालमत्ता जप्त केलेले 6 कारखाने आहेत, आणि सिक्युरिटायझेशन कायद्याखाली नोटिस दिलेल्या कारखान्यांची संख्या 5 आहे. तसेच, या कायद्यांतर्गत नोटिस देण्यासंदर्भात 2 कारखान्यांची प्रकरणे आहेत. अशी एकूण 15 साखर कारखान्यांची ही वर्गवारी आहे. मा.उच्च न्यायालयाने विचारले आहे की, 15.4. पूर्वी आपण काय कारवाई करणार आहात?याचा अहवाल मा. उच्च न्यायालयाने मागितला आहे. त्याप्रमाणे झालेल्या कारवाईचा अहवाल मा. उच्च न्यायालयामध्ये सादर केला जाईल.

. . . D 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, ज्या लोकांचे कारखाने दिवाळखोरीमध्ये निघाले आहेत अशा व्यक्तिनी प्रायव्हेट कंपन्या स्थापन करुन हे कारखाने कमीत कमी किंमतीमध्ये विकत घेण्याचा घाट घातला आहे. त्याला प्रतिबंध करण्याचा राज्य शासन प्रयत्न करणार आहे काय?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी अशा प्रकरणांची माहिती जरुर माझ्याकडे सादर करावी. ती तपासून त्यासंबंधी जरुर ती कारवाई केली जाईल.

श्री. सय्यद जमा : सभापति महोदय, माननीय मंत्री महोदय ने कहा है कि वे "वन टाइम सेटलमेंट" की योजना बना रहे हैं. मेरा पहला प्रश्न यह है कि इसमें कितना समय लगेगा ? मेरा दूसरा प्रश्न यह है कि सिक्युरिटायझेशन एक्ट के अन्तर्गत 888 करोड़ में से कितने प्रतिशत एमाउन्ट की रिकवरी होगी ? महाराष्ट्र शासन ने बहुत पहले एक कमेटी बनाकर सिक यूनिट्स को सस्टेन किया था. उसके बाद बहुत से साखर कारखाने सिक हो गए हैं. उदाहरण के तौर पर मैं आपको बताना चाहता हूँ कि श्रीराम साखर कारखाना सिक हो गया है. मेरा तीसरा प्रश्न यह है कि जो कारखाने सिक है, ठीक ढंग से नहीं चल पा रहे हैं तो ऐसे कारखानों को चलाने के बारे में सहकार विभाग की क्या योजना है ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, या 15 सहकारी साखर कारखान्यांना सिक्युरिटायझेशन कायद्याखाली नोटिस देऊन कारवाई केली आहे. त्यामधून किती रक्कम जमा झाली आहे याची माहिती आता सांगता येणे शक्य नाही. परंतु केस टू केस कारवाई झाल्यानंतर या सभागृहाला ती माहिती सांगितली जाईल. दुसरा प्रश्न असा विचारण्यात आला की, श्रीराम सहकारी साखर कारखान्यांच्या संदर्भातील आकडेवारी याठिकाणी आहे. परंतु त्याबाबतीत तो अधिकार बँकेला आहेत. साधारणपणे आपण एकदा टेंडर काढल्यानंतर त्या टेंडरमध्ये ज्या रक्कमा येतात त्याप्रमाणे टेंडर द्यावयाचे की नाही हे ठरविण्याचा अधिकार संबंधित संस्थेला असतो. म्हणून याबाबत धोरण ठरविण्याची आवश्यकता आहे व यामध्ये पारदर्शकता आणण्याची आवश्यकता आहे. आणि याबाबत किंमती ठरवितांना सहकार विभाग, वित्त विभाग आणि संबंधित बँक यांनी एकत्रित बसून त्यासंबंधीचा निर्णय घ्यावा अशाप्रकारचे धोरण स्वीकारु.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुद्धीत प्रत / शोधनीसाठी नाही

रामटेक (जि.नागपूर) लघु सिंचन उपविभाग, रामटेक येथे सुमारे सव्वा सात कोटी रुपयांचा झालेला भ्रष्टाचार

(2) * 4750 **श्री.सय्यद ज़मा, श्री.संजय दत्त, श्री.सुभाष चव्हाण, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, प्रा.सुरेश नवले, श्री.प्रतापसिंह मोहिते-पाटील** : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) रामटेक (जि.नागपूर) लघु सिंचन उपविभाग, रामटेक येथे सुमारे सव्वा सात कोटी रुपयांचा भ्रष्टाचार करण्यात आल्यासंबंधी पोलीस स्टेशन, रामटेक येथे दिनांक 30 मार्च, 2008 रोजी वा त्या सुमारास तक्रार करुनही पोलीसांकडून अद्याप कोणतीच कारवाई झालेली नसल्याचे माहे जानेवारी, 2010 मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर भ्रष्टाचाराची त्वरीत चौकशी करुन दोषींवर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री.रमेश बागवे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता : (1) नाही.

(2) व (3) या प्रकरणी रामटेक पोलीस स्टेशन येथे मॅजि.के.नं1/10 भा.दं.वि.क.409,468,471,477 (अ) व 34 प्रमाणे दिनांक 21 जानेवारी, 2010 रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्यात 10 आरोपी निष्पन्न झाले असून त्यांनी अटकपूर्व जामीन मिळविलेला आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

सय्यद जमा : सभापति महोदय, हमारी जानकारी के मुताबिक शिकायतकर्ता ने सन् 2008 में रामटेक कोर्ट में शिकायत की थी और कोई कार्रवाई न होने पर 22 जनवरी 2010 को कोर्ट का आदेश आने के बाद पुलिस ने एफ.आई.आर. लिखी. उत्तर में लिखा है कि इन्वेस्टीगेशन जारी है. मैं यह जानना चाहता हूँ कि पुलिस द्वारा एफ.आई.आर. लिखने के बाद क्या आपने कोई डिपार्टमेंटल एक्शन लिया है ? पुलिस के द्वारा किए जाने वाले इन्वेस्टीगेशन में डिले हो रहा है तो क्या आपके डिपार्टमेंट के द्वारा इस बारे में कोई कार्रवाई की जा रही है ?

श्री.आर.आर:पाटील : सभापती महोदय, यामधील जो फिर्यादी आहे, तक्रारकर्ता आहे त्याचे नाव श्री.देवीदास जगन्नाथ जोशी असे आहे. हा त्याच विभागामध्ये डेप्युटी इंजिनिअर म्हणून काम करीत होता. याला खालच्या कर्मचाऱ्यांनी भ्रष्टाचार करतो म्हणून पैसे घेत असताना रंगेहाथ पकडून दिले. त्यानंतर तो निवृत्त झाल्यावर ज्यांनी त्याला पैसे घेताना पकडून दिले अशा लोकांविरुध्द त्याने अनेक वेळा तक्रारी केल्या. याबाबतीत जिल्हा परिषदेकडे तक्रार केल्यानंतर जिल्हा परिषदेने वेगवेगळया समित्या नेमून यामध्ये भ्रष्टाचार झालेला आहे काय ? याबाबत चौकशी केली आणि यामध्ये कुठेही भ्रष्टाचार झालेला नाही असे निष्कर्ष काढले. त्यानंतर चौकशी होत नाही म्हणून ...

. . . .ई-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

संबंधिताने कोर्टामध्ये कलम 156 (3) खाली पोलिसांनी गुन्हा नोंदवून चौकशी करावी म्हणून पोलिसांकडे तक्रारी अर्ज केला आहे. कोर्टाच्या आदेशाप्रमाणे गुन्ह्याची नोंद केली आहे आणि पोलिसांनी प्राथमिक चौकशी केलेली आहे. पण ही सर्व तांत्रिक स्वरुपाची माहिती असल्यामुळे दिनांक 12-02-2010 रोजी भूनियंत्रण कक्षाला या सगळया कामांची तपासणी करुन त्यासंबंधीचा अहवाल पोलिसांना द्यावा असे सांगण्यात आले आहे. जर त्यामध्ये कोणी दोषी आढळले तर या सगळया लोकांवर विभागीय कारवाई किंवा इंडियन पिनल कोडखाली जी कारवाई करावी लागेल, ती केली जाईल. पण यामध्ये तांत्रिकता असल्यामुळे भूनियंत्रण कक्षाने या सगळया प्रकरणांची छाननी करण्याची आवश्यकता आहे आणि तशा प्रकारची कार्यवाही सुरु आहे.

. . . .ई-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील होमगार्डस्ना गेल्या चार महिन्यांपासून वेतन न मिळाल्याबाबत करावयाची उपाययोजना

(3) * 3452 **श्रीमती उषाताई दराडे , श्री.अरुण गुजराथी, श्रीमती मधु जैन, श्री.जयप्रकाश छाजेड , श्री.मोहन जोशी , श्री.संजय दत्त , श्री.चरणसिंग सप्रा** : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील 52 हजारांवर होमगार्डस्ना गेल्या चार महिन्यांपासून (माहे सप्टेंबर ते डिसेंबर, 2009) वेतन मिळाले नसल्याची बाब दिनांक 16 जानेवारी, 2010 रोजी वा त्यासुमारास उघडकीस आली, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर होमगार्डस्ना वेतनापासून वंचित ठेवण्याची कारणे काय आहेत,

(3) तसेच सदर होमगार्डस्चे वेतन तातडीने देणेबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

श्री.रमेश बागवे, श्री.आर.आर. पाटील यांच्याकरिता : (1), (2) व (3) होमगार्ड संघटनेतील मानसेवी स्वयंसेवकांना अनुज्ञेय असलेल्या विविध भत्त्यांच्या संदर्भात, प्रलंबित भत्त्यांची रक्कम अदा करण्याच्या दृष्टीने आवश्यक तरतूद उपलब्ध करुन घेण्याची, योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे.

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, याठिकाणी होम गार्डचे प्रलंबित असलेले वेतन द्यावयाचे आहे. त्याची एकूण रक्कम किती आहे ? पुढच्या भविष्यामध्ये दर महिन्याला त्यांना ही रक्कम नियमितपणे दिली जाईल काय ? असे दोन महत्वाचे प्रश्न आहेत. तसेच होम गार्डच्या संबंधात काही वेल्फेअर योजना शासन राबविणार आहे काय ? त्याचप्रमाणे पोलीस भरतीमध्ये होम गार्डस्नां प्राधान्य देण्याच्या संदर्भात शासन विचार करणार आहे काय ?

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, पोलीस भरतीमध्ये होम गार्डनां प्राधान्य देण्यासाठी शासन नक्की प्रयत्न करीत आहे. आम्ही त्यांच्यासाठी 5 टक्के जागा रिझर्व ठेवलेल्या आहेत. 2009-2010 मध्ये 35 कोटी 10 लाख 79 हजार इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला होता. परंतु लोकसभा व विधान सभा यांच्या निवडणुकांमुळे कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी होम गार्डना अतिरिक्त कामासाठी नियुक्त करावे लागले. त्यासाठी अतिरिक्त खर्चासाठी, नियमित अनुदानातून भत्त्यासाठी नियमित रक्कम अपूरी पडली हे खरे आहे. याकरता अपूरे पडलेले अनुदान सत्वर उपलब्ध करुन त्याचे होम गार्ड यांना वाटप करण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : या अनुदानाचे वाटप कधी करणार आहात ?

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, 31 मार्चच्या अगोदर वाटप करण्यात येईल.

. . . .ई-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, राज्यातील पोलीस दलाला जे वेतन मिळत आहे आणि मला असे वाटते की, या देशामध्ये सर्वोत्तम वेतन देणारे असे महाराष्ट्र राज्य आहे. महाराष्ट्र राज्यातील पोलीस दलाला होम गार्डची खूप चांगल्या प्रकारे सहकार्य मिळते, मदत होते. म्हणून होम गार्डस्नां मिळणारे जे वेतन किंवा मानधन आहे, त्यामध्ये वाढ करण्यासाठी काही प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय ? तसेच शासन होम गार्डच्या मानधनात किती वाढ करणार आहे?

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे या गोष्टीचा नक्कीच विचार करुन मानधनामध्ये वाढ करण्याच्या बाबतीत शासन नक्कीच विचार करील.

यानंतर कु.थोरात . . ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, गेल्या तीन-चार वर्षापासून समुद्रकिनाऱ्यावर जे मच्छिमार लोक राहतात त्यांच्या मुलांना होमगार्डमध्ये समाविष्ट करण्यासाठी मी सातत्याने याठिकाणी प्रश्न मांडत आलेली आहे. थोडयावेळा पूर्वीच माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, होमगार्डमधील पाच टक्के लोक पोलीस भरतीमध्ये घेण्यात येणार आहेत त्याबद्दल मी माननीय मंत्रिमहोदयांचे अभिनंदन करते. पण या पाच टक्के लोकांमध्ये समुद्रकिनाऱ्यावर राहणाऱ्या मच्छिमार बांधवांच्या मुलांना किती टक्के जागा देण्यात येणार आहेत याचा शासन विचार करणार आहे काय?

आर.आर.पाटील : सभापती महोदय, जे लोक होमगार्डमध्ये काम करतात त्यांना वन खात्यामध्ये गार्ड म्हणून नेमत असताना आणि पोलीस दलात भरती होत असताना पाच टक्के आरक्षण ठेवण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. याठिकाणी मानधनाच्या बाबातीत विचारण्यात आलेले आहे. सभापती महोदय, दिनांक 1-9-2009 रोजी म्हणजे नुकतेच होमगार्डचे मानधन प्रत्येक दिवसाला 200 रुपये केलेले आहे. सभापती महोदय, मूळ प्रश्न होमगार्डच्या थकीत देयकाचा आहे. यावर्षी वेगवेगळी झालेली आंदोलने, विधानसभेच्या आणि लोकसभेच्या झालेल्या निवडणुका यामुळे होमगार्डसना अनेकवेळा प्राचारण करावे लागल्यामुळे यासंदर्भात करण्यात आलेली मूळ तरतूद कमी पडलेली आहे. त्यमुळे त्यांचे पंधरा कोटी रुपये शासन देऊ शकलेले नाही. सभापती महोदय, सी.एफ. ॲडव्हान्समधून ही देयके लवकरात लवकर देण्याचा शासनाचा प्रयत्न राहील आणि ती दिली सुध्दा जातील. होमगार्डस्च्या कल्याणाच्या अनेक योजना प्रस्तावित आहेत. मी आज इतकेच सांगेन की, देशातील कुठल्याही राज्यापेक्षा महाराष्ट्रातील होमगार्डस्ना अधिक मानधन देण्याचा शासनाचा प्रयत्न राहील. हे खूप चांगले संघटन आहे. नैसर्गिक आपत्तीच्यावेळी अतिरेकी हल्ले झाल्यावरसुध्दा होमगार्डस्नी विशेष कामगिरी बजावलेली आहे.

डॉ.दीपक सावंत : नैसर्गिक आपत्तीच्यावेळी कोस्टल गार्डस् खूप उपयोगी पडतात त्यांचा देखील विचार होणे आवश्यक आहे.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, कोस्टल गार्डस् हे केंद्र शासनाचे युनिट आहे.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, कोकण किनारपट्टीवर कोस्टल गार्डस महत्वाची भूमिका बजावत आहेत तेव्हा या कोस्टल गार्डसचा विचार होण्याची आवश्यकता आहे.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, माहिती घेऊन कार्यवाही केली जाईल.

--- ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांची आहार व प्रवास भत्यांची देयके त्वरीत काढण्याबाबत करावयाची कार्यवाही

(4) * 4420 प्रा.सुरेश नवले, श्री.राजन तेली : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील पोलीस दलाचे आधुनिकीकरण व सुविधांबाबत राज्य सरकारकडून घोषणा व आश्वासनांचा भडीमार सुरु असताना दुसरीकडे त्यांच्या मुलभूत हक्कांपासून त्यांना डावलले जात असून मुख्यत: मुंबई पोलीस मुख्यालयात नियुक्तीला असलेल्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना तब्बल दीड वर्षापासून आहार व प्रवास भत्यांपासून वंचित रहावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, नऊ हजारांवर कर्मचाऱ्यांची कोट्यावधीची देयके अद्याप काढण्यात आलेली नाहीत हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, आहार व प्रवास भत्यांची देयके त्वरित अदा करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रमेश बागवे श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता : (1) व (2) बृहन्मुंबई पोलीस दलातील पोलीस कर्मचाऱ्यांची आहार व प्रवास भत्त्यांची देयके प्रलंबित आहेत, हे खरे आहे.

(3) व (4) शासनाने दि.8/3/2010 रोजी बृहन्मुंबई पोलीस दलाकरीता रुपये 5 कोटी इतके वाढीव अनुदान आहार भत्त्यासाठी मंजूर केले असून सदर अनुदान जुनी प्रलंबित देयके पारीत करण्यासाठी संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना वितरीत करण्यात आले आहे. त्याद्वारे सर्वात जुनी प्रलंबित देयके पारीत करण्यात येत आहेत. प्रलंबित प्रवास भत्त्यांच्या देयकासाठी अनुदान उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, प्रवासभत्याच्या देयकांसाठी केव्हा पर्यंत अनुदान उपलब्ध करुन देण्यात येईल? तसेच आहार आणि प्रवास भत्ता वेळेवर मिळण्यासाठी त्यामध्ये काही सुधारणा करण्यात येणार आहे काय?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, प्रत्येक वर्षी मागणी करताना निश्चित आहार भत्ता किती लागेल याचा अंदाज घेता येत नाही. कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण झाले की, पोलिसांना जास्त वेळ, दहा तासापेक्षा अधिकची डयुटी द्यावी लागते आणि दहा तासापेक्षा अधिकची डयुटी दिली की, नियमाप्रमाणे् त्याना आहारभत्ता देण्यात येतो. या वर्षी पोलिसांना दोन निवडणुकांसाठी आणि अनेक वेळा जास्तीची डयुटी द्यावी लागल्यामुळे काही निधी देय राहिला होता. पण कालच सतरा कोटी रुपये उपलब्ध झाल्यामुळे सगळया महाराष्ट्रात डी.जी. ऑफिसला जे कर्मचारी काम करीत आहेत त्यांची 31 तारखेपर्यंतची सर्व देयके देण्याइतपत पैसे विभागाकडे

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आलेले आहेत. त्यामुळे याबाबतीत कुठलीही थकबाकी राहणार नाही. मुंबईमध्ये पोलिसांना अतिरिक्त बोलावल्यामुळे येथे अपेक्षेपेक्षाही अधिकचा खर्च झाला आणि 8 कोटी रुपये अद्यापही देय आहेत. याबाबतीत माझी माननीय वित्त मंत्र्याबरोबर चर्चा झालेली आहे. सी.एफ. ॲडव्हान्समधून किंवा आता पुढच्या वर्षासाठीची अनुदाने एप्रिल नंतर मिळायला सुरुवात होईल त्यामधून प्राधान्याने ही सगळी देयके दिली जातील.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, पोलिसांच्या आहार भत्याच्या बाबतीत आणि इतर भत्यांच्या बाबतीतील हा प्रश्न आहे. मुंबई असो किंवा राज्याच्या इतर भागामध्ये ज्या वातावरणामध्ये किंवा ज्या परिस्थितीत हे पोलीस काम करीत आहेत. माननीय मंत्रिमहोदयांचे म्हणणे बरोबर आहे की, दहा तासाच्या वर डयुटी करणाऱ्या पोलिसांना हा आहार भत्ता किंवा प्रवास भत्ता लागू करतो. माझ्या माहिती प्रमाणे आज परिस्थिती अशी आहे की, जवळ जवळ 50 ते 60 टक्के पोलीस अशा पध्दतीने राऊंड द क्लॉक काम करीत आहेत. म्हणून या बाबीकडे विशेष लक्ष देण्यात यावे. याबाबतीत माननीय गृहमंत्री प्रयत्न करीत आहेत, हे खरे आहे. परंतु याबाबतीत वित्त मंत्री असतील, उप मुख्यमंत्री असतील किंवा मुख्यमंत्री असतील या बाबी थकित राहणे हे आपल्याला शोभनीय वाटत नाही. मागच्या वर्षीची देयक प्रलंबित आहेत, त्याला दीड वर्ष झालेले आहे. असे वारंवार होऊ नये यासाठी काही विशिष्ट फंड या विभागासाठी मागण्यात येणार आहे काय किंवा तशी तरतूद करण्यात येणार आहे काय?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन.

यानंतर श्री. बरवड..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

अलिबाग (जि.रायगड) तालुक्यात संजय गांधी निराधार योजनेमध्ये झालेला भ्रष्टाचार

(५) * २७३२ श्री.जयंत प्र. पाटील, श्री.कपिल पाटील : सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग (जि.रायगड) तालुक्यात संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(४) अद्याप कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. वर्षा गायकवाड, श्री.छगन भुजबळ यांच्याकरिता : (१) नाही.

अलिबाग तालुक्यात संजय गांधी योजनेअंतर्गत ३७२ लाभार्थी असून, सदर लाभार्थ्यांची बँक खाती उघडण्यात आलेली असून, अनुदानाची रक्कम त्यांच्या बँक खात्यातच जमा करण्यात येते. लाभार्थ्यांना रोख स्वरुपात रक्कम अदा करण्यात येत नसल्यामुळे भ्रष्टाचार होण्यास कोणत्याही प्रकारे वाव मिळत नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांना उत्तरामध्ये दुरुस्ती करावयाची आहे काय ?

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, नाही.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, त्या ठिकाणी भ्रष्टाचार झाला नाही असे उत्तर माननीय मंत्रिमहोदयांनी दिलेले आहे. राज्य शासनाची भ्रष्टाचाराची व्याख्या काय आहे ?

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे त्यासंदर्भात त्यांनी असे सांगितले आहे की, जे 11 लोक आहेत ते लाभ घेत आहेत. जे शासकीय सेवेमध्ये आहेत ते लाभ घेत आहेत. मला सभागृहाला सांगावयाचे आहे की, ज्यावेळी ते लाभार्थी होते, ज्यावेळी त्यांनी फॉर्म भरला आणि लाभ सुरु झाला त्यावेळी ते कामावर नव्हते. नंतरच्या काळामध्ये चार पाच वर्षानंतर 11 लोक कामाला लागले. त्यामुळे भ्रष्टाचार झालेला नाही.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, आपण मला प्रश्न डेव्हलप करण्यासाठी थोडा वेळ द्यावा. त्या ठिकाणी अलिबाग तालुक्यातील संजय गांधी निराधार योजनेच्या संदर्भात लोकशाही दिनामध्ये जिल्हा परिषदेचे अध्यक्ष श्री. पंडित पाटील यांनी तक्रार केली आणि त्यावेळेला त्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 2732 ..... श्री. जयंत प्र. पाटील ...

ठिकाणी यादी दिली. माननीय उपमुख्यमंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. जे जिल्हा परिषदेमध्ये कर्मचारी आहेत, ज्या अंगणवाडी सेविका आहेत, जे आर.सी.एफ.मध्ये कर्मचारी आहेत त्यांच्याबद्दल तक्रार केली की, त्यांना संजय गांधी निराधार योजनेचे लाखो रुपये दिले. कोट्यवधी रुपये अशा पध्दतीने वाटले. लोकशाही दिनामध्ये ही तक्रार झाली त्यानंतर अलिबागचे तहसीलदार यांनी, जे नोकरीला आहेत त्याबाबत गट विकास अधिकारी,पंचायत समिती अलिबाग यांना तेथील कर्मचारी श्रीमती वंदना किशोर पाटील तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड यांना जिल्हा परिषद येथील श्रीमती अंकिता अरविंद थळे यांच्या बाबतीत यांच्याकडून 22 हजार रुपये परत द्यावेत असे सांगितले. श्रीमती मोहिनी मोहन ओवाळ, शिरगाव यांचेही नाव आहे. जे नोकरीला आहेत, ज्यांनी पंचनामे केले ..

सभापती : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, जे पैसे गरिबांसाठी आले, जे पैसे दलितांसाठी आले ते सरकारी नोकर लाटत आहेत आणि त्याची मोठी साखळी निर्माण केली जाते. याबाबत शासनाने त्यांच्यावर कारवाई करावी म्हणून तहसीलदार सांगतात, त्या ठिकाणी अधिकारी सांगतात की, फौजदारी गुन्हे दाखल करा. त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करुन, त्यांना निलंबित करुन त्यांची सखोल चौकशी करुन शासन कारवाई करणार काय ?

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली सगळी माहिती सत्य आहे. जेव्हा अध्यक्षांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार केल्यानंतर चौकशी करण्यात आली आणि चौकशी केल्यानंतर असे आढळून आले की, जे 11 लोक दोषी आहेत ते जेव्हा लाभार्थी होते तेव्हा ते शासकीय नोकरीमध्ये नव्हते. जेव्हा आम्हाला कळले तेव्हा त्यांचे अनुदान पूर्णत: बंद केले आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे दोन्ही बाबतीत आम्ही एक चौकशी समिती नेमू आणि तहसिल ऑफीसची पूर्ण माहिती काढू, त्यांची चौकशी करु. जे लाभार्थी आहेत त्यांच्याकडून जी रक्कम दिलेली आहे ती व्याजासह वसूल करण्याचे काम सध्या सुरु आहे.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, ही बाब अतिशय गंभीर आहे. गोरगरिबांसाठी आलेले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 2732 ..... श्री. विक्रम काळे...

जे पैसे आहेत ते नोकरीमध्ये असलेल्या लोकांनी गिळंकृत केलेले आहेत. म्हणून या संपूर्ण प्रकरणाची शासन वरिष्ठांमार्फत चौकशी करणार काय ? नुसते पैसे वसूल करुन चालणार नाही तर अशा प्रवृत्ती पुन्हा वाढू नयेत म्हणून शासन त्यांच्यावर योग्य कारवाई करुन त्यांना सेवेतून निलंबित करणार काय ?

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, मी सांगितले की, अगोदरच आपण चौकशी सुरु केलेली आहे आणि त्यांच्याकडून वसुली चालू केलेली आहे. हे प्रकार जास्तीतजास्त प्रमाणात होऊ नये म्हणून आपण संगणकीकृत सिस्टिम करीत आहोत जेणेकरुन भ्रष्टाचाराचे प्रमाण कमी होईल. प्रत्यक्षात मेस्टेक कंपनीला काम दिलेले आहे. त्यांच्या माध्यमातून पूर्णत: संगणकीकृत सिस्टिम होईल आणि नंतर ते डायरेक्ट वितरित होईल.

सभापती : मी माननीय मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, यामध्ये सरळ प्रश्न असा आहे की, संजय गांधी निराधार योजनेमध्ये काही लाभार्थी असे दिसतात की, जे कोठे तरी रोजगार करतात, जे सर्व्हिसमध्ये आहेत, असे असतांना त्यांना लाभ दिला. याबाबत आपण सांगावे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, या प्रश्नासंबंधी सन्माननीय राज्यमंत्री महोदया यांनी उत्तर दिले आहे. त्याप्रमाणे फेब्रुवारी, 2010 मध्ये अलिबाग तालुक्यामध्ये संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांची पुनर्तपासणी झाली आहे. त्यामध्ये 11 लाभार्थी नोकरी करीत असताना या योजनेचा लाभ घेत असल्याचे दिसून आले. ज्यावेळी हे लाभार्थी नोकरी करीत नव्हते त्यावेळी त्यांना लाभ देण्याचे काम सुरु झाले आणि पुढे ते तसेच सुरु राहिले असे दिसून येत आहे. त्यामुळे त्यांच्याकडून सर्व पैसे वसूल करण्याचे काम सुरु आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी आता नवीन माहिती देत असताना काही नावांचाही उल्लेख केलेला आहे. त्यांनी त्यांच्याकडे असलेली माहिती जरुर माझ्याकडे द्यावी. त्याची जरुर चौकशी केली जाईल आणि जे दोषी असतील त्यांच्याविरुध्द पोलिसांमार्फत कडक कारवाई केली जाईल. पण जर शासनाकडे चुकीची माहिती कळविण्यात आली असेल तर त्याची जबाबदारी संबंधितावर निश्चित करुन त्यांच्याविरुध्द कारवाई केली जाईल.

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांनी कारवाई केली जाईल असे ठामपणे सांगितले आहे. परंतु मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने संजय गांधी निराधार योजनेबाबत एक निर्णय दिला आहे. त्यामध्ये 3 कोटी रुपयांचा अपहार झाला असल्याने शासनाला कारवाई करण्याचे निदेश देण्यात आलेले आहेत. त्याबाबत शासनाने कारवाई केली आहे काय ?

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, यासंबंधीची माहिती घेऊन ती पटलावर ठेवण्यात येईल. परंतु याबाबत अनेक वर्षांपासून तक्रारी येत आहेत, गैरप्रकार होत आहेत. हे निदर्शनास आल्याने या सिस्टिमचे कॉम्प्युटरायझेशन करुन या प्रकाराला वाव मिळणार नाही याची दक्षता घेत आहोत. या सिस्टिमच्या कॉम्प्युटरायझेशनचा प्रोजेक्ट पूर्ण केल्यास याला ब-याच प्रमाणात आळा बसू शकेल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझ्याकडे अशी अनेक नावे आहेत.

श्री.छगन भुजबळ : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, माझ्याकडे जे रेकॉर्ड आहे त्यानुसार मी उत्तर दिले आहे. आपल्याकडे असलेल्या माहितीच्या आधारे चौकशी केली जाईल आणि चुकीची माहिती असेल किंवा हेतूपुरस्सरपणे माहिती दिली असेल तर त्यासंदर्भात सुध्दा जबाबदारी निश्चित करुन कारवाई केली जाईल असे यापूर्वीच मी सांगितले आहे.

------- 2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरण करावयाची उपाययोजना

(६) * ५९५६ श्री.शिवाजीराव पाटील, श्री.विक्रम काळे, डॉ.वसंत पवार, श्री.सुभाष भोईर, श्री.परशुराम उपरकर, श्री.रामदास कदम, श्री.अनिल परब, डॉ.दीपक सावंत, श्री.किरण पावसकर : सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा महामार्ग चौपदरीकरण करण्याची गेली अनेक वर्षांची मागणी असून मुंबई-गोवा चौपदरीकरण करण्यासाठी शासनाने अद्याप जमिन संपादन केलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग चौपदरीकरणाचे काम रखडलेले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची सविस्तर कारणे काय आहेत,

(४) उक्त प्रकरणी महामार्ग चौपदरीकरण करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

श्री.अब्दूल सत्तार, श्री.छगन भुजबळ यांच्याकरिता : (१), (२), (३) व (४) मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १७ च्या चौपदरीकरणाची सतत अनेक वर्षांची मागणी आहे.

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १७ च्या पनवेल ते इंदापूर (कि.मी.००/०० ते ८४/००) च्या लांबीचे चौपदीकरण करण्यासाठीचे काम राष्ट्रीय महामार्ग विकास कार्यक्रम टप्पा-३ अंतर्गत समाविष्ट करण्यात आलेले आहे.

सदर चौपदरीकरण करण्यासाठी आवश्यक भूसंपादनाचे काम प्रगतीपथावर आहे असे प्रकल्प संचालक, भारतील राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, नाशिक यांनी कळविले आहे.

या कामाच्या निविदेबाबत नवी दिल्ली येथील भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांचे कार्यालयात ठेकेदार पात्रता विनंतीचे प्रस्तावाबाबत मुल्यमापन करणे प्रगतीपथावर आहे.

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १७ च्या पनवेल ते इंदापूर (कि.मी.८४/०० ते १६१/००) व इंदापुर ते झाराप (कि.मी.) १६१/०० ते ४५०/१७०) या लांबीतील चौपदरीकरण करण्यासाठी बांधा,वापरा व हस्तांतरित करा या तत्वावर करणेसाठी प्राथमिक आराखडे संकल्पने व तांत्रिक आणि आर्थिक शक्यतेचा अहवाल सादर करण्यासाठी तांत्रिक सल्लागार नेमणेबाबत निविदा प्राप्त झाल्या असून पुढील कार्यवाही प्रगतीत आहे.

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १७ च्या झाराप ते पत्रादेवी (कि.मी.४५०/१७० ते ४७०/६७८) या २०.५०८ कि.मी.लांबीच्या चौपदरी रस्त्याचे बांधकाम प्रगतीपथावर आहे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.17 च्या चौपदरीकरणाची मागणी अनेक वर्षांची आहे हे मान्य केल्याबद्दल मी प्रथम त्यांचे अभिनंदन करतो. मुंबई-गोवा या महामार्गाची लांबी किती कि.मी.आहे, हे सर्व काम बीओटी तत्वावर पूर्ण करणार आहे काय आणि किती दिवसात पूर्ण होणार आहे ? दुसरा प्रश्न असा आहे की, इंदापूर ते झाराप व पनवेल ते इंदापूर हे काम किती दिवसात पूर्ण होणार आहे ?

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.5956.....

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, या महामार्गापैकी गोव्याच्या बाजूने झाराप ते पत्रादेवीपर्यंतचे 20 कि.मी.चे चौपदरीकरणाचे काम सुरु झालेले आहे. या बाजूने पळस्पे-इंदापूर, इंदापूर-कशेळी घाट, कशेळी घाट-संगमेश्वर आणि झाराप-पत्रादेवी हे काम सुरु झाले आहे. पळस्पे-इंदापूर पर्यंतचे 84 कि.मी.काम आहे. हा राष्ट्रीय महामार्ग आहे. त्यामुळे प्रत्येक गोष्टीसंबंधीचा निर्णय केंद्र सरकार घेत असते. शासनामार्फत त्यांच्याकडे जास्तीत जास्त पाठपुरावा करणे, पत्र पाठविणे, बैठकीत विषय मांडणे याप्रमाणे पाठपुरावा केला जात आहे. या कामापैकी पळसपे-इंदापूर या 84 कि.मी.अंतराचे काम राष्ट्रीय महामार्ग विकास कार्यक्रम टप्पा-3 अंतर्गत समाविष्ट केलेले आहे. नंतरचा टप्पा-4 आहे.

यानंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

फिझिबिलिटी रिपोर्टचा अभ्यास झालेला आहे. आता ते काम आणखी पुढे गेलेले आहे. कॉण्ट्रॅक्टरचे प्रिकॉलिफिकेशन करण्याचे काम केन्द्र पातळीवर सुरु आहे. फेब्रुवारी 2010मध्ये या संदर्भातील निविदा केन्द्र सरकारकडे प्राप्त झालेल्या आहेत. लवकरच कॉण्ट्रॅक्टर नेमण्यात येईल. सर्वसाधारणपणे नोव्हेबर 2010मध्ये भारतीय राष्ट्रीयमार्ग प्राधिकारण, नवी दिल्ली यांच्या मार्फत.....(अडथळा)... कृपाकरुन सन्माननीय सदस्यांनी माझे उत्तर ऐकून घ्यावे. संपूर्ण उत्तर देण्याची माझी तयारी आहे. या कामाच्या संदर्भात केन्द्र सरकारकडून अभ्यास करुन, प्रिक्वॉलिफिकेशन करुन कॉण्ट्रॅक्टर फिक्स करण्याचे काम केले जाईल. त्यानंतर बँकेमार्फत पैशाची व्यवस्था करण्यासाठी 5-6 महिन्याचा कालावधी लागेल. साधारणपणे नोव्हेंबर पर्यन्त हे काम निश्चितपणे सुरु होईल. हा एक भाग झाला. इंदापूर ते कशेडी आणि कशेडी ते संगमेशवर या कामापैकी इंदापूर ते कशेडी कामासाठी सल्लागाराच्या नियुक्तीचे काम सुरु झाले. त्या कामाच्या निविदा 20.7.2009ला केन्द्र सरकारकडे प्राप्त झालेल्या आहेत. सल्लागार नेमण्याचा प्रस्ताव केन्द्र शासनाकडे गेलेला आहे. केन्द्र शासनाच्या मंजुरी नंतर सल्लागाराची नियुक्ती करण्यात येईल. सुसाध्यता अहवाल तयार झाल्यानंतर निविदा प्रक्रियेला सुरुवात होईल. कशेडी ते संगमेश्वर या कामाच्या बाबातीत 14.9.2009ला सल्लागार नियुक्तीस मंजुरी प्राप्त झालेली आहे. त्याही बाबतीत सुसाध्यता अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढची प्रक्रिया सुरु होईल. पनवेल ते इंदापूर किंवा पळस्पे ते इंदापूर या कामामध्ये कर्नाळा पक्षी अभयारण्याचा भाग येतो. या अभयारण्यातील रस्त्याची लांबी दीड कि.मी. आहे. त्याबाबतीत 6.135 हेक्टर क्षेत्र इतकी जमीन वर्ग करण्यासंबंधीचा प्रस्ताव वन्यजीव महामंडळाकडे पाठविल्या नंतर त्यांनी तो प्रस्ताव फेटाळला. एकूणच या प्रस्तावाचे पुनर्विलोकन केल्यानंतर हा अभयारण्याचा भाग बाजूला ठेवून पुढच्या भागाचे आधी चौपदरीकरण करण्याच्या कामास सुरुवात करण्याचा निर्णय घेतलेला आहे. या कामाच्या निविदा निश्चित करण्यात येत आहेत.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 17च्या संदर्भात शासनाने आपली भूमिका स्पष्ट केलेली आहे. मुंबई-अहमदाबाद किंवा मुंबई-बंगलोर किंवा नाशिक-इंदोर या महामार्गाचे काम पूर्ण होत आलेले आहे. या कामाच्या तुलनेत राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 17च्या कामाच्या निविदा

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मागविणे, कामाला सुरुवात करणे ह्या गोष्टी आधीच सुरु व्हायला हव्या होत्या. तेव्हा ही कामे करण्यासाठी विलंब झालेला आहे असे मंत्री महोदयांना वाटत नाही काय ? राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 17चे काम जलद गतीने करण्यासाठी काय प्रयत्न करण्यात येणार आहेत ?

श्री. छगन भुजबळ : हे काम केन्द्र सरकारच्या अखत्यारितील आहे. सन्माननीय सदस्यांप्रमाणे मला सुध्दा हे काम लवकर व्हावे असे वाटत आलेले आहे. मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग, नाशिकवरुन जाणारा मुंबई-आग्रा मार्ग हे मार्ग अगोदर व्हायला पाहिजेत असे मलासुध्दा वाटत होते.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

परंतु ते काम झाले. त्यानंतर नाशिकचे काम झाले. त्यानंतर मुंबई-गोवा महामार्गाच्या कामासाठी आग्रह धरला होता. सन्माननीय केंद्रीय मंत्री श्री.शरद पवार साहेब मी स्वत: मिळून तत्कालीन केंद्रीय मंत्री श्री.बालू यांच्याकडे जाऊन या कामासाठी आग्रह धरला होता. परंतु कर्नाळा पक्षी अभयारण्यामुळे या गोष्टीला विलंब झाला. सातत्याने या कामासाठी आग्रह धरण्याचे काम करीत आहोत. महाराष्ट्राचे सन्माननीय नेते व केंद्रीय मंत्री सुध्दा आग्रह धरीत आहेत. इतकेच नव्हे तर आम्ही त्यांना हेही सांगितले की, चौपदरी काम पूर्ण होणार नाही. सहा पदरी कामाचे नियोजन करणे गरजेचे आहे असे सुध्दा सांगितले आहे. सातत्याने पाठपुरावा करण्याचे काम सुरु आहे. एखादे काम अगोदर सुरु होते. एखादे काम उशिरा सुरु होते. त्याबद्दलची खंत सन्माननीय सदस्यांच्या मनात आहे ती मी समजू शकतो.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, या चौपदरी रस्त्याचे काम पूर्ण होईपर्यंत सध्या अस्तित्वात असलेल्या मुंबई-गोवा महामार्गावर अनेक अपघात होत आहेत. या रस्त्याचे रुंदीकरण होईपर्यंत या रस्त्यावर असलेले पूल हे ब्रिटिश काळात बांधले गेले आहेत, त्या कामाला 100-100 वर्षे होऊन गेली आहेत. त्या पुलांची सुधारणा करण्याचा प्रस्ताव दिल्लीमध्ये रखडला आहे हे खरे आहे काय? प्रस्तावाबाबत तातडीने पाठपुरावा करुन या पुलांची सुधारणा करण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे? या मार्गावर पूल व वळण रस्ते यांची दुरुस्ती किती दिवसात केली जाणार आहे?

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, पूल जूने झाले असले तरी ते उत्तम स्थितीत असतील तर त्यामुळे अपघात होतात असे म्हणणे योग्य होणार नाही. 100-100 वर्ष जूने पूल असले तरी सुसाध्यता अहवाल तयार करण्यासाठी अभ्यास गटाची नेमणूक केली जाते. त्यासाठी किमान 9 महिन्यांचा कालावधी जातो. एखाद्या ठिकाणी मोरी किंवा वळण कमी करावयाचे, कमी जास्त ऊंची असेल तर ती एका पातळीवर आणण्याचे काम असेल, जुने पूल किती ठिकाणी आहेत, नवीन करणे किती गरजेचे आहे त्यासाठीच सुसाध्यता अहवाल तयार केला जातो. तो अभ्यास गटाचाच एक भाग आहे. सन्माननीय सदस्य म्हणतात ते सगळे प्रश्न यामध्ये अंतर्भूत केले जातात आणि त्यांचा अभ्यास करुन त्यानुसार पुढील काम सुरु होईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.5956.....

श्री.राजन तेली : सभापती महोदय, मी सन्माननीय उपमुख्यमंत्री महोदयांना मनापासून धन्यवाद देतो. त्यांनी या मार्गाबाबत सविस्तर उत्तर दिले आहे. कोकण रेल्वेने ज्याप्रमाणे महाराष्ट्रात एकाच वेळी 52 ठिकाणी काम सुरु केले त्याच पध्दतीने या रस्त्याचे काम दोन्ही बाजूंनी एकाच वेळी सुरु करण्यासाठी प्रयत्न केले जातील काय?

श्री.छगन भुजबळ : एका बाजूने काम सुरु झालेले आहे. दुसरे म्हणजे मी यापूर्वी सांगितले की, हे काम केंद्र शासनाकडे आहे. एकाच वेळी सर्व काम सुरु व्हावयाचे असेल तर पनवेल ते इंदापूर हे काम आणखी पुढे ढकलावे लागेल. पुढच्या कामांचा अभ्यास सुरु झालेला आहे. त्याचा अहवाल येणार आहे. त्यानंतर कामाला सुरुवात होणार आहे. तोपर्यंत हे काम थांबवावे असे म्हणणे बरोबर होणार नाही. त्यामुळे मी सांगितले की, साधारणपणे नोव्हेंबर महिन्यामध्ये पहिले काम निश्चितपणे सुरु होईल. कारण त्या संदर्भातील कंत्राटदारांच्या निविदा केंद्र शासनाकडे प्राप्त झालेल्या आहेत. त्याचे प्रि-क्वॉलिफिकेशन होऊन त्यांना कंत्राट देण्याचे काम लवकरच पूर्ण होईल. त्यानंतर पहिल्या टप्प्याचे पनवेल ते इंदापूर या भागाचे काम नोव्हेंबर महिन्यापर्यंत निश्चितपणे सुरु होईल. त्यानंतर पुढील काम सुरु होईल.

श्री.अनिल तटकरे : सभापती महोदय, या रस्त्याचे काम सुरु असल्यामुळे किंवा नादुरुस्त असल्यामुळे अनेक ठिकाणी अपघात होत आहेत. हा संपूर्ण महामार्ग माझ्या मतदारसंघातून जातो. या महामार्गावर उभ्या असलेल्या नादुरुस्त वाहनांवर प्रवास करणारी वाहने आदळून अपघात होऊ लागले आहेत. जी वाहने नादुरुस्त असल्यामुळे महामार्गावर उभी केली जातात अशा वाहनांवर रात्रीच्या वेळी प्रवास करणारी वाहने आदळून अनेक लोकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. दोन दिवसांपूर्वी धार्मिक कार्य आटोपून मुंबईकडे येत असलेल्या दोघा भावांना अशा प्रकारच्या अपघातामध्ये आपले प्राण गमवावे लागले आहेत.

(नंतर श्री.खर्चे...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. अनिल तटकरे ..... ता. प्र. क्र. 5956.....

15 दिवसांपूर्वी अशाच प्रकारचा एक आणखी अपघात झाला आणि एकाच कुटुंबातील व्यक्ती मृत पावल्या होत्या. या निमित्ताने माझी माननीय मंत्री महोदयांना अशी विनंती आहे की, अशा महामार्गावर ज्या बंद पडलेल्या गाड्या असतात त्यांना पाठीमागून लाईट वगैरे नसल्याने अंधारात त्यांच्यावर दुसरी वाहने आदळून पुन्हा पुन्हा असे अपघात होण्याची शक्यता असते. अशा गाड्या हलविण्याबाबत पोलिसांना आदेश देण्यात येतील काय ?

श्री. छगन भुजबळ : महोदय, अशा बंद पडलेल्या गाड्यांच्या बाबतीत जास्तीत जास्त काळजी घेण्याच्या संदर्भात पोलीस व इतर संबंधित संस्थांनाही कळविण्यात येईल.

.....2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कोकण व घाटमाथा यांचा दुवा असणारा करूळ घाटमार्ग वाहतुकीस धोकादायक बनला असल्याप्रकरणी करावयाची उपाययोजना

(7) * 3021 श्री.परशुराम उपरकर, श्री.किरण पावसकर, श्री.रामदास कदम, ॲड.अनिल परब : सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष झाल्यामुळे कोकण व घाटमाथा यांचा दुवा असणारा करूळ घाटमार्ग वाहतुकीस धोकादायक बनला आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, घाट रस्त्यांचे संरक्षक कठडे 50 प्रतिशत नामशेष झाले असून रस्त्याला लहान मोठी भगदाडे पडली आहेत तसेच धोकादायक वळणावर 20 ते 25 फूटाचे प्रचंड भगदाड पडून निम्म्याहून अधिक रस्ता तुटून गेला आहे हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, सदर घाट रस्त्याची कामे करण्याबाबत शासनाकडून कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे ?

श्री. अब्दुल सत्तार, श्री.छगन भुजबळ यांच्याकरिता : (1) हे खरे नाही.

(2) सदर घाटरस्त्यातील सुमारे 615 मी. लांबीतील संरक्षक कठडे तसेच एका मोरीची संरक्षक भिंत अतिवृष्टीमुळे कोसळली, हे खरे आहे, तथापि, सदर ठिकाणी तातडीची उपाययोजना करुन वाहतूक सुस्थितीत व सुरळीत ठेवण्यात आली आहे.

(3) सदर संरक्षक भिंत बांधणेचे काम प्रगतीपथावर असून मार्च 2010 पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, कोकणातून कोल्हापूरकडे जाणारा हा महत्वाचा रस्ता असून तो घाटात तीन चार ठिकाणी पूर्णपणे खचलेला आहे. गेल्या काही वर्षात या रस्त्यावर 27 कोटी रुपये खर्च केलेले आहेत. परंतु अशा प्रकारे सातत्याने रस्ता खचत असताना त्यावर दुरुस्ती होत असते व ती दुरुस्ती निकृष्ट दर्जाची असल्याच्या तक्रारी व पत्रव्यवहारही लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून होत आहेत. म्हणून हा रस्ता पूर्णपणे दुरुस्त करुन त्यावरील सर्व वळणे तसेच खचलेला भाग व दरी दुरुस्त करण्यासाठी भरीव निधी शासन देणार काय ? तसेच हे काम लवकरात लवकर सुरु करणार काय ?

श्री. अब्दुल सत्तार : महोदय, फक्त एकाच जागेवर 615 मीटरपर्यंत हा रस्ता खचलेला होता व त्याची दुरुस्ती करण्याचे काम चालू आहे. या कामासाठी नैसर्गिक आपत्ती सहाय्यता निधीतून 30 लाख रुपये जिल्हाधिकाऱ्यामार्फत प्राप्त झाले असून हे काम येत्या 15 एप्रिलपर्यंत पूर्ण होईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.3021.....

डॉ. दीपक सावंत : माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी 27 कोटी रुपये आतापर्यंत या रस्त्यावर खर्च झाल्याची माहिती दिली आहे. माझ्या माहितीनुसार माननीय राज्य मंत्री महोदय या रस्त्यावरुन कधी गेलेच नसावेत. ते जर या रस्त्यावरुन गेले असते तर त्यांना समजले असते की, हा रस्ता किती अरुंद आहे आणि पावसाळ्यात किती निसरडा होतो. माझा प्रश्न असा आहे की, या रस्त्याच्या दुरुस्तीबाबत तातडीने शासन कधीपर्यंत उपाययोजना करणार आहे ? तसेच चार ठिकाणी कठडे खचलेले असून ते पावसाळ्यापूर्वी दुरुस्त करण्यात येतील काय? रस्त्यावर कोठेही साईन बोर्ड दिसत नाहीत ते बोर्ड लावण्याची व्यवस्था शासन करणार काय ?

श्री. अब्दुल सत्तार : महोदय, मी त्या रस्त्यावरुन जरी गेलो नसलो तरी माझ्याकडे असलेल्या माहितीनुसार मी सांगू इच्छितो की, या कामासाठी नुकतेच जिल्हाधिकाऱ्यांमार्फत 30 लाख रुपये उपलब्ध झालेले आहेत व सदर काम येत्या 15 एप्रिलपर्यंत पूर्ण होणार आहे. तसेच सन्माननीय सदस्यांनी या रस्त्यावरील कठडे तुटल्याचे सांगितले आहे त्यांची दुरुस्ती करुन साईन बोर्ड लावण्याची व्यवस्था देखील निश्चितपणे करण्यात येईल.

....4.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विळे-भागाड (जि.रायगड) येथील शेतकऱ्यांना जमिनी परत करण्याबाबतची कार्यवाही

(8) * 3579 श्री.रामदास कदम, श्री.परशुराम उपरकर, ॲड.अनिल परब : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) विळे-भागाड (जि.रायगड) येथील जमिनी औद्योगिक वसाहत स्थापन करण्याच्या नावाखाली 20 वर्षापूर्वी अत्यंत अल्पदराने घेतल्या असून माणगाव-रोहे व पळसगाव औद्योगिक क्षेत्राच्या जमिनी एम.आय.डी.सी. अंतर्गत विकसित करण्याकरिता शासनाने अधिसुचना काढली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, शासनाच्या उक्त निर्णयामुळे शेतकऱ्यांना अनेक संकटांना सामोरे जावे लागत असल्याने शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय,

(4) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने शेतकऱ्यांना जमिनी परत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

श्री.राजेंद्र दर्डा : (1) विळे -भागाड येथील जमिनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने 20 वर्षापूर्वी योग्य तो मोबदला अदा करुन संपादित केल्या आहेत.

माणगाव-रोहा व पळसगाव या औद्योगिक क्षेत्रासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, 1961 अन्वये अनुक्रमे दि. 11.2.2009 व 25.5.2009 रोजी अधिसूचना काढली आहे.

(2) या क्षेत्राच्या संपादनामुळे बांधीत काही खातेदारांनी उपविभागीय अधिकारी, माणगाव यांच्याकडे निवेदन देऊन भूसंपादनास हरकती दिल्या आहेत.

(3) व (4) या क्षेत्राची अद्याप संयुक्त मोजणी झालेली नाही. संयुक्त मोजणीनंतर अधिनियमाच्या कलम 32 (2) नुसार या हरकतीबाबत पडताळणी करुन भूसंपादनाबाबत योग्य निर्णय शासन स्तरावर घेणे शक्य आहे.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय.....

श्री. जयंत प्र. पाटील : महोदय, 20 वर्षापूर्वी विळे-भागाड (जि.रायगड) येथील जमिनीचे संपादन केलेले आहे ही गोष्ट खरी आहे काय ? एमआयडीसीकडे कोणत्याही प्रकारचे नियोजन नव्हते तरी देखील 20 वर्षापूर्वी ही जमीन संपादित करण्याची गरज शासनाला का वाटली ?

श्री. राजेंद्र दर्डा : ही गोष्ट खरी आहे की, सन 1988 साली एक अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानंतर कलम 32 (1) नुसार सन 1990 मध्ये दुसरी अधिसूचना प्रसिध्द झाली . सन 1993-94 मध्ये या जमिनी ताब्यात मिळाल्या पण जमिनीची मागणी नसल्यामुळे सन 2005 पर्यंत जमिनीचे वाटप झाले नाही. सन 2005 नंतर मात्र प्रचंड मागणी वाढलेली आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र दर्डा ....

विळे-भागाड या औद्योगिक भागात आठ दिवसापूर्वी पास्को या कोरीयन कंपनीने 4400 कोटी रुपयांची गुंतवणूक केली असून या ठिकाणी त्यांनी परवाच भूमिपूजन देखील केलेले आहे. तसेच या ठिकाणी महाराष्ट्र सिमलेस या कंपनीने 375 कोटी रुपयांची गुंतवणूक केलेली आहे. ही गोष्ट खरी आहे की, त्या ठिकाणी अनेक दिवसापासून भूखंड पडून होते परंतु आज त्या ठिकाणी 399 भूखंडाचे वाटप झालेले असून या ठिकाणी आता कोणतेही भूखंड शिल्लक राहिलेले नाहीत.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, रायगड जिल्हयाच्या संदर्भातील याच विषयाचे प्रश्न या सभागृहात वारंवार चर्चेला आलेले आहेत. आता जमिनींचे भाव वाढलेले असल्यामुळे औद्योगिकरणासाठी शेतक-यांच्या जमिनीचा वापर होणार आहे असे म्हटले जात आहे. जमिनीचे दरामध्ये मोठया प्रमाणात फरक पडलेला आहे. त्यामुळे औद्योगिकरणासाठी ज्या जमिनींचा वापर होणार आहे त्या शेतक-यांना आपण वाढीव बाजारभावाप्रमाणे मोबदला देणार आहात काय?

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, रोहा-माणगाव औद्योगिक क्षेत्र आणि पळसगाव औद्यौगिक क्षेत्राच्या संदर्भात सहाच्या तरतुदी लागू करण्याच्या अधिसूचना 2009 मध्ये लागलेल्या आहेत. या ठिकाणी ज्या जमिनी एमआयडीसी घेणार आहे त्या जमिनी वाटाघाटीनेच घेतल्या जाणार आहेत. त्या ठिकाणी सध्या जमिनीचे जे दर आहेत ते दर लक्षात घेऊन वाटाघाटीच्या माध्यमातूनच व्यवहार होणार आहेत. इतकेच नाही तर त्या ठिकाणच्या शेतक-याला औद्यौगिकरणामध्ये भाग मिळावा म्हणून जे प्रकल्पग्रस्त आहेत त्यांना 15 टक्के डेव्हलपड् लँड देण्यात येईल. मी अजून सांगू इच्छितो की, जे प्रकल्पग्रस्त असतात त्यांचे छोटे छोटे प्लॉट वेगवेगळया ठिकाणी असतात त्यामुळे या ते सर्व प्लॉट एकत्र आणून ते स्वत:ची कंपनी सुरु करु शकतील. समजा त्या शेतक-यांजवळ पैसे नसतील तर ते 49 टक्के रक्कम बाहेरुन आणू शकतात आणि स्वत: ते उद्योगाचे मालक होऊ शकतात अशा पध्दतीची योजना एमआयडीसीने आखलेली आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, विळे-भागाड येथील जमीन परत करण्याच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी एमआयडीसीने जमिनीचे भूसंपादन केलेले असून त्यातील अनेक एमआयडीसी सुरु न होता त्या बंद पडलेल्या आहेत. बंद असलेल्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 3579.....

डॉ.दीपक सावंत...

एमआयडीसी सुरु करण्यासाठी शासन काही पॉलीसी ठरविणार आहे काय ? पैठण, कुडाळ या ठिकाणच्या एमआयडीसी बंद पडलेल्या आहेत त्यामुळे ज्या ठिकाणच्या एमआयडीसी बंद पडलेल्या आहेत त्या सुरु होण्यासाठी शासन काही धोरणात्मक निर्णय घेणार आहे काय ?

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, ज्या ठिकाणच्या एमआयडीसी बंद पडलेल्या आहेत त्या सर्व एमआयडीसीचे अहवाल मी मागितलेले आहेत. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी पैठणच्या एमआयडीसीचा उल्लेख केलेला आहे. त्यामुळे मी यासंदर्भात सांगू इच्छितो की, पैठण येथे 20-22 वर्षापूर्वी औद्योगीकरणाला चालना मिळाली होती. परंतु 1988 साली एक घटना घडल्यामुळे त्या ठिकाणचे औद्योगीकरण थांबले होते, परंतु सुदैवाने 6-8 महिन्यापासून पैठण येथील औद्योगीकरणाला चालना मिळालेली आहे. ज्या ज्या ठिकाणी एमआयडीसी बंद पडलेल्या असतील आणि त्या ठिकाणी जर विकास होत नसेल तर ती बाब निश्चितपणे तपासून घेण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, पैठणच्या एमआयडीसीचा प्रश्न जवळ 15-20 वर्षापासून प्रलंबित होता परंतु या ठिकाणी मंत्रीमहोदयांनी सांगितले की, गेल्या 6-8 महिन्यापासून तेथे उद्योगाला चालना मिळालेली आहे. म्हणजे पूर्वीचे मंत्री निष्क्रीय होते असे आपल्याला सांगावयाचे आहे काय ?

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी मला कारण नसतांना कृपया अडचणीत आणू नये कारण सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे माझे चांगले मित्र आहेत. महाराष्ट्र शासनात आतापर्यंत जे जे उद्योगमंत्री झाले त्यांनी महाराष्ट्रातील उद्योग वाढण्यासाठी सातत्याने प्रयत्न केलेला आहे तसेच युतीच्या काळात सत्ता होती त्यावेळेस सुध्दा युतीशासनाने उद्योग वाढण्यासाठी प्रयत्न केले होते एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, बेलापूर औद्योगिक क्षेत्रातील खूप मोठया जमिनी काही व्यक्तींनी हडप केलेल्या आहेत. त्यामुळे ज्यांनी औद्यौगिक क्षेत्रातील जमिनी हडप केलेल्या आहेत त्या जमिनीच्या संदर्भात शासन कारवाई करणार आहे?

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 3579.....

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, या ठिकाणी मूळ प्रश्न हा विळे-भागाडचा आहे परंतु सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी टीटीसी बद्दलचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी संबंधित विषयाच्या संदर्भात वेगळा प्रश्न उपस्थित केला तर त्याला निश्चितपणे उत्तर दिले जाईल.

यानंतर श्री. गायकवाड...

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, रायगड जिल्हयामध्ये 15 ते 16 हजार हेक्टर्स जमीन एम.आय.डी.सी.ने संपादित केली असून या जमिनीचा वापर केल्याशिवाय दुसरी जमीन संपादित केली जाणार नाही असे आश्वासन माननीय मंत्री महोदय देणार आहे काय ? त्याच बरोबर मघाशी उत्तर देतांना माननीय मंत्री महोदयांनी असे सांगितले की, संबंधित शेतक-यांना 15 टक्के विकसित जमीन देण्यात येणार आहे. त्या बाबतीत माननीय मंत्र्यांना मी विचारु इच्छितो की,गेल्या नागपूर अधिवेशनामध्ये आपण एक विधेयक मंजूर केले असून साडेबारा टक्के विकसित जमीन शेतक-यांना देण्याचा निर्णय शासनाने मागे घेतला होता. यापुढे साडेबारा टक्के विकसित जमीन न देण्याचा कायदा शासनाने केलेला असतांना माननीय मंत्री महोदय पंधरा टक्के विकसित जमीन शेतक-यांना परत देण्यासबंधी सांगत आहेत. तेव्हा हा कायदा खरा आहे की माननीय मंत्र्यांनी दिलेले उत्तर खरे आहे ?

श्री.राजेंद्र दर्डा :सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री जयंत प्र पाटील यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे त्याबाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की, त्या ठिकाणी जमीन संपादित करण्यात आल्या नंतर संपादित जागेवर उद्योग येत असतात. भविष्यात येणा-या उद्योगाचा विचार करुन त्यांना लागणा-या जमिनीची व्यवस्था अगोदर करावी लागते. त्यामुळे उद्योगाने नोंदणी केल्यानंतर मग जमिनी संपादित करणे हे योग्य नाही. म्हणून योग्य वेळी जमीन संपादित करावीच लागेल एम.आय.डी.सी.मार्फत वेळोवेळी जे ठराव करण्यात येतात त्याच्या अनुषंगाने मी ही माहिती देत आहे.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, सिंधुदूर्ग जिल्हयातील कुडाळ एम.आय.डी.सी.मध्ये औद्योगिकीकरणासाठी जागा दिली होती परंतु त्या जागेत निवासी गाळे बांधण्यात आलेले आहेत तेव्हा संबंधिताविरुध्द कारवाई करण्यात येणार आहे काय ?

श्री.राजेंद्र दर्डा : सन्माननीय सदस्यांचा प्रश्न वेगळा आहे.

श्री. एस. क्यू. ज़मा : सभापति महोदय, मेरे अभी पूछे जाने वाले प्रश्न के बारे में भी मंत्री जी ऐसा न कहे कि " हा वेगळा प्रश्न आहे ". सरकार ने पूरे महाराष्ट्र में तालुका स्तर पर कई हजार एकड़ जमीन एक्वायर की थी, वह जमीन कई सालों से अनयूज्ड है. क्या सरकार ऐसी अनयूज्ड जमीन वापस करेंगी या एस.ई.झेड. के लिए देने संबंधी कोई विचार है ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र दर्डा :सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारण्याच्या अगोदर दुस-या सन्माननीय सदस्यांनी अशाच प्रकारचा प्रश्न विचारला होता. सन्माननीय सदस्यांची अशी भावना आहे की,एखाद्या ठिकाणी एम.आय.डी.सी.साठी जागा संपादित केल्यानंतर तिचा वापर होत नसेल तर त्या संबंधीचा प्रस्ताव मागविण्यात येईल आणि त्यासबंधीचा अभ्यास करुन सबंधितांना निश्चितपणे न्याय देण्यात येईल.

श्री.एस.क्यु.जमा : एस.ई.झेड.च्या बाबतीत खुलासा करावा.

श्री.राजेंद्र दर्डा : तो प्रश्न वेगळा आहे.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 289 च्या प्रस्तावासबंधी

सभापती : नियम 289 च्या प्रस्तावासंबंधी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी थोडक्यात म्हणणे मांडावे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मी नियम 289 अन्वये प्रस्ताव दिला असून तो प्रस्ताव मुंबईच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा आहे. मुंबईमध्ये 1100 नर्सिग होम्स आज कार्यरत आहेत व ही सर्व नर्सिग होम्स जुन्या इमारतीमध्ये आहेत. 1992 पूर्वी पासून नर्सिग होम्स अस्तित्वात आलेली आहेत. या ठिकाणी दिवसाला 20 ते 25 इनडोअर पेशंटस ॲडमिट होत असतात . 31 मार्च 2010 नंतर ही नर्सिग होम्स बंद होणार आहेत. ती का बंद होणार आहेत या संदर्भातच मी नियम 289 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे.श्री.नेरकर यांनी नर्सिग होम्सच्या बाबतीत मुंबई हायकोर्टात एक याचिका दाखल केली होती. सभापती महोदय,या विषयाशी सबंधित असलेले मंत्री सभागृहात उपस्थित नाहीत.

सभापती :माननीय उप मुख्यमंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, श्री.नेरकर यांनी हायकोर्टात एक याचिका दाखल केली होती . नर्सिग होममध्ये जाण्यासाठी स्वतंत्र प्रवेशव्दार असले पाहिजे तसेच स्वतंत्र जिना असला पाहिजे.एखाद्या रुग्णाचे जर दुर्दवाने निधन झाले तर त्याला नर्सिग होममधून बाहेर नेत असतांना लोकांच्या घरासमोरुन न्यावे लागते म्हणून तेथे स्वतंत्र जिना असावा यासंदर्भात हायकोर्टात याचिका दाखल करण्यात आली होती.....

नंतर श्री.सरफरे

अशुद्धीरत प्रत / मुद्रितशोधनाधीन नाही

डॉ. दीपक सावंत...

परंतु या याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयाने डॉक्टर्सच्या नर्सिंग होमच्या बाजूने निर्णय दिला. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयामध्ये प्रकरण गेल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला की, येणा:या 31 मार्चपर्यंत म्हणजे उद्यापर्यंत राज्य सरकारने त्यामध्ये लक्ष घालून डी.सी. रुलमध्ये बदल करुन यासंबंधीचा निर्णय घेतला नाही तर या नर्सिंग होमचे लायसन्स नूतनीकरण करता येणार नाही. अशाप्रकारे मुंबईतील 1100 नर्सिंग होम आणि काही डे केअर सेंटर्सचे नूतनीकरण न झाल्यास बेकायदेशीर ठरतील. आणि डॉक्टर्सनी इलिगल प्रॅक्टिस करणे चुकीचे असल्यामुळे त्या नर्सिंग होममध्ये उपचार घेत असलेल्या 20 ते 22 लाख गरीब व मध्यमवर्गीय रुग्णांनी कुठे जायचे? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी त्यांचा मुद्दा पुन्हा सांगावा.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मी पुन्हा स्पष्ट करुन सांगतो. मुंबईमध्ये 1100 नर्सिंग होम्स जुन्या इमारतीमध्ये भाडे तत्वावर, तळ मजल्यांवर, किंवा पहिल्या मजल्यांवर आहेत. या नर्सिंग होम्सना स्वतंत्र जीना नसल्यामुळे श्री. नेरकर यांनी मुंबई उच्च न्यायालयामध्ये रिट पिटीशन केली असता, त्याबाबतचा निकाल डॉक्टरांच्या बाजूने लागला. त्यानंतर सुप्रिम कोर्टामध्ये गेल्यानंतर सुप्रिम कोर्टाने असा निर्णय दिला की, हा महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारीतील प्रश्न असल्यामुळे याबाबत 31 मार्चपर्यंत ही नर्सिंग होम्स रहावीत की नाहीत याबाबत महाराष्ट्र सरकारने निर्णय द्यावा. त्यामुळे डी.सी. रुलमध्ये बदल करण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. ज्या जुन्या इमारती आहेत त्यांच्या आर्किटेक्चरल डिझाईनप्रमाणे स्वतंत्र जीना काढणे कठीण आहे. त्यामुळे यामध्ये राज्य शासनाने लक्ष घालून डी.सी. रुलमध्ये बदल करणे आवश्यक आहे. त्यामुळे उद्या 31.3 ला त्यांची मुदत संपल्यानंतर नर्सिंग होमचे लायसन्स रीन्यू होणार नाही. त्यामुळे त्याठिक्राणी डॉक्टर्सची प्रॅक्टिस इलिगल ठरणार आहेत. मग त्याठिकाणी असलेले 20 ते 22 लाख रुग्ण कोठे जाणार? हा प्रश्न असल्यामुळे राज्य सरकारने सुप्रिम कोर्टामध्ये प्रतिज्ञापत्र सादर करुन एक वर्षाची वेळ वाढवून घ्यावी. आणि मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून डी.सी. रुलमध्ये बदल करावा. यासाठी मी याठिकाणी नियम 289 खाली प्रस्ताव मांडला आहे, त्याबाबत मंत्रिमहोदयांनी योग्य तो निर्णय घ्यावा अशी मी विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : माननीय उपमुख्यमंत्र्यांनी या संदर्भात लक्ष घालावे. सन्माननीय नगर विकास राज्यमंत्र्यांनीसुध्दा त्यांच्या विभागाचा हा प्रश्न असल्यामुळे त्यांनी सुध्दा यामध्ये लक्ष घालणे जरुरीचे आहे.

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी अतिशय महत्वाचा प्रश्न शासनाच्या निदर्शनास आणला आहे. यासंबंधी शासनातर्फे संबंधित वकिलांना कळविण्यात येईल. आणि त्यासंबंधी विचार करुन योग्य तो ठोस असा निर्णय घेण्यात येईल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, उद्या 31 मार्च असल्यामुळे त्या नर्सिंग होम्सचे लायसन्स रिनिव्ह होणार नाही. तेव्हा उद्याची शेवटची तारीख लक्षात घेता शासनाने त्याबाबत त्वरीत कार्यवाही करावी अशी माझी विनंती आहे.

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, माननीय उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या संदर्भात मला याठिकाणी निवेदन करणे कठीण आहे. परंतु मी एवढेच सांगतो की, त्या संदर्भात वकिलांशी संपर्क साधून पुढील वेळ वाढवून घेण्याच्या बाबतीत आपल्याला काय करता येईल ही बाब तपासून निर्णय घेवू.

श्री. दिवाकर रावते :सभापती महोदय, माननीय उपमुख्यमंत्र्यांनी दिलेले उत्तर बरोबर आहे. कोणत्याही कोर्टाने दिलेला निर्णय तपासल्याशिवाय उत्तर देता येणार नाही. परंतु सर्वोच्च न्यायालयाने यासंबंधी सहा महिन्यापूर्वी निर्णय दिला आहे. परंतु सहा महिने होऊन गेल्यानंतर आणि उद्या 31 तारीख समोर आलेली असतांना शासनाला याठिकाणी अगतिक व्हावे लागत आहे, याबाबत आपले प्रशासकीय अधिकारी, आपले विधी व न्याय विभाग काय करीत आहे? हा प्रश्न निर्माण झाला आहे. म्हणून उद्या करावयाच्या कार्यवाहीसंबंधी या सदनामध्ये प्रश्न निर्माण होण्याची परिस्थिती निर्माण होईपर्यंत ज्या अधिकाऱ्यांनी या शासनाला कडेलोटाच्या सीमेवर आणून ठेवले आहे त्या अधिकाऱ्यांच्या बाबतीत आपण गांभीर्याने दखल घेणार आहात की नाही?

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, आठ दिवसापूर्वी माननीय मुख्यमंत्र्यांना निवेदन सुध्दा देण्यात आले आहे.

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, या संदर्भात नोंद घेऊन उचित अशी कारवाई केली जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याचा मुद्दा.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. मोहन जोशी : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. या सभागृहाचे माजी सदस्य, ज्येष्ठ कृषी तज्ज्ञ पद्मश्री कविवर्य ना. धों. महानोर यांना पुण्यातील साहित्य संमेलनाचे उद्घाटक म्हणून अतिशय मानाने महाराष्ट्रातील सर्व साहित्यिकांच्या वतीने बोलाविण्यात आले होते. ते पुण्यामध्ये तीन दिवस होते. आणि काल 29 तारखेला रात्री ते आपल्या गावी पोहोचले.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ते काल रात्री 29 तारखेला जेव्हा आपल्या गावाला पोहोचले, तेव्हा महावितरणच्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या घराची वीज ही त्यांचे घर उघडून तोडली आहे. एवढेच नव्हेतर त्यांच्या घरातील विजेचे मीटर सुध्दा काढून नेले असे लक्षात आले आहे. त्याठिकाणी घरामध्ये काम करणारा त्यांचा नोकर होता, जो अशिक्षित आहे, त्याने संबंधित अधिकाऱ्यांना विनंती केली आणि समजावून सांगितले की, जर तुम्ही पेपर वाचत असाल किंवा रेडिओ ऐकत असाल किंवा जर तुम्ही टी.व्ही.पहात असाल तर श्री.ना.धों. महानोरसाहेब हे पुणे येथील साहित्य संमेलनाचे उद्घाटक म्हणून उद्घाटन करीत आहेत. असे असताना तुम्ही वीज तोडू नये अशी विनंती केली असताना सुध्दा त्याठिकाणचे अधिकारी श्री.महाजन आणि त्यांच्याबरोबर असलेल्या पाच कर्मचाऱ्यांनी त्या नोकराचे म्हणणे ऐकले नाही. गावातील काही प्रतिष्ठित लोकांनी सुध्दा त्यांना विनंती केली. तरी सुध्दा त्यांनी ऐकलेले नाही. हा प्रकार महाराष्ट्राच्या दृष्टीने फार निषेधार्ह आहे, याचे कोणत्या शब्दामध्ये वर्णन करावे हे कळत नाही. सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे की, श्री.महाजन नावाचे जे अधिकारी आहेत आणि त्यांच्याबरोबरचे जे कर्मचारी आहेत, तर त्यांचे प्रमुख श्री.महाजन यांना आताच्या आता निलंबित करावे आणि नंतर त्यांची चौकशी करावी अशी मी आपल्याकडे मागणी करीत आहे.

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, सदरहू गोष्ट आज सकाळीच मला कळल्यानंतर मी संबंधित खात्याचे माननीय मंत्री महोदय श्री.अजितदादा पवार यांच्या कानावर ती घातली आहे. कारण ही खरोखरच अतिशय दुःख देणारी गोष्ट आहे. कारण श्री.ना.धों. महानोर हे पुणे येथील मराठी साहित्य संमेलनामध्ये दीप प्रज्वलन करीत होते आणि दुसरीकडे त्याच वेळेला त्यांच्या घरातील दिवा आमच्या अधिकाऱ्यांनी बंद केला, एवढेच नव्हेतर माझे सन्माननीय श्री.ना.धों.महानोर यांच्याबरोबर प्रत्यक्ष बोलणे झालेले आहे. त्यांच्याकडे कोणतेही शेतीच्या संबंधातील बिल प्रलंबित नव्हते, फक्त घराच्या संबंधातील काही पैसे राहिले असतील तर मी ते भरले असते. परंतु संबंधित अधिकाऱ्यांनी कुलूप तोडून, आतमध्ये जाऊन त्यांच्या घरातील मीटर घेऊन गेले आणि याबाबतीत उद्दामपणे गोष्टी घडलेल्या आहेत, त्याबद्दल खरोखरच खंत वाटते आणि यासंदर्भात मी सन्माननीय मंत्री महोदयांना सकाळीच फोन करुन सांगितल्यानंतर ते याबाबतीत कडक कारवाई करीत आहेत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हा अतिशय महत्वाचा विषय आहे. श्री.ना.धों.महानोर साहेबांबद्दल काही प्रश्नच नाही. संपूर्ण महाराष्ट्राला त्यांच्याबद्दल अभिमान वाटतो. ते एक ज्येष्ठ

. . . .ओ-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . ..

साहित्यिक आहेत. श्री.ना.धों.महानोर म्हणजे आमच्या ग्रामीण जीवनाचा एक चालता बोलता असा एक साहित्य संग्रह आहे. परंतु त्यांच्या घराची वीज का कापली ? हा प्रश्न निर्माण होतो. ज्यावेळेला माननीय मुख्यमंत्र्यांच्या घरातील वीज कापण्यात आली, त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी असे सांगितले होते की, माणूस कितीही मोठा असो आणि त्यावेळी संबंधितांनी आपले कर्तव्य बजावल्यामुळे त्यांनी त्या अधिकाऱ्यांना शाबासकी दिली. या राज्याच्या सरकारचे धोरण जाहीर केले म्हणून आपण संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावयाची की नाही असा जो प्रश्न उपस्थित केलेला आहे, तेव्हा माननीय मुख्यमंत्र्यांच्या मार्गदर्शनाचा तो प्रश्न आहे. याठिकाणी श्री.ना.धों.महानोर यांचा विषय नाही, सर्व महाराष्ट्राला त्यांच्याबद्दल आदर आहे. पण राज्यामध्ये जो आदर्श निर्माण केलेला आहे, आता तो आदर्श मोडणार आहात काय ? असा प्रश्न आहे.

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, मी सांगितले आहे, त्यानुसार मी स्वत: श्री.ना.धों. महानोर यांच्याशी चर्चा केली. त्यावेळी त्यांनी सांगितले की, माझ्याकडे शेतीच्या संबंधात कोणत्याही प्रकारचे बिल शिल्लक नाही. घराच्या संबंधातील जर एखादे बिल शिल्लक राहिले असेल तर त्या बाबतीत मला सांगता आले असते आणि ते बिल भरताही आले असते. परंतु मी घरी गेल्यानंतर मला हे सर्व समजले. विशेषत: संबंधित अधिकारी कुलूप तोडून आतमध्ये गेले आणि त्यांनी हे कृत्य केले हे बरोबर आहे. त्यानंतर त्याठिकाणी उद्दामपणाने काही गोष्टी घडलेल्या आहेत. तेथील गावातील लोकांनीही सांगितले की, आपण वर्तमानपत्रे वाचावीत, त्यामध्ये काय बातमी आलेली आहे ती पहावी की, पुणे येथील मराठी साहित्य संमेलनामध्ये श्री.ना.धों.महानोर हे दीप प्रज्वलन करीत आहेत आणि तुम्ही येथे असे का करीत आहात ? त्यानंतर त्यांनी जी काही उत्तरे दिलेली आहेत, ती माझ्या कानावर आलेली आहेत. त्यामुळे मी याबाबतीत संपूर्ण माहिती घेतली असून, याबाबत उचित कारवाई करण्यासाठी, कडक कारवाई करण्यासाठी संबंधित खात्याच्या मंत्री महोदयांना सांगण्यात आलेले आहे. सकाळी 8.00-9.00 वाजता यासंबंधातील सूचना देण्यात आलेल्या आहेत.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, याठिकाणी केवळ बिलाचे पेमेंट केले नाही एवढाच प्रश्न नाही. माननीय श्री.ना.धों.महानोर यांना संपूर्ण महाराष्ट्र ओळखतो आणि ते या सदनाचे अनेक वर्षे सन्माननीय सदस्य होते. ते बिल पेंडींग ठेवणारे गृहस्थ नाहीत.

यानंतर कु.थोरात . . . .

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी. देशमुख ...

तीन दिवस पर्यंत सातत्याने पुण्यामध्ये मुक्काम असल्यामुळे,सभापती महोदय, बिलाबाबत काय कारवाई करावयाची होती ती करावयास पाहिजे होती पण कुलूप तोडण्याचा अधिकार त्यांना कोणी दिलेला नाही. हे अत्यंत घृणीत अशा प्रकारचे कृत्य आहे. माझे याबाबतीत एकच म्हणणे असे आहे की, साध्या कॉमन सेन्सचा अभाव या अधिकाऱ्यांमध्ये असणे ही गोष्ट अत्यंत अयोग्य आहे. माननीय उपमुख्यमंत्र्यांनी याठिकाणी जे सांगितले ती गोष्ट निश्चित समाधानकारक अशी असली तरी माझी याबाबतीत स्पष्ट मागणी अशी आहे की, उद्या याबाबतीत या सभागृहात निवेदन झाले पाहिजे. त्याबाबतीत शासनाने काय कारवई केली आणि कोणत्या परिस्थितीत त्यांनी कुलूप तोडले हे सभागृहाला कळले पाहिजे. सभापती महोदय, हा केवढा मोठा ॲरोगन्ट्स आहे. म्हणून माझी अशी मागणी आहे की, उद्या याबाबतीत शासनाच्या वतीने याठिकाणी निवेदन केले पाहिजे.

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, मी मघाशी याबाबतीत खंत व्यक्त केलेली आहे. सनमाननीय सदस्य देशमुखसाहेब सांगतात त्याप्रमाणे निवेदन करण्यात येईल.

<u>औचित्याच्या मुद्याबाबत</u>

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मी याठिकाणी एका अत्यंत महत्वाच्या विषयावर औचित्याच्या मुद्याद्वारे सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो.

सभापती महोदय, पंढरपूरला विठोबाच्या मंदिरामध्ये सामान्यातील सामान्य माणूस आपला देव म्हणून नतमस्तक होण्यासाठी, विठोबाच्या दर्शनासाठी जातो. वारकरीपंथांचे लोक शेकडो मैल चालत विठोबाचे दर्शन घेण्यासाठी या ठिकाणी येतात. या सगळया पार्श्वभूमीवर तेथील मंदिर समितीने विठोबाचे दर्शन घेण्यासाठी देणगी ठेवलेली आहे. कमीत कमी 200 रुपये ते हजार रुपये अशा प्रकारची देणगी ठेवलेली आहे. मंदिर समितीने हा निर्णय कोणाच्या सल्ल्याने घेतला आहे हे मला माहीत नाही. पण यामुळे वारकरी पंथामध्ये विशेषत: विठोबाचे दर्शन घेणारे जे गरीब लोक आहेत त्यांच्यामध्ये एक प्रकारचे असंतोषाचे वातावरण निर्माण झालेले आहे. त्यामुळे सभापती महोदय, आपल्या माध्यमातून राज्य शासनाला माझी विनंती आहे की, यासंदर्भात त्यांनी निवेदन करावे. ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय गुरुनाथ कुलकर्णी यांनी जो औचित्याचा मुद्दा उपस्थित केलेला आहे, त्याबाबतीत दोन दिवसापूर्वी मी देखील ऐकले होते. मंदिर समितीने हा निर्णय केलेला आहे. पंढरपूरचे विठोबाचे जे देवस्थान आहे ते खरे म्हणजे अख्या महाराष्ट्राचेच नव्हे तर कर्नाटकातील लाखो भाविकांचे श्रध्दास्थान आहे. हा मध्यमवर्गीयांचा देव आहे. गरिबांचा देव आहे. लाखो लोक हजारो कि.मी अनवानी पायी चालत येतात आणि 24-24 तास बारीमध्ये उभे राहून विठोबाचे दर्शन घेतात. या संस्थानाची किंवा या मंदिराची हजारो वर्षाची परंपरा अशी आहे की, त्याठिकाणी कधीही पैसे देऊन दर्शन घेण्यास परवानगी दिलेली नाही. आता मंदिर समितीला जर पैसेच कमवायचे असतील तर त्यांनी ते महाराष्ट्र सरकारकडे मागावयास पाहिजे होते. पैसे घेऊन विठोबाचे दर्शन घेण्याचा हा एक नवीन प्रकार "तीरुपती बालाजी प्रभानगर"प्रमाणे या महाराष्ट्रात सुरु झालेला असेल तर तो वारकरी संप्रदायाच्या दृष्टीने अत्यंत वाईट आणि दु:खदायक असा निर्णय आहे. म्हणून ताबडतोबीने याबाबत शासनाने निर्णय घेऊन मंदिर समितीने घेतलेल्या निर्णयाला स्टे देऊन तो रद्द केला पाहिजे अशा प्रकारची मागणी मागणी आहे.

श्री. दीपकराव साळुंखे : सभापती महोदय, पांडुरंग हा महाराष्ट्राचे आराध्य दैवत आहे आणि गरिबांचा देव आहे. माझ्या आगोदर बोललेल्या दोन्ही सन्माननीय सदस्यांनी विनंती केलेली आहे त्याबाबतीत मी सुध्दा निश्चितपणाने सांगू इच्छितो की, हा जो निर्णय झालेला आहे तो अत्यंत दु:खदायक आहे, चुकीचा आहे. सगळया गरिबांचा तो पांडुरंग आहे. महाराष्ट्रामध्ये, देशामध्ये आणि इतर ठिकाणी काय परिस्थिती असेल मला माहीत नाही पण या निर्णयामुळे वारकरी संप्रदायामध्ये संतापाची लाट निर्माण झालेली आहे. तेव्हा हा निर्णय ताबडतोब रद्द होण्याच्या बाबतीत याठिकाणी निवेदन करण्यात यावे अशी माझी विनंती आहे.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, याबाबतीत निवेदन करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. त्याला अनुसरुन याबाबतीत एक वेगळा मुद्दा होता की, सामान्य वारकऱ्यांच्या बाबतीत अशी कुठल्याही प्रकारची आकारणी करण्यात येणार नाही. सभापती महोदय, मंदिरांतर्गत असणारे पुजारी अती महत्वाच्या व्यक्तींकडूनही पैसे घेतात.

यानंतर श्री. बरवड...

अशोधित प्रत / शोधित प्रत नाही

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील ....

अशा पध्दतीने अनधिकृतपणे पैसे गोळा करण्याचा धंदा अनेक वर्षापासून त्या ठिकाणी सुरु आहे म्हणून येणाऱ्या लोकांपैकी ज्या लोकांना लाईन सोडून किंवा मागच्या दरवाजाने दर्शन घेण्याची इच्छा असेल त्यांच्याकरिता पेड दर्शनाची सोय मंदिर समितीने केलेली आहे. मात्र त्या ठिकाणी येणाऱ्या कोणत्याही भाविकाला दर्शन घेताना कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. तशा सक्त सूचना देण्यात आलेल्या आहेत.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय त्याचे समर्थन करीत आहेत. आपण त्याचे समर्थन करु शकत नाही. यामध्ये वारकऱ्यांवर अन्याय होणार आहे. त्या ठिकाणी पैशाचा व्यवहार सुरु झाला तर वारकऱ्यांना 24 तासांऐवजी 48 तास उभे राहावे लागेल.

(काही सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात)

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : मंदिर समितीने निर्णय केलेला आहे पण मंदिर समिती शासनानेच नेमलेली आहे.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, मंदिर समितीने निर्णय केलेला आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या महाराष्ट्रामध्ये कोणतेही देवस्थान हा सर्वसामान्यांच्या भावनेचा आणि श्रध्देचा विषय असतो. त्या ठिकाणी जाईपर्यंत तो प्रचंड पैसे खर्च करीत असतो. शिर्डी संस्थानने सुध्दा असेच सुरु केले आहे. कोणाला किती दर आकारला जाईल हे त्यांनी ठरविले. ती वाळवी त्या ठिकाणी आधी सुरु झाली. त्यामुळे पहिल्यांदा आपण शिडीला हे बंद करावे. ही वाळवी आधी बंद झाली पाहिजे. शिर्डी संस्थानसह याबाबतीत निर्णय झाला पाहिजे. तेथील पदाधिकारी शासनाने नेमलेले आहेत. वाटेल ते करण्यासाठी ते स्वायत्त नाहीत. जनतेच्या हिताचा निर्णय शासनाने घेतला पाहिजे. जनतेच्या श्रध्देचा असा व्यापार आणि लिलाव होता कामा नये.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, शासनाला सन्माननीय सदस्यांच्या भावनांची पूर्णपणे जाणीव आहे. जे वारकरी सांप्रदायातील लोक आहेत, वारकरी चळवळीचे जे नेतृत्व करतात त्यांच्याबरोबर त्या समितीच्या लोकांची चर्चा झालेली होती. या ठिकाणी सन्माननीय सदस्य

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील .....

श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी या ठिकाणी प्रश्न उपस्थित केला तसेच सभागृहाने या ठिकाणी भावना व्यक्त केल्या आहेत. अशी आकारणी होत असेल तर मंदिर समितीला पुन्हा याबाबीत सरकारच्या माध्यमातून सूचना देण्यात येईल की, या प्रक्रियेला तात्पुरती स्थगिती द्यावी. वारकरी सांप्रदायातील जे लोक आहेत त्यांच्याशी चर्चा करुन ते आवश्यक तो निर्णय घेतील. परंतु तात्पुरती स्थगिती देण्याच्या संदर्भात सूचना देण्यात येईल.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना

सभापती : आज नियम 93 अन्वये ज्या सूचना आलेल्या आहेत त्यामध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, विनोद तावडे यांनी "राज्यातील पोलीस दलातील अनेक कर्मचाऱ्यांनी पोलीस उपनिरीक्षक पदासाठी बढती मिळण्यासाठी चाळणी लेखी परीक्षा, मुख्य लेखी परीक्षा, शारीरिक चाचणी व तोंडी परीक्षा उत्तीर्ण करुनही बढती देण्यात न येणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, संजय केळकर, रामनाथ मोते यांनी "सरस्वती एज्युकेशन सोसायटीव्दारा संचालित यादवराव तासगावकर इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी/फार्मसी (बीफार्म/डीफार्म) मॅनेजमेंट स्टडीज ॲण्ड रिसर्च व बिझनेस मॅनेजमेंट ही महाविद्यालये सन 2005-2006 या शैक्षणिक वर्षापासून भिवपुरी रोड, जि. रायगड येथे सुरु करण्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी "बोरीवली येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानामध्ये दि. 23 मार्च, 2010 रोजी घोडबंदर रोड, चेनाखेड्यामधील जंगलांना आग लागल्यामुळे मोठ्या प्रमाणावर वन संपत्ती जळून खाक झाल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी "शैक्षणिक क्षेत्रात मागील दशकात मोठ्या प्रमाणात गोंधळ निर्माण होऊन सामाजिक व आर्थिक प्रगती साधण्यासाठी असलेल्या शिक्षणाकडेच शासनाने केलेली डोळेझाक" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MMP/

सभापती .....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी "सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ले तालुक्यातील चिपी येथे नियोजित विमानतळासाठी 271 हेक्टर जमीन संपादित करण्यात आल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.दिलीपराव सोनवणे यांनी "सोलापूर जिल्हयातील होटगी स्टेशन येथील उस्मानिया ऊर्दू हायस्कूलच्या मुख्याध्यापकांची त्या शाळेच्या संस्था चालकांनी बेदम व अमानुष मारहाण करुन केलेली हत्या" यासंबंधी नियम 93 ची सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री कपिल पाटील, जयंत प्र.पाटील यांनी "ठाणे जिल्हयातील डहाणू जनता को-ऑप.बँक लिमिटेडच्या संचालकांनी मनमानी करुन संस्थेच्या पैशाचा मोठया प्रमाणात केलेला अपहार" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र.पाटील, व्ही.यू.डायगव्हाणे, कपिल पाटील यांनी "पूर्णपणे दारुबंदी असलेल्या वर्धा जिल्हयात उपहारगृह व भोजनालयात लहान मुलांच्या मार्फत ग्राहकांना खुलेआम दारु विकली जात असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "नाशिक रोड मध्यवर्ती कारागृहाच्या अधीक्षक श्रीमती स्वाती साठे आणि त्यांचे हस्तक कर्मचा-यांनी मालेगांव बॉम्ब स्फोटातील संशयित साध्वी प्रज्ञा सिंग यांच्यावर भीषण अत्याचार करुन त्यांना मरणाच्या दारात लोटले जात असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

इतर सर्व सूचनांना मी दालनात अनुमती नाकारली आहे.

यानंतर आज नियम 93 अन्वयेच्या सूचनेवरील दोन निवेदनांवर प्रश्नोत्तरे होणार आहेत.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, दोन दिवसांपूर्वी आमचे निवेदन आले होते, परंतु ते पुढे ढकलले होते. तथापि, ते आजपर्यंत चर्चेसाठी आलेले नाही.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, पहिल्या दिवसाचे निवेदन आजपर्यंत चर्चेला आलेले नाही.

सभापती : मी नियम 93 च्या ज्या ज्या सूचनांवर शासनाला निवेदन करावे असे सांगितले आहे, त्यापैकी जी निवेदने अद्याप आलेली नाहीत अशी निवेदने या आठवडच्या अखेरपर्यंत चर्चेसाठी कशी येतील यादृष्टीने मी जरुन पाहीन.

3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : राज्य परिवहन महामंडळाला विविध कराच्या रुपाने राज्य शासनाला मोठी रक्कम द्यावी लागणे

मु. शी. : राज्य परिवहन महामंडळाला विविध कराच्या रुपाने राज्य शासनाला मोठी रक्कम द्यावी लागणे याबाबत सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, विनोद तावडे वि. प. स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (परिवहन मंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, विनोद तावडे यांनी " राज्य परिवहन महामंडळाला विविध कराच्या रुपाने राज्य शासनाला मोठी रक्कम द्यावी लागणे या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती: निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...4...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, शासनाने या निवेदनात उत्तर दिले आहे की, "महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसला या कराच्या कार्यकक्षेतून वगळण्याची बाब शासन स्तरावर तपासण्यात येत आहे." यासंबंधीची पडताळणी करुन किती दिवसात निर्णय घेतला जाणार आहे ? माझा दुसरा प्रश्न असा आहेह की, आंध्र प्रदेश व इतर राज्यांचा प्रवासी कराचा दर 7.70 टक्के इतका आहे. राज्य परिवहन महामंडळाचा प्रवासी कराचा दर प्रवासभाडे रक्कमेच्या 17.5 टक्के इतका असल्याचे मान्य केलेले आहे. ख-या अर्थाने या महामंडळाला सक्षम करण्यासाठी प्रवासी कराचा दर इतर राज्याप्रमाणे कमी केला जाईल काय ?

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, प्रवासी कर वसूल करुन खाजगीकरणाच्या माध्यमातून रोडचे काम चालू आहे. हा वाहन कर सगळयाच गाडयांकडून गोळा करावा अशी सूचना होती. पहिल्यांदाच ही योजना तयार करण्यात आली त्यावेळी एस.टी.ला वगळण्याच्या स्पष्टपणे उल्लेख नव्हता. म्हणून वर्षाला साधारणपणे 60 कोटींचा भूर्दंड आहे. म्हणून संबंधित विभागाला तसा प्रस्ताव पाठविला आहे. एक महिन्यामध्ये मंत्रिमंडळासमोर जाऊन अंतिम निर्णय होईल. महामंडळाकडून 17.5 टक्के प्रवासी कर आकारला जातो. परंतु महामंडळाकडून 650 कोटींच्या विविध प्रकारच्या वर्गाला प्रवासात सवलती दिलेल्या आहेत. मग विद्यार्थी असतील, स्वातंत्र्य सैनिक असतील, वृध्द व्यक्ती असतील, महाविद्यालयीन विद्यार्थी असतील. या सर्वांना प्रवास सवलत दिली जाते. त्यामुळे या वसुलीसाठी ही रक्कम आकारण्याची आवश्यकता आहे. अन्य राज्यात अशा सवलती दिल्या जातात की नाही हे मी तपासले आहे. या 17.5 टक्क्यात 5.5 टक्के राज्य सरकारचे अनुदानच आहे. वेगवेगळया भांडवली खर्चाकरिता, गाडया खरेदी करण्यासाठी तो खर्च होतो. त्यामुळे 12 टक्क्याची गॅप शिल्लक राहते. हा गॅप आणखी कमी कशी करता येईल यादृष्टीने राज्य स्तरावर विचार सुरु आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.शिगम.....

श्री. दिवाकर रावते : एस.टी.चा तोटयात असलेला प्रवास बंद होऊन ती नफ्यामध्ये धावायला लागल्याबद्दल मी माननीय परिवहन मंत्र्यांचे अभिनंदन करतो. हा एस.टी.चा नफा 10 पटीने वाढण्याच्या दृष्टीने तसेच होणारी अवैध वाहतूक रोखून एस.टी.ला पुनश्च भरभराटीचे दिवस येण्याकरिता शासन कोणते प्रयत्न करणार आहेत ? अवैध वाहतूक रोखण्यासाठी कोणते धोरण अवलंबिण्यात येणार आहे ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : अवैध वाहतुकीच्या बाबतीत या सभागृहामध्ये आणि बाहेर देखील अनेक वेळा चर्चा झालेली आहे. अवैध वाहतुकीच्या बाबतीत नवीन धोरण राज्य सरकारला आणता येईल. अवैध वाहतुकीच्या माध्यमातून राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे होणारे नुकसान विचारात घेता या अवैध वाहतुकीच्या बाबतीत महिन्याभरामध्ये राज्य शासन नवीन धोरण आणीत आहे.

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : आंबेरी,ता.कुडाळ (जि.सिंधुदुर्ग) येथील रानटी हत्तीचा सुळा उपवनसंरक्षक, सावंतवाडी यांनी कापणे

मु.शी. : आंबेरी,ता.कुडाळ (जि.सिंधुदुर्ग) येथील रानटी हत्तीचा सुळा उपवनसंरक्षक, सावंतवाडी यांनी कापणे याबाबत सर्वश्री किरण पावसकर व परशुराम उपरकर, वि.प.स. यांनी नियम 93अन्वये दिलेली सूचना

श्री. भास्कर जाधव (वने राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री किरण पावसकर व परशुराम उपरकर यांनी आंबेरी, ता.कुडाळ (जि. सिंधुदुर्ग) येथील रानटी हत्तीचा सुळा उपवनसंरक्षक, सावंतवाडी यांनी कापणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर : हत्तींच्या वारंवार होणा-या उपद्रवाबाबत शासनाने अनेक उपाययोजना केलेल्या आहेत. तरीही तेथे हत्ती आहेतच. या उपाययोजना करीत असताना हत्तीचा एक सुळा कापला गेला. हा सुळा किती काळ ठेवता येतो यासंबंधीची माहिती निवेदनामध्ये दिलेली नाही. निवेदनामध्ये मी कोल्हापूर येथील कार्यालयाला भेट दिल्याचे म्हटलेले आहे. मी कोल्हापूर कार्यालयाला कधीच भेट दिलेली नाही. या कार्यालयातील फाईल चोरीला गेल्याचे निवेदनामध्ये म्हटलेले आहे. कार्यालयातील फाईल चोरीला जात असताना लाखो रुपयांचा सुळा या कार्यालयात ठेवला गेला याबाबतची चौकशी वरिष्ठ पातळीवरुन करण्यात येणार आहे काय ?

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सदस्यांना माहीत आहे की कोकण आणि कोल्हापूरमध्ये रानटी हत्ती धुमाकूळ माजवित होते. त्यामुळे काही प्रशिक्षित हत्ती आणून तसेच विविध उपाययोजना करुन धुमाकूळ घालणा-या हत्तींना जेरबंद करण्याचा निर्णय झाला. त्यानुषंगाने दोन हत्ती पकडण्यात आले होते. हे दोन हत्ती आंबेरी बेसकॅम्पमध्ये ठेवण्यात आले. या हत्तींना एक वेगळा सेन्स असतो. त्या हत्तीच्या वासाने आजूबाजूच्या परिसरामधील एक रानटी हत्ती त्या कॅम्मध्ये आला. त्या हत्तीला जेरबंद करण्यात आले. विजयानंद चौधरी हे आसाम मधील हत्ती पकडणारे तज्ज्ञ असून आपण त्यांची हत्ती पकडण्यासाठी नियुक्ती केली होती. दोन हत्ती एकत्र ठेवल्यानंतर आणि त्यांची आपपसात झुंज झाली तर त्यांचे सुळे एकमेकांना लागून इजा होऊ शकते. म्हणून सुळयाचा अणुकुचीदारभाग कापण्यात यावा अशी चौधरी यांनी सूचना केली. त्या सूचनेवरुन हत्तीच्या दोन सुळ्यापैकी एक सुळा 15.4 सेमी आणि दुसरा 15.8 सेमी याप्रमाणे कापण्यात आला. हे कापलेले सुळे कोठे ठेवायचे हा सन्माननीय सदस्यांचा प्रश्न आहे. हे सुळे कुठे सुरक्षित ठिकाणे ठेवावेत किंवा त्यांची कशा प्रकारे विल्हेवाट लावावी यासंदर्भात वन खात्याच्या विभागांतर्गत कोणत्याही स्पष्ट सूचना नाहीत. या संदर्भात निर्णय होणे आवश्यक असताना तो निर्णय होऊ शकला नाही ही गोष्ट खरी आहे. या संदर्भात चर्चा केल्यानंतर कापलेला सुळा नष्ट करु नये त्याऐवजी तो नॅशनल सेंटर, दर्यापूर येथे ठेवण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे.

....नंतर श्री. भोगले....

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

निवेदन क्रमांक-2.....

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा प्रश्न होता की, जे सुळे कापण्यात आले त्या संदर्भात स्वत: वन संरक्षक दोषी आहेत, त्यांनी काय आदेश दिले होते? त्यांनी स्वत:च्या अधिकारात ते सुळे ठेवले. ज्या हत्तीचे सुळे कापण्यात आले ते हत्ती कुठे गेले? शासनाकडे माहिती प्राप्त झाली त्यामध्ये वन संरक्षक जबाबदार आहेत की नाहीत? त्यांच्यावर काय कारवाई करण्यात आली? आम्हाला माहिती नाही अशा प्रकारचे उत्तर दिले आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी निवेदन बारकाईने वाचले तर आम्हाला माहिती नाही असे म्हटलेले नाही हे लक्षात येईल. अशा प्रकारच्या स्पेसिफिक गाईडलाईन्स दिलेल्या नाहीत. सुळे हे खूप मौल्यवान आहेत. ते नक्की कुठे ठेवावेत याबाबत निश्चित धोरण किंवा नियम नाहीत. या संदर्भातील प्रसंग पूर्वी कधी घडलेला नसल्यामुळे निश्चित गाईडलाईन्स नव्हत्या. म्हणून वन संरक्षकांच्या कार्यालयात ते दोन सुळयांचे तुकडे ठेवले होते. त्या संदर्भात आजच निर्णय घेतला आहे की, दर्यापूर येथे इन्फॉर्मेशन सेंटर आहे त्याठिकाणी सुळे ठेवण्यात यावेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विशेष उल्लेख

पृ. शी. : नाशिक येथे बजरंगवाडी येथे वाहनांची केलेली मोडतोड

मु. शी. : नाशिक येथे बजरंगवाडी येथे वाहनांची केलेली मोडतोड याबाबत श्री.हेमंत टकले, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□□य सदस्य श्री.हेमंत टकले यां□□ विशेष उल्ले□□संबंधीची सूच□□ दिली आहे. त्यां□□ ती मांडावी.

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□□संबंधीची सूच□□ मांडतो.

दिनांक 28 मार्च, 2010 रोजी नाशिक पोलीस आयुक्त अंतर्गत बजरंगवाडी येथे अनेक वाहने उद्ध्वस्त करणे, दगडफेक करणे, त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होणे याबाबत मी विशेष उल्लेखाची सूचना मांडीत आहे. याबाबत शासनाने तातडीने दखल घेऊन योग्य ती उपाययोजना करावी अशी माझी विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मनोरा आमदार निवासामागील झोपडपट्टीवासियांना स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करुन देणे

मु. शी. : मनोरा आमदार निवासामागील झोपडपट्टीवासियांना स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करुन देणे याबाबत प्रा.सुरेश नवले, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□□य सदस्य प्रा.सुरेश नवले यां□□ विशेष उल्ले□□संबंधीची सूच□□ दिली आहे. त्यां□□ ती मांडावी.

प्रा.सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□□संबंधीची सूच□□ मांडतो.

मनोरा आमदार निवास, मुंबई येथील झोपडपट्टीमध्ये हजारो गोरगरीब नागरिक रहात आहेत. त्यांना स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध नसल्यामुळे नागरिक उघड्यावर प्रातर्विधीसाठी जातात. सदर नागरिकांना आरोग्याचा त्रास होत आहे. राज्य शासनाने हागणदारीमुक्त योजना सुरु केली असून त्याचा फायदा राज्याच्या राजधानीत होत असल्याचे आढळून येत नसल्याचे दिसून आले आहे. सदर झोपडपट्टीतील नागरिकांना स्वच्छतागृहाची सोय नसल्यामुळे मनोरा आमदार निवास येथे रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. सदर झोपडपट्टीतील सर्व नागरिकांना त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने तातडीने स्वच्छतागृहे बांधून देण्यात यावीत अशी मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मागणी करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना किमान वेतन मिळणे

मु. शी. : ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना किमान वेतन मिळणे याबाबत ॲड.उषा दराडे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्या ॲड.उषा दराडे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

ॲड.उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते.

राज्यात सुमारे 50 हजार ग्रामपंचायत कर्मचारी मागील अनेक वर्षापासून तुटपुंज्या वेतनावर काम करीत आहेत. लिपिक, पाणीपुरवठा, साफसफाई या कामासाठी कर्मचारी नियुक्त करणे, मात्र लहान ग्रामपंचायतीमध्ये सर्व कामे एकाच कर्मचाऱ्याला करावी लागणे, दिवसभर सर्व कामे करुन 600 ते 700 रुपये वेतन मिळणे, त्यामुळे सदर कर्मचाऱ्यांची होत असलेली उपासमार, पुरेसे कर्मचारी न नेमले गेल्यामुळे त्यांच्यावर पडत असलेला ताण याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना याबाबत मी विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे लक्ष वेधू इच्छिते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : सरकारी वकिलांच्या नेमणुकीबाबत होत असलेला हस्तक्षेप

मु. शी. : सरकारी वकिलांच्या नेमणुकीबाबत होत असलेला हस्तक्षेप याबाबत श्री.मोहन जोशी, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□□य सदस्य श्री.मोहन जोशी यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.मोहन जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

राज्यामध्ये विविध न्यायालयात सबळ पुराव्याअभावी 83 टक्के गुन्हेगार निर्दोष मुक्त होणे, न्यायालयात खटले दाखल झाल्यावर तपास अधिकारी सरकारी वकिलांना सहाय्य करीत नसणे, पोलीस आणि सरकारी वकिलांमध्ये परस्पर समन्वय नसणे, सरकारी वकिलांची नेमणूक करताना मोठया प्रमाणावर राजकीय हस्तक्षेप होणे, तसेच सरकारी वकिलाची निवड होताना पुरेशी काळजी न घेतल्याने अकार्यक्षम वकिलांची नेमणूक होणे, सरकारी वकील वर्षभरात किती कार्यक्षमतेने काम करतात त्याचा आढावा आवश्यक होणे, शासनाने महाअधिवक्ता यांच्या नियंत्रणाखाली एका उच्चाधिकार समितीची स्थापना करण्याचा विचार करावा व सरकारी वकिलानी 50 टक्केपेक्षा जास्त केसेस हरतील अशा वकिलांना पुढील वर्षासाठी सरकारी वकील म्हणून नेमणूक देऊ नये अशा प्रकारची शिफारस शासनाला करण्याबाबतची मी विनंती करतो.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : तुळजाभवानीच्या मंदिरातील ठेकेदारांनी मंदिर प्रशासनाला 5.82 कोटीचा गंडा घालणे

मु. शी.: तुळजाभवानीच्या मंदिरातील ठेकेदारांनी मंदिर प्रशासनाला 5.82 कोटीचा गंडा घालणे याबाबत डॉ. नीलम गोऱ्हे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते.

तुळजाभवानी मंदिराचे दैवत तसेच वेगवेगळ्या देवांच्या दर्शनाला विविध पध्दतीने पैसे मोजावे लागतात यासंबंधी सभागृहात मघाशीच चर्चा झाली. परंतु तुळजाभवानी मंदिराच्या संदर्भात जो गैरव्यवहार चालला आहे त्या अनुषंगाने 13 ठेकेदारांनी मिळून मंदिर प्रशासनाला 5 कोटी 82 लाख 8 हजार रुपयांना फसविलेले आहे. प्रत्यक्ष देवांना देखील फसविणारे हे ठेकेदार आहेत. या मंदिरात साड्यांच्या लिलावापासून दान पत्रापर्यंत बोली आणि ठेका मिळविला जातो. दैनिक लोकसत्तामध्ये या मंदिरातील गैरव्यवहाराबद्दल श्री. सरदेशमुख यांनी लेखमाला चालविली आहे. अशा प्रकारे लाखो रुपयांची या देवस्थानची फसवणूक झाली आहे आणि त्यामुळे सर्वसामान्य भाविकांच्या श्रध्देचा जो व्यापार येथे होतो त्यासंबंधात शासनाने भूमिका स्पष्ट करावी आणि विशेष करुन तुळजापूर भवानी मंदिराचा विकास करण्याच्या दृष्टीने कोट्वधी रुपयाचा निधी उपलब्ध करुन दिलेला असताना येथे झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करणे अत्यावश्यक आहे, अशी मागणी मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मुंबईत वाढत असलेली मॉल संस्कृती

मु. शी. : मुंबईत वाढत असलेली मॉल संस्कृती याबाबत डॉ. दीपक सावंत,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य डॉ. दीपक सावंत यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

महोदय, हा प्रश्न सभागृहात अनेक वेळा चर्चिला गेला आहे. तो म्हणजे मुंबईमध्ये मॉलची संस्कृती वाढत असून "मुंबईकर" आता "मॉलकर" होऊ इच्छित आहेत. मॉलमध्ये गेल्यानंतर एअर कंडिशनमधून फिरताना कधी व कुठे आग लागेल याची खात्री नाही. कारण मेराणी समितीच्या अहवालामध्ये मॉल कसा बांधावा ? मॉलमध्ये जाण्यासाठी एन्टरन्स कुठे असावा ? थिएटर कुठे असावे? रेस्टॉरंट कुठे असावे? किचन कोणत्या ठिकाणी पाहिजे ? बाहेर जाण्यासाठी मार्ग कुठे असावा ? याविषयीचे नियम गुंडाळून हे मॉल बांधले जात आहेत. अनेक वेळा सभागृहात तसेच मागील अधिवेशनात देखील मी मागणी केली होती की, मिराणी समितीचा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवावा परंतु दुर्दैवाने तो अहवाल आम्हाला मिळाला नाही. त्यानंतर मी नगरविकास विभागाचे सचिव श्री. बेंजामीन यांच्याकडे सुध्दा पत्र देऊन अहवालाची मागणी केली, प्रत्यक्ष जाऊन भेटलो तरी देखील त्यांनी मला सदर अहवाल दिला नाही. नुकतीच इन्फिनिटी मॉलला आग लागली व त्यामुळे तो मॉल तीन महिने बंद होता. त्यानंतर मुंबई महानगरपालिकेने अशा मॉल्सवर कारवाई करण्याचे ठरविले आहे. या निमित्ताने माझी शासनाला विनंती आहे की, या मेराणी समितीच्या अहवालानुसार अशा मॉल्सचे काम झाले नसेल, त्यात ज्या त्रुटी असतील त्या ताबडतोबीने सुधारुन अशा मॉल्सवर कारवाई करावी. कारण जनतेचे रक्षण करणे हे शासनाचे कर्तव्य आहे व हे कर्तव्य पार पाडताना पुन्हा अशी विनंती करतो की, मिराणी समितीचा अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवावा. अशी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मी शासनाला विनंती करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मौजे वासिंद (जि.ठाणे) येथील तरुणांची नोकरीच्या निमित्ताने झालेली फसवणूक

मु. शी. : मौजे वासिंद (जि.ठाणे) येथील तरुणांची नोकरीच्या निमित्ताने झालेली फसवणूक याबाबत श्रीमती मंदा म्हात्रे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्रीमती मंदा म्हात्रे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते.

ठाणे जिल्ह्यातील मौजे वासिंद, ता. शहापूर येथील मे. जिंदाल व शहापूर येथील मे. लिबर्टी कंपनीत 82 बेरोजगारांना सुरक्षा रक्षकांची नोकरी देण्याच्या आमिषाने पाच जणांच्या टोळक्याने माहे जानेवारी 2010 मध्ये सुमारे 1,43,500 रुपयांना फसविल्याचे उघडकीस येऊन त्यांच्यावर शासनामार्फत कोणतीच कारवाई करण्यात न येणे, त्यामुळे सदर परिसरातील सुशिक्षीत बेरोजगारांमध्ये पसरलेला असंतोष व निराशेचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे.

...4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

मु.शी.: सन 2010-2011 च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

उपसभापती : आता अर्थसंकल्पावरील चर्चा सुरु होत आहे. सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे हे अर्थसंकल्पावर आपले भाषण करतील.

(चर्चा पुढे सुरु .....

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे (नामनियुक्त) :सभापती महोदय, सन 2010-11 हे वर्ष महाराष्ट्र शासनाचे सुवर्णमहोत्सवी वर्ष असल्यामुळे सुवर्ण अक्षराने लिहिला जावा असा अर्थसंकल्प सन्माननीय अर्थमंत्र्यांनी सभागृहाला सादर केलेला आहे. या राज्यातील सर्वसामान्य जनतेच्या विकासासाठी अतिशय चांगला असा अर्थसंकल्प या ठिक्राणी सादर केल्याबद्दल मी सन्माननीय अर्थमंत्र्यांचे तसेच शासनाचे अभिनंदन करतो, स्वागत करतो.

सभापती महोदय, अर्थसंकल्पाच्या चर्चेस सुरुवात करीत असतांना सन 2010 हे महाराष्ट्र राज्याचे सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे. या सुवर्णमहोत्सवी वर्षामध्ये आमच्या शासनाची वाटचाल पुढील धोरणानुसार राहणार आहे. आर्थिक व सामाजिक विकासाच्या क्षेत्रात या राज्याचे स्थान देशात क्रमांक एकचे राखणे हा शासनाचा मुख्य हेतू आहे. हे करीत असतांना पुढील आकडेवारी पाहिल्यानंतर आपल्या लक्षात येईल की, राज्याचे अंदाजित दरडोई उत्पन्न सन 2008-09 मध्ये 54867 रुपयांचे होते आणि राष्ट्रीय दरडोई उत्पन्न 37490 रुपयांचे होते. सन 2014 पर्यंत आघाडी शासनाच्या हातात जनतेने ज्या विश्वासाने सत्ता दिली तो विश्वास टिकविण्यासाठी या आघाडी शासनाने सन 2014 पर्यंतचे दरडोई उत्पन्न 1 लाखापर्यंत वाढविण्याचे नियोजन केलेले असल्यामुळे मी सर्वप्रथम आघाडी शासनास धन्यवाद देतो.

सभापती महोदय, शालेय शिक्षण व महिला व बाल विकास, ग्रामीण विकास, शेती, पर्यावरण अशा किती तरी विभागांसाठी शासनाने भरीव तरतूद केलेली आहे. महाराष्ट्र राज्यातील 65 टक्के जनता ही शेती व्यवसायावर अवलंबून आहे. त्यामुळे या शासनाने शेतीसाठी जी भरीव तरतूद केली त्याबद्दल मी या आघाडी शासनाचे खास अभिनंदन करतो. या आघाडी शासनाने शेतीच्या विकासासाठी जलसिंचनाचे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी 7366 कोटी रुपयांची तरतूद या अर्थसंकल्पात केलेली आहे. राज्याचा विकास झपाटयाने करण्यासाठी या आघाडी शासनाने भरीव पावले उचललेली आहेत. त्यामुळे यासंदर्भात मला असे सूचवावयाचे आहे की, जलसंधारणाचे काम घेत असतांना या राज्यात जे कायम दुष्काळी तालुके आहेत त्या ठिकाणी अग्रक्रमाने जलसंधारणाचे कामे हाती घेतली जाणे फार आवश्यक आहे. शाहू, फुले आणि आंबेडकरांचे नाव

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे .....

घेऊन हे आघाडी शासन राज्य करीत आहे. त्यामुळे या आघाडी शासनाने अनुसूचित जातीसाठी 3461 कोटी रुपये तसेच अनुसूचित जमाती व आदिवासींचा विकास करण्यासाठी 3020 कोटी रुपयांचे नियोजन केलेले आहे. या राज्यातील मागासलेल्या समाजाच्या विकासासाठी भरीव तरतूद या आघाडी शासनाने केलेली आहे. तसेच या राज्यात भटक्या व विमुक्त जातींची संख्या मोठी असल्याने त्यांच्यासाठी सुध्दा भरीव अशी तरतूद या शासनाने करावी, अशी सूचना मला करावीशी वाटते.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे...

राज्याच्या वार्षिक योजनेमध्ये 53 टक्के वाढ करुन 3 हजार 816 कोटी रुपयांची वार्षिक योजना सादर करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील जनतेच्या विकासाकरिता हे शासन प्रयत्न करीत आहे ही बाब निश्चितपणे उल्लेखनीय व अभिनंदनीय आहे.

सभापती महोदय, मानव विकास निर्देशांक वाढविण्यासाठी 172 तालुक्यासाठी 500 कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली असून ही बाब अभिनंदनीय आहे असे मला सांगावयाचे आहे.महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेसाठी 2010-2011 सालासाठी 1378 कोटी रुपयांचे नियोजन शासनाने केलेले आहे त्यासाठी या शासनाचे मी अभिनंदन करतो .

सभापती महोदय,छत्रपती शिवाजी महाराजापासून ते अतिरेक्यांच्या गोळया छातीवर झेलून रयतेचे रक्षण करणा-या शुरांचे आणि वीरांचे आपले राज्य आहे. त्याचप्रमाणे संत ज्ञानेश्वरापासून साईबाबा,गजानन महाराज,अक्कलकोटच्या स्वामी महाराजा पर्यत धार्मिक वारसा जतन करणारे हे राज्य आहे. त्याचबरोबर राज्यात असलेल्या सर्व जनतेचे श्रध्दास्थान श्री क्षेत्र देहू,आळंदी,तुळजापूर,भंडारा डोगर,पालखीतळ, शेगावचे गजानन महाराज, जेजुरी, पैठण, श्रीक्षेत्र परशुराम,भराडी देवी माता,कुणकेश्वर इत्यादी तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी शासनाने 1230 कोटी रुपयांचे नियोजन केलेले आहे आणि या आर्थिक वर्षामध्ये 294 कोटी रुपयांची तरतूद या अर्थसंकल्पात केलेली आहे ही बाब ऐतिहासिक आणि अभिनंदनीय आहे.

सभापती महोदय, कोल्हापूर येथील जोतिबा वा इतर जी तीर्थक्षेत्रे विकास कामापासून वचित राहिली असतील त्यांच्यासाठी शासनाने निधीची तरतूद करावी अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे.

सभापती महोदय, देशाचे कृषी मंत्री आदरणीय श्री.शरद पवार यांनी देशातील शेतक-यांसाठी 72 हजार कोटी रुपयांची कर्जमाफी देऊन जगामध्ये ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.त्या कर्जमाफीच्या माध्यमातून या राज्यातील जनतेला दहा ते बारा हजार कोटी रुपयांची केन्द सरकारकडून कर्ज माफी मिळालेली आहे व राज्य सरकारने 6 हजार 250 कोटी रुपयांची कर्ज माफी दिली आहे यामुळे शेतक-यांना नवीन कर्ज घेणे सोयीस्कर झाले आहे.राज्यातील शेतक-यांना 3 हजार 507 कोटी रुपयांची कर्ज माफी झालेली आहे त्याचबरोबर केन्द्र सरकारचे 25 टक्के आणि राज्य सरकारचे अतिरिक्त 25 टक्के. अशा प्रकारे 50 टक्के अनुदानावर शेती अवजाराचे

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे..

वाटप चांगल्या प्रकारे केले जात आहे. त्याचबरोबर महापीक - 2 ही अतिशय उपयुक्त योजना राज्य सरकारने शेतक-यांसाठी सुरु केलेली आहे.

सभापती महोदय, मत्स्यव्यवसायासाठी अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम रत्नागिरी येथे सुरु करण्यात येत आहे.ही बाब अत्यंत उल्लेखनीय असून. ज्याप्रमाणे मत्स्यव्यवसायामध्ये प्रगती करणे आवश्यक आहे त्याप्रमाणे या राज्यातील शेळी मेढीचा व्यवसाय करणारे जे मेंढपाळ आहेत त्यांच्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान सुरु केले तर त्याला अधिक वाव मिळणार आहे.तेव्हा शेळी मेंढीच्या विकासासाठी तसेच मास निर्यात व दूध अंडी इत्यादीच्या विकासासाठी अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम सुरु करण्याचा शासनाने विचार करावा अशी माझी शासनाला विनंती आहे.

सभापती महोदय, माननीय पंतप्रधान पॅकेजच्या अंतर्गत 21 हजार 239 दुधाळ जनावरे वाटप करण्यात आली. त्या योजनेअंतर्गत फक्त गाई म्हशींचे वाटप करण्यात आले होते त्या बरोबरच शेळया मेंढयाचे जर वाटप करण्यात आले तर महिलांना चांगला उद्योग मिळू शकेल.

सभापती महोदय,राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत पशुसंवर्धन विभागासाठी 272 कोटी रुपये देण्यात आलेले आहेत परंतु हा निधी केन्द्र सरकारकडून आलेला आहे या निमित्ताने मला राज्य सरकारला अशी विनंती करावयाची आहे की, केन्द्र सरकारच्या 272 कोटी रुपयांच्या माध्यमातून पशुसंवर्धनाचा विकास साधत असतांना राज्य सरकारनेसुध्दा 300 कोटी रुपये टाकले पाहिजेत असे मला नमूद करावेसे वाटते.

सभापती महोदय, गोर गरिबांसाठी काम पूर्ण् करण्यांबंधी राज्य शासनाने जे वचन दिलेले आहे ते वचन पूर्ण केलेले आहे. खेळण्याच्या दुकानात गेल्यानंतर हजार वा बाराशे रुपयामध्ये बाहुलीचे घर विकत मिळते परंतु 1500 रुपयात 269 स्केअर फुटाचे खरे घर देण्याची योजना राज्य सरकारने आणली आहे. अत्यंत मौल्यवान, ऐतिहासिक आणि महत्वाची योजना राज्य सरकारने अर्थसंकल्पात सादर केली असून 2 लाख 24 हजार 324 घरे 2009-2010 मध्ये आणि 2010-2011 मध्ये 2 लाख 50 घरे बांधण्यात येण्ार आहे ही घरे बांधण्याकरिता 2009-2010 सालासाठी 1404 कोटी आणि 2010-2011 सालासाठी 1721 कोटी रुपयांचे नियोजन केलेले आहे.हे सरकार गरिबासाठी कशा प्रकारे काम करीत आहे हे आपल्याला यावरुन दिसून येईजल.

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे..

अगोदरच्या वर्षात 3 लाख 90 हजार शेंत तळी बांधण्यात आली आहेत आणि या वर्षी 2 लाख 70 हजार शेततळी बांधण्यात येणार असून त्यासाठी 124 कोटी रुपये मंजूर करण्यात आलेले आहेत.शेत तळयाप्रमाणे के.टी.बंधारे जर ग्रामीण भागात बांधण्यात आले तर शेंतक-यांना शेतीसाठी आणि पाण्यासाठी चांगला वापर होणार आहे.भारताचे स्वातंत्र्य लढयाचे केन्द्र म्हणून महाराष्ट्राकडे सारा देश आदराने पाहतो त्याचप्रमाणे महाराष्ट्र ही शुरांची, वीरांची आणि साधु संताची भूमी आहे म्हणून राष्ट्रीय पुरुषांच्या स्मारकाचे जतन करीत असतांना आवश्यक असलेली स्मारके अजूनही उभारण्यात आली पाहिजेत ज्या स्मारकाचे बांधकाम अर्धवट आहे त्याच्यासाठी भरीव निधी दिला पाहिजे.

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे....

सभापती महोदय, चौंडी येथे अहिल्याबाई होळकर यांचे स्मारक बांधण्यासाठी निधी कमी पडत आहे त्यासाठी 10 कोटींचा निधी दिला पाहिजे अशी मला सूचना करावयाची आहे. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे, व महाराष्ट्राची राजधानी आहे. या मुंबई शहरामध्ये 55 हजार कोटी पेक्षा जास्त कामे या शहरामध्ये सुरु असतांना दिल्लीकडून किंवा राज्य सरकारकडून भरीव निधी देऊन राजीव गांधी सागरी उड्डाण पूल किंवा इतर प्रकल्पांच्या माध्यमातून मुंबई हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर करण्याचा वचननामा याठिकाणी दिलेला दिसत आहे.

सभापती महोदय, वन उद्यानाची निर्मिती करीत असतांना शासनाने मान्य केल्याप्रमाणे या राज्यामध्ये वन उद्याने आदिवासींना व वनवासियांना वनावरील हक्काची जागा देत आहोत. मला त्याबाबत अशी सूचना करावयाची आहे की, या राज्यामध्ये पिढयान पिढया शेळया-मेंढीचा व्यवसाय करणारा भटकंती करणारा मेंढपाळ, धनगर समाज आहे.त्या समाजाला चराऊ कुरणे उपलब्ध नाहीत. मागील कालावधीमध्ये माननीय वनमंत्र्यांनी आश्वासन दिले, सरकारने ते मान्य केले होते की, चराऊ कुरणे उपलब्ध नसल्यामुळे हा व्यवसाय नेस्तनाबूत व्हावयास लागला आहे. चराऊ कुरणासाठी जागा नसल्यामुळे हा मेंढपाळ करणारा समाज या राज्यात आठ ते दहा महिने भटकंती करीत फिरत आहे, त्याचा विचार अर्थसंकल्पामध्ये केला पाहिजे अशी मला विनंती करावयाची आहे.

सभापती महोदय, याठिकाणी अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या बाबतीत बोलत असतांना भटक्या व विमुक्त जातींसाठी शासनाने वसतिगृहांच्या उभारणीसाठी 50 कोटींचे नियोजन केले आहे ही अभिनंदणीय बाब आहे. त्यामध्ये 10 हजार विद्यार्थ्यांना लाभ देतांना ज्याप्रमाणे आपण ऊस तोड कामगारांच्या मुलांसाठी साखर शाळा निर्माण केल्या आहेत त्याप्रमाणे शेळया-मेंढया घेऊन भटकंती करणाऱ्या लोकांच्या मुलांसाठी कुठेही शिक्षण दिले जात नाही. म्हणून माझी विनंती आहे की, अशापकारे आठ महिने भटकंती करीत फिरणाऱ्या मेंढपाळांसाठी वस्ती शाळा शासनाने सुरु कराव्यात. त्याचप्रमाणे् शासनाने भटक्या विमुक्तांसाठी शिष्यवृत्ती सुरु केली आहे. ही करीत असतांना आज या राज्यामध्ये जवळ जवळ 20 टक्के असलेला भटका, विमुक्त समाज व त्यामध्ये 15 टक्के असलेला धनगर समाज आहे, त्या समाजातील फक्त 100 मुलांच्या शिष्यवृत्तीसाठी 1 कोटींची तरतूद केली आहे. याबाबत मला अशी विनंती करावयाची आहे की, मोठया संख्येने असलेल्या या भटक्या-विमुक्त समाजाच्या उन्नतीसाठी जास्तीत जास्त नियोजन केले पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MMP/

श्री.रमेश शेंडगे...

शेवटी मी जाता जाता एवढेच सांगतो की, या समाजाला बरोबर घेऊन , सर्व जाती धर्माला बरोबर घेऊन आणि त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण केला पाहिजे. त्याच माध्यमातून या शासनाने मागील निवडणुकीपूर्वी या राज्यामध्ये विविध समाजाशी संबंधित असलेली महामंडळे आहेत, त्यांना 1100 कोटींची कर्जमाफी दिली आहे ही अभिनंदणीय बाब आहे. त्याचबरोबर या अर्थसंकल्पामध्ये महामंडळांना निधी दिल्याचे दिसत नाही. म्हणून विनंती आहे की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेळी-मेंढी महामंडळ असेल, अण्णभाऊ साठे महामंडळ असेल, वसंतराव नाईक भटक्या-विमुक्त विकास महामंडळ असेल, किंवा चर्मोद्योग विकास महामंडळ असेल या महामंडळाना यांना भरीव निधी देऊन पुन्हा एकदा समाजामध्ये आत्मविश्वास निर्माण केला पाहिजे. त्यांना भरीव कर सवलत देऊन उद्योगांना चालना देणारा हा देश राज्याला प्रथम क्रमांकावर नेणाऱ्या या अर्थसंकल्पाचे स्वागत करतो आणि मी माझे भाषण संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: पद्मश्री कविवर्य श्री. ना. धो. महानोर यांच्या निवासस्थानाचा खंडीत केलेला वीज पुरवठा

मु.शी.: पद्मश्री कविवर्य श्री. ना. धो. महानोर यांच्या निवासस्थानाचा खंडीत केलेला वीज पुरवठा या विषयावर श्री. मोहन जोशी, वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्यास अनुलक्षून माननीय ऊर्जा मंत्र्यांचे निवेदन

श्री. अजित पवार (ऊर्जा मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांनी "पद्मश्री कविवर्य श्री. ना. धो. महानोर यांच्या निवासस्थानाचा खंडीत केलेला वीज पुरवठा" या विषयासंबंधी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्यास अनुलक्षून मी पुढील निवेदन करीत आहे.

सभापती महोदय, पद्मश्री कविवर्य श्री. ना. धों. महानोर साहेबांच्या घराचे वीजेचे कनेक्शन तोडण्यात आले याबाबत माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांनी सभागृहामध्ये विषय उपस्थित केला. त्याबाबतची माहिती सभागृहाला सादर करण्यासाठी आपण मला परवानगी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे.

सभापती महोदय, औरंगाबाद जिल्हयातील सोयगाव तालुक्यामध्ये पळसखेडे येथे पद्मश्री कविवर्य ना. धों. महानोर साहेबांचे घर आहे. त्या घरासाठी घेण्यात आलेले विजेचे कनेक्शन हे त्यांचे बंधू श्री. पुंडलिक धोंडू महानोर यांच्या नावे आहे. काल ते विजेचे कनेक्शन तोडण्यात आले ही वस्तुस्थिती खरी आहे. ज्यावेळी मला सकाळी ही बातमी समजली त्यावेळी मी तात्काळ संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधला. आणि त्यांना विचारले की, एवढी मोठी व्यक्ती असतांना आपण विजेचे कनेक्शन तोडण्यापूर्वी त्यांना त्याबाबतची माहिती देणे आवश्यक होते. परंतु विजेचे कनेक्शन त्यांच्या बंधूंच्या नावे असल्यामुळे काही गोष्टी त्याठिकाणी करावयाच्या राहिल्या होत्या. त्यांच्या बंधूंना त्याप्रमाणे नोटीस दिली होती, परंतु त्यांच्याकडून ज्याप्रकारे प्रतिसाद मिळावयास पाहिजे होता त्याप्रकारे प्रतिसाद मिळाला नाही. त्यामध्ये माननीय श्री. ना. धों. महानोर साहेबांची कोणतीही चूक नाही. म्हणून आज सकाळी त्यांच्या घराचे विजेचे कनेक्शन पुन्हा जोडण्यात आले आहे. याबाबतीत ज्या अधिकाऱ्यांनी यामध्ये चूक केली असेल तो संबंधित अधिकारी आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांना मी उद्या बोलाविले आहे. त्यांच्याकडून यासंबंधी संपूर्ण माहिती घेण्यात येईल. ही माहिती घेत असतांना त्या अधिकाऱ्याकडून चूक झाल्याचे लक्षात आले तर त्यावर कारवाई करण्यात येईल.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कारण नसताना एवढया मोठया व्यक्तीला अशा प्रकारे त्रास देण्याचा शासनाचा आणि ऊर्जा विभागाचा कोणताही हेतू नाही ही गोष्ट देखील मी यानिमित्ताने सभागृहाच्या लक्षात आणून देतो. मला असे सांगण्यात आले की, त्यांच्या घराचे कुलूप तोडण्यात आले आहे. तर याबाबतीत देखील मी शहानिशा केली आहे. तेथे घर आहे आणि त्याच्या बाहेर एक कम्पाऊंड आहे. त्याला कुठेही कुलूप नव्हते. तेथे आत घरामध्ये जावेच लागत नाही तर जिन्याच्या खालीच विजेचे मीटर होते आणि तेथील संबंधित ज्युनिअर इंजिनिअर यांनी तशा प्रकारची कारवाई केली होती. परंतु ही बाब पद्मश्री श्री.ना.धों.महानोरसाहेबांच्या बाबतीत घडावयास नको होती. म्हणून मी ऊर्जा विभागाचा मंत्री या नात्याने त्याबद्दल दिलगिरी व्यक्त करतो आणि पुन्हा अशा प्रकारच्या मोठया व्यक्तींच्या बाबतीत घटना घडणार नाही याबद्दल जी काळजी, जी खबरदारी घेण्याची गरज असेल तशा प्रकारची खबरदारी आणि काळजी घेतली जाईल आणि तशा प्रकारच्या अधिकाऱ्यांना सूचना देखील देण्यात येतील.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या घटनेच्या संबंधात सन्माननीय ऊर्जा मंत्री श्री. जितदादा पवार यांनी ताबडतोब दखल घेतली, त्याबद्दल मी त्यांचे निश्चितपणे आभार मानते. पण मला आपल्याला असे सांगावयाचे आहे की, आपण स्वत: एकदा माननीय श्री.ना.धों.महानोर यांच्याशी बोलावे. कारण पळसखेडा येथे सुध्दा स्थानिक पातळीवर त्यांना त्रास देणारे बरेच लोक आहेत. त्यांना स्वत:ला आवडेल की नाही याची मला कल्पना नाही. परंतु मला असे वाटते की, त्यांच्या स्वत:च्या गावामध्ये अशा अभ्यासू व्यक्तीला, सर्जनशील व्यक्तीला सुरक्षितपणे जगता यावे म्हणून त्यांना विचारावे आणि त्यांना जर योग्य वाटत असेल तर सुरक्षिततेच्या दृष्टीने आपण काही पावले उचलावीत असेही मला सुचवावेसे वाटते. माननीय श्री.ना.धों.महानोर यांनी अशा प्रकारची कोणतीही मागणी केलेली नसली तरी सुध्दा, तुम्ही जाणकार आहात, आपल्याला कल्पना आहे. वारंवार पळसखेडा येथे त्यांना त्रास देण्याच्या घटना घडलेल्या आहेत. म्हणून त्यांच्या सुरक्षिततेच्या संबंधात शासनाने स्वत:हून काही पावले उचलावीत अशी मी विनंती करते.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गोऱ्हेताईंनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे. त्याबद्दल मी एवढेच सांगू इच्छितो की, विधानसभेमध्येही माननीय विरोधी पक्षनेते श्री.एकनाथराव गणपतराव खडसे पाटीलसाहेबांनी काही वेळापूर्वी हा मुद्दा उपस्थित

. . . .वाय-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजितदादा पवार . . . .

केला होता व त्याबाबत या राज्याचे प्रमुख या नात्याने माननीय मुख्यमंत्री महोदयांनी जे सांगितले आहे, तेच मी येथे रिपीट करतो. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी असे सांगितले की, श्री.ना.धों. महानोर यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून जी काही खबरदारी घेतली पाहिजे, कारण ती एक मोठी व्यक्ती आहे आणि ते काही स्वत: तशा प्रकारची तक्रार करीत नाहीत, नोंदवत देखील नाही आणि ते त्यांच्या मनाला पटतही नाही. पण तेथील पोलीस स्टेशनला, तेथील एस.पी.साहेबांना सांगून जे काही करता येईल, कारण ते शेतावर रहातात. त्यांचे मातीशीच एक जवळकीचे नाते आहे. त्यांनी तेथे मोठया प्रमाणात फळबाग फुलविलेली आहे. त्यांना तेथेच रहावयास आवडते. परंतु मागे काही घटना घडलेल्या आहेत ही वस्तुस्थिती खरी आहे. पण त्यामुळे त्यांना पोलिसांकडून काही संरक्षण देण्याची गरज असेल ते देण्याच्या बाबतीत राज्य शासन योग्य तो निर्णय घेईल, योग्य ती कारवाई करील असे माननीय मुख्यमंत्री महोदयांनी विधानसभेमध्ये आश्वासित केलेले आहे आणि तशा पध्दतीने निश्चितपणे कार्यवाही केली जाईल.

. . . .वाय-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

मु.शी.: सन 2010-2011 च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

(चर्चा पुढे सुरु)

श्री.पांडुरंग फुंडकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय काल पासून सदनामध्ये अर्थसंकल्पावर चर्चा सुरु झाली आहे. 25 तारखेला माननीय अर्थमंत्र्यांनी विधानसभेमध्ये आणि माननीय राज्य मंत्र्यांनी विधान परिषदेमध्ये हा अर्थसंकल्प मांडलेला आहे.

सभापती महोदय, आम्ही त्यांचे भाषण अत्यंत मन:पूर्वक ऐकलेले आहे. केवळ ते भाषण ऐकले नाही तर एकदा नाही, तर दोन वेळा ते वाचलेही आहे. त्यांनी एकंदर 33,934 कोटी रुपयांचा अर्थसंकल्प सभागृहासमोर सादर केला. आम्ही हा अर्थसंकल्प वरवर पाहिला तर राज्याचा समतोल विकास या अर्थसंकल्पातून साधला गेला पाहिजे अशी साधारणत: या अर्थसंकल्पाच्या बाबतीत सर्वसाधारण जनतेची अपेक्षा असते. हा महाराष्ट्र दहा कोटी जनतेचा आहे, पुरोगामी महाराष्ट्र आहे आणि या पुरोगामी महाराष्ट्राचा अर्थसंकल्प मांडताना राज्याचा समतोल विकास साधण्याऐवजी आम्हाला असे दिसून आले की, काही भागाचाच विकास करण्यासाठी निधी द्यावयाचा आणि सर्व योजना तेथे राबवावयाच्या . . ..

यानंतर कु.थोरात . . ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फंडकर...

आणि इतरांना घोषणाबाजीने मुर्ख बनवायचे ही निती या ठिकाणी अवलंबिण्यात आली. सभापती महोदय, विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्यांनी काल याठिकाणी अर्थसंकल्पावरील आपली मत व्यक्त केलेली आहेत. माननीय अर्थमंत्र्यांच्या सुमारे दोन तास चाललेल्या भाषणात रायगडचा उल्ल्ेख 17 वेळा आला आणि नांदेडचा उल्लेख 10 वेळा आला. रायगड बरोबरच मुख्यमंत्री महोदयांच्या नांदेडमधील कामे आणि त्यासाठी केलेली तरतूद याठिकाणी सर्वांना ठळकपणे दिसली. त्यामुळे हा अर्थसंकल्प राज्यातील काही भागापुरता, विदर्भाला उपाशी ठेवणारा आणि वेगळया विदर्भाच्या चळवळीला चालना देणारा असा हा अर्थसंकल्प या ठिकाणी मांडण्यात आलेला आहे. याला सांस्कृतिक अर्थसंकल्प म्हणावे का राजकीय अर्थसंकल्प म्हणावे हेच आम्हाला कळत नाही.

सभापती महोदय, हा अर्थसंकल्प मांडत असताना तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी भरीव तरतूद करण्यात आलेली आहे. देहू, आळंदी, पंढरपूर, तुळजापूर त्याचबरोबर संत गजानन महाराजांचाही त्यात उल्लेख करण्यात आलेला आहे व त्यासाठीही काही निधीची तरतूद ठेवण्यात आलेली आहे. पण एक गोष्ट माननीय अर्थमंत्री प्रकर्षाने विसरले. वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या जन्म शताब्दीचे वर्ष होते. ते या महाराष्ट्रात एक फार मोठे संत होऊन गेले. ग्राम गीतेच्या माध्यमातून त्यांनी अख्या महाराष्ट्राला जागविले. आपल्या खंजरीच्या भजनातून ग्रामीण भागातील माणूस जागा केला. या राज्यातील आणि मानवतेमधील अंधश्रध्दा गेली पाहिजे यांसंबंधी त्यांनी समाजाचे प्रबोधन केले. अशा राष्ट्रसंताच्या खऱ्या अर्थाने जन्म शताब्दीचे हे वर्ष असताना आम्ही यासंबंधात या सभागृहात ज्यावेळी हा प्रश्न उपस्थित केला त्यावेळी सरकारने काही घोषणा केल्या. त्यासंबंधी समिती नियुक्त केली. पहिल्यांदा एक समिती नियुक्त केली. दुसऱ्यांदा एक समिती नियुक्त केली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे मोजरी हे जे जन्म गाव आहे त्याठिकाणी जी संस्था आहे त्या संस्थेने काही प्रपोजल, काही प्रस्ताव महाराष्ट्र शासनाकडे पाठविले. महाराष्ट्र शासनाने त्याला तत्वत: मान्यताही दिली. मी या बजेटच्या भाषणाचे पुस्तक पूर्ण वाचलेले आहे. पण त्यामध्ये दुर्देवाने राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा एका अक्षराने देखील उल्ल्ेख केलेला नाही. तेथील संस्थांनी जे प्रस्ताव पाठविले होते त्या प्रस्तावच्या संदर्भात या अर्थसंकल्पात एक नवा पैसा सुध्दा तरतूद केलेली नाही. खरे म्हणजे हा त्या राष्ट्रसंताचा अवमान आहे. आज गुरुदेव सेवा मंडळाचे हजारो कार्यकर्ते या महाराष्ट्रात राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे अनुकरण करुन आजही

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुडकर...

अंधश्रध्देच्या विरुध्द खऱ्या अर्थाने खेडोपाडी जनजागरणाचे काम करीत आहेत. त्या राष्ट्रसंताच्या शिष्याचा हा खरे म्हणजे अवमान आहे. याचा खुलासा माननीय मंत्रिमहोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात केला पाहिजे. माणसाच्या जन्मा पासून मरणापर्यंत माणसाने कसे जगावे, गाव कसे असावे, गावातील संस्कृती कशी असावी, गावातील शेती कशी असावी,लग्न पध्दती कशी असावी या सर्व गोष्टीचे उदबोधन राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी आपल्या ग्रामगीतेमध्ये केलेले आहे. असे असताना कुठल्याही कार्यक्रमाचे आयोजन या राष्ट्रसंताच्या जन्म शताब्दीच्या माध्यमातून केलेले नाही. वरवर घोषणांचा देखावा केला. यासंदर्भात समिती नेमली. या समितीच्या किती बैठका झाल्या, काय कार्यक्रमांचे आयोजन महाराष्ट्र सरकारच्या माध्यमातून झाले, किती पैसा उपलब्ध करुन दिला हे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले तर बरे होईल्. जर त्याठिकाणी पैसा द्यावयाचाच नव्हता तर अशा प्रकारच्या घोषणा करण्याची गरज नव्हती.

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ...

त्या ठिकाणी किती पैसे उपलब्ध करुन दिले ? जर आपल्याला पैसे द्यावयाचे नव्हते तर घोषणा करण्याची गरज नव्हती. परंतु हे घडलेले आहे. ज्या राष्ट्रसंतांच्या नावाने आज आपण एक मोठी योजना महाराष्ट्रामध्ये राबवितो त्या राष्ट्रसंतांचा अवमान करणे ही चांगली गोष्ट नाही.

सभापती महोदय, आपण महाराष्ट्राचे सुवर्णमहोत्सवी वर्ष साजरे करीत आहोत. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी जो उल्लेख केला तो मी ऐकत होतो. त्यांनी सांगितले की, या महाराष्ट्रामध्ये 105 हुतात्मे झाले. गेली 50 वर्षे हा ऐतिहासिक महाराष्ट्र, आध्यात्मिक महाराष्ट्र, साधूसंतांचा महाराष्ट्र ज्या पध्दतीने वाटचाल करीत आहे त्याबाबत गेल्या 50 वर्षाच्या बाबतीत आत्मपरीक्षण करुन सुवर्णमहोत्सवी वर्ष साजरे करीत असताना या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून काही संकल्प करण्याची गरज होती. ग्रामीण भागासाठी संकल्प, गोरगरिबांसाठी संकल्प, या राज्यातील बेरोजगारांसाठी संकल्प, या राज्यातील उद्योगांसाठी संकल्प करण्याची गरज होती. परंतु या अर्थसंकल्पामध्ये एकही संकल्प केलेला आम्हाला दिसून आला नाही. मागच्या वर्षी अर्थसंकल्प मांडत असताना शिलकीचा अर्थसंकल्प सादर केला होता. मागचे वर्ष हे निवडणुकीचे वर्ष होते. त्यावेळी जनतेची मते पाहिजे होती म्हणून शिलकीचा अर्थसंकल्प सादर केला. निवडणुका संपल्यानंतर आता 7654 कोटी रुपयांची तूट दाखवून अर्थसंकल्प सादर केला आहे. महसुली तूट 7123 कोटी रुपयांची आहे. ही तूट राज्याच्या स्थूल उत्पन्नाच्या 0.9 टक्के इतकी आहे. वित्तीय तूट 26562 कोटी रुपयांची आहे. ही तूट राज्याच्या स्थूल उत्पन्नाच्या 3.2 टक्के आहे.

सभापती महोदय, गेली दहावर्षे या लोकशाही आघाडीच्या हातात या महाराष्ट्राची सत्ता आहे. दहा वर्षानंतर त्यांच्या सुदैवाने आणि जनतेच्या दुर्दैवाने पुन्हा लोकशाही आघाडीच्या ताब्यात सत्ता आली. सतत 10 वर्षे राज्यकारभार करीत असताना या राज्यावरील कर्ज 1 लाख 85 हजार कोटी रुपयांवर गेले आहे. याला राज्याची दिवाळखोरी म्हणावयाचे काय ? 10 वर्षे आपण या पध्दतीने कारभार केला आणि त्यातून आपण हे राज्य दिवाळखोरीकडे नेले. आपण दिवाळखोरी जाहीर केली. केवळ 1 लाख 85 हजार कोटी रुपयांचेच कर्ज आहे असे नाही तर त्याशिवाय राज्य शासनाने काही कारखान्यांची हमी घेतलेली आहे. सहकार क्षेत्रातील 36 हजार 75 कोटी रुपयांची

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

हमी शासनाने घेतलेली आहे. त्याचे काय होणार आहे ? सन 2009-2010 या वर्षात घेतलेले कर्ज 25 हजार 539 कोटी रुपयांचे आहे. ही कर्जाची रक्कम कोठे खर्च केली ? व्याज प्रदानाची रक्कम 14 हजार 860 कोटी रुपये आहे. गेली तीन वर्षे विरोधी पक्षाकडून सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते असतील किंवा मी असेन, आम्ही या सभागृहामध्ये मागणी केली की, 1 लाख 85 हजार कोटी रुपयांचे जे कर्ज आपण महाराष्ट्राच्या डोक्यावर उभे केले आहे ती रक्कम कोठे खर्च केली हे महाराष्ट्राच्या जनतेला कळले पाहिजे यासाठी शासनाने एक श्वेतपत्रिका काढावी. यासंदर्भात आम्ही या सभागृहामध्ये अनेक वेळा मागणी केलेली आहे. हे सर्व महाराष्ट्रातील जनतेला दिसू द्या. एका बाजूला कर्ज वाढत आहे. आजच या ठिकाणी संजय गांधी निराधार योजनेच्या संदर्भात असा उल्लेख झाला की, बोगस पध्दतीने योजना चालू आहे. या शासनाची दिवाळखोरी किती आहे ? एका बाजूला शासन 13 हजार कोटी रुपये 25 मार्चपर्यंत खर्च करीत नाही. मी कालच गावी जाऊन आलो. माझ्या जिल्ह्यातील संग्रामपूर तालुक्यामध्ये संजय गांधी निराधार योजना, वृध्द पेन्शन योजना, श्रावणबाळ योजना,

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

याची दीड कोटी रुपयांची थकबाकी त्या गरीबांची गेल्या 6 महिन्यांपासून शासन देऊ शकले नाही. हे शासन गरीबांचे आहे, हे शासन आम जनतेचे आहे असे सांगितले जाते. पण संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ योजनेचे गोरगरिबांचे पैसे 6-6 महिने दिले जात नाहीत, ही या राज्याची स्थिती आहे. या अर्थसंकल्पात घोषणांचा पाऊस मोठया प्रमाणात पाडलेला आहे. महसुली जमेची आकडेवारी पाहिली तर सन 2008-09 च्या तुलनेत सन 2009-10 मध्ये वाढ झालेली आहे. मुद्रांक नोंदणी शुल्काची रक्कम 8600 कोटीवरुन 9600 कोटीवर गेली आहे. राज्य उत्पादन शुल्काची रक्कम 4300 कोटीची रक्कम 4800 वर गेली आहे. व्हॅटच्या माध्यमातून गोळा होणारा कर कमी झाला आहे. 28479 कोटी वरुन 2706 पर्यंत खाली आली आहे. म्हणून 1433 कोटीने उत्पन्नात घट झाली आहे. एका बाजूला महसुली उत्पन्न वाढत नाही आणि दुस-या बाजूला उत्पन्न कमी कमी होत चालले आहे. ही माहिती महाराष्ट्राची आर्थिक पाहणीमध्ये देण्यात आली आहे, हे महाराष्ट्र सरकारचे पुस्तक आहे. या राज्यातील 61 शहरांमध्ये झोपडपट्टी दिसून आली आहे. सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे यांनी झोपडपट्टी मुक्त महाराष्ट्र करावयाचे आहे असे सांगितले आहे. घोषणा करण्याला तुम्हाला कोणी मनाई केलेली नाही. परंतु किती दिवस तुम्ही घोषणांवर चालविणार आहात ? आज शेतकऱ्यांसंबंधी घोषणा केली आहे. यापूर्वीही शासनाने शेतक-यांना 4 टक्के दराने, 3 टक्के दराने, 6 टक्के दराने कर्ज पुरवठा केला जाईल असे घोषित केले आहे. परंतु मी कालच बँकेत चौकशी केली असता शेतक-यांना 14 टक्के दराने कर्ज पुरवठा सुरु असल्याचे समजले आहे. अर्थसंकल्पात लाखो घरे बांधण्याचा उल्लेख केलेला आहे. वर्षभरामध्ये शासनाला समजून येईल. राज्यातील 61 टक्के शहरातील लोकसंख्या 3.36 कोटी होती. या झोपडपट्टीतील लोकसंख्या 1.12 कोटी होती. या शहरे व नगरातील 3 व्यक्तींपैकी 1 व्यक्ती झोपडपट्टीत राहते. या लोकांना झोपडपट्टीतून कसे बाहेर काढले जाणार आहे ? महाराष्ट्र हे शेतक-यांचे राज्य आहे असे बोलले जाते. परंतु महाराष्ट्राची आर्थिक पाहणी या पुस्तकात सन 2008-09 या आर्थिक वर्षात कृषीचे उत्पादन 19.3 टक्क्यांनी घटले आहे. त्यामुळे शासनाने काही घोषणा करु नये. कारण महाराष्ट्राची आर्थिक पाहणी हे पुस्तक राज्याच्या

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

श्री.पांडुरंग फुंडकर....

आर्थिक स्थितीचा आरसा आहे. या पुस्तकात नमूद केले आहे, राज्यातील कृषी उत्पादन घटले आहे. हे राज्य सर्व क्षेत्रात अग्रेसर आहे असे बोलले जाते. पण कृषी उत्पादन 19.3 टक्क्यांनी घटल्यावर शेतकरी कसा जगणार आहे ? सन 2009-10 या वर्षात उत्पादन वाढीमध्ये 1.8 ने वाढ झाली आहे. ते सुध्दा पूर्वानुमान आहे. त्याची आकडेवारी प्रसिध्द झालेली नाही. सन 2008-09 मध्ये कृषी उत्पादन 19 टक्क्यांनी घटले असताना उत्पादन वाढीत 1.8 टक्क्यांनी वाढ झाली आहे. यावरुन राज्य सरकारचे कृषी क्षेत्राकडे किती दुर्लक्ष झाले आहे ते दिसून येते. राज्य उत्पन्नाचा स्थूल वार्षिक वृध्दी दर सन 1999 ते 2000 आणि 2000 ते 2008 या कालखंडात हा दर घटलेला आहे. राज्याचा प्रत्येक क्षेत्रात प्रथम क्रमांक आहे असे सांगण्याचा प्रयत्न केला जातो. यासंदर्भात मी काही राज्यांची आकडेवारी देऊ इच्छितो. गुजरात राज्याचा वार्षिक दर 9.6 टक्के, हरियाणा राज्याचा वार्षिक दर 9.2 टक्के, केरळ राज्याचा वार्षिक दर 8 टक्के, ओरिसाचा 7.8 टक्के, आंध्र प्रदेशचा 7.8 टक्के आणि महाराष्ट्राचा 7.3 टक्के आहे. म्हणजे देशातील काही राज्यांची तुलना करता आपला सहावा क्रमांक लागतो. ही आकडेवारी महाराष्ट्राची आर्थिक पाहणी यामध्ये नमूद केलेली आहे. मुंबई व उपनगर या जिल्हयांसह ठाणे, नाशिक, नागपूर, पुणे या जिल्हयांचा राज्य उत्पन्नातील वाटा 55 टक्के आहे. राज्यातील 25 जिल्हयांचे दरडोई उत्पन्न राज्याच्या सरासरी दरडोई उत्पन्नापेक्षा कमी असून लातूर, गडचिरोली व वाशिम या जिल्हयांचे दरडोई उत्पन्न सर्वात कमी आहे.

यानंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / अशुद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर...

लातूर, गडचिरोली, वाशिम या जिल्ह्यांचे दरडोई उत्पन्न पाहता राज्याची प्रगती समृध्दीच्या दिशने होत आहे की विषमतेच्या दिशेने होत आहे हे आपल्या लक्षात येते. राज्यातील जिल्ह्यांच्या प्रगतीचा आढावा घेतला तर महाराष्ट्राच्या 75 टक्के भागाची अधोगती झालेली असल्याचे चित्र दिसून येते. केवळ महानगराची प्रगती म्हणजे महाराष्ट्राची प्रगती असा अर्थ आपण काढणार असाल तर ती आपण जनतेची निव्वळ फसवणूक करीत आहात. राज्यातील शहरांमध्ये काहीअंशी प्रगती झालेली दिसत असली तरी खेडी मात्र भकास झालेली आहेत. खेड्याकडे लक्ष द्यायला शासनाला वेळ नाही. राज्यामध्ये 27 हजार ग्रामपंचायती आहे. या 27 हजार ग्रामपंचायतीच्या विकासासाठी फक्त 75 कोटी रुपये ठेवलेले आहेत. या 75 कोटीची विभागणी 75 हजार ग्रामपंचायतीमध्ये करुन त्यांचा विकास कसा करणार आहात, हे माननीय मंत्री महोदयांनी सांगावे. आपण लोकांची कशासाठी फसवणूक करीत आहात ? वाढत्या महागाईवर नियंत्रण ठेवण्याबाबत कोणतीही उपाययोजना या अर्थसंकल्पामध्ये करण्यात आलेली नाही. सभापती महोदय, आज राज्यातील सर्वसामान्य आणि गोरगरीब जनतेसमोर कोणता मोठा प्रश्न असेल तर तो महागाईचा आहे. वाढत्या महागाईला आळा घालण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या याचा उल्लेख या अर्थसंकल्पामध्ये नाही. गेल्या वर्षभरामध्ये महागाईने अक्षरश: कहर केला आहे. डिसेंबर महिन्यामध्ये ग्रामीण भागातील किंमत निर्देशांक 172.8 इतका होता आणि नागरी भागातील किंमत निर्देशांक 165.9 इतका होता. या महागाईला कोण जबाबदार आहे ? कॉग्रेस पक्ष म्हणतो या महागाईला राष्ट्रवादीचे नेते केन्द्रीय कृषीमंत्री श्री. शरद पवारसाहेब जबाबदार आहेत आणि श्री.शरद पवारसाहेब सांगतात की, महागाईला कॉंग्रेस जबाबदार आहे. अशा पध्दतीने ही महागाईच्या संदर्भातील जबाबदारी कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष एकमेकांवर ढकलण्याचा प्रयत्न करीत आहे. धान्याच्या किंमती वाढल्यानंतर त्याचा फायदा शेतक-याला व्हायला पाहिजे. परंतु तसे होत नाही. शेतक-याच्या हातामध्ये जेव्हा पीक येते त्यावेळी धान्याच्या किंमती गडगडतात. किंमती कोणत्या स्तरावर कमी केल्या जातात ? तर जेव्हा शेतक-याकडून माल घेतला जातो त्यावेळी त्या मालाच्या किंमती कमी केल्या जातात. जेव्हा शेतक-याच्या हातामध्ये सोयाबीनचे पीक येते त्यावेळी सोयाबीनच्या बाजारातील किंमती 200 ते 300 रुपयांनी कोसळतात. त्याचप्रमाणे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर...

कापूस, ज्वारी, धान ही पिके शेतक-याच्या हातात आली की त्या मालाच्या किंमती कमी होतात. बाजारातील भाव पाडले जातात आणि शेतकरी नागावला जातो. तुरीचा बाजारातील भाव 100 रु. किलो होता. परंतु जेव्हा तुरीचे पीक शेतक-याच्या हाती आले त्यावेळी हा भाव 4 हजार रुपये क्विंटल पर्यन्त खाली आला. ही तूर 3500 ते 4000 रु. प्रति क्विंटल या प्रमाणे विकली जात आहे.

सभापती महोदय, 25 मार्च पर्यन्त 13 हजार कोटी रुपये खर्च केलेले नाहीत. ही रक्कम अखर्चित का राहिली याचे उत्तर माननीय मंत्री महोदय देणार आहेत काय ? मला तर असे वाटते की, शासनाच्या तिजोरीमध्ये काहीही नाही. योजना केल्या, कामे सुरु झाली, पण ठेकेदाराला देण्यासाठी तुमच्याकडे पैसे नाहीत. त्यामुळे ही एवढी रक्कम प्रशासनाने खर्च केला नाही म्हणून अखर्चित दाखविण्यात आलेली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचे 1200 कोटी रु. अखर्चित राहिलेले आहेत. जलसंपदा विभागाचे 1068 कोटी अखर्चित राहिलेले आहेत. आदिवासी विकास विभागाचे 700 कोटी अखर्चित राहिलेले आहेत. महिला व बालकल्याण विभागाचे 251 कोटी आणि अन्न व नागरी पुरवठा विभागाचे 200 कोटी अखर्चित राहिलेले आहेत. शासन दरडोई उत्पन्न 1 लाख रुपयापर्यन्त वाढविणार असे म्हणते. पण हे दरडोई उत्पन्न शासन कसे काय वाढविणार आहे. ग्रामीण भागातील दरडोई उत्पनन 50 हजार इतके दाखविलेले आहे. परंतु ग्रामीण भागातील दरडोई उत्पन्न प्रत्यक्षात तेवढे नाही. योजनेतर खर्च वाढत चालला आहे.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

शासनाने 33 हजार कोटीचा जो अर्थसंकल्प आमच्यासमोर मांडला त्यामध्ये 70 टक्के खर्च योजनेतर होणार आहे. योजनेवर नाही. त्यामुळे खर्च हा फक्त पगारावर होणार आहे. या खर्चामध्ये मंत्र्यांच्या बंगल्यांची सजावट अंतर्भूत आहे. चार्टर्ड विमान प्रवासाचा खर्च आहे. हेलिकॉप्टर उड्डाणांवर होणारा खर्च अंतर्भूत आहे. 70 टक्के खर्च हा योजनेतर असून फक्त 30 टक्के खर्च योजनेवर होणार आहे. 1/3 जनता दारिद्र्यात खितपत पडलेली असताना शासन स्वत: ऐषारामावर करोडो रुपये खर्च करीत आहे. मी या खर्चाची आकडेवारी देऊ शकतो. मंत्र्यांच्या बंगल्यांच्या सजावटीवर व कॅबिनवर किती कोटी रुपये खर्च केले याची आकडेवारी उपलब्ध असली तरी वेळेअभावी ती आकडेवारी मी मांडू शकणार नाही. करोडो रुपये ऐषारामावर खर्च होत आहे. महसुली तूट वाढत आहे. राजकोषीय तूट कमी व्हावी यासाठी राज्य सरकारने पाच वर्षापूर्वी कायदा आणला. तो केवळ दाखविण्यासाठी आणला. प्रत्यक्षात वित्तीय तूट वाढत आहे. राष्ट्रीय उत्पन्नाच्या 3.2 टक्के म्हणजे 26562 कोटी रुपयापर्यंत आपण जाऊन पोहोचलो आहोत. 13 व्या वित्त आयोगाने राज्याला 91 हजार कोटी रुपये देऊ असे सांगितल्याचे माननीय अर्थमंत्री म्हणाले आहेत. 91 हजार कोटी रुपये मिळण्याबाबत ज्या अटी घालण्यात आल्या आहेत त्याचा उल्लेख केलेला नाही. हे 91 हजार कोटी कसे मिळणार आहेत? 2013-14 पर्यंत महसुली तूट शून्यावर आली तरच हा निधी मिळणार आहे. अशी ही अट आहे. 2013-14 पर्यंत महसुली तूट शून्यावर आणणार असे ठामपणे अर्थमंत्री सांगतील काय? महसुली तूट शून्यावर कशी आणणार आहात याचे उत्तर मंत्रीमहोदयांनी दिले पाहिजे. महसुली तूट शून्यावर आली तरच 91 हजार कोटी रुपये शासनाला मिळतील अशी व्यवस्था आहे. दरडोई उत्पन्न 1 लाखापर्यंत नेण्याचे दिवास्वप्न दाखविले जात आहे. खरे म्हणजे मृगजळ असाच शब्द या अर्थसंकल्पाबद्दल वापरला पाहिजे. हे दिवास्वप्न कशाच्या आधारे शासन पहात आहे? प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागणार आहे. शासनाने उपलब्ध असलेला 12 व्या वित्त आयोगाचा 30 टक्के निधी शासन खर्च करु शकलेले नाही अशी स्थिती आहे. अंदाजपत्रकीय पुस्तकामध्ये उद्योगासंबंधी मोठे चित्र रंगविले गेले आहे. औद्योगिक गुंतवणुकीबाबत 1991 ते 2009 या दरम्यान देशातील विविध राज्यात झालेल्या औद्योगिक गुंतवणुकीचा तपशील नमूद केलेला आहे. ओरिसामध्ये 7,03,943 कोटी रुपयांची गुंतवणूक झाली. भारताच्या तुलनेत 12.5 टक्के आहे. छत्तीसगड राज्यामध्ये 6,99,310

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

कोटी रुपयांची गुंतवणूक झाली. गुजराथ राज्यामध्ये 6,40,769 कोटी रुपयांची आणि महाराष्ट्रामध्ये फक्त 5,58,336 कोटी रुपये इतकी झाली. औद्योगिक गुंतवणुकीमध्ये पहिल्या क्रमांकावर असलेले राज्य केवळ या शासनाच्या उदासिन धोरणामुळे आणि विजेच्या समस्येमुळे चौथ्या क्रमांकावर ढकलले गेले आहे. ओरिसा आणि छत्तीसगड सारख्या छोटया राज्यांनी महाराष्ट्राला मागे टाकले आहे. ही आकडेवारी माझी नसून महाराष्ट्राची आर्थिक पाहणी या पुस्तिकेमध्ये दिलेली आकडेवारी आहे. शासनाने सुधारित सामुहिक प्रोत्साहन योजना 2007 मध्ये सुरु केली. अविकसित भागात उद्योगांची वाढ करणे हा प्रमुख उद्देश होता. मागास भागात उद्योगधंदे वाढविण्यासाठी ही योजना परिणामकारक ठरल्याचे दिसून येत नाही. अविकसित भागांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी उद्योगधंद्यांची वाढ होणे नितांत गरजेचे होते. त्यादृष्टीने या योजनेला व्यापक असे स्वरुप देण्याची गरज होती. तसे स्वरुप देण्यात आलेले नाही. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने 31 मार्च, 2009 रोजी जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार अमरावती विभागात 716 कोटी रुपयांची गुंतवणूक झालेली आहे. जी महाराष्ट्राच्या तुलनेत फक्त 18 टक्के आहे. अमरावती विभागात 2001 च्या जनगणनेनुसार 1 कोटी लोकसंख्या आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात या विभागाला वाटा देणार आहात की नाही? महाराष्ट्राची लोकसंख्या 10 कोटी असताना अमरावती विभागासाठी 10 टक्के वाटा देण्याची म्हणजे 3966 कोटी रुपयांची गुंतवणूक व्हावयास पाहिजे होती. परंतु फक्त 716 कोटी रुपयांची गुंतवणूक केली. राज्य शासनाचे विदर्भावर किती लक्ष आहे?

(नंतर श्री.खर्चे....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

माननीय अर्थ राज्यमंत्री हे विदर्भातील असल्याने त्यांनी ही आकडेवारी जरा पहावी. अमरावती विभागात राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या 10 टक्के लोकसंख्या राहत असताना या जिल्ह्याला राज्याच्या तुलनेत किमान 10 टक्के तरी वाटा मिळाला पाहिजे, तेवढी गुंतवणूक या भागात झाली पाहिजे. परंतु या प्रमाणात ही गुंतवणूक झाली नसून फक्त 716 कोटीचीच गुंतवणूक झालेली आहे. नियोजन आयोगाने सुचविल्याप्रमाणे राज्यातील दारिद्र्यरेषेखालील लोकांचे प्रमाण 30.6 टक्के एवढे असून देशातील प्रमाणाच्या फक्त 3.2 टक्के एवढेच हे प्रमाण आहे. नियोजन आयोगाने जी आकडेवारी दिलेली आहे ती शासनाने पाहिली तर नक्कीच डोळ्यात अंजन घालणारी आहे. सन 1973-74 पासून सन 2004-05 पर्यंत दारिद्र्यरेषेखालील प्रमाण हे बरेच कमी केलेले आहे. या अनुषंगाने देशातील इतर काही राज्यांची आकडेवारी पाहिली असता गुजरातमध्ये हे प्रमाण सन 1973-74 मध्ये 48.2 टक्के एवढे होते तर सन 2004-05 मध्ये 16 टक्के एवढे आहे. कर्नाटक राज्यातील हेच प्रमाण 54.5 टक्के असून 2004-05 मधील प्रमाण 25 टक्क्यावर आले आहे. केरळमध्ये 1973-74 मधील प्रमाण 59 टक्के असून आता म्हणजेच 2004-05 मध्ये हे प्रमाण 15 टक्के एवढे आहे. पंजाबमध्ये सन 1973-74 मधील प्रमाण 28 अक्क्यावरुन सन 2004-05 मध्ये तेच प्रमाण 8 अक्क्यावर आले आहे. तामिळनाडूमध्ये 54 टक्क्यावरुन 22 टक्क्यावर आले आहे. पश्चिम बंगालमध्ये 63 अक्क्यावरुन 24 टक्के एवढे आले आहे आणि महाराष्ट्रात 53 टक्क्यावरुन 30 टक्क्यावर हे प्रमाण सन 2004-05 मध्ये आलेले आहे. यावरुन आपल्या राज्याची दयनीय स्थिती लक्षात येईल. म्हणजे राज्यातील 33 टक्के लोक आजही दारिद्र्यरेषेखाली राहत आहेत. मुळात दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांचा सर्व्हे करण्याची पध्दत शासनाने अतिशय कडक केलेली आहे. खरे म्हणजे अशा कुटुंबांची गणना करताना जे निकष आहेत ते फार कठोर करण्यात आलेले आहेत. राज्यात शहरीकरण फार मोठ्या वेगाने होत असल्यामुळे पुष्कळ लोकांकडे टी.व्ही. सारख्या वस्तू वाढलेल्या आहेत. परंतु दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची संख्या गणना करताना दूरदर्शन संच, पंखे वगैरे वस्तू घरात असल्यास त्या कुटुंबांना वगळण्यात येते, एवढे कडक निकष लावण्यात येतात. वास्तविक रोजंदारीवर काम करणारा मजूर सुध्दा टी.व्ही. संच घेतो परंतु हा निकष लावून दारिद्र्यरेषेखालील लोकांचे प्रमाण कमी करण्याचा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

प्रयत्न शासनाने केलेला आहे. त्याचबरोबर 15 हजार रुपयापर्यंतची उत्पन्न मर्यादा हा सुध्दा एक निकष आहे, ही मर्यादा वाढविण्याची गरज आहे. कारण एका कुटुंबात 5 सदस्य जरी गृहित धरले तरी वार्षिक 3 हजार रुपये आणि महिन्याला 250 रुपयेप्रमाणे उत्पन्न होते. या रकमेमध्ये महिन्याचा खर्च भागणार आहे काय याचाही शासनाने विचार करावा. दारिद्र्यरेषेखालील टक्केवारी कमी करावयाची असेल तर खऱ्या अर्थाने ग्रामीण भागापर्यंत जाऊन फेर सर्व्हे करण्याची गरज आहे आणि शासनाला असा फेर सर्व्हे करावा लागणार आहे. श्री. एम.सी. चैनी, माजी अध्यक्ष, महाराष्ट्र आर्थिक विकास परिषद यांनी असे म्हटले आहे की, हे सरकार बिल्डरांच्या स्वार्थाकरिता काम करीत आहे. गेल्या 10 वर्षात राज्याची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासंबंधी शासनाने दिलेली सर्व आश्वासने फोल ठरलेली आहेत. यामध्ये खरे तर आवश्यक असलेली नजर आणि राजकीय इच्छाशक्ती या दोहोंचाही सरकारकडे अभाव आहे.

महोदय, आज राज्यातील उद्योगांची परिस्थिती पाहिली तर असे दिसून येईल की, लघु उद्योगांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे. या ठिकाणी सांगितले गेले की, राज्यातील उद्योगांमध्ये खूप वाढ झाली आहे. परंतु प्रत्यक्षात राज्यातील छोटे कारखाने आणि लघु उद्योग मोठ्या संकटात सापडलेली आहेत. त्यांच्या भविष्याचा व त्यांना सावरण्याचा प्रयत्न सरकारकडून होत आहे असे अर्थमंत्र्यांनी आपल्या भाषणातून जरी सांगितले असले तरी आम्हाला या अर्थसंकल्पात कुठेही दिसून येत नाही. लघु उद्योगांना सूचना देण्यासंबंधी एक समिती नेमण्यात येईल असेही पोकळ आश्वासन दिले. आज खरे म्हणजे लघु उद्योगांकडे पाहिले तर 30 हजार लघु उद्योग संकटात आहेत. माननीय उद्योग मंत्री श्री. राजेंद्र दर्डा यांनी एका तारांकित प्रश्नाला उत्तर देताना मान्य केले आहे की, सन 2009 मध्ये राज्यात नोंदविलेल्या 1.5 लाख लघु उद्योग आणि मध्यम उद्योगांपैकी 30 हजार उद्योग दिलेल्या पत्त्यांवर अस्तित्वातच नाहीत, ते गायब झालेले आहेत. याची माहिती उद्योग विभागाला सुध्दा नाही.

कृषी वित्त पुरवठा यासंदर्भात सांगायचे झाल्यास कृषी सहकारी पत संस्थांच्या मार्फत सन 2007-08 मध्ये या पत संस्थांनी 5828 कोटीचे कर्ज वाटप केले व सन 2008-09 मध्ये 3128 कोटीचे कर्जवाटप केले. म्हणजे सन 2007-08 च्या तुलनेत सन 2008-09 मध्ये 46.28 टक्क्यांचेच कर्ज वाटप करण्यात आले.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

आताच सन्माननीय शेंडगे साहेबांनी आमच्या शासनाने शेतक-यांना एवढे कर्ज दिले, तेवढे कर्ज दिले असे सांगितले, परंतु सन 2008-09 मध्ये 3128 कोटी रुपयांपैकी 60 टक्के कर्ज म्हणजे फक्त 1892 कोटी रुपये अल्प भूधारक शेतक-यांना देण्यात आलेले आहेत. विदर्भात शेतीचे प्रमाण चांगले आहे. 5-10 एकर शेती असणा-या शेतक-यांचे प्रमाण विदर्भात मोठे आहे. आज शेतमजुरी मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे, निसर्गाचा असमतोल वाढलेला आहे, सरकारची शेतीच्या प्रती असलेली उदासिनता वाढलेली आहे आणि या सर्वांचा परिणाम शेतक-याच्या आर्थिक स्थितीवर झालेला आहे. आज शेतक-यांची परिस्थिती हलाखीची झालेली आहे. 10 एकर जमीन स्वत: कसू शकेल एवढी शारीरिक क्षमता शेतक-यात राहिलेली नाही. नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात विदर्भासाठी शासनाने 10 हजार कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले होते. या पॅकेजसाठी विदर्भातील 10 हजार कोटी रुपयांच्या ज्या योजना तुम्ही जाहीर केल्या होत्या त्यातील किती योजना तुम्ही या अर्थसंकल्पात घेतलेल्या आहेत? या योजनांमध्ये रस्ते, दवाखाने, शैक्षणिक संस्था याचा समावेश पॅकेज मध्ये करण्यात आला होता परंतु या कोणत्याही योजनांचा समावेश या अर्थसंकल्पात का करण्यात आलेला नाही याची माहिती माननीय मंत्रीमहोदयांनी या ठिकाणी देण्याची आवश्यकता आहे. या अर्थसंकल्पात समावेश केला नसेल तर विदर्भासाठी जे 10 हजार कोटी रुपयांचे पॅकेज दिले होते ते 10 हजार कोटी रुपये कोठे गेलेले आहेत? विदर्भासाठी, कोकणासाठी, उत्तर महाराष्ट्रासाठी पॅकेज शासनाने जाहीर केले होते परंतु त्याचा सुध्दा उल्लेख या अर्थसंकल्पात करण्यात आलेला नाही. याचा अर्थ हे अंदाजपत्रक किती उदासीन, किती दिशाहीन आहे हे दिसून येते. महाराष्ट्र राज्याचे हे वर्ष सुवर्णमहोत्सवी वर्ष असल्यामुळे या वर्षात तरी तुम्ही जनतेची फसवणूक करावयास नको होती. उलट या सुवर्णमहोत्सवी वर्षात या शासनाने चांगले संकल्प करावयास पाहिजे होते, महाराष्ट्रातील 10 कोटी जनतेला सोबत घेऊन या महाराष्ट्र राज्याची गाडी चांगल्या दिशेने नेण्याचा प्रयत्न या अर्थसंकल्पात आम्हाला दिसला असता तर आम्ही निश्चितपणे आपले स्वागत केले असते. काल या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितले होते की, 3750 कोटी रुपयांचे माननीय पंतप्रधानांचे पॅकेज तसेच महाराष्ट्र शासनाचे 1000 कोटी रुपयांचे पॅकेज देण्यात आले होते. या पॅकेजमधून जनावरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

वाटली गेली, लोखंडी अवजारे वाटली गेली परंतु ही अवजारे कोणत्या प्रकारची वाटली गेली यासंदर्भात आमदारांनी निकृष्ठ प्रतीची अवजारे दाखवली होती. या पॅकेजमधून निकृष्ठ पध्दतीची अवजारे वाटण्यात आलेली होती. त्यावेळेच मंत्री श्री. अनिस अहमद यांनी यात्रा सुध्दा काढली होती. या यात्रेत त्यांनी दुभती जनावरे वाटली होती. विदर्भात आपण ज्या दुभत्या गायींचे वाटप केले होते त्या वाटपामुळे विदर्भातील दुधाचे प्रमाण किती लिटरने वाढले याची माहिती या ठिकाणी देण्याची आवश्यकता आहे. या पॅकेजमध्ये भाकड गायींचे वाटप करण्यात आले होते. काही जनावरे तर कागदावरच वाटण्यात आले होते. या पॅकेजमधील किती तरी जनावरे आणि अवजारे तिकडच्या बाकावर बसलेल्यांनी हडप केलेल्या आहेत. तिकडच्या बाकावरील किर्तीनी जनावरे आणि अवजारे हडप केल्या यासंदर्भातील नावासहीत याद्या आम्ही जाहीर केल्या होत्या. माहितीच्या अधिकाराखाली माहिती मागवून त्या याद्या आम्ही प्रसिध्द केल्या होत्या. सत्ताधारी पक्षाच्या माजी मंत्र्यांनी, माजी खाजदारांनी, माजी आमदारांनी गाई लाटल्या होत्या. या शासनाने ज्या गोरगरींबासाठी पॅकेज जाहीर केले होते ते पॅकेज गोरगरीब जनतेपर्यंत पोहचू शकले नाही. काल मी देशोन्तीच्या कार्यालयात फोन लावून विचारले की, हे सरकार सत्तेवर आल्यापासून किती शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत त्यावेळी मला सांगण्यात आले की, हे शासन सत्तेवर आल्यापासून 140 शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. सावकारी पाशातून शेतक-यांना मुक्त करण्यासाठी हे शासन सावकारी कायदा आणणारे होते. काल माझ्या तालुक्यातील खोदपूरी गावातील डवंगे नावाच्या एका शेतक-याने खाजगी सावकाराच्या कर्जापाई आत्महत्या केली आहे. सावकाराच्या कर्जापाई किती शेतक-यांनी आत्महत्या केल्यानंतर तुम्ही हा सावकारी कायदा आणणार आहात याची माहिती या ठिक्राणी शासनाने देण्याची आवश्यकता आहे. सावकारी कायदा आणण्यासाठी हे शासन का उशीर लावत आहे?

सभापती महोदय, सामूहिक विवाहाची चांगली योजना सुरु झाली होती. शेतक-यांच्या मुलीबाळींची लग्न करण्यासाठी सामूहिक विवाहाची योजना सुरु झाली होती. सामूहिक विवाहामध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

मुलींना 10 हजार रुपयांचे अनुदान मिळत असे. या मुलीच्या नावाने 10 हजार रुपयांचा चेक हे शासन देत होते परंतु गेल्या सहा महिन्यापासून ज्यांनी सामूहिक विवाह योजनेत लग्न केलेले आहेत त्यांना चेक मिळालेले नाही. त्यामुळे ही योजना बंद करण्यात आलेली आहे काय याचाही खुलासा या ठिकाणी माननीय मंत्रीमहोदयांनी करण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर .....

याचा माननीय मंत्री महोदयांनी खुलासा केला पाहिजे. आंतरजातीय विवाह करणा-यांना प्रोत्साहन देण्यासंबंधीचा उल्लेख या अर्थसंकल्पात करण्यात आला आहे. आंतरजातीय विवाह करणाऱ्यांना प्रोत्साहन देण्याबाबत आमचा काहीही विरोध नाही परंतु सर्वसामान्य शेतक-यांच्या मुला मुलीच्या विवाहासाठी प्रोत्साहन देण्यात येणार आहे किंवा नाही ? जर त्यांना प्रोत्साहनपर रक्कम दिली जात नसेल तर या शेतक-याने मुलाच्या वा मुलीच्या लग्नासाठी आत्महत्या करावयाच्या काय ? शेतकरी मुला मुलींच्या सामूहिक विवाहाची योजना सुरु केली होती ती बंद करता कामा नये आणि त्यासाठी यापूर्वीचे जे पैसे द्यावयाचे आहेत ते लवकर पैसे दिले गेले पाहिजेत. शेतक-यांच्या मुलांची लग्ने होऊन चार ते पाच महिने होऊन गेली आहेत परंतु अजूनही त्याना हे चेक्स मिळालेले नाहीत. तेव्हा त्यांना ताबडतोब चेक्स देण्यात यावेत तसेच ही चळवळ शासनाने बंद करता कामा नये अशी मी या चर्चेच्या निमित्ताने मागणी करीत आहे.

सभापती महोदय, सावकारी प्रतिबंधक कायदा महाराष्ट्रात ताबडतोब लागू झाला पाहिजे. सावकारी प्रतिबंधक कायदा नसल्यामुळे हजारो शेतकरी सावकाराच्या पाशात अडकले आहेत आणि त्यांच्या जमिनी देखील सावकाराच्या पाशात अडकल्या आहेत. सहकारी विभागातील डी.डी.आर वा ए.आर.शेतक-याच्या बाजूने निर्णय न देता सावकाराच्या बाजूने निर्णय देतात. त्यामुळे सावकाराच्या कर्जातून शेतकरी मुक्त होऊ शकलेले नाहीत. तेव्हा सावकारी प्रतिबंधक कायदा ताबडतोब राज्य सरकारने आणावा अशी मी या चर्चेच्या निमित्ताने मागणी करीत आहे.

सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने मला आणखी एक मागणी करावयाची आहे हे राज्य बी.ओ.टी. वर चालले आहे.प्रत्येक गोष्ट बी.ओ.टी.वर सुरु करण्यात येत आहे.विधानमंडळाच्या इमारतीचा नवीन प्लॅन तयार करण्याचे काम सुरु आहे. या इमारतीचे तसेच आमदार निवास , मंत्रालय इत्यादी ठिकाणच्या इमारतीचे काम देखील बी.ओ.टी. वर दिले जाणार आहे. बी.ओ.टी.च्या नावाखाली शेकडो एकर्स जमिनी बिल्डर्सना दिल्या जात आहेत. बी.ओ.टी.च्या नावाखाली राज्यातील सामान्य माणसाच्या खिशातील पैसे टोलच्या माध्यमातून काढले जात आहेत. अशा प्रकारे जर या राज्याचा कारभार सुरु असेल तर एक दिवस हे राज्यसुध्दा बी.ओ.टी. तत्वावर द्यावे लागेल .असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर .....

सभापती महोदय, या ठिकाणी सादर करण्यात आलेला अर्थसंकल्प दिशाहीन आहे,या सुवर्ण्महोत्सवी वर्षात अर्थसंकल्पात कोणतीही दिशा नाही. 33 हजार कोटी रुपये जरी या अर्थसंकल्पात दाखविले असले तरी त्यात केन्द्र सरकारचा वाटा किती आहे हे आम्हाला सांगितले पाहिजे. केन्द्र सरकार अनेक योजनांसाठी पैसे देते परंतु त्यांच्याकडील पैसे देखील खर्च करण्याची कुवत राज्य सरकारमध्ये नसल्यामुळे हजारो कोटी रुपये केन्द्र सरकारचे पैसे परत जात आहेत.

सभापती महोदय, माननीय वित्त मंत्र्यांनी उत्तराच्या भाषणात विदर्भाच्या संदर्भात शासनाने काय केले आहे या संबंधीचा खुलासा करावा. विदर्भातील पाच सहा जिल्हयाचा भौतिक अनुशेष जर 650 कोटी रुपयांचा होता तर त्यामध्ये रत्नागिरीचा समावेश का केला ? अशा प्रकारे शासनाने रत्नागिरीला फसवले की विदर्भाला फसवले हे वित्त मंत्र्यांनी सांगावे. विदर्भाचा भौतिक अनुशेष दूर करण्यासाठी शासनाने 650 कोटी रुपये दिले असे सांगण्यात येते परंतु त्यामध्ये रत्नागिरीचा समावेश करण्यात आला आहे. तेव्हा विदर्भासाठी किती पैसे देण्यात येणा्र आहे आणि रत्नागिरीसाठी किती पैसे देण्यात येणार आहेत यासबंधी मंत्री महोदयांनी खुलासा केला तर रत्नागिरीला फसवले की आम्हाला फसवले हे समजून येईल.

सभापती महोदय, विदर्भाचा 40 हजार कोटी रुपयांचा अनुशेष असतांना 60 ते 62 कोटी रुपयाचा तुकडा देण्यात येत असल्यामुळे विदर्भातील जनता स्वतंत्र विदर्भाची मागणी करीत आहे गेल्या 50 वर्षापासून ज्या पध्दतीने विदर्भाला वागविले जात आहे त्यामुळेच विदर्भातील जनता स्वतंत्र विदर्भाची मागणी करीत आहे.विदर्भातील लोकांना वेगळा विदर्भ मागण्याची वास्तविक काहीही गरज नव्हती आम्ही मोठया मनाने महाराष्ट्रात सामील झालो होतो परंतु अन्याय आणि अत्याचाराची परीसीमा गाठली जाते त्यावेळी मुंगीसुध्दा चावा घेत असते. अशा प्रकारे विदर्भाला वागविण्याचा प्रयत्न राज्य शासनाने केला तर वेगळया विदर्भाची चळवळ पुढे गेल्याशिवाय राहणार नाही हा इशारा मी आपल्याला देत आहे.तेव्हा राज्य शासनाने वेळीच सावरले पाहिजे अन्यथा ही चळवळ पुढे गेल्याशिवाय राहणार नाही अशा प्रकारचा इशारा मी देतो आणि माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, माननीय वित्त राज्य मंत्र्यांनी सादर केलेल्या 2010-2011 च्या अर्थसंकल्पावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मला माननीय वित्त राज्य मंत्र्यांना असे सांगावयाचे आहे की ज्यावेळी ते अर्थसंकल्प मांडत होते त्यावेळी त्यांनी काळया रंगाचा सूट घातला होता व त्या सुटावर गुलाबाचे फुल देखील लावले होते त्यामुळे माननीय मंत्री सुंदर दिसत होते. महाराष्ट्रातील जनतेचीसुध्दा त्यांनी अशाच प्रकारची काळजी घेतली असती तर बरे झाले असते असे मला वाटते.

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम...

सभापती महोदय, महात्मा गांधी ज्यावेळी बॅरिस्टर झाले त्यावेळी ते देखील सूटाबुटामध्ये आले होते. परंतु ज्यावेळी ग्रामीण भागातील शेवटच्या माणसाची अवस्था महात्मा गांधींनी पाहिली त्यावेळी या शेवटच्या माणसाच्या अंगावर लाज राखण्यासाठी कापड देखील नाही हे त्यांच्या लक्षात आले. त्यावेळी महात्मा गांधींनी घोषणा केली की, या शेवटच्या माणसाच्या अंगावर लाज राखण्यासाठी जोपर्यंत कापड येणार नाही तोपर्यंत मी माझ्या अंगावर पूर्ण कपडे घालणार नाही. सभापती महोदय, महात्मा गांधींचे नाव घेऊन चालणारे हे शासन असले तरी आज देखील 31 टक्के महाराष्ट्र दारिद्रय रेषेखाली आहे, आणि दुसऱ्या बाजूला आपण सूटाबुटामध्ये येऊन कोटावर गुलाबाचे फूल लावून भाषण केले. त्या गुलाबाच्या फुलाचा सुगंध तुम्हाला मिळत आहे. त्या गुलाबाच्या फुलाचा सुगंध शासन आणि त्यांच्या मंत्रिमंडळातील त्यांचे नातेवाईक घेत आहेत. त्या गुलाबाच्या फुलाचे काटे गरीब माणसाच्या वाटयाला आले आहेत असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. आणि म्हणून या महाराष्ट्र राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये सादर केलेला अर्थसंकल्प असे म्हटले असले तरी या महाराष्ट्र राज्याची नेमकी अवस्था काय आहे? या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये सुवर्णाक्षरांनी लिहावी अशी एकही गोष्ट असेल तर ती आपण दाखवावी. आपण आम्हाला पुरविलेल्या या सर्व पुस्तकांची पडताळणी करुन आलो आहे.

सभापती महोदय, आपण काही चांगले निर्णय घेतले आहेत त्यावर सुध्दा मी बोलणार आहे. आज महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची काय अवस्था आहे? एका बाजूला शेतकऱ्यांच्या मोठया प्रमाणावर आत्महत्त्या होत आहेत. आणि दुसऱ्या बाजूला सिंचनाचा अनुशेष न भरला गेल्यामुळे सर्वत्र बोंबाबोंब आहे. वेगळया विदर्भाच्या बाबतीत माननीय विरोधी पक्षनेत्यांनी याठिकाणी भूमिका मांडली असली तरीही त्या संदर्भात मी माझी भूमिका मांडणार आहे. या राज्यामध्ये मोठया प्रमाणावर बेरोजगारी वाढत आहे, आदिवासी कुपोषित बालकांची अवस्था वाईट असतांना त्या अवस्थेमध्ये या राज्याचा सुवर्ण महोत्सव साजरा होत आहे. तरी देखील आम्ही आमची पाठ थोपटून घेत आहोत. या राज्याला 50 वर्षे झाल्यामुळे सुवर्ण महोत्सव साजरा करीत असतांना आपण अधोगतीला गेलो आहोत असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. या अर्थसंकल्पाचे वर्णन करीत असतांना एकच गोष्ट सांगतो की, आपण अनेक घोषणा केल्या त्यांची मी चिरफाड करणार आहे. या अर्थसंकल्पाचे मी एकाच वाक्यामध्ये वर्णन करीन की, "खिशामध्ये नाही आणा, आणि मला बाजीराव म्हणा" अशी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ KGS/

श्री. रामदास कदम....

या अर्थसंकल्पाची अवस्था आहे. खिश्यामध्ये काही नसल्यामुळे हे सरकार ठणठण गोपाळ आहे. परंतु यामध्ये प्रचंड घोषणा पहावयास मिळतात. तिजोरीमध्ये खडखडाट आहे, दुसऱ्या बाजूला कोटयावधी रुपयांच्या घोषणा केल्या जात आहेत. त्या कशापध्दतीने केल्या जात आहेत हे यावरुन स्पष्ट होत आहे.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पामध्ये तीर्थक्षेत्रांच्या विकासाच्या योजनांचा पाढा वाचण्याचे काम झाले आहे. एका अर्थाने हा अर्थसंकल्प म्हणजे राज्याच्या पर्यटनाचा अर्थसंकल्प आहे असे हे अर्थसंकल्पाचे भाषण वाचल्यानंतर लक्षात येते. तसेच, या अर्थसंकल्पामध्ये अनावश्यक कविता समाविष्ट करण्यात आल्या आहेत. त्या कवितांचा आणि अर्थसंकल्पांचा कुठेही ताळमेळ बसत नाही. मी आता अर्थसंकल्पातील मुख्य मुद्याकडे येतो. या अर्थसंकल्पामध्ये जवळ जवळ महसूली जमा 89 हजार 61 कोटी रुपये, महसूली खर्च 96 हजार 184 कोटी आणि महसूली तूट 7 हजार 123 कोटी रुपयांची आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

म्हणजे 22,920 कोटी रुपये इतका महसूल वसूल झाला असता असे माननीय मंत्री महोदयांनी म्हटलेले आहे, मी म्हणत नाही. एका बाजूला 7123 कोटी रुपये हे महसूली तुटीमध्ये दाखवत आहोत आणि दुसऱ्या बाजूला माननीय श्री.वडेट्टीवार साहेब, आपणच असे सांगत आहोत की, आम्ही 22,920 कोटी रुपये वसूल करु शकलो नाही. परंतु आम्हाला याचे कारण समजले पाहिजे. यामध्ये आपण वसूल न झालेल्या आणि वसूल होत असलेल्या अशा दोन्ही रकमा दिलेल्या आहेत. या दोन्ही रकमा पाहिल्या तर हा आकडा 36,464 कोटी इतका आहे. म्हणजेच आपण जर प्रयत्न केला तर या राज्याच्या महसुलामध्ये 36,464 कोटी रुपये जमा करु शकतो. असे असताना देखील हे शासन किती निकम्म आहे हे यांनीच दाखवून दिलेले आहे. म्हणून जर शासनाने प्रयत्न केले असते तर ही महसूल तूट दिसून आली नसती. पण आपण हे का करु शकलो नाही ? याबाबतीत माननीय वित्त राज्यमंत्र्यांनी आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये खुलासा केला तर ते जास्त सोयीचे होईल.

सभापती महोदय, मी आपल्यामार्फत एक गोष्ट शासनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, याठिकाणी आकड्यांचा कसा खेळ करण्यात आला आहे, यामध्ये बनवाबनवी कशी केली आहे आणि त्यातून महाराष्ट्रातील जनतेला फसविण्याचे काम कसे करण्यात आले आहे. गेल्या वर्षी सदनामध्ये माजी वित्त मंत्री आणि विधानसभेचे माननीय अध्यक्ष श्री.दिलीप वळसे-पाटील यांनी जो अर्थसंकल्प मांडलेला आहे, ते पुस्तक, त्यांचे भाषण माझ्याकडे आहे. जर ते पुस्तक आपल्याकडे असेल तर ते आपण मुद्दाम पडताळून पहावे. त्यातील पान क्र.3 वरील मुद्दा क्र.9 मध्ये असे म्हटलेले आहे की, "महाराष्ट्र राज्याने सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण केले आहे. त्यामुळे सन 2009-2010 साठी 26 हजार कोटी रुपयांच्या वार्षिक योजने व्यतिरिक्त उपलब्ध अतिरिक्त साधनसंपत्तीच्या मर्यादित पायाभूत सुविधा विकासासाठी 11,915 कोटी रुपयांचा एकूण विशेष कार्यक्रम जाहीर करीत आहे. त्यामुळे सन 2009-2010 या वर्षात विविध विभागांच्या विकास कामांसाठी एकूण 37,915 कोटी रुपये एवढया मोठया प्रमाणावर निधी उपलब्ध होत आहे." सभापती महोदय, आपण गेल्या वर्षीच्या योजना पाहिल्या तर त्या 37,915 कोटी रुपयांच्या आहेत. आपणही अर्थमंत्रीच आहात, मग यावेळी तो कमी का झाला ? कशासाठी झाला ? मग गेल्या वर्षी आपण 37 हजार कोटी रुपयांच्या योजना जाहीर केल्या. पण त्यासाठी किती पैसा खर्च झाला ? कुठेही काही नाही. आपण 11 हजार कोटी

. . . .2 आय-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

रुपयांची ठोस तरतूद दाखविलेली आहे. पण त्यातील एकही पैसा खर्च झालेला नाही म्हणजेच निवडणुका डोळयासमोर ठेऊन महाराष्ट्रातील जनतेला कसे फसविले आहे हे तुम्हीच सांगत आहात, ते मी सांगत नाही. तुमच्याच माननीय माजी वित्तमंत्र्यांचे हे भाषण आहे, माझे नाही. तसेच यावेळेला माननीय वित्तमंत्री श्री.सुनील तटकरेसाहेब काय सांगत आहेत ? तर यावेळेला माननीय वित्तमंत्री पान क्र.51 वर असे सांगत आहेत की, "वार्षिक योजना सन 2010-2011 बाबत योजना आयोगाशी अंतिम चर्चा झालेली नाही. तथापि, मंत्रिमंडळाच्या नियोजन उप समितीच्या निर्णयानुसार या वर्षाच्या राज्य योजनेचे आकारमान रुपये 33,935 कोटी निश्चित करण्यात आले आहे." पण हे 33,935 कोटी रुपये कुठे आहेत ? गेल्या वेळेस 37 हजार कोटी आणि यावेळेस 33 हजार कोटीचा उल्लेख केलेला आहे. परंतु गेल्या वर्षीचे 37 हजार कोटी रुपये कुठे गेले ? ते पैसे खर्च पडलेले नाहीत. कारण पैसाच नव्हता. अशा प्रकारे महाराष्ट्राच्या जनतेला चुकीचे, दिशाभूल करणारे आकडे देऊन कशासाठी फसवित आहात ? आम्ही सगळे येथे बुध्दू लोक बसलो आहोत काय ? आम्हाला काहीच कळत नाही काय ? सभापती महोदय, हा फक्त आकड्यांचा खेळ आहे, हा बनवाबनवीचा खेळ आहे. जर तसे नसेल तर आपण उत्तराच्या भाषणामध्ये याबाबतीत खुलासा करावा. पण आपण याबाबतीत काही बोलूच शकत नाही, आम्हाला सांगू शकत नाही अशी स्थिती आहे.

सभापती महोदय, याठिकाणी औद्योगिक स्त्रोतानुसार राज्य उत्पन्नाच्या किंमती दिलेल्या आहेत. त्यावरुन दिसून येते की, कृषीमध्ये वाढ झालेली आहे. आपण यामध्ये 76,222 वरुन 79,701 वर आलो आहोत. मच्छिमारीमध्ये 1802 वरुन 1708 वर आलो आहोत म्हणजे आपण यामध्ये खाली आलो आहोत. तसेच नोंदणीकृत वस्तुनिर्माण मध्ये 89,666 वरुन 99,884 वर गेलो आहोत. तसेच बांधकामाच्या बाबतीत सांगावयाचे तर 47,676 वरुन 67,483 वर गेलो आहोत आणि व्यापार, हॉटेल्स् व उपहारगृहे यामध्ये आपण अधिक पुढे गेलो आहोत. पण कृषीच्या बाबतीत काय अवस्था आहे हे आपण लक्षात घेतले पाहिजे. याचा अर्थ खरा आहे की, आपण शेती संपवून टाकली आणि सगळीकडे मॉल उभे केले, इमारती उभ्या केल्या आणि त्यातून आपल्याला अधिक महसूल जमा झालेला आहे हे आपण स्पष्टपणे सांगत आहात. म्हणून सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून एका गोष्टीकडे माननीय मंत्री महोदयांचे लक्ष वेधू इच्छितो.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखापाठी नाही

(तालिका सभापती - माननीय श्री. रमेश शेंडगे)

श्री. रामदास कदम....

सभापती महोदय, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा अहवाल आहे आपण अर्थ राज्यमंत्री असल्यामुळे तो वाचला असेल. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी मंत्र्यांच्या बंगल्यावर किती खर्च झाला याबाबत याठिकाणी सांगितलेले आहे. माझ्याकडे त्याच्यापुढचे आकडे आहेत. विजेच्या बिलाची, पाण्याच्या बिलाची किती बाकी आहे याबाबतची सर्व माहिती माझ्याकडे आहे पण ती सांगून मी सभागृहाचा वेळ घेणार नाही. पण कॅगने यासंदर्भात ताशेरे ओढले आहेत. एका बाजुला महाराष्ट्राची जनता अंधारात आहे. एका बाजुला आत्महत्या होत आहेत. मोठया प्रमाणात बेरोजगारी वाढत आहे आणि दुसऱ्या बाजूला महाराष्ट्राचे लेखापाल असे म्हणतात की, "अयोग्य नियोजन आणि गैर कारभारामुळे राज्यातील 29 सार्वजनिक उपक्रमामुळे राज्य सरकारच्या तिजोरीला 1389 कोटी रुपयाचा तोटा सहन करावाल लागला आहे." सभापती महोदय, मी हे म्हणत नाही, विरोधी पक्ष नेता म्हणत नाहीत तर महाराष्ट्राचे महालेखापाल असे म्हणत आहेत. "आंधळे दळते आणि कुत्रे पीठ खाते" हे मी म्हणत नाही तर कॅग म्हणते. सभापती महोदय, त्यापुढे जाऊन असे म्हटलेले आहे की, "पोलीस गृहनिर्माण मंडळाला दिलेले शंभर कोटी रुपये खर्च न होता पडून रहातात" याला काय समजायचे? हे कॅग म्हणत आहे मी म्हणत नाही. विरोधी पक्षाच्या सदस्यांने असे म्हटले असते तर ती गोष्ट वेगळी आहे. पण एका बाजुला पोलिसांकडून चांगल्या कामाची अपेक्षा करायची आणि दुसऱ्या बाजूला पोलिसांच्या घरासाठी शंभर कोटी रुपये दिले असताना त्यातील एक दमडी देखील खर्च करायची नाही, वाहरे शासन. पोलिसांसाठी पैसे कां खर्च होत नाहीत?. सभापती महोदय, हे कॅग म्हणत आहे, मी म्हणत नाही. सभापती महोदय, कॅगने पुढे असे म्हटलेले आहे की, "औद्योगिक महामंडळाने मान्यता न घेताच जमिनीचे वाटप केल्याने सव्वा तीन कोटी रुपयाचे नुकसान झालले आहे." असे आपल्या सरकारचे काम चालले आहे. सभापती महोदय, विजेच्या खरेदीवर पावणे चारशे कोटी रुपयाचा अतिरिक्त खर्च झाल्याचे कॅगला आढळून आले. मी याबाबतीत सांगणार आहे. हे पैसे कसे गेले, कुठे केले, कोणी कोळशाने तोंड काळे केले. सभापती महोदय, म्हणून महाराष्ट्र शासनाला उघडे करण्याचे काम महाराष्ट्राच्या महालेखापालांनीच केलेले आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम...

सभापती महोदय, महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणीमध्ये प्रत्येक वर्षी महामंडळाची यादी दिली जाते पण यावेळी महाराष्ट्राच्या आर्थिक पहाणीमध्ये महामंडळाची यादी दिलेली नाही, ती लपवून ठेवण्यात आलेली आहे. सभापती महोदय, ती यादी मी माहितीच्या अधिकाराखाली मागवून घेतली. त्यावेळी हे स्पष्ट झाले की, जवळजवळ 5560 कोटी रुपयाचा तोटा या महामंडळाच्या माध्यमातून झालेला आहे. एका बाजूला महाराष्ट्र कर्जबाजारी झालेला आहे आणि दुसऱ्या बाजूला या महामंडळाची यादी माझ्या हातामध्ये आहे. माझ्याकडे अधिक वेळ नसल्यामुळे मी याठिकाणी ते सगळे वाचून दाखवित नाही. पण या महामंडळाच्या माध्यमातून 5560 कोटी रुपयाचा तोटा झालेला आहे. प्रत्येक वर्षी आर्थिक पहाणीमध्ये या महामंडळाची माहिती असते पण यावेळेला मुद्दाम ती दिली गेलेली नाही. म्हणून हे शासन कशा पध्दतीने आपल्या कार्यकर्त्यांना उभे करण्यासाठी महाराष्ट्राच्या पैशाचा अपव्यय करीत आहे याचे हे जीवंन उदाहरण आहे. हे पांढरे हत्ती कोणासाठी पोसण्यात येत आहेत. एका बाजूला शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत आणि दुसऱ्या बाजूला या महामंडळाच्या माध्यमातून 5560 कोटी रुपये खर्च करतो आणि ती महामंडळे तोटयात घालवतो याचा मी याठिकाणी धिक्कार करतो. सभापती महोदय, महाराष्ट्रावर 1 लाख 85 हजार कोटी रुपयाचे कर्ज आहे. असे संक्षिप्त अर्थसंकल्पामध्ये दिलेले आहे. त्यानंतर ही आकडेवारी दुरुस्त केलेली आहे. संक्षिप्त अर्थसंकल्पात टेबल नंबर 7 वर शासनाने असे म्हटले आहे की, एकूण 2,96,748 कोटी रुपये यावर्षी शासनावर कर्जाचा बोजा पडणार आहे. आता 1 लाख 85 हजार रुपये कर्ज राहणार नाही तर शासनाच्या अधिकृत माहिती नुसार, संक्षिप्त अर्थसंकल्पात दिलेल्या आकडेवारीनुसार 2,96,748 कोटी रुपये यावर्षीचे कर्ज आहे. ही आमची अवस्था आहे.

यानंतर श्री. बरवड....

अशुद्धीत मत / शोधनीसाठी नाही

श्री. रामदास कदम ....

वाह रे सरकार ! माझ्याकडे सन 2001-02 पासून 2010-2011 पर्यंतची आकडेवारी आहे परंतु वेळेअभावी मी सर्व आकडेवारी वाचत नाही. पण या दहा वर्षामध्ये एकाही वर्षी आपण कर्जाच्या बाबतीत मागे गेलेलो नाही. याच्या व्यतिरिक्त शासनाने विविध कर्जासाठी जी हमी दिलेली आहे ती 36 हजार कोटी रुपयांची आहे. ही रक्कम कर्जाच्या व्यतिरिक्त आहे. ही हमी प्रामुख्याने साखर कारखानदारीसाठी, सहकारासाठी शासनाने घेतलेली आहे. ही हमी गरिबांसाठी, शेतकऱ्यांसाठी घेतलेली नाही. त्यामुळे याचा उल्लेख मला या ठिकाणी केला पाहिजे.

सभापती महोदय, आणखी एक बाब मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. सन्माननीय अर्थमंत्र्यांनी असे म्हटले आहे की, केंद्रीय करातील राज्याचा हिस्सा म्हणून महाराष्ट्रास 2010-11 ते 2014-15 या कालावधीत रुपये 75,406 कोटी प्राप्त होणार आहेत. सहाय्यक अनुदानाच्या रुपाने 2010-11 ते 2014-15 या कालावधीत महाराष्ट्रास रुपये 16,302 कोटी म्हणजे एकूण 91 हजार कोटी इतका निधी प्राप्त होणार आहे. दुसऱ्या बाजूला मी माननीय वित्तमंत्र्यांना सांगेन की, आपण जे ग्रीन बुक दिलेले आहे त्यामध्ये आपण जी आकडेवारी दिलेली आहे त्यात सुधारित अंदाज 2009-10 मध्ये रुपये 17,484 कोटी रुपये, अर्थसंकल्प 2010-11 मध्ये रुपये 12106 कोटी रुपये आणि यातील तफावत जवळजवळ 5377 कोटी रुपयांची आहे. म्हणजे केंद्राकडून मिळालेल्या अनुदानामध्ये झालेली घट ही 5377 कोटी रुपयांची आहे. एका बाजूला आपण सांगता की, सन 2015-15 पर्यंत आपल्याला केंद्राकडून 91 हजार कोटी रुपये मिळणार आहेत आणि दुसऱ्या बाजूला ग्रीन बुकामध्ये दाखविल्याप्रमाणे चालू आर्थिक वर्षामध्ये केंद्राकडून जे अनुदान मिळाले त्यामध्ये 5377 कोटी रुपयांची घट आहे. ही आकडेवारी बनवाबनवीची आहे. एकीकडे 91 हजार कोटी रुपये मिळणार आहेत असे सांगावयाचे आणि दुसऱ्या बाजूला ग्रीन बुकामध्ये आपण म्हणत आहात की, या वर्षात केंद्राकडून मिळणाऱ्या अनुदानामध्ये 5377 कोटी रुपयांची घट आहे. हे पुस्तक कोण वाचणार, एवढ्या खोलात कोण जाणार असे आपल्याला वाटले काय ? म्हणून माझे असे म्हणणे आहे की, अशा प्रकारे आकड्यांची बनवाबनवी करुन हा अर्थसंकल्प मांडण्यात आलेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ KGS/

श्री. रामदास कदम .....

सभापती महोदय, मघाशी माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आम्ही वेगळा विदर्भ का मागतो याबाबत उल्लेख केला. आपण म्हणालात म्हणून एवढ्यासाठीच मी उत्तर देणार आहे. जिल्ह्यांतर्गत दरडोई उत्पन्नाची जी यादी दिलेली आहे ती आकडेवारी मी मुद्दाम सांगणार आहे. सन 2007-08 मध्ये रत्नागिरी जिल्ह्यामध्ये दरडोई निव्वळ उत्पन्न 39,527 रुपये आहे. नाशिकमध्ये 51 हजार रुपये, धुळ्यामध्ये 31 हजार रुपये, नंदूरबारमध्ये 33 हजार रुपये, जळगावमध्ये 37 हजार रुपये दरडोई निव्वळ उत्पन्न आहे. रत्नागिरीमध्ये 39,527 रुपये दरडोई निव्वळ उत्पन्न आहे. एका बाजूला रत्नागिरी जिल्ह्याचे दरडोई निव्वळ उत्पन्न 39,527 रुपये असताना दुसऱ्या बाजूला आपल्याकडे नागपूर जिल्ह्याचे दरडोई निव्वळ उत्पन्न 60,592 रुपये आहे. भंडारा 42,037 रुपये, गोंदिया 36,986 रुपये, चंद्रपूर 43,456 रुपये, गडचिरोली 24,370 रुपये, धुळे 33,869 रुपये आणि नंदूरबार 30516 रुपये याप्रमाणे सन 2008-09 या वर्षातील दरडोई निव्वळ उत्पन्न आहे. यामध्ये आपण कोठेही कमी नाही.. एका बाजूला माझ्या जिल्ह्यात दरडोई निव्वळ उत्पन्न 39 हजार रुपये आहे म्हणजे रत्नागिरी जिल्ह्याचे दरडोई निव्वळ उत्पन्न कमी आहे. मग आपल्याकडे काय अन्याय झाला आहे ?

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

आपण साप साप म्हणून बोंबलत आहोत आणि लाठीने जमीन धोपटत आहोत. दुसऱ्या बाजूला ही आकडेवारी पहावी. जालना जिल्हयाचे दरडोई उत्पन्न 23,635 रुपये आहे, म्हणजे मराठवाडयावर किती अन्याय झाला आहे ते पहावे...

ॲड.उषा दराडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी भाषण करीत असताना 'बोंबलतो' असा शब्दोच्चार केला आहे तो कामकाजाच्या नोंदीमधून काढून टाकण्यात यावा अशी मी विनंती करते.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मोठयाने ओरडतो असे म्हणावे.

तालिका सभापती (श्री.रमेश शेंडगे) : सन्माननीय सदस्यांनी असंसदीय शब्द वापरला असेल तर तो कामकाजाच्या नोंदीतून काढून टाकण्यात येईल.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी वापरलेला शब्द असंसदीय असेल तर तो काढून टाकण्यास माझी हरकत नाही. परंतु त्याचा त्यांनी अभ्यास करुन घ्यावा.

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, बोंबलणे हा शब्द माझ्या माहितीप्रमाणे संसदीय आहे.

तालिका सभापती : परंतु काही सन्माननीय सदस्यांच्या भावनांचा विचार करुन तो शब्द काढून टाकण्यात येईल.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, येथे कोणाच्या भावनेचा विचार केला जात नाही. येथे नियमांचा विचार केला जातो. नियमांमध्ये आहे तेच केले जाते.

श्री.केशवराव मानकर : बोंबलणे हा शब्द संसदीय आहे की नाही ते स्पष्ट केले पाहिजे.

श्री.राजन तेली : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी सन 2007-08 मधील आकडेवारी वाचून दाखविली आहे. एका बाजूला ते सन 2008-09 ची आकडेवारी वाचून दाखवित आहेत, तर दुस-या बाजूला काही जिल्हयाची आकडेवारी देत असताना रत्नागिरी जिल्हयाची सन 2007-08 मधील आकडेवारी देत आहेत. सभागृहात चुकीचे रेकॉर्ड होऊ नये म्हणून सांगतो.

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ SBT/

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझ्याकडे मराठवाडयातील आकडेवारी आहे, त्यानुसार जालना जिल्हयाचे दरडोई उत्पन्न 23635 इतके आहे, नांदेडचे 28853 रुपये, लातूरचे 28764 रुपये, बुलढाण जिल्हयाचे 30165, वाशिम जिल्हयाचे 23,628 आणि वर्धा जिल्हयाचे 41,757 रुपये आहे. म्हणजे विदर्भापेक्षा मराठवाडा किती मागासलेला आहे ते मला सांगावयाचे आहे. (अडथळा) एका बाजूला विदर्भावर अन्याय झाला आहे, विदर्भावर अन्याय झाला आहे असे सांगत आहोत ते चुकीचे कसे आहे ते मी सांगत आहे. विदर्भापेक्षा मराठवाडयावर अन्याय झाला आहे, मराठवाडयापेक्षा कोकणावर अन्याय झालेला आहे हे मी शासकीय आकडेवारीनुसार सांगत आहे. (अडथळा) सभापती महोदय, माझ्या भाषणात अडथळा आणण्यापेक्षा ज्यावेळी सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी मिळेल त्यावेळी त्यांनी बोलावे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, बुलढाणा जिल्हा विदर्भात येतो, वाशिम जिल्हा, गडचिरोली, भंडारा हे जिल्हे विदर्भात येतात. परंतु सन्माननीय सदस्यांनी मराठवाडयात बुलढाणा, वाशिम जिल्हे येतात असा उल्लेख केला आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मला एवढेच सुचवावयाचे आहे की, ज्या पध्दतीने कोकणावर अन्याय झाला, ज्या पध्दतीने मराठवाडयावर अन्याय झाला तसाच विदर्भावर देखील अन्याय झाला आहे. कोकण व मराठवाडयापेक्षा विदर्भावर जास्त अन्याय झाला आहे असे नाही. प्रत्येकाने आम्हाला वेगळा विदर्भ द्यावा, आम्हाला स्वतंत्र कोकण द्यावा असे म्हणू लागलो तर महाराष्ट्रात कोण शिल्लक राहणार आहे ? आपण कोठून कोणाला जोडत आहोत ते ध्यानात घ्यावे. एवढाच संदेश मला द्यावयाचा आहे. आपल्याला अखंड महाराष्ट्र ठेवावयाचा आहे, आपण भाऊ भाऊ आहोत. सरकारकडे भांडून हक्काने मागितले पाहिजे, विकास करुन घेतला पाहिजे. एका बाजूला हे सरकार शेतक-यांचे आहे असे सांगितले जाते. दुस-या बाजूला कृषी विभागाचे बजेट कमी झालेले आहे. कृषी विभागाचे बजेट निम्म्यावर कसे आले आहे ते सांगतो. (अडथळा)

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

यानंतर श्री.शिगम.....

श्री. रामदास कदम...

सभापती महोदय, 2001मध्ये कृषी विभागाचे बजेट 4.28 टक्के होते. आता 2009-2010मध्ये हे कृषी विभागाचे बजेट 2.21 टक्के आहे. मी मधल्या वर्षांची आकडेवारी वाचून दाखवत नाही. परंतु मला एवढेच सांगावयाचे आहे की, गेल्या 10 वर्षामध्ये आपण कृषी विभागाचे बजेट निम्म्यावर आणलेले आहे. आज राज्यातील शेतीची काय अवस्था आहे हे आपणस दिसतेय त्यावर भाष्य करण्याची आवश्यकता नाही, शेतकरी आत्महत्या करताना दिसतोय.

सभापती महोदय, महिलावरील अत्याचाराच्या बाबतीत महाराष्ट्र 14व्या क्रमांकावर आहे. बालकांवर होणा-या अन्यायाच्या बाबतीत महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आहे. मागील 5 वर्षामध्ये 30 हजार लघुउद्योग आणि दीड हजार मोठे उद्योग बंद पडलेले आहेत. तसेच मागील 5 वर्षामध्ये 7 लाख कामगार बेरोजगार झालेले आहेत. हे पाप कोणाचे आहे ? याचे उत्तर माननीय मंत्री महोदय देणार आहेत काय ? मागील 10 वर्षामध्ये सिंचनावर 26 हजार कोटी रु. खर्च करण्यात आले. या एवढ्या रकमेमध्ये राज्यातील किती जमीन ओलिताखाली आणली गेली ? निवडणुकीच्या काळामध्ये 5 लाख हेक्टर जमीन ओलिताखाली आणू अशी आश्वासने आघाडी सरकारने दिली होती, त्या आश्वासनांचे काय झाले ? 26 हजार कोटी रुपये पाण्यात गेले काय ? हे पैसे कोणासाठी वापरले ? ते शेतक-यासाठी वापरले की ठेकेदारासाठी वापरले ? राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या बाबतीत महाराष्ट्र 14व्या क्रमांकावर आहे. रोजगार हमी योजनेचे 20 हजार कोटी रुपये महसुलात जमा केले. ते पैसे कोठे गेले ? सर्वप्रथम महाराष्ट्र राज्याने रोजगार हमी योजना सुरु केली आणि त्याचा आदर्श केन्द्राने घेऊन केन्द्राने सर्व राज्यामध्ये राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना सुरु केली. आज आपली रोजगार हमी योजना जवळ जवळ बंद झालेली आहे. आपल्या रोजगार हमी योजनेचे जे 20 हजार कोटी रुपये राज्याच्या एकत्रित निधीमध्ये वर्ग केले त्या पैशाचे काय केले, असा प्रश्न मला माननीय मंत्री महोदयांना विचारावयाचा आहे.

सभापती महोदय, संपूर्ण राज्याला 22 हजार कोटीचे पॅकेज जाहीर करण्यात आले. विदर्भ, मराठवाडा, कोकण या भागासाठी कुठे 5 कोटी, कुठे 6 कोटी अशा प्रकारे 22 हजार कोटीचे पॅकेज जाहीर केले. त्या पॅकेजचे पुढे काय झाले ? त्या पॅकेजमधील पैसे खर्च केलेले नाहीत. कोकणातील पर्यटन विकासाठी 100 कोटी 25 लाख रुपये पहिल्या वर्षी देण्यात आले. या पहिल्या वर्षातील 100 कोटी 25 लाख रु. पैकी किती रक्कम खर्च झाली. आपण कोकणासाठी जाहीर

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. रामदास कदम...

केलेल्या पॅकेज मधील किती रक्कम खर्च केली आहे ? ग्रामविकास विभागाचे 35 कोटी, जलसंधारणाचे 35 कोटी, पणन विभागाचे 37.43 कोटी याप्रमाणे रक्कम अखर्चित आहे. निवडणुका जिंकण्यासाठी आपण दिशाभूल करणा-या घोषणा केल्या. नंतर मते घेऊन सत्तेवर आल्यानंतर त्या घोषणांकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष केले. बोलाचीच कढी आणि बोलाचाच भात.

सभापती महोदय, मागील 10 वर्षापासून राज्यामध्ये विजेचा तुटवडा भासत आहे. राज्यामध्ये 10 हजार मेगावॉट विजेची तूट आहे. 2012 पर्यन्त ही विजेची तूट भरुण काढण्यात येईल असे ऊर्जामंत्री सातत्याने सांगत आहेत. माझ्याकडे माननीय ऊर्जा मंत्र्यांनी केलेली भाषणे आहेत. दरवर्षी 1 हजार मेगावॉट इतकी विजेची गळती होत असताना 2012 पर्यन्त विजेची तूट कशी काय भरुन काढण्यात येणार आहे ? सभापती महोदय, विजेच्या बाबतीत महाराष्ट्रामध्ये आज जी परिस्थिती आहे तिच उद्या 2012मध्ये पहावयास मिळणार आहे. उलटपक्षी महाराष्ट्र आणखी अंधारात जाईल. गुंतवणुकीच्या बाबतीत महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आहे असे सांगितले जाते. परंतु राज्यामध्ये वीजच नसेल तर मग उद्योग तरी कसे सुरु होणार, असा प्रश्न आहे. हे आघाडी शासन जनतेशी शुध्द फसवणूक करीत आहे.

....नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 14:15

श्री.रामदास कदम.....

सन्माननीय सभापती महोदय, कोकणातील फयान चक्रीवादळात सापडलेल्या 12 हजार आपद्ग्रस्तांना अद्याप आर्थिक मदत मिळालेली नाही. शासनाने निव्वळ घोषणा केली. सार्वजनिक वितरण विभागासाठी 110 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. पाच जीवनावश्यक वस्तूंचे भाव स्थिर ठेवण्यात येणार आहेत. शासनाला हे शक्य आहे का? विनाअनुदानित 6558 शाळा आहेत. 70 हजार शिक्षक शासनाच्या निर्णयाची वाट पहात आहेत. कुठून पैसे आणणार आहात? सभापती महोदय, याठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा उल्लेख केला आहे. गेल्या तीन महिन्यात 140 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. म्हणजे प्रत्येक दिवसाला सरासरी किमान 2 आत्महत्या झाल्या ही बाब प्रगतीशील महाराष्ट्राला शोभादायक नाही. मागील 5 वर्षात 7000 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या याचा अर्थ स्पष्ट होतो की, 7 हजार भगिनींचे कुंकू पुसण्याचे पाप, 7 हजार भगिनींच्या बांगड्या फोडण्याचे पाप, 7 हजार भगिनींना विधवा करण्याचे पाप या शासनाने केले आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले होते की, डॉ.नरेंद्र जाधव समितीचा अहवाल जशास तसा स्वीकारला आहे. माझ्याकडे डॉ.नरेंद्र जाधव समितीच्या अहवालाची प्रत उपलब्ध आहे. शासनाने स्पष्ट करावे की, या अहवालातील कोणत्या शिफारशी मान्य करण्यात आल्या? शेतकऱ्यांनी कोणती मदत दिली गेली? कदाचित डॉ.नरेंद्र जाधव समितीच्या अहवालातील शिफारशींची अंमलबजावणी झाली असती तर तेव्हापासून एकाही शेतकऱ्याने आत्महत्या केली नसती. मी वेळेअभावी या अहवालातील तरतुदी वाचून दाखवू शकत नाही. दुर्दैवाने माझ्यावर अशी वेळ आली याला इलाज नाही. सभापती महोदय, डॉ.नरेंद्र जाधव समितीच्या अहवालातील शिफारशींची अंमलबजावणी झाली नाही. या राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्राच्या जनतेला एक दोन वेळा नव्हे तर पाच वेळा शब्द दिला होता की, डॉ.नरेंद्र जाधव समितीचा अहवाल जशाच्या तसा स्वीकारला आहे. सहा महिन्यात त्या अहवालातील शिफारशींची अंमलबजावणी करणार असे म्हटले होते. दुर्दैवाने ती अंमलबजावणी झाली नाही. या अहवालात अनेक महत्वाच्या शिफारशी आहेत. शेतकऱ्यांना खते कुपनावर द्यावीत. खताचे मोफत वाटप करावे. शेतकऱ्यांने कुपनावर बियाणे द्यावे. मोफत बियाणे वाटप करावीत. 3.5 लाख कुटुंबे अतिसंवेदनशील आहेत. त्यांना दरमहा 25 किलो धान्य मोफत द्यावे. कुटुंबातील मुला-मुलींच्या लग्नासाठी 10 हजार रुपये द्यावेत. शिक्षणासाठी 500 रुपये द्यावेत. रोजगार हमी योजनेत

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.....

कोणती कामे घ्यावीत याची यादी दिलेली आहे. आम्ही अहवाल स्वीकारला असे मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले परंतु त्या अहवालाची अंमलबजावणी झाली असती तर कदाचित पुढील आत्महत्या झाल्या नसत्या. दुर्दैवाने तसे झाले नाही. फक्त घोषणा झाल्या. सभापती महोदय, कृषि उत्पादन 7 टक्के वाढले असे म्हटले आहे. कशामध्ये उत्पादन वाढले? बाजरी, ज्वारी आणि मका या पिकाचे उत्पादन वाढले. एका बाजूला शासन सांगते की, धान्यापासून मद्य बनविणार आहोत. हे धान्य कोणी खात नाही. हे धान्य कोणी खात नसेल तर त्याच्या उत्पादनामध्ये वाढ कशी झाली याचे उत्तर मंत्रीमहोदयांनी द्यावे. महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणी या पुस्तकामध्ये ही आकडेवारी दिली आहे.

सभापती महोदय, जीवनदायी योजनेपासून अनेक योजनांवर मला मुद्दे मांडावयाचे होते. परंतु वेळ अपुरी आहे. एक गोष्ट निश्चितपणे मी सांगू इच्छितो की, शासनाने जनतेची फसवणूक केली आहे. केवळ पोकळ घोषणा केल्या आहेत. जनतेची दिशाभूल केली आहे. खोटी आकडेवारी देऊन, खोटे पॅकेज देऊन सत्ता प्राप्त केली आहे. या सगळ्या गोष्टींचे पाप जनतेसमोर निश्चितपणे जाणार आहे आणि या सगळया गोष्टींचा जाब शासनाला द्यावा लागणार आहे. भविष्यात या सरकारकडून मला कोणतीही अपेक्षा नाही, महाराष्ट्राच्या जनतेला देखील नाही. मी मंत्रीमहोदयांना एवढेच विचारु इच्छितो की, मागासवर्गीय आणि आदिवासी विभागाचा जो निधी आहे तो अन्यत्र वळविण्याचे काम थांबविणार आहात की नाही? या राज्यातील मागासवर्गीय आणि आदिवासी जनतेवर अन्याय होऊ देऊ नका. माझ्याकडे या संदर्भातील आकडेवारी उपलब्ध आहे. हे शासन फक्त धनदांडग्यांचे शासन आहे. सर्वसामान्य गोरगरीब जनतेच्या मुळावर उठलेले शासन आहे. या शासनाचा मी धिक्कार करतो, या अर्थसंकल्पाचा धिक्कार करतो आणि माझे दोन शब्द संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र!

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखा नाही

श्रीमती मधु जैन (महाराष्ट्र विधानसभा सदस्यों द्वारा निर्वाचित) :सभापति महोदय, मैं वर्ष 2010-2011 के बजट पर अपने विचार व्यक्त करने के लिए खड़ी हूं. हमारी सरकार के वित्त मंत्री जी ने बहुत बढ़िया बजट पेश किया है. मैं यह कह सकती हूं कि यह बजट आम आदमी के लिए है. वित्त मंत्री जी ने आम आदमी का ध्यान रखते हुए बढ़िया बजट पेश किया है इसलिए मैं उनका अभिनंदन करती हूं. विरोधी पक्ष का काम ही है विरोध करना. उस दृष्टि से उन्होंने बहुत सी बातें यहीं बतायी हैं. महाराष्ट्र का इकॉनॉमिक सर्वे संबंधी पुस्तक मेरे पास भी है. उस पुस्तक में उल्लेखित कुछ चीज़ें मैं उनको बताना चाहती हूं. पृष्ठ क्रमांक 3 पर यह उल्लेख है कि वर्ष 2008-09 में राज्य की प्रति व्यक्ति औसत आय 54,867 रुपये है. जब कि पूरे देश की प्रति व्यक्ति औसत आय 33,283 है. इसका अर्थ यह है कि राज्य की प्रति व्यक्ति औसत आय देश की औसत आय की तुलना में ज्यादा है. बैंकिंग क्षेत्र में महाराष्ट्र प्रथम क्रमांक पर है. एग्रीगेट बैंक डिपाज़िट 10,36,974 करोड़ रुपये हैं. महाराष्ट्र में 2001 में जन्म दर 20.7 प्रतिशत थी जो 2008-09 में घट कर 17.9 प्रतिशत हो गई है. देश स्तर पर जन्म दर का प्रमाण 22.8 प्रतिशत है. 2000-01 मृत्यु दर 7.5 थी जो 2008-09 में 6.6 प्रतिशत हो गई है. जब कि देश स्तर पर मृत्यु दर का प्रमाण 7.4 प्रतिशत है. शिशुओं की मृत्यु दर 45 प्रतिशत से घट कर 33 प्रतिशत हो गई. जब कि देश स्तर पर 53 प्रतिशत है. प्रति व्यक्ति औसत आय बताती है कि हमारे राज्य में 40-50 वर्षो के अन्दर जिस समय यूपीए सरकार का राज्य रहा है, हमारा राज्य बहुत आगे बढ़ा है. कृषि क्षेत्र में पिछले साल की तुलना में इस वर्ष 8 प्रतिशत उत्पादन बढ़ा है. महाराष्ट्र में साक्षरता का प्रमाण 76.9 प्रतिशत है जब कि देश स्तर पर साक्षरता का प्रमाण 65 प्रतिशत है. आल वेदर में 97 प्रतिशत सड़के गांव को जोड़ी गई है. पूरे देश की तुलना में हमारा राज्य बिजली के उत्पादन में सबसे आगे है. इस दृष्टि से हमारे देश में महाराष्ट्र राज्य सबसे आगे हैं. उद्योग क्षेत्र में 10 प्रतिशत जमीन लगी है. जबकि हमारे राज्य की जनसंख्या 10 प्रतिशत से कम है. इसके बावजूद भी राज्य में 4133 प्रोजेक्ट मंजूर हुए है. देश की तुलना में 20.4 प्रतिशत है. देश स्तर पर 20273 प्रोजेक्ट मंजूर हुए हैं. इसी तरह महाराष्ट्र में 81763 करोड़ रुपये इनवेस्ट होने वाले हैं. देश की तुलना में यह 23.1 प्रतिशत है. देश स्तर पर 3,54,306 करोड़ रुपये इनवेस्ट होने वाले हैं.

यानंतर श्री शर्मा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . . श्रीमती मधु जैन का भाषण जारी (पूर्वी श्री. तालेवार)

सभापति महोदय, महाराष्ट्र की सरकार आम लोगों के हित के लिए पहले से ही कार्य कर रही है और भविष्य के लिए भी सरकार ने इस प्रकार के निर्णय लिए हैं. गेहूँ, चावल, फरसाण इत्यादि आवश्यक वस्तुओं को कर मुक्त किया गया है. 750 रुपए तक के होटल के कमरे को कर मुक्त किया गया है. छोटे उद्योगों को प्रोत्साहन मिले, इसके लिए वॅट की सीमा 40 लाख रुपए से बढ़ाकर 60 लाख रुपए की गई है. गरीब किसानों को 50 हजार रुपए की रकम बिना ब्याज के मिल सकती है. राज्य सरकार की जीवनदायी योजना के अन्तर्गत गरीब मरीजों को हेल्थ कार्ड दिए जाएंगे. शस्त्रक्रिया के लिए 3 लाख रुपए तक दिए जाएंगे और इसके अन्दर 80 प्रतिशत लोगों को फायदा होगा. इस प्रकार से बहुत से ऐसे मुद्दे हैं, जिनके द्वारा सरकार ने अच्छे कार्य किए हैं. इसमें कोई शक नहीं कि आम आदमी का समर्थन करते हुए उसके फेवर में यह बजट बनाया है.

सभापति महोदय, मैं इस बजट का समर्थन करते हुए सरकार को कुछ सुझाव देना चाहती हूँ. हमारा नॉन टॅक्स रेवेन्यू पिछले साल कम हुआ है. वर्ष 2008-09 में यह 8,773 करोड़ रुपए था और 2009-10 में अंदाज था कि यह राशि बढ़कर 12,700 करोड़ रुपए हो जाएगी, लेकिन यह राशि घटकर 5,763 करोड़ रुपए रह गई. नॉन टॅक्स रेवेन्यू का कम होना चिन्ता का विषय है. इसी प्रकार से महाराष्ट्र सरकार के ऊपर कर्ज की राशि चिन्ता का विषय है. कर्ज के बारे में हम देखते हैं कि 3 साल पहले कर्ज की राशि 1,42,382 करोड़ रुपए थी, जो कि इस साल 1,83,825 करोड़ रुपए हो गई है और अगले वर्ष यह राशि 2,09,648 करोड़ रुपए हो जाएगी. यह अच्छा संकेत नहीं है. जितना हमारे ऊपर कर्ज बढ़ता है, उतना हमारे ऊपर ब्याज भी बढ़ता जाता है और उसके कारण विकास के कार्यों पर कम खर्च कर पाएंगे. ब्याज और वेतन पर जितना खर्च हो रहा है, वह चिन्ता की बात है. बजट ब्रीफ के पेज 13 पर ब्याज और वेतन का "परसेंटेज टू रेवेन्यू " के बारे में जानकारी दी गई है. वर्ष 2000-01 में 88 प्रतिशत, वर्ष 2004-05 में 75 प्रतिशत था. वर्ष 2007-08 में यह और घटकर 50 प्रतिशत हो गया. वर्ष 2009-10 में यह फिर से बढ़ कर 66 प्रतिशत हो गया है. वर्ष 2010-11 में यह 70 प्रतिशत अपेक्षित है. हमारे लिए चिन्ता की बात यह है कि ज्यादा रेवेन्यू इसी विषय के पर खर्च हो रहा है. बढ़ता हुआ वेतन व खर्च का प्रतिशत हमारे लिए निश्चित रुप से चिन्ता का कारण है क्योंकि

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . . श्रीमती मधु जैन

विकास कार्य पर खर्च कम हो रहा है.

सभापति महोदय, दूसरी समस्या हमारे सामने यह है कि केन्द्र सरकार से जो पैसा आता है, उसमें से बहुत सारा पैसा वापस चला गया है, उस निधि को हम खर्च नहीं कर सके हैं. चाहे जवाहरलाल नेहरु हाउसिंग स्कीम हो, चाहे आदिवासियों के विकास की स्कीम हो, चाहे इरीगेशन के प्रोजक्ट हों, इनके लिए केन्द्र सरकार द्वारा दी गई बहुत सारी रकम ऐसी है, जो इस्तेमाल नहीं हुई. आदिवासियों के विकास के लिए 650 करोड़ रुपए में से 276 करोड़ रुपए वापस चले गए. हम यह देखते हैं कि आदिवासियों के विकास पर 3 हजार करोड़ रुपए खर्च करने के बाद जिस तरह से उनका विकास होना चाहिए था, उतनी अच्छी तरह से उनका विकास नहीं हो पाया है.

सभापति महोदय, मैं एक बात और कहना चाहूँगी. हम यह देखते हैं कि राज्य के अन्दर समान रुप से विकास नहीं हुआ है. राज्य की 11 करोड़ जनता में से 33 प्रतिशत जनता बी.पी.एल. के अन्दर रहेगी तो यही निष्कर्ष निकलता है कि समान रुप से विकास नहीं हो रहा है. खानदेश के जलगांव जिले में बी.पी.एल का प्रतिशत 43 है और धूलिया में यह 53 प्रतिशत है. और नंदुरबार में 73 प्रतिशत है. अगर बी.पी.एल. की जनता का प्रतिशत 50 से ऊपर दिखाई दे रहा है तो इस विषय के बारे में हमें गंभीरता से देखने की जरुरत है, क्योंकि यहां पर विकास नहीं हो रहा है.

. . . . भाषण जारी, नंतर तालेवार.

अशुधारित प्रत / अशुद्धीपत्र नाही

श्रीमती मधु जैन ...

अगर हम समान विकास की दृष्टि से देखें तो मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक एवम् नागपुर इन 5 जिलों में राज्य की कुल आय का 55 प्रतिशत आय होती है. सवाल यह है कि बाकी क्षेत्रों का भी समान विकास होना चाहिए और आय बढ़नी चाहिए. मुंबई में सवा करोड़ लोग रहते हैं. इनमें से 50 प्रतिशत लोग झोपड़पट्टियों में रहते हैं. झोपड़पट्टियों में रहने वालों का जीवनस्तर उठाने के लिए सरकार द्वारा योजनाएं की जा रही है लेकिन मैं कहना चाहती हूं कि इस दिशा में विशेष कदम उठाने की जरुरत है. सरकार ने बॅकलॉग दूर करने के लिए कुछ क्षेत्रों के लिए अच्छी तरतूद की है. कोंकण, विदर्भ एवम् मराठवाड़ा के लिए धनराशि की तरतूद की गई है. लेकिन खानदेश उपाशी (भूखा) रह गया है. बॅकलॉग की दृष्टि से देखें तो विदर्भ और मराठवाड़ा की मांग पर अधिक तरतूद की गई है. उर्वरित (शेष) महाराष्ट्र के लिए 472 करोड़ रुपये की तरतूद हुई है. लेकिन उत्तर महाराष्ट्र व खानदेश के लिए इसमें से कितनी धनराशि की तरतूद की गई है, उसका उल्लेख बजट में नहीं है.

तालिका सभापति : आपको दिया गया समय समाप्त हो गया है.

श्रीमती मधु जैन :सभापति महोदय, समय के बारे में महिलाओं पर ही अन्याय होता है. मेरा अनुरोध है कि मुझे और थोड़ा समय दीजिए.

सभापति महोदय, मेरा यह अनुरोध है कि खानदेश के विकास के लिए स्वतंत्र रुप से खानदेश वैधानिक विकास मंडल बनाया जाए. सम्माननीय सदस्य श्री गुजराथी जी ने भी बजट पर अपने विचार व्यक्त करते हुए इसका समर्थन करते हुए कहा था कि खानदेश के विकास के लिए विशेष पॅकेज दिया जाए ताकि खानदेश की जनता का जीवनस्तर ऊँचा उठ सके. दूसरी बात यह है कि सरकार ने महाराष्ट्र के 5 जिलों के लिए 6509 करोड़ रुपये का प्रावधान करने संबंधी घोषणा विशेष पॅकेज के अनतर्गत की थी. लेकिन खानदेश के लिए जो पॅकेज दिया गया था, उसमें से कुछ भी पैसा मिलना शुरु नहीं हुआ है. मेरी यह विनती है कि जिस चीज़ के लिए और जिस क्षेत्र के लिए धनराशि का अलाटमेंट हुआ है, उसी काम के लिए उस धनराशि का उपयोग किया जाए. केन्द्रीय सरकार की ओर से AIBP के अन्तर्गत जलगांव में सिंचाई के लिए वर्ष 2009-10 के लिए 70 करोड़ रुपये का प्रावधान किया गया था. यह धनराशि भी इस काम के

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लिए इस्तेमाल नहीं हुई. वह कहां खर्च हुई यह मालूम नहीं. जिस काम के लिए धनराशि दी गई है, वह उसी काम पर खर्च होनी चाहिए.

सभापति महोदय, 1 लाख 10 हजार करोड़ रुपये के बजट में करीब 70 प्रतिशत राशि वेतन और ब्याज देने में खर्च हो जाती है. विकास कार्य के लिए बजट में 30 हजार करोड़ रुपये का प्रावधान किया गया है. इसमें से केवल सिंचाई के लिए 25 प्रतिशत बजट रखा गया है. लेकिन खानदेश के सिंचाई प्रकल्प जो अधूरे पड़े है, उसको पूरा करने के लिए कोई प्रावधान नहीं किया जा रहा है.

अंत में, मैं इतना ही कहना चाहूंगी कि वित्त मंत्री जी ने यहां एक अच्छा बजट पेश किया है. उन्होंने अच्छी तरह से नियोजन किया है. मुझे विश्वास है कि माननीय मंत्री जी मेरे सुझावों पर ध्यान देंगे. मॉनेटरिंग सिस्टम हेतु तरतूद की गई है. लेकिन जो प्रोजेक्ट कार्यान्वित हो रहे हैं, उन पर अच्छी प्रकार से मॉनेटरिंग करना सबसे महत्वपूर्ण बात है. यह कहते हुए मैं अपना भाषण समाप्त करती हूं. धन्यवाद, जय हिंद, जय महाराष्ट्र.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) सभापती महोदय, सन 2010-2011 च्या अर्थसंकल्पावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय वित्त मंत्र्यांचा आणि माननीय वित्त राज्यमंत्र्यांचा हा पहिलाच अर्थसंकल्प असल्यामुळे त्यांचे अभिनंदन करावे असे मला वाटले होते परंतु त्यांचे अभिनंदन कोणत्या शब्दाने करावे आणि का करावे असा माझ्या समोर प्रश्न होता.सभापती महोदय, केन्द्रीय अर्थमंत्र्यांनी ज्यावेळी अर्थसंकल्प मांडला होता त्यावेळी त्यांच्या भाषणाच्या पुस्तकात एकूण 189 परिच्छेद होते. राज्याच्या अर्थमंत्र्यांनी जो अर्थसंकल्प मांडला होता तेव्हा त्यांच्या भाषणाच्या पुस्तकात एकूण 195 परिच्छेद होते. केन्द्राच्या अर्थसंकल्पाच्या भाषणा पेक्षा राज्याच्या अर्थसंकल्पाच्या भाषणाच्या पुस्तकात 6 मुद्दे जास्त होते. वास्तविक आपल्याकडील अर्थसंकल्पाच्या भाषणात कमी मुद्दे असावयास पाहिजे होते.

सभापती महोदय, अशा प्रकारे आपल्या अर्थसंकल्पाच्या भाषणाच्या पुस्तकात 195 परिच्छेद असले तरी त्यामध्ये एकही धोरणात्मक मुद्दा मला दिसला नाही. त्या भाषणात तीर्थक्षेत्राची मोठी यादी देण्यात आलेली आहे. अशा प्रकारे माननीय वित्त मंत्र्यांनी नवस फेडून घेतलेले आहेत. त्यांनी व्यक्तिगतरीत्या नवस फेडले असते तर ते मी मान्यही केले असते परंतु शासकीय तिजोरीच्या पैशातून त्यांनी नवस फेडले असून ही गोष्ट बरोबर नाही.

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील...

सभापती महोदय, या अर्थसंकल्पामधून आपणास काय दिसते? याठिकाणी जो आर्थिक पहाणी अहवाल सादर करण्यात आला आहे त्यामध्ये डेव्हलपमेंट एक्सपेंडिचर 86 हजार कोटी वरुन 83 हजार कोटीवर म्हणजे 3 हजार कोटींनी खाली आला आहे. त्याचप्रमाणे नॉन डेव्हलपमेंट एक्सपेंडिचर 28 हजार कोटीवरुन 45 हजार कोटीपर्यंत गेला आहे. या राज्यामध्ये वॅटनंतर केंद्र सरकारचा जी.एस. टॅक्स पुढील वर्षीपासून येत आहे. त्या पार्श्वभूमीवर आपण कोणतेही नियोजन केल्याचे याठिकाणी दिसत नाही. या अर्थसंकल्पामध्ये दूरदृष्टीचा पूर्णपणे अभाव आहे. शिक्षण हा गुंतवणुकीचा भाग असून त्यावरील खर्चाला कात्री लावता कामा नये.परंतु त्यावरील खर्चाला कात्री लावली जात आहे. आणि अन्य खात्यांवर भरमसाठ खर्च केला जात आहे, त्यावरील खर्चाला कात्री लावण्याची हिंमत होत नाही. आपण आज विकास कामांवर पाण्यासारखा पैसा खर्च करीत आहात.परंतु प्रत्यक्षात किती खर्च होत आहे? हा पैसा मधल्या मध्ये गडप होत आहे याचा विचार आपण करणार आहोत की नाही? या अर्थसंकल्पातील पहिल्या भागाचा शेवटचा परिच्छेद वाचलातर आपल्याला नेमके बजेटचे चित्र समजेल. त्यामध्ये असे म्हटले आहे की, "वार्षिक योजना सन 2010-11 बाबत योजना आयोगाशी अंतिम चर्चा झालेली नाही. तथापि, मंत्रिमंडळाच्या नियोजन उपसमितीच्या निर्णयानुसार या वर्षाच्या राज्य योजनेचे आकारमान रुपये 33,935 कोटी निश्चित करण्यात आले आहे" तुमच्या योजनेचे आकारमान राष्ट्रीय नियोजन आयोगाने मान्य केले नाही. म्हणजे यामध्ये उशीर कुणामुळे झाला? हे आपण स्पष्ट केले पाहिजे. उद्या जर यामुळे कात्री लागली तर ती विकास कामांना लागेल, बजेटमधील रक्कम प्रत्यक्षात शिल्लक राहणार नाही. हे यापूर्वी कधीही झालेले नाही. आपण म्हणता की, कामामुळे गोंधळ होतो. या कामाकडे कुणाचे लक्ष लागले नाही? माननीय अर्थमंत्र्यांनी पुन्हा पुन्हा सांगितले की, हा करवाढ नसलेला अर्थसंकल्प आहे. या अधिवेशनापूर्वी 15 दिवस अगोदर 1 टक्का वॅट वाढविला. त्यामुळे आपण महागाई वाढविली. आणि आता काही वस्तूंवरील कर कमी केल्याचा आविर्भाव आपण आणीत आहात. ही शुध्द धूळफेक आहे, फसवणूक आहे. आपण एका बाजूला कोणतीही करवाढ केली नाही असे सांगावयाचे. आणि अधिवेशन सुरु होण्यापूर्वी 15 दिवस अगोदर ही करवाढ करावयाची. आणि दुसरीकडे आम्ही महागाई कमी केल्याचे सांगावयाचे. आपण कापूरावरील कर कमी केला. म्हणजे आता कापूर पेटवून तुमची आरती ओवाळायला पाहिजे. त्याचप्रमाणे आपण हेअरपीनवरील कर कमी केला. आज गरीब महिला हेअर पीन वापरीत नाहीत, त्या रबर बँड वापरतात, किंवा दोरी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ SBT/

श्री. कपिल पाटील....

बांधतात. सभापती महोदय, आपण फॅशन शोमध्ये पाहिले आहे. त्याठिक्राणी महिला वापरीत असलेल्या हेअर पीनची किंमत 20 ते 25 लाख रुपये असते, त्या डायमंडच्या हेअरपीन असतात. त्यावरील कर आपण माफ केला आहे. त्याचप्रमाणे आपण साबुदाण्यावरील कर माफ केला आहे. या राज्यातील एक तृतियांश जनता उपाशी आहे. फ्रान्सच्या राणीकडे खायला भाकरी मागण्यासाठी मोर्चा आला. त्यावेळी राणीने मोर्चेकऱ्यांना सांगितले की, तुम्हाला भाकरी मिळत नसेल तर केक खा. सभापती महोदय, हे शासन सांगत आहे की, तुम्हाला उपास घडत असेल तर साबुदाण्याची खिचडी खा, साबुदाणा वडा खा. परंतु आज गोरगरीब जनतेला चटणी आणि भाकरी पाहिजे.याचा अर्थ फ्रान्सच्या राणीनंतर तुमचाच अवतार आहे.

तालिका सभापती (श्री.रमेश शेंडगे): आता आपण जेवणाची सुट्टीसाठी मध्यंतर घेणार आहोत...

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्यांच्या म्हणण्याप्रमाणे राज्यातील निम्मी जनता उपाशी असतांना आपण जेवण करणे बरोबर नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, विरोधी पक्षाकडील प्रस्तावावर चर्चा करावयाची असल्यामुळे जेवणाची सुट्टी घेण्यात येऊ नये.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय अर्थमंत्र्यांचा देवावरील विश्वास जास्त आहे. या राज्यातील जनतेचा देवावरील विश्वास वाढत आहे. परंतु ज्या रांगा लागलेल्या आहेत त्या देवावरील वाढलेल्या विश्वासामुळे नाही.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील . . ..

तुम्ही सार्वजनिक पूजा असो, साईभंडारा असो तर तेथे प्रचंड मोठया प्रमाणात रांगा लागलेल्या असतात. त्या रांगेतील लोकांचे चेहेरे पहा, मग आपल्याला दिसेल की, त्यांचे चेहेरे आणि कपडे सुध्दा विटलेले असतात. कारण त्यांच्या पोटामध्ये आग असते, त्यांच्या पोटामध्ये खड्डा पडलेला असतो. आपल्या पोराबाळाला कधीतरी तुपाचा बेदाणा घातलेला शिरा खावयास मिळावा म्हणून रांग लावून महाप्रसाद घरी घेऊन जाणाऱ्या महिला तेथे उभ्या असतात. कारण त्यांना घरी असा शिरा आपल्या खर्चाने बनवता येत नाही. तुम्ही जर या लोकांच्या पोटाची काळजी घेतली असती आणि त्यांचे उपास कमी करता आले असते तर ते अधिक बरे झाले असते. पण तुम्ही या संपूर्ण अर्थसंकल्पामध्ये त्याची काळजी घेतलेली नाही. तीर्थस्थानांची यादी खूप मोठी आहे, लहान नाही. पण भाविकांची गैरसोय दूर होईल याबद्दल शंका नाही. मात्र तुम्ही त्या काळजीपोटी हे बजेट मांडलेले नाही. तुम्ही जर खरोखरच त्यांची काळजी घेतली तर विठूरायाने तुम्हाला आशिर्वाद दिले असते. आज किती माणसे उपाशी आहेत ? तर याबाबतीत देशामध्ये आपल्या राज्याचा क्रमांक तिसरा आहे. उत्तर प्रदेश आणि बिहार या दोन राज्यांनंतर दारिद्र्याच्या बाबतीत सांगावयाचे तर पुरोगामी राज्य असलेले महाराष्ट्र राज्य आज तिसऱ्या क्रमांकावर आहे म्हणजे उत्तर प्रदेश आणि बिहार या राज्यांच्या नंतर आपला क्रमांक आहे एवढेच समाधान. पण अन्य राज्यांच्या तुलनेत आपण सर्वात पुढे आहोत. देशामध्ये 27 टक्के इतका गरिबांचा आकडा असताना, आपल्याकडे 30 टक्के म्हणजे आपल्याकडे 3 टक्के अधिक गरीब माणसे आहेत. ही आकडेवारी जुन्या निकषानुसार आहे. जर खरे निकष लावले तर ही संख्या 50 टक्क्यापर्यंत जाईल. श्री.अर्जूनसेन गुप्ता यांनी जो अहवाल दिला आहे, त्यामध्ये त्यांनी असे म्हटले होते की, या देशातील 77 कोटी जनता ही 20 रुपये खर्च करण्याची ऐपत नसलेली आहे आणि यातील सर्वात मोठी संख्या ही महाराष्ट्रातील आहे ही गोष्ट सगळ्यात वाईट आहे. याचा कुठेही या अर्थसंकल्पामध्ये विचार केलेला आहे असे मला दिसत नाही. सभापती महोदय, पैसा तर खूप आहे, ज्या पैशाची आपण वारंवार चर्चा करतो. मॉलमध्ये प्रचंड गर्दी आहे, लोकांच्या गर्दीने मॉल भरभरुन वाहत असतात. पंचतारांकित हॉटेल मध्ये जे उष्ट केलेले अन्न उरलले असते ते फेकून दिले जाते. एका बाजूला उरलेले जेवण फेकून द्यावयाचे आणि दुसऱ्या बाजूला सगळी गरीब जनता उपाशी आहे आणि त्यांच्यासाठी मात्र शासनाने कोणतीही योजना आणलेली नाही. यामध्ये जीवनदायी योजना आणलेली आहे, पण जी बी.पी.एल.

. . . .2 एस-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील . . . .

मधील जनता आहे म्हणजे 15 हजार पेक्षा कमी उत्पन्न असलेली जनता आहे आणि दुसरीकडे जास्त उत्पन्न असलेली जनता आहे. गेल्या वेळेला आपले पर कॅपिटा इन्कम 49 हजार होते आणि यावेळेला तुम्ही ते 54 हजार झाल्याचा आव आणलेला आहे. पण ज्याचे 54 हजार उत्पन्न आहे, तो जीवनदायी योजनेसाठी पात्र नाही, त्यासाठी त्याच्याकडे पिवळे रेशनकार्ड असावयास पाहिजे आणि या माणसाला पिवळे रेशनकार्ड मिळत नाही. मी सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांना सांगू इच्छितो की, तुमचा जो गरीब कामगार आहे, त्याला मिळत नाही.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, शासनाने जीवनदायी योजनेच्या बाबतीत ऐतिहासिक निर्णय घेतलेला आहे. आपण जे सांगत आहात, ते बरोबर आहे की, बीपीएल खाली असणाऱ्या कार्डधारकांनाच ती जीवनदायी योजना लागू होती. पण यावेळेला केशरी कार्डधारकांना सुध्दा समाविष्ट केल्यामुळे जीवनदायी योजनेची व्याप्ती वाढलेली आहे. सभापती महोदय, रेकॉर्डवर चुकीचे राहू नये म्हणून मी सांगत आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, ही व्याप्ती किती उत्पन्न गटाची आहे हे तुम्ही कुठे दिलेले आहे.

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : या सभागृहामध्ये सरकारच्यावतीने प्रवक्ता, काहीही झाले की त्याबाबतीत ते सरकारच्यावतीने खुलासा करतात.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, रेकॉर्डवर चुकीचे राहू नये म्हणून. सरकारने जी चांगली कामे केलेली आहेत, त्याची स्तुती करु नका. पण जे आहे ते तरी तसे रेकॉर्डवर येऊ द्या.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांना काळजी आहे की, माझ्याकडून काही चुकीचे रेकॉर्डवर जाऊ नये. पण मला सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांना असे सांगावयाचे आहे की, आपण ज्या गरीब कामगारांचे नेतृत्व करीत आहात, ते कामगार अर्धपोटी आहेत याचा आपण विचार करणार आहोत की नाही ? गिरणी कामगारांच्या बाबतीत आपण काय केलेले आहे ? त्यांच्यासाठी अर्थसंकल्पामध्ये कुठेही तरतूद नाही. गरिबी किती भयावह आहे ? यावेळेला बालमृत्यू दर फक्त एक टक्क्याने कमी झालेला आहे म्हणजे 34 टक्के होता, तो 33 टक्के झालेला आहे म्हणजे याचा अर्थ ही सगळी मुले मृत्यू पावत आहेत, ती कुपोषणामुळे मृत्यू पावत आहेत हे आपल्याला नाकारता येणार नाही. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप हे कामगारांचे नेते आहेत. पुणे येथे एका आरोग्य सेनेने हमालांचा सर्व्हे केला.

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ MMP/ प्रथम सौ. रणदिवे... 14:45

श्री. कपिल पाटील....

सभापती महोदय, त्या सर्व्हेमध्ये असे आढळून आले की, साधारणपणे कष्ट करणाऱ्या माणसाला दिवसाला 2400 कॅलरीज लागतात. तो फक्त 600 कॅलरीवर जगतो त्याच्याकडे पिवळे रेशनकार्ड नाही केशरी रेशन कार्ड आहे तरी देखील तो 600 कॅलरीजवर जगतो याचे कारण आपल्या पोराबाळांच्या शिक्षणासाठी, लग्नासाठी पैसे वाचविण्याच्याभरात तो स्वतःच्या पोटाला चिमटा काढत जगत असतो. ही सगळयात वाईट स्थिती आहे. याचा विचार या बजेटमध्ये कुठे आहे? याबद्दल माननीय मंत्रिमहोदय काहीही बोललेले नाहीत. मात्र हेअरपीनबद्दल या बजेटमध्ये उल्लेख करण्यात आलेला आहे.

सभापती महोदय, या राज्यातील हमालाने, या राज्यातील कष्टकऱ्याने, या राज्यातील शेतमजुराने आपल्या मुलांचे स्वप्न पहायचे नाही काय? हा खरा प्रश्न आहे.एखाद्या कास्तकाराने आपली मुलगी कलेक्टर व्हावी याचे स्वप्न पहायचे नाही काय? आज त्याला हे स्वप्न पहाता येत नाही. रस्त्यावरच्या माणसाने आपला मुलगा शिकला पाहिजे, पुढे गेला पाहिजे हे स्वप्न पहावे की नाही? पण त्याला हे स्वप्न पहाता येत नाही. सभापती महोदय, या बजेटमध्ये शिक्षणावरील खर्च किती आहे. आपले सगळे स्थूल उत्पन 692749 कोटी रुपये आहे. आणि शिक्षणावरील खर्च 22000 कोटी रुपये इतका आहे. हा आकडा नेहमी शिक्षकांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या सदस्यांच्या तोंडावर फेकला जातो. एकूण स्थूल उत्पन्नाच्या फक्त 3.18 टक्के एवढाच हा खर्च आहे. एकूण स्थूल उत्पन्नाच्या फक्त तीन टक्के खर्च शिक्षणावर होतो. ज्या थोर नेत्यांची याठिकाणी नावे सांगितली जातात त्या मौलाना आझाद यांनी शिक्षण मंत्री असताना सांगितले होते की, "शिक्षणावर एकूण उत्पन्नाच्या किमान 6 टक्के खर्च झाला पाहिजे." बजेटचा आकडा या ठिकाणी सांगू नका. माननीय मंत्रिमहोदय मान हलवत आहेत. माननीय मंत्रिमहोदय, मी तुम्हाला प्राथमिक शिक्षणाचा आकडा सांगत आहे. तुमचा इकॉनॉमिक सर्व्हे एक तर तुम्ही बदला किंवा तो मागे घ्या. मागच्या वर्षीचा आर्थिक पाहणीचा अहवाल 1 कोटी 33 लाख मुले प्राथमिक शिक्षण घेत होती असे सांगतो तर यावर्षीचा अहवाल असे सांगतो की, आता ती फक्त 1 कोटी 4 लाख मुले उरलेली आहेत. 29 लाख मुले गेली कुठे? ही शाळाबाहय मुले कुठे आहेत? शासनाचा आर्थिक पाहणी अहवाल असे सांगतो की, ती मुले बाहेर फेकली गेलेली आहेत. माणसांना शिकायला वाव नाही. वीट भट्टीवरील मुले असतील अथवा ऊस तोडणी कामगारांची मुले असतील, ही मुले अद्याप शाळेत जात नाहीत.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील....

त्यांच्यासाठी साखर शाळा उघडल्या, अमुक शाळा उघडल्या. अशा प्रकारच्या अनौपचारिक शाळांचे प्रयोग याठिकाणी सांगू नका. ही मुले औपचारिक शाळेत आहेत की नाही याचा आकडा सांगा आणि औपचारिक शाळेचा आकडा काढला तर हजारो नाही तर लाखो मुले आज शाळेच्या बाहेर असलेली दिसतील. मेंढपाळांची मुले कुठे आहेत? मेंढपाळांचे तांडेच्या तांडे फिरत असतात. मेंढपाळाचा एकही मुलगा शाळेत जात नाही. सभापती महोदय, ज्येष्ठ सदस्यांनी याच सभागृहात या मेंढपाळांच्या मुलांसाठी फिरती शाळा म्हणजे मेंढपाळांच्या मागे जाणारी शाळा काढा अशी मागणी केली होती. सरकार ती शाळा काढू शकले नाही. पण ते सर्व अनौपचारिक प्रयोग आहेत. घटनेने 14 वर्षापर्यंतच्या मुलाला सक्तीचे आणि मोफत शक्षण देण्याची जबाबदारी राज्य आणि केंद्र शासनावर टाकण्यात आलेली आहे. या मुलांनी औपचारिक शाळेतच गेले पाहिजे. त्यांच्यासाठी अनोपचारिक शाळेचा प्रयोग करायला शासन काही एनजीओ नाही.एन.जी.ओं.नी हा प्रयोग केला तर ती गोष्ट वेगळी आहे. एनजीओने उघडलेल्या शाळा आणि शासनाने एन.जी.ओंच्या रुपाने उघडलेल्या शाळा ही धूळफेक आहे. जोपर्यंत रेग्युलर अनुदानित शाळेत मुले जात नाहीत तोवर ती शाळेत गेली आहेत असे सांगता येत नाही. 29 लाख शाळाबाहय मुलाचा आकडा शासनाने दिलेला आहे. त्याच्यापेक्षा जास्त मोठा हा आकडा आहे आणि तो महाराष्ट्रात आहे याचे जास्त दु:ख होत आहे. सभापती महोदय, शिक्षणावर गेल्या वेळेपेक्षा फक्त .80 टक्के खर्च वाढविण्यात आलेला आहे. प्रत्यक्षात तो अजून दोन-तीन टक्के वाढविला असता तर या राज्यातील शिक्षण सेवकांचा प्रश्न मिटला असता. शासनाने या संदर्भात सभागृहात अनेक वेळा आश्वासन दिलेले आहे पण ते पाळलेले नाही. हा प्रश्न कॅबिनेटपुढे गेलेला नाही. शिक्षण सेवकांचा पगार वाढविण्यासाठी आणि त्यांना शिक्षक म्हणून सन्मान देण्यासाठी व तो कायदा रद्द करण्यासाठी शासनाने एकही पाऊल उचललेले नाही. ग्रामीण भागातील शाळा आणि शहरी झोपडपट्टयांमधील शाळा बंद पडण्याची वेळ आलेली आहे. पण वेतनेत्तर अनुदानासाठी या शासनाने चार आण्याची देखील तरतूद केलेली नाही. शिक्षकांना केंद्रा प्रमाणे वेतन द्या अशी मागणी आहे पण तीही या शासनाने नाकरलेली आहे. पण शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये आज मेरीटची माणसे करीअर म्हणून, प्रोफेशन म्हणून यावयास तयार नाहीत इतकी अवहेलना आणि इतके शोषण या शिक्षण क्षेत्रात आहे ते दूर करायला शासन तयार नाही.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील....

सभापती महोदय, यंदाचे वर्ष हे महाराष्ट्राचे सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे. या सुवर्णमहोत्वाच्या निमित्ताने महाराष्ट्रातील तीर्थस्थांनाना निधी उपलब्ध करुन देण्यात आला पण सुवर्णमहोत्सवी महाराष्ट्रासाठी ज्यांनी ज्यांनी त्याग केला त्यांच्यासाठी चार आणे तरी उभे केले आहेत काय? आपण याठिकाणी ज्या सगळयांचे फोटो वरती लावलेले आहेत, संयुक्त महाराष्ट्र ज्यांनी ज्यांनी घडविला मग ते एस.एम.जोशी असतील, भाई डांगे असतील. आचार्य अत्रे असतील शाहीर अमरशेख असतील, पंजाबराव देशमुख असतील, प्रबोधनकार ठाकरे असतील, सी.डी.देशमुख असतील या सगळयांच्या स्मारकासाठी त्यांची तीर्थस्थळे उभी करावीत म्हणून एक रुपया सुध्दा या अर्थसंकल्पामध्ये ठेवलेला नाही. त्यांच्या नावाने

यानंतर श्री. बरवड...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील .....

त्यांची तीर्थस्थळे उभी करण्यासाठी एक रुपया सुध्दा ठेवलेला नाही. त्यांचे पुतळे उभे करा असे मी म्हणत नाही पण त्यांनी केलेले कार्य पुढच्या पिढीच्या लक्षात आणून द्यावयाचे असेल तर त्यांची जिवंत स्मारके उभी करण्याची आवश्यकता आहे परंतु ते केलेले नाही. माझी एकच मागणी आहे की, संपूर्ण प्रशासनावरील जो वाढता खर्च आहे त्याचा पुनर्विचार शासन करणार की नाही ? तो विचार शासनाने करावा अशी माझी मागणी आहे. संपूर्ण ॲडमिनिस्ट्रेटिव रिफॉर्म करण्यासाठी स्वतंत्र समिती नेमावी आणि विकास कामाच्या पैशाची जी गळती होते, शेवटच्या माणसांपर्यंत ते पैसे पोहोचत नाहीत, ते रोखण्यासाठी सुध्दा वेगळी पाहणी करावी अशी मागणी मी या निमित्ताने करतो आणि माझे भाषण संपवितो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री. रमेश शेंडगे) : यानंतर सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे बोलतील.

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, माझी एक विनंती आहे. मी अर्थसंकल्पावर बोलण्यासाठी शुक्रवारी नाव दिलेले आहे. मी नाव दिल्यानंतर अनेक सन्माननीय सदस्यांनी नावे दिलेली आहेत. माझी हरकत अशी आहे की, ज्या सन्माननीय सदस्यांनी माझ्यानंतर नावे दिलेली आहेत त्यांना आधी बोलण्याची संधी दिली जात आहे. मी काय अन्याय केलेला आहे की ज्यामुळे माझे नाव शेवटी ठेवले जाते ?

तालिका सभापती : पक्ष प्रतोदांनी दिलेल्या यादीनुसार आपले नाव खाली आहे.

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, मी पक्ष प्रतोदांकडूनच नाव दिलेले आहे. सर्वात आधी माझे नाव गेलेले आहे याची मला खात्री आहे. आपण सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांच्यानंतर मला संधी दिली तरी काही म्हणणे नाही. माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, माझ्या रंगामुळे काही त्रास आहे काय ? माझ्या कपड्यामुळे काही त्रास आहे काय ?

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे यांनी रंगाचा उल्लेख केला. सन्माननीय सदस्या महिला आहेत आणि रंगासाठी महिलेचा अपमान करणे बरोबर नाही.

श्री. राम पंडागळे : सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील हे शिक्षक आहेत....

तालिका सभापती : पक्ष प्रतोदांनी दिलेल्या यादीनुसार नावे पुकारली जातात.

श्री. राम पंडागळे : माननीय प्रतोद महोदय या ठिकाणी बसलेले आहेत. मी सर्वात आधी माझे नाव दिलेले आहे. सन्माननीय सदस्य श्रीमती मंदाताई म्हात्रे यांना बोलण्याची संधी दिली त्याबद्दल माझा आक्षेप नाही.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्या श्रीमती मंदाताई म्हात्रे यांनी आपले भाषण सुरु करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्याचा सुवर्ण महोत्सव साजरा करीत असताना माननीय अर्थमंत्र्यांनी या राज्याचा जो अर्थसंकल्प सादर केलेला आहे तो ऐतिहासिक, क्रांतिकारक आणि सर्वसामान्य माणसाला दिलासा देणारा आहे. या राज्याचे माननीय अर्थमंत्री श्री. सुनील तटकरे साहेब त्याचप्रमाणे माननीय अर्थराज्यमंत्री श्री. विजय वडेट्टीवार यांनी राज्याचा जो अर्थसंकल्प मांडलेला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, माननीय अर्थमंत्र्यांनी राज्यातील विकास योजनांचा पूल, धार्मिक स्थळांचा विकास, महापुरुषांचा आदर हे सगळे डोळ्यासमोर ठेवून राज्याचा विकास आणि सामाजिक न्यायाच्या प्रक्रियेला गतिमान करणारा 7654 कोटी रुपये तुटीचा अर्थसंकल्प सादर केलेला आहे. ग्रामीण आणि कृषी क्षेत्राला आर्थिक मदतीचा हात देत असताना 50 हजार रुपयांपर्यंतचे कर्ज शून्य टक्के दराने देण्याची घोषणा केली आहे. यापूर्वी शेतकऱ्यांना डिसेंबर महिन्यापासून कर्जमाफी योजना चालू केलेली आहे. गेली चाळीस वर्षे कोकणाकडे कधीच कोणी लक्ष दिलेले नव्हते. या वेळचा अर्थसंकल्प पाहिला तर चाळीस वर्षानंतर कोकणातूनच हा अर्थसंकल्प सादर केला की काय असे वाटते.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे.....

40 वर्षानंतर ही पहिलीच सुरुवात झाली आहे. कोकणाविषयी सर्वच सन्माननीय सदस्य बोलतात. पहिल्यांदाच कोकणातील मंत्री महोदय श्री.सुनील तटकरे यांनी अर्थसंकल्प सादर केलेला आहे. त्याबद्दल मी मनापासून त्यांचे अभिनंदन करते आणि धन्यवाद देते. सन्माननीय अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्प मांडला आहे तो कोकणाचा अभ्यास करुनच मांडलेला आहे. माननीय वित्त मंत्र्यांकडून आमच्या अपेक्षा होत्या. त्या पूर्ण झालेल्या नाहीत. या अर्थसंकल्पात ठाणे जिल्हा कोठेच दिसत नाही याची मनामध्ये खंत वाटते. ठाणे जिल्हयात 12 तालुके आहेत. एवढया मोठया ठाणे जिल्हयासाठी या अर्थसंकल्पात कोणत्याही विभागासाठी काही तरतूद केल्याचे दिसत नाही. या ठाणे जिल्हयाला ऐतिहासिक परंपरा आहे, प्राचीन पार्श्वभूमी आहे. मुंबईतील लोकांना ठाणे जिल्हयातून पाणी मिळते. मुंबईतील लोकांची तहान ठाणे जिल्हा भागवित आहे. असे असताना आमच्या जिल्हयाची प्राचीन पार्श्वभूमी पाहिली तर कल्याणचे सुभेदार असोत, चिमाजी अप्पा असोत, ज्या क्रांतीकारक लोकांना ठाणे कारागृहात फाशी देण्यात आले आहे ते कारागृह असो, ऐतिहासिक मंगलगड, माहुलगड आहे, वसईचा, बेलापूरचा किल्ला असो, विरारची जीवदानी माता आहे, डहाणूची महालक्ष्मी आहे. अर्नाळा, बोर्डी, माहीम-केळवे बीच आहे, या जिल्हयामध्ये अशी प्रसिध्द ठिकाणे असताना सुध्दा त्यांच्यासाठी काहीच दिलेले दिसत नाही. ठाणे जिल्हयात अर्नाळयापासून वसई, पालघर, विरार, मिरा- भाईंदर, नवी मुंबई येथपर्यंत समुद्र किनारा आहे. या समुद्र किना-यासाठी जेटी बांधणे, मच्छिमारांसाठी ओटे देणार आहात, गाळ काढण्यासाठी 70 कोटींची तरतूद केलेली आहे. परंतु ठाणे जिल्हयासाठी नेमकी किती तरतूद केलेली आहे ते दिसत नाही. या 70 कोटी रुपयांमधून एवढया मोठया जिल्हयाला व एवढा मोठा समुद्र किनारा असताना शासन नक्की किती निधी देणार आहे त्याची आम्ही वाट पहात आहोत. शासनाने या 70 कोटीतून ठाणे जिल्हयाला व समुद्र किना-याच्या विकासासाठी भरीव निधी द्यावा अशी विनंती करते. ठाणे जिल्हयामध्ये आरोग्य व्यवस्थेचा बोजवारा उडालेला आहे. या जिल्हयात आदिवासींची संख्या खूप आहे. मग विक्रमगड, शहापूर, वाडा, डहाणू असेल या भागातील रुग्णालयांची स्थिती पाहिली तर तेथे डॉक्टर्स उपलब्ध होत नाहीत, औषधे मिळत नाहीत. ठाणे-नाशिक हायवे झालेला आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KGS/ MMP/ KTG/

श्रीमती मंदा म्हात्रे.....

या हायवेवर अपघात होतात. त्याठिकाणी ट्रॉमा केअर सेंटरची व्यवस्था केल्याचे दिसत नाही. ठाणे जिल्हयात 7 महानगरपालिका आहेत. नवी मुंबईचे डम्पिंग ग्राऊंडची व पाणी पुरवठयाची व्यवस्था आहे, परंतु बाकीच्या महानगरपालिकांची स्वत:ची अशी कोणतीच व्यवस्था नाही. त्यासाठी काहीच तरतूद केलेली नाही. ठाणे सागरी मार्गावर मोठे खडक आहेत, त्यामुळे रात्रीच्या वेळी त्यावर बोटी आदळतात, त्यामुळे मच्छिमारांची जाळी फाटतात. हे खडक फोडण्यासाठी शासनाने तरतूद करावी, अशी मी विनंती करते.

यानंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्रीमती मंदा म्हात्रे...

सभापती महोदय, नवी मुंबई येथे आंतरराष्ट्रीय विमानतळ बांधण्यासाठी आवश्यक त्या बाबींची पूर्तता करण्यात येत असल्याचे अर्थसंकल्पामध्ये नमूद केलेले आहे. 70 हजार शेतक-यांनी आपल्या जमिनी दिलेल्या आहेत. या प्रकल्पग्रस्तांच्या जमिनी ताब्यात घेतल्यानंतर त्यांना अजून साडेबारा टक्के भूखंडाचे वाटप केलेले नाही. अनेक शेतक-यांची कुटुंब व्यवस्था वाढल्यामुळे त्यांनी तेथे घरे बांधलेली आहेत, ती घरे अजून पर्यन्त कायम करण्यात आलेली नाहीत. आपल्या शेतक-यांच्या जमिनी घेतल्यानंतर त्यांचे ज्या पध्दतीने पुनर्वसन व्हायला पाहिजे त्या पध्दतीने ते होत नाही. या प्रकल्पग्रस्तांनी गरजेस्तव घरे बांधली. ती नियमित केली जात नाहीत. माजी मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख तसेच विद्यमान मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण यांनी जेव्हा आमच्या जिल्ह्याला भेटी दिल्या त्या वेळी त्यांनी ही प्रकल्पग्रस्तांनी बांधलेली घरे कायम करण्यात येतील अशा घोषणा केल्या. परंतु त्या घोषणेबरहुकूम कोणतीही कार्यवाही होत नाही. त्यामुळे तेथील शेतक-यांमध्ये, प्रकल्पग्रस्तांमध्ये कमालीचा असंतोष निर्माण झालेला आहे. तेव्हा या प्रकल्पग्रस्तांची घरे कायम करावीत अशी मी शासनाला विनंती करते. या प्रकल्पग्रस्तांच्या शैक्षणिक संस्था आहेत. या शैक्षणिक संस्थांसाठी सिडकोचे महाव्यवस्थापक श्री. गिलसाहेबांनी एकच भूखंड दिलेला आहे. अन्य शैक्षणिक संस्थांना मात्र 7-8 भूखंड देण्यात आलेले आहेत. तेव्हा इतर शैक्षणिक संस्थांना ज्याप्रमाणे भूखंड देण्यात आले त्याप्रमाणे प्रकल्पग्रस्तांच्या शैक्षणिक संस्थांना भूखंड देण्यात यावे अशी मी शासनाला विनंती करते. सामाजिक आणि शैक्षणिक संस्थांना 20 टक्के, प्रकल्पग्रस्तांच्या संस्थांना 10 टक्के उलवा आणि द्रोणागिरी नोडसाठी 5 टक्के भूखंड राखीव ठेवण्याची योजना आहे. परंतु ही फाईल गेल्या वर्षभरापासून मंत्रालयस्तरावर पडून आहे. त्याबाबतीत कोणताही निर्णय होत नाही. तेव्हा त्याबाबतीत लवकरात लवकर निर्णय घ्यावा अशी माझी शासनाला विनंती आहे.

सभापती महोदय, वृत्तपात्रामध्ये अशी बातमी छापून आलेली आहे की, एल ॲण्ड टी कंपनीला सिडकोने 635.32 कोटी माफ केले आहेत. एल ॲण्ड टी कंपनीवर ही मेहरबानी करण्याचे कारण काय ? सर्वसामान्य माणूस आणि मोठे उद्योजक यांच्यामध्ये सिडको अशा प्रकारे दुजाभाव का करीत आहे ? आम्हाला फायदा झाला नाही म्हणून 635.32 कोटी रु. इतके लावलेले

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्रीमती मंदा म्हात्रे

व्याज सिडकोने माफ करावे असे एल ॲण्ड टी कंपनीने सांगितले आणि सिडकोने ते व्याज माफ केले. मग एखादा प्रकल्पग्रस्त किंवा सर्वसामान्य माणूस असता तर त्याचे पैसे सिडकोने माफ केले असते काय ? पूर्वी सिडकोने 1 रुपया नाममात्र दराने भूखंड दिले होते. सिडकोने विमानतळासाठी तसेच विविध प्रकल्पासाठी ज्यांच्या जमिनी घेतलेल्या आहेत त्या प्रकल्पग्रस्तांना नोक-या दिल्या जात नाहीत, प्रकल्पग्रस्तांच्या संस्थांना भूखंड दिले जात नाहीत, त्यांची घरे नियमित केली जात नाहीत. तेव्हा याबाबतीत शासनाने ताबडतोबीने उपाययोजना करावी अशी मी शासनाला विनंती करते.

सभापती महोदय, देशाची आर्थिक राजधानी असलेले मुंबई हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर बनविण्याचे शासनाने ठरविलेले आहे. नवी मुंबई ही मुंबईची जुळी बहीण आहे. मुंबईप्रमाणे नवी मुंबईमध्ये देखील पायाभूत सुविधा निर्माण कराव्यात, तसेच तेथेही मेट्रोरेल प्रकल्प करावेत अशी मी शासनाला विनंती करते.

सभापती महोदय, कर्ल्याची एकवीरा देवी हे महाराष्ट्र राज्यातील अनेक लोकांचे कुलदैवत असून असंख्य भाविक त्या देवीच्या दर्शनासाठी जात असतात. कार्ल्याच्या प्रसिध्द लेण्याच्या ठिकाणी हे एकवीरा देवीचे मंदिर आहे. तेथे जाण्यासाठी रोप वे करावा अशी मागणी या सभागृहाचे माजी सन्माननीय सदस्य श्री. अनंत तरे हे सातत्याने करीत होते. मी देखील त्याच मागणीचा येथे पुनरुच्चार करुन एकवीरा देवीच्यो ठिकाणी रोप वे करावा अशी विनंती करते. बेलापूर किल्ल्याचे संवर्धन करण्याची गरज आहे. या बेलापूर किल्ल्याचे संवर्धन व्हावे यासाठी मी या सभागृहाच्या माध्यमातून तसेच अंदाज समितीच्या माध्यमातून अनेकदा प्रयत्न केले.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे.....

सिडको टप्प्याटप्प्याने 4.5 कोटी रुपयाचा निधी देण्यास तयार आहे. परंतु पुरातत्व विभागास तशा सूचना दिल्या गेल्या नसल्यामुळे सिडको काम करण्यास तयार असतानाही बेलापूर किल्ल्याचे संवर्धन करता येत नाही. कोकण विकासासंबंधी आज प्रस्ताव चर्चेला येणार आहे. कोकणाच्या प्रश्नावर आम्ही नेहमी बोलत असतो. कोकण रेल्वेचा मार्ग दुपदरी करावा अशी मी यानिमित्ताने मागणी करते. त्याचप्रमाणे कोकण रेल्वे मार्गावर बॅ.नाथ पै व स्व.मधु दंडवते यांच्या नावाने दोन नवीन गाड्या सुरु करण्यात याव्यात. प्रकल्पग्रस्तांची घरे कायमस्वरुपी करण्यात यावीत. सागरी सुरक्षेबाबत गृह विभागाने चांगले काम केल्याबद्दल मी अभिनंदन करते. दोन वर्षे सातत्याने मी मागणी करीत आहे की, सागरी किनाऱ्यावर राहणारे जे मच्छिमार आहेत त्यांच्या कुटुंबातील मुलांना होमगार्ड म्हणून नेमण्यात यावे. त्यांना त्यासाठी आवश्यक असलेले प्रशिक्षण देण्यात यावे. त्यामुळे सागरी किनाऱ्याचे संरक्षण करण्यास खूप मदत होणार आहे. मंत्रीमहोदयांनी या संदर्भात समर्थता दर्शविली आहे. तसेच मच्छिमारांना ओळखपत्रे देणे सुध्दा गरजेचे आहे. खारघर आणि नवी मुंबई परिसरात अनेक सामाजिक संस्थांना सवलतीमध्ये भूखंड दिले जातात. सिडकोकडून कोट्यवधी रुपयांचे व्याज माफ केले जाते. त्या ठिकाणी अनुसूचित जाती जमाती व आदिवासी समाजाच्या मुलींसाठी वसतिगृह उभारण्यात यावे. नवी मुंबईतील रेल्वे स्टेशन परिसरात पाळणाघरे स्थापन करावीत, जेणेकरुन नोकरी करणाऱ्या स्त्रियांना त्यांच्या मुलांची तेथे व्यवस्था करता येईल. या अर्थसंकल्पामध्ये महिलांना स्थान दिलेले दिसत नाही. परवा पुण्यामध्ये अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन पार पडले. त्या संमेलनात पुणे विद्यापीठाला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे नाव देण्यात यावे असा ठराव मंजूर करण्यात आला. शासनाने या संदर्भात लक्ष घालून पुणे विद्यापीठाला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे नाव द्यावे अशी मी मागणी करते. या अर्थसंकल्पात क्रीडा, कला, साहित्य, समाजसेवा, तीर्थक्षेत्र या सर्व क्षेत्रांचा समावेश असल्यामुळे मी अर्थसंकल्पाला पाठिंबा देऊन मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण संपविते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, हा संपूर्ण अर्थसंकल्प अनेक आर्थिक तज्ज्ञ असतील, आपणही गेल्या सात-आठ वर्षामध्ये आमदार या नात्याने मांडलेले सगळे अर्थसंकल्प पाहिले, वाचले असतील. या अर्थसंकल्पांमध्ये गेल्या वर्षी जी आकडेवारी होती त्या आकडेवारीतील काही तुलनात्मक तक्ते गायब झाले आहेत. मराठी टक्का घसरतो आहे अशी माहिती गेल्या वर्षीच्या तक्त्यामध्ये आकडेवारीवरुन स्पष्ट झाले होते. इतर भाषिक लोक या राज्यात आले आणि मराठी लोक महाराष्ट्रात किती आहेत हे नमूद केले होते. त्यानंतर मोठया प्रमाणात वृत्तपत्रात बातमी प्रसिध्द झाली. ती आकडेवारी आर्थिक पाहणी या अहवालामध्ये नाही. दुसरी गोष्ट म्हणजे धार्मिक लोकसंख्या कोणकोणत्या धर्मांना मानणारी आहे ही बाब होती. या संदर्भात मला स्मरते की, 2005 साली हिंदू धर्मियांच्या तुलनेत मुस्लीम धर्मियांची लोकसंख्या वाढत आहे याची आकडेवारी दैनिक सामना या वृत्तपत्राने छापली नव्हती. आर्थिक पाहणी अहवालात तो तक्ता दिलेला होता. तो तक्ता गायब झालेला आहे. ती आकडेवारी यावेळच्या आर्थिक पाहणी अहवालामध्ये नाही.

2एक्स.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .....

दारिद्र्यरेषेच्या संदर्भात सातत्याने येथे सांगितले जाते. विशेषत: दरडोई उत्पन्न वाढल्याचे जे यामध्ये म्हटले आहे त्याकडे इतरही सन्माननीय सदस्यांनी सभागृहाचे लक्ष वेधलेले आहे. परंतु दरडोई उत्पन्नाच्या बाबतीतील आकडेवारीमध्ये अशा प्रकारे फिरवाफिरव करणे हे शासनाला शोभणारे नाही. आर्थिक पाहणी अहवाल पहिल्या पानापासून तपासला तर असे दिसून येते की, नियोजन आयोगाने स्वत: म्हटले आहे की, देशातील दारिद्र्यरेषेचे प्रमाण सातत्याने वाढत आहे. गेल्या 10 वर्षातील दारिद्र्यरेषेखालील लोकांची संख्या पाहिली तर 12.2 लाखाने वाढलेली आहे. दरडोई उत्पन्न कागदावरच दिसत असले तरी मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नाशिक, पुणे आणि नागपूर या 6 जिल्ह्यांचा वाटा त्यात 55 अक्के आहे आणि राज्यातील 25 जिल्ह्यातील दरडोई उत्पन्न हे सरासरी दरडोई उत्पन्नापेक्षा कमी असून लातूर, गडचिरोली आणि वाशिम या जिल्ह्यांमध्ये प्रमाण त्यातही कमी आहे. याचा अर्थ या 6 जिल्ह्यांत चांगले उत्पन्न आहे व ती आकडेवारी धरुन शासनाने अयोग्य स्वरुपाची आकडेवारी समोर ठेवली आहे.

महोदय, दुसरा भाग असा की, अर्थसंकल्पाच्या बाबतीत नियोजन आयोगाची बैठकच झाली नाही म्हणून यासंदर्भात मला असा प्रश्न पडतो की हे सरकार कशा प्रकारे राज्यकारभार करीत आहे ? त्याचबरोबर गुलाबी पुस्तक पाहिले तर गेल्या दोन तीन वर्षातील पुस्तके आणि यावर्षीच्या पुस्तकामध्ये काही स्पष्टीकरण आहे ते मात्र यावेळच्या अनेक पुस्तकांमध्ये नाही. आमदारांच्या वैधानिक समित्यांसाठीचा हा विषय आहे. अर्थसंकल्प मांडला जात असताना तो कशा पध्दतीने मांडला जाणार आणि आर्थिक पाहणीमधून काही मुद्दे गाळून टाकले जाणार असतील तर त्याबद्दल कोणाकडे दाद मागायची ? त्याचबरोबर अर्थसंकल्पाची मांडणी करीत असताना स्पष्ट आकडेवारी नाही, अडचणी येत असतील त्यातून काय मार्ग काढायचा ? सन 2004 मध्ये तत्कालीन अर्थमंत्री श्री. जयंत पाटील यांनी "आऊट कम बजेट" तयार केले होते. त्या बजेटला "आऊट गेट" दाखविण्यात आले आणि नंतर त्याचे काय झाले हे कोणालाही सापडले नाही. केंद्रशासनाने सन 2003 मध्ये जेंडर बजेट सुरु केले परंतु हे बजेट आपल्या राज्यापर्यंत गेल्या 7 वर्षात देखील पोहचलेले नाही. ही संकल्पना आमच्या सरकारपर्यंत पोहचलीच नाही. यासंदर्भात मी माननीय अर्थमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री तसेच माननीय मुख्यमंत्र्यांनाही स्वत: भेटले, यासंबंधीची सूचना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .....

केली आणि दरवेळेस अर्थसंकल्पावरील भाषणातून मी उल्लेख सुध्दा करते तरी देखील मला ती माहिती मिळाली नाही. मी यासंदर्भात काही अर्थतज्ज्ञांकडे विचारले तेव्हा मला समजले की, अशा जेंडर बजेटमुळे सरकारला फायदाच होणार आहे, नुकसान काहीच होणार नाही तरी देखील ही संकल्पना आपले शासन स्वीकारत नाही हे त्यातून निश्चितपणे दिसत आहे. ज्यावेळेस आकडेवारीचे पुस्तक पाहतो त्यावरुन हे लक्षात येते. तसेच पृ.क्र. 4 वरील वित्त विषयक प्रमाणपत्र पाहिले तर हे सहजपणे लक्षात येते की, केंद्रशासनाकडून येणाऱ्या सहाय्यक अनुदानात यावर्षी 2876.40 कोटी एवढी घट आहे. तसेच सामाजिक सेवा यामध्ये अनुसूचित जाती, इतर मागासवर्गीय यामध्ये 158 कोटीची घट, नगरविकास विभागामध्ये 667.51 कोटीची घट, गृहनिर्माण मध्ये 367 कोटी अशा प्रकारची घट झालेली दिसत आहे. त्यासोबतच वित्त आयोगाच्या शिफारशींची देखील अमलबजावणी झालेली नाही ही त्यामधील वस्तुस्थिती दिसत आहे. तसेच या आर्थिक निरीक्षणामध्ये ज्यावेळेस प्रचंड तूट आल्याचे दिसत आहे ती तूट भरुन काढण्यासाठी जी पावले उचलायला पाहिजे होती त्या अनुषंगाने विधिमंडळात एक विधेयक मंजूर केले.....

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे.....

कशाकशावर किती शुल्क लावण्यात आलेले आहे याची माहिती घेतली असता असे दिसून येते की, सिनेमा हॉल्सचे साधने तपासण्यासाठी काही शुल्क लावण्यात आलेले आहेत. या शुल्काच्या रकमा अतिशय नगण्य आहेत. 2008-09 मध्ये अतिशय नगण्य रकम जमा झालेली आहे आणि चालू आर्थिक वर्षात अगोदरच्या चौपट रकम जमा होईल अशी अपेक्षा शासनाने व्यक्त केलेली आहे. सिनेमा हॉलच्या सुरक्षेच्या प्रश्नासंदर्भात मोठया प्रमाणात या ठिकाणी चर्चा होत असते परंतु सिनेमा हॉलला कशा प्रकारे सर्टीफिकेट्स दिले जातात त्याबाबत मला असे सूचवावयाचे आहे की, कर बसवले जात असतांना जसे सिनेमा हॉलची विद्युत निरीक्षण शुल्क वाढवणे शक्य आहे त्याच सोबत मुंबई सारख्या शहरात अनेक फॅशन शो होत असतात. त्यामुळे या फॅशन शोवर शासन कर का लावत नाही हे आम्हाला समजत नाही. फॅशन शोमध्ये केवळ श्रीमंत व्यक्तीच जात असतात. त्या ठिकाणी प्रचंड प्रमाणात पैशांची उलाढाल होत असते. या फॅशन शोला कर लावला नाही तर त्याचा फायदा कुणाला होणार आहे हा प्रश्न निर्माण होतो.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 19 वरील 056 या मुद्यावर महसूल आणि जमा रकमेमध्ये मला एक अनियमितता दिसून आलेली आहे. या ठिकाणी सन्माननीय गृहमंत्री उपस्थित आहेत. तुरुंगात कैदी ज्या वस्तू तयार करतात त्या वस्तूंची विक्री गेल्या वर्षात एकदम घटलेली आहे. वस्तु घटण्याचे प्रमाण का कमी झाले आहे ? तसेच इतर जमा रक्कम मोठया प्रमाणात दिसते आहे. म्हणजे आपण त्या ठिकाणच्या बजेट हेड बदलले आहे की, तुरुंगातीतल उत्पादने कमी झालेली आहेत की, विक्रीमध्ये काही वेगळया पध्दतीने काम केले जात आहे ?

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 24 च्या संदर्भात माझे विचार व्यक्त करणार आहे. जनतेने शासकीय कोषागारात निरनिराळया प्रयोजनांसाठी ठेवी ठेवलेल्या असतात. परंतु काही वेळेला ठेवी ठेवणा-या व्यक्तींनी त्यांच्या ठेवीची मागणी केली नाही किंवा मुदत संपून गेली तर तो पैसा शासनाकडे व्यपगत होत असतो. त्यामुळे हे जे व्यपगत होणारे पैसे आहेत, निधी आहे त्या निधीचा कशा प्रकारे वापर करता येईल याचा विचार होणे आवश्यक आहे. शेतक-यांनी आत्महत्या केल्यानंतर त्यांना जेव्हा पैसे देण्याची वेळ येते तेव्हा ती केस नियमात बसते की, नाही हे पाहिले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे.....

जाते तसेच कॅन्सरच्या रुग्णांसाठी कोठून निधी आणावयाचा असा प्रश्न अनेक गोरगरीब लोकांना पडलेला असतो. जर्मन बेकरी पुन्हा उभी करावयाची असेल तर ती नैसर्गिक आपत्तीमध्ये बसत नसल्यामुळे तिला मदत करता येणार नाही याबाबत पुण्याचे जिल्हाधिकारी श्री. चंद्रकांत देसाई यांनी असमर्थता व्यक्त केलेली आहे. मला असे सूचवावयाचे आहे की, जनतेच्या ज्या ठेवी व्यपगत झालेल्या आहेत त्या तशाच दरवर्षी कॅरीफॉरवर्ड करण्यापेक्षा त्यांचा उपयोग कसा करता येईल याबाबत विचार करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, अर्थसंकल्पाच्या खंड दोन मधील पृष्ठ क्रमांक 7 मध्ये गृहविभागाने पिस्तूल आणि गोळयांसाठी आर्थिक तरतूद केलेली आहे. ही गोष्ट चांगली आहे. मी नुकतीच कर्नाटक येथे काही कामासाठी गेली होते. तेथे माझ्या असे निदर्शनास आले की, महाराष्ट्रातील ट्रॅफिक पोलीस वाहन चालकांना जो दंड आकारतात तो दंड कोठे जातो असा प्रश्न सामान्य माणसांच्या मनात उपस्थित होत असतो. बंगलोरमध्ये ट्रॅफिक पोलिसांकडे क्रेडीट कार्डसमधून पैसे दिले जातील अशा प्रकारचे मशीन असते. दंड आकारल्यावर ते पोलीस मोबाईलवरुन इमेल करुन संबंधितांना कळवतात की, तुमचे एवढे एवढे पैसे या या अकाऊंटवर जमा झालेले आहेत. बंगलोरमध्ये जशी अत्याधुनिक सुविधा आहे तशी सुविधा आपल्याकडे का नाही ? महाराष्ट्रात नाक्या नाक्यावर ट्रक थांबवून जे काही पैसे जमा केले जातात ते नेमके कोठे जातात असा प्रश्न सर्व सामान्यांना पडत असतो. त्यामुळे बंगलोरमध्ये तंत्रज्ञानाचा वापर करुन जी पध्दत अवलंबविली आहे तशी पध्दत आपल्याकडे सुध्दा अवलंबवण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणीच्या आकडेवारीमध्ये स्थलांतरीतांचा जो तक्ता आहे त्यामध्ये काम आणि रोजगार यासाठी आलेल्या लोकांची संख्या 42.2 टक्के आहे व त्यासाठी भारताचे महानिंबधकांचा आधार घेतलेला आहे. मला असे सूचवावयाचे आहे की, महाराष्ट्र शासनाने स्वत:ची यंत्रणा वापरुन निव्वळ बेरोजगार किती आले आणि त्यातील अल्पशिक्षित किंवा ज्यांना कोणताही रोजगार नाही असे लोक किती आले ? याची आकडेवारी स्पष्ट करावयास पाहिजे.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे..

सभापती महोदय, महिलावरील अत्याचारामध्ये 5 टक्क्यांनी वाढ झालेली आहे. विविध विभागाच्या सर्व मुद्यासबंधी बोलावयाचे ठरविल्यास त्यासाठी बराच वेळ लागणार असल्यामुळे मी सारांश रुपाने 4-5 मुद्दे फक्त मांडणार आहे.

सभापती महोदय, रोजगार आणि कामगार विभागाच्या अनुषंगाने घरेलू कामगारांच्या प्रश्नासंबंधी विधेयक मंजूर केले होते. घरेलू कामगारांसाठी कल्याण मंडळ स्थापन करण्यात येणार आहे. परंतु त्यासबंधीची माहिती पाहिली असता असे दिसून येते की पान नंबर के - 43 मध्ये उद्योग, उर्जा व कामगार विभागामध्ये असंघटीत कामगारांना स्मार्ट कार्ड देणे,घरेलू कामगारांना स्मार्ट कार्ड देणे,घरेलू कामगारांना सहाय्यक अनुदान आणि बाल कामगार जनजागृती कार्यक्रम इत्यादीसाठी काहीही तरतूद करण्यात आलेली नाही.

सभापती महोदय, महसूल आणि वन विभागामध्ये भूकंप आपत्ती धोका निवारण, आपत्ती व्यवस्थापन, आपत्ती सिध्दता या सगळया गोष्टीसाठी अर्थसंकल्पात कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही. पर्यावरण विभागाच्या बाबतीत सरदार सरोवर प्रकल्पाचा उल्लेख करण्यात आला आहे.परंतु त्यासाठी जी तरतूद करण्यात आलेली आहे ती अत्यंत हास्यास्पद आहे.असे म्हणावेसे वाटते.संजय संगवाई हे पत्रकार व नर्मदा बचाव आंदोलनाचे कार्यकर्ते होते काही वर्षापूर्वी कॅन्सरने त्यांचे दु:खद निधन झाले होते. परंतु सरदार सरोवर प्रकल्पाच्या प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन आणि त्यासबंधीच्या बाबीची पूर्तता करण्याकरिता या अर्थसंकल्पात अत्यंत तुटपुंजी तरतूद करण्यात आली आहे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे..

सभापती महोदय, अर्थसंकल्पावरील चर्चेत भाग घेत असतांना मला अनेक मुद्दे जरी सोडून द्यावे लागले तरी साहित्य संम्मेलनात श्री.ना.धो.महानोर यांची व माझी भेट झाली होती त्यावेळी पर्यटन व सांस्कृतिक धोरण यासबधी त्यांनी मला असे सांगितले की,1990 साला पासून त्यांनी सांस्कृतिक धोरणाच्या संदर्भात सातत्याने प्रयत्न केले होते. तेव्हा त्या बाबतीत शासनाने काय पावले उचलली आहेत यासंबंधीचा उल्लेख नवीन येणा-या सांस्कृतिक धोरणामध्ये करावयास पाहिजे असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, पर्यटन धोरणाच्या सदर्भात बोलत असतांना मला असे सागावयाचे आहे की, जयभवानी चित्र संग्रहालय, रत्नागिरी येथील प्रादेशिक वस्तू संग्रहालय, माहूर येथील वस्तू

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

संग्रहालय या संदर्भात या अर्थसंकल्पात निधी दिला गेला नाही. तीर्थक्षेत्राच्या बाबतीत निधीची तरतूद करण्यात आलेली असली तरी सुध्दा मूल्यमापन आणि काटेकोर निकष, लोक सहभाग, श्रध्दा जतन, पारदर्शकता, उत्तरदायित्व या सारखें मुद्दे जर विचारात घेतले गेले नाही तर तीर्थक्षेत्रातील दानपेटीकडेच सरकारचे लक्ष आहे किंवा काय अशी शंका निर्माण होते.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पामध्ये सगळीकडे आर्थिक गैरशिस्तच दिसून येते.त्यामुळे पुढचा आराखडा आणि ख-या अर्थाने कृती कार्यक्रम कशा प्रकारे तयार केला जाणार आहे यासबंधी विधिमंडळात जर समाधानकारक उत्तरे मिळाली नाही तर शेवटी काही संस्थाना वा व्यक्तिंना कोर्टात जाण्याची वेळ येईल अशा प्रकारची शासनाची कार्यवाही चालू असल्याचे दिसून येत आहे. त्याचबरोबर वैधानिक समित्यांनीसुध्दा या गोष्टीची दखल घेतली पाहिजे या दृष्टीने आम्ही देखील प्रयत्न करीत आहोत विरोधकांच्या टीकेकडे दुर्लक्ष केले म्हणजे सत्ताधा-यांनी चांगल्या प्रकारची सत्ता राबवली आहे असे जर शासनाला वाटत असेल तर "कही पे निगाहे कही पे निशाना" अशा प्रकारचे एक हिंदी गाणे आहे त्या प्रमाणे एका बाजूला म्हणावयाचे की जनतेच्या विकासाकडे शासनाचे लक्ष आहे परंतु प्रत्यक्षात त्याच्या निधीकडे सरकारचे लक्ष आहे हेच यावरुन सिध्द होते एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.धन्यवाद.

एक सन्माननीय सदस्य :सभापती महोदय, आता मध्यंतर घेण्यात यावे.

तालिका सभापती (श्री.रमेश शेंडगे) :आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 3.45 वाजता पुन:भरेल.

(3.23 ते 3.45 मध्यंतर)

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

(मध्यंतरानंतर)

(सभापतीस्थानी तालिका सभापती ॲड. अनिल परब)

श्री. राम पंडागळे (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय वित्तमंत्र्यांनी सन 2010-2011 च्या मांडलेल्या अर्थसंकल्पावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. या अर्थसंकल्पावर माझे विचार व्यक्त करीत असतांना जनतेच्या वेदना अत्यंत पोटतिडिकीने शासनाच्या कानावर घालणार आहे. दबलेल्या, पिचलेल्या काळया रंगाचा, पददलितांचा आवाज शासनाच्या कानावर पोहोचावा...

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी याठिकाणी काळया रंगाचा उल्लेख केला. काळा रंग आपणास आदरणीय आहे, प्रभू श्रीरामचंद्रांचा रंगसुध्दा काळा होता, भगवान विष्णू सुध्दा काळया रंगाचे होते. परमेश्वरांचा काळा रंग आम्हाला वंदनीय आहे. तो बहुजनांचा परमेश्वर आहे....

श्री. पाशा पटेल : माननीय सदस्यांच्या आई-वडिलांनी त्यांचे नाव सुध्दा राम ठेवले आहे.

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, माझ्या काळया रंगाची उपेक्षा सुरु आहे. कामगार नेते माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी माझ्या काळया रंगाबाबत चांगले उद्गार काढल्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. अतिशय पुरोगामी विचाराच्या या महाराष्ट्र राज्याच्या सर्वांगीण विकासाचा अर्थसंकल्प याठिकाणी मांडण्यात आला आहे. त्याचे याठिकाणी अभिनंदन करीत असतांना त्यामधील एक-दोन त्रुटी आपणामार्फत शासनाकडे पाहोचविण्याचा मी प्रयत्न करणार आहे. सभापती महोदय, या महाराष्ट्र राज्यामध्ये मोठया प्रमाणावर देवस्थाने आहेत.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पडांगळे . . . .

त्या देवस्थानाच्या विकासाच्या दृष्टीने माननीय अर्थमंत्र्यांनी अर्थसंकल्पामध्ये तरतूद केलेली आहे आणि ती तरतूद भरीव स्वरुपाची आहे. ही संतांची भूमी आहे,महाराष्ट्राची भूमी आहे, मराठवाड्याची भूमी आहे आणि देवस्थानांचा सर्वांगीण विकास व्हावा ही भूमिका अतिशय चांगली आहे.परंतु त्याचबरोबर मला वेदना होत आहेत,कारण संपूर्ण महाराष्ट्रामध्ये अनेक ठिकाणी अशोककालीन,बुध्दकालीन लेण्या आहेत.सरकारने त्या लेण्यांच्या संरक्षणासाठी कोणत्याही प्रकारचे धोरण अर्थसंकल्पामध्ये दिलेले नाही. मी दहा-पंधरा दिवसापूर्वी बोरीवली येथील मागाठाणे परिसरातील एका गुंफेमध्ये गेलो होतो.मला काही कार्यकर्त्यांनी सांगितले की,तुम्ही मागाठाणे येथे या. तेथे बुध्दकालीन लेण्या आहेत. मग मी बोरीवली येथील मागाठाणे बस स्टॉपवर गेलो. मला असे वाटले की, आता तेथून कान्हेरी गुंफा आहे, त्याबाजूला जावयाचे असून तेथे लेण्या आहेत. मी आणि माननीय सदस्य श्री.रामदास कदम हे गेल्या 40 वर्षापासून कांदिवली परिसरामध्ये रहातात. पण मी विचार देखील करु शकत नाही की, मागाठाणे येथील परिसरामध्ये, भरवस्तीमध्ये लेणी आहे. मग मी तेथे जाऊन पहाणी केली. तेथील लेणी बुध्दकालीन असून, तेथे सबंध कोरीव काम केलेले आहे आणि त्याच्यावर शेंदूर फासलेला आहे. पण त्या लेण्यांमध्ये कोणाचे तरी घर आहे आणि त्याला दरवाजा लावलेला आहे. मी घर आहे हे समजू शकतो, पण त्या लेण्यांच्यावर देखील घर आहे, एवढी महाराष्ट्रामध्ये आज बुध्दकालीन लेण्यांची, बुध्दाची दुरावस्था झालेली आहे. जेथे-जेथे बुध्द लेणी आहे, मग ती लेणी डोंगरावर असो किंवा इतर कुठेही असो, तेथे लेण्यांच्या बरोबरच गोडया पाण्याचा हौद आहे. सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांना सांगू इच्छितो की, त्या वस्तीमध्ये गोडया पाण्याचा हौद सुध्दा होता आणि ते सगळे आपल्या घराच्या पालिकडील बाजूलाच आहे आणि ते सर्व पाहून मला आश्चर्य वाटले. हे एकाच लेण्याच्या बाबतीत नाही तर भाजेची लेणी असेल, कारल्याची लेणी असेल, लेण्याद्रीची लेणी असेल किंवा जोगेश्वरीची लेणी असेल, या सर्व लेण्यांची उपेक्षा होत आहे.तेथे माणसे रहातात. जोगेश्वरीच्या लेण्यांवर सुध्दा घरे आहेत,अजुबाजूला सुध्दा घरे आहेत.तेथे हे सगळे दलाल लोकांनी केलेले आहे आणि त्यावर कोणाचाही कसलाही कंट्रोल नाही.देवस्थानाबद्दल आदर करीत असताना, बुध्द सुध्दा एक विचारवंत आहे. त्यांनी सर्व जगाला विचार दिला, शांतीचा मार्ग दिला आणि जगातील सर्वात पहिला धर्म हा बुध्द धर्म आहे. म्हणून त्या लेण्यांच्या विकासाच्या दृष्टीने, त्यांच्या संरक्षणाच्या दृष्टीने सरकारने भूमिका घ्यावी अशी मी विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पडांगळे . . . .

सभापती महोदय, रायगड येथे दहा एकर,20 एकर जमीन घेऊन तेथे शिवसृष्टी निर्माण करण्याच्या बाबतीत याठिकाणी माननीय अर्थमंत्र्यांनी घोषणा केली. मी सुध्दा शिवप्रेमी असून, शिवाजी महाराजांचे नाव घेतल्यानंतर अंगावर शहारे उठतात आणि शिवाजी महाराजांबद्दल आत्मियता असलेला एक कार्यकर्ता आहे.

सभापती महोदय, श्री.सचिन तेंडूलकर यांच्या खेळाडू जीवनावर मुंबई शहरात भव्य क्रिडा संग्रहालय उभारण्याबाबत घोषणा करण्यात आली, त्याबद्दल मला आनंद वाटला. परंतु याच मुंबई शहरामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे "राजगृह" नावाचे घर आहे. त्या "राजगृहा"मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण झालेले आहे.मी शासनाला विनंती करतो की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे देखील या महाराष्ट्रातील लाखो जनतेची अस्मिता आहे. दि.6 डिसेंबर रोजी 12 ते 15 लाख लोक डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जेथे महापरिनिर्वाण झाले आहे, त्याठिकाणी अनेक लोक हाताला, पाठीला लेकरेबाळे घेऊन, उपाशीपोटी राहून त्यांचे दर्शन घेण्यासाठी येत असतात. आपल्याला जगामध्ये असे कुठेही चित्र पहावयास मिळणार नाही. पण डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे दर्शन घेण्यासाठी लाखो लोक रात्रीपासून रांगा लावतात. ज्याप्रमाणे चैत्यभूमी येथे दर्शन घेतात, त्याचप्रमाणे ज्या "राजगृहा" मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण झालेले आहे, तेथे जाऊन सुध्दा लोक दर्शन घेतात.

यानंतर कु.थोरात . . ..

अशुधारित प्रत / अशुद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ SBT/ MMP/ KTG/ प्रथम सौ. रणदिवे... 15:55

श्री. राम पंडागळे...

मी सरकारला विनंती करतो की, ज्याप्रमाणे सचिन तेंडुलकरची अकॅडमी बनविणार आहात आणि शिवसृष्टी निर्माण करणार आहात त्याचप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकराचा देखील विचार करावा. 'राजगृह' ताब्यात घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची तेथे फार मोठी अकॅडमी निर्माण करावी अशी मी शासनाला विनंती करतो. सभापती महोदय, या अर्थसंकल्पामध्ये मागासवर्गीयांसाठी 3461 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे आणि जवळपास 3000 कोटी रुपंयाची आदिवासींसाठी तरतूद केलेली आहे. आदिवासींसाठी गेल्या वर्षी 1800कोटी रुपयाची तरतूद करण्यात आली होती आणि यावेळी 3000 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. हा सगळा पैसा जातो कुठे? आजुबाजूला जे दलाल बसलेले आहेत त्यांच्यासाठी हा खर्च होतो की आदिवासींसाठी हा खर्च होतो? सभापती महोदय, मी मुंबई ते ठाण्यापर्यंत लोकसभेची निवडणूक लढवलेली आहे. पालघर भागामध्ये आणि आदिवासी पाडयामध्ये मी गावागावात फिरलेलो आहे. मुंबई शहरात ज्याठिकाणी सन्माननीय सदसय श्री. रामदास कदम रहातात तेथून अर्धा-किलोमीटरवर दलितांची, आदिवासींची वस्ती आहे त्याठिकाणी रस्ता नाही, शाळा नाही, वीज नाही, अन्न नाही असे चित्र मुंबई शहरापासून अर्धा किलोमीटरच्या अंतरावर आहे. मुंबई शहराच्या बाजूलाच मी या शासनाला दोनशे कुपोषित मुले दाखवू शकेन. या आदिवासींसाठी एवढया प्रचंड पैशाची तरतूद करण्यात येते पण मातेच्या अंगावर दूध पिणारी जी बालके आहेत, वर्षा दोन वर्षाची जी बालके आहेत ही बालके माणसे आहेत की जनावरे आहेत हे आपण ओळखू शकणार नाही. अशा वाईट परिस्थितीत जगत आहेत. अतिशय वाईट परिस्थितीत आदिवासी दिवस कंठीत आहेत. संबंध आदिवासी पाडयामध्ये, गावामध्ये, पालघरमध्ये, ठाण्यामध्ये हीच परिस्थिती पहावयास मिळते. ज्या रेल्वेस्टेशनचा शासन विकास करीत आहे त्या ठाण्याच्या कुठयाही आजुबाजूच्या स्टेशनमध्ये आपण गेलात तर तेथे आपल्याला आदिवासी स्त्रिया दिसतील. या आदिवासी स्त्रियांनी आपल्या अंगावर जे पातळ नेसलेले असते ते विशिष्ट शरीर झाकण्यापुरतेच असते. सभापती महोदय, बारकाईने बघितले तर आदिवासी स्त्रियांचे शरीर देखील आपल्याला उघडे-नागडे पहावयास मिळते, इतकी दुर्दशा, इतकी वाईट अवस्था आदिवासींची आहे मग तरतूद केलेला पैसा जातो कोठे? 1800 कोटी रुपये आणि 3000 कोटी रुपये कोणावर खर्च करण्यात येतात. हजारो बालके कुपोषित आहेत. त्यांच्यासाठी

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राम पंडागळे....

दवाखान्याची, औषधोपचाराची कशाचीही व्यवस्था केलेली नाही. अधिकारी दुर्गम भागामध्ये जात नाहीत. अधिकारी डोंगरामध्ये जात नाहीत. अधिकारी फक्त रेकॉर्डवर दाखविण्यापुरते काम करतात. मागच्यावेळी एका सन्माननीय सदस्यांनी सांगितले होते की, औषधाच्या गोण्याच्या गोण्या नदीच्या पाण्यामध्ये मिळाल्या. जे अधिकारी तेथे पोहचत नाहीत फक्त रेकॉर्डवर दाखवतात त्या अधिकाऱ्यांवर कारवाई होणार काय? या स्वतंत्र भारतातले आम्ही नागरिक आहोत जी सुविधा सर्वांसाठी आहे ती सुविधा मला देखील मिळणार आहे असे या आदिवासींना कधी वाटणार आहे? म्हणून शासनाने या गोष्टीचा गांभीर्याने विचार करावा. त्यांच्यासाठी जेवढया पैशाची तरतूद करण्यात आलेली आहे त्यातील पैसानपैसा हा आदिवासीपर्यंत पोहचावा अशी सभापती महोदय, मी आपल्या मार्फत माननीय मंत्रिमहोदयांना विनंती करतो.

सभापती महोदय, दि.29 जुलै,2009 मध्ये मंत्रिमंडळाची बैठक झाली आणि त्या बैठकीमध्ये मागासवर्गीयांची कर्जे माफ करण्याचा निर्णय झाला.

यानंतर श्री. बरवड...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पंडागळे....

हा निर्णय 2009 मध्ये झाला. आम्हाला वाटले होते की, दलित वर्गातील लोकांना कर्जमाफी मिळेल. कारण यामध्ये 4-5 महामंडळे आहेत. त्या सर्व महामंडळांमधून ज्यांनी कर्ज घेतले आहे त्यांचे कर्ज माफ होईल. या लोकांना नवीन कर्ज मिळेल अशी अपेक्षा होती. यासंदर्भात मंत्रिमंडळाने 5 जणांची समिती नेमली होती. या समितीमध्ये नियोजन विभागाचे प्रधान सचिव, सहकार विभागाचे प्रधान सचिव, आदिवासी विकास विभागाचे प्रधान सचिव आणि एका विभागाचे सचिव या समितीचे सदस्य होते. दुर्दैवाची अशी गोष्ट आहे, कदाचित इतिहासामध्ये अशी घटना घडली नसेल, या प्रधान सचिवांची व सचिवांच्या 5 जणांच्या समितीची कर्ज माफीच्या संदर्भात एकही बैठक झाली नाही. या सचिवांना असे कोणते महत्वाचे काम होते, त्यांच्याकडे कोणत्या कामाचा तगादा लावलेला होता ते सांगावे. दलितांना न्याय देण्यासाठी जी समिती नेमली होती त्या समितीची एकही बैठक होऊ नये यापेक्षा काय दुर्दैव असू शकते ? मी आपल्यामार्फत शासनाला विनंती करतो की, ज्या सचिवांनी ही बैठक घेतली नाही त्या सर्वांना ॲट्रॉसिटी ॲक्ट लावून तुरुंगात पाठवावे. दलित समाजासाठी त्यांना वेळ नसेल तर कशासाठी पाहिजे ही समिती ? पददलित समाज सरकारकडे मोठया आशेने पहात आहे. त्यांच्यासाठी वेळ नसेल तर या लोकांना ॲट्रॉसिटी ॲक्ट लावला पाहिजे. अनेक वर्तमानपत्रांमध्ये अनेक सम्राटांच्या बातम्या येतात. (अडथळा)

सभापती महोदय, नागपूर महानगरपालिकेला विविध योजनांसाठी केंद्र सरकारकडून पैसा आला होता. परंतु त्यांनी हा पैसा एफ.डी.मध्ये ठेवला आहे. त्यामुळे जवळजवळ 1 लाख दलित लाभार्थ्यांना त्याचा लाभ घेता आला नाही. महाराष्ट्रातील महार, मांग, बौध्द, ढोर अशा समाजातील 1 लाख लाभार्थ्यांना या कर्जाचा लाभ मिळू शकला नाही याबाबत सरकार उत्तर देणार आहे काय ? या 1 लाख लाभार्थ्यांसाठी कर्जाची उपाययोजना करणार काय ? शासनाने यासाठी 3461 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. ही चांगली गोष्ट आहे.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पंडागळे....

सभापती महोदय, शासन यावर्षी नवीन वसतिगृहे बांधणार आहे. परंतु पुण्यासारख्या शहरामधील मुलींच्या वसतिगृहांमध्ये अळया व किडेयुक्त अन्न दिले जाते. ही वस्तुस्थिती आहे. शासन या मुलांना माणूस समजणार आहे की नाही, या गरीब मुलांची किती दिवस थट्टा करणार आहे ? 15 x 15 च्या एका खोलीत 85 मुलांना डांबून ठेवले जाते. ही मुले म्हणजे कोंबडयांचा खुराडा वाटला काय ? हे सर्व असताना नवीन वसतिगृहे बांधण्याची घोषणा केली जात आहे. परंतु अशा पध्दतीने दलितांच्या मुलांना वागविणार आहात काय, दलितांऐवजी अन्य समाजातील मुले असती तर त्यांना अशाप्रकारची वागणूक मिळाली असती काय, पण केवळ दलितांची मुले आहेत म्हणून त्यांना अळया व किडयांनी युक्त जेवण मिळते. हे कधी तरी थांबले पाहिजे. या प्रकाराची कोणतीही चौकशी होत नाही. मी 3-4 वेळा हा मुद्दा उपस्थित केला होता. नागपूरच्या अधिवेशनामध्ये मुद्दा उपस्थित केला होता. पुण्याला नुकतेच अखिल भारतीय साहित्य संमेलन झाले आहे. पण त्या जिल्हयातील ही गंभीर परिस्थिती मी मांडली आहे. या बाबी अत्यंत गंभीर आहेत याकडे शासनाने लक्ष देणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, शासनाने 1100 कोटी रुपयांच्या कर्जमाफीची घोषणा केली. त्यामुळे दलितांनी सरकारला भरभरुन मते दिली आहेत. त्यामुळे निदान आता तरी त्यांचे कर्ज माफ करावे अशी मी विनंती करतो. या अर्थसंकल्पाबाबत बोलताना मी माझ्या वेदना मांडल्या आहेत. दु:ख मांडले आहे. परंतु सभागृहात आमचे नेते सन्माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील हे उपस्थित असल्यामुळे मी या अर्थसंकल्पाला पाठिंबा देतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

यानंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. पाशा पटेल (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2010-2011 च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, हा अर्थसंकल्प कशा त-हेचा आहे हे आताच सन्माननीय सदस्य श्री.राम पंडागळे यांनी आपल्या भाषणातून सांगितलेले आहे. दीन, दलित, उपेक्षित, शोषित, पीडित लोकांच्या भावना त्यांनी या ठिकाणी व्यक्त केलेल्या आहेत. अल्पसंख्याकांची देखील तिच परिस्थिती आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, ज्या प्रमाणे बुध्द लेण्यांच्या बाबतीत शासन उदासीन आहे त्याप्रमाणे दलित आणि अल्पसंख्यांकांच्या बाबतीतही शासन उदासीन आहे. दलितांची, अल्पसंख्याकांची मते घेऊन मोठ्या संख्येने हे निवडून आले. परंतु निवडून आल्यानंतर मात्र ते दलितांना विसरले. सभापती महोदय, तसे पाहिले तर महाराष्ट्रामध्ये अल्पसंख्यांकांची खूप देवस्थाने आहेत, दर्गे आहेत. त्यांच्यासाठी पैसे दिले असते तर या शासनाचे नुकसान झाले नसते. राज्यामध्ये अशी काही ठिकाणे आहेत की ज्यांच्या संवर्धनामुळे राष्ट्रीय एकात्मता जोपासली जाऊ शकते. सायगाव नावाचे एक गाव आहे. तेथे एक दर्गा आहे. त्या दर्ग्यामध्ये आयुष्यभर हिंदू माणूस बसतो. तो हिंदू माणूस मृत्यू पावल्यानंतर मुस्लिम माणूस बसतो, मुस्लिम माणूस मृत्यू पावल्यानंतर पुन्हा हिंदू माणूस बसतो. अशा प्रकारे राष्ट्रीय एकात्मता जोपासणारी अनेक ठिकाणे राज्यामध्ये आहेत. त्यांच्या देखभालीसाठी देखील निधी दिला पाहिजे. परंतु या राज्य सरकारला दृष्टीच नाही. राज्य सरकार आंधळे आहे, त्याला काही दिसत नाही. निवडणुकीपुरता आपण या लोकांचा उपयोग करता आणि नंतर त्यांना विसरुन जाता.

सभापती महोदय, मला आणखीन काही गोष्टी येथे स्पष्ट करावयाच्या आहेत. हे राज्य शासन असे का वागते ते कळत नाही. एकीकडे राज्य शासन असे सांगते की, राज्यातील अन्नधान्य उत्पादन वाढी बरोबर शेतक-यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी कृषीवर्गासाठी महापीक योजना घेण्यात येणार आहे. हे नाटक आपण कशासाठी करीत आहात ? माझ्या मोबाईलवर एसएमएस ॲर्लट सेवेद्वारे एक एसएमएस आलेला आहे की, या वर्षी खाद्यातेलाची जास्त प्रमाणावर आयात होणार आहे. एका बाजूला शेतक-याचे उत्पादन वाढविण्याची भाषा केली जाते आणि दुस-या बाजूला परदेशातून अन्नधान्य आणून भाव पाडण्याचे प्रयत्न केले जातात. हे कशासाठी केले जात आहे ? सभापती महोदय, मी माझ्याकडील एसएमएस आपणास दाखवितो. परदेशातून 25 हजार टन

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पाशा पटेल...

तूरडाळ आणण्याचे शासनाने ठरविलेले आहे. ही तूरडाळ आणण्यासाठी मुहूर्त कोणता साधला असेल तर ज्या दिवशी शेतक-यांच्या शेतातील माल बाजारात जातो त्या दिवशी परदेशातून तूरडाळ आयात करण्यात येते. या महागाईच्या काळात शेतक-याची कशी जिरवली जात आहे ? तर परदेशातून डाळी आणून जिरवली जात आहे. सभापती महोदय, हे सरकार दुतोंडी भाषा कशासाठी करीत आहे ? माझ्यासारख्या संवेदनशील माणसाला हे कळत नाही. राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत दूध उत्पादन वाढीचा दर 4 टक्के राहाणार आहे. वाहरे, वा ! गबरू. एकीकडे दुधाचे भले करण्याची भाषा करता आणि त्याच वेळी 30 लाख टन दुधाची भुकटी आणण्याची भाषा करता. दुधाचे तुम्ही भले करणार. वाहरे वा ! काय चमत्कार आहे ? अशा प्रकारचे वागणे हे सरकारलाच जमू शकते. महाराष्ट्रातील जनता वेडी आहे. तुमचे हे सगळे कलेले कार्य जनतेने वाचले असते तर तुमचे काही खरे नव्हते.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य खूप पोटतिडकीने बोलत आहेत. त्यांचे बोलणे रेकॉर्ड होत आहे. गबरु सारखा शब्द कोणत्याच सभागृहाच्या रेकॉर्डवर असू नये. सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या भावना व्यक्त कराव्यात.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, गबरु हा अतिशय चांगला मराठी शब्द आहे. तो रास्त आहे. खालच्या सभागृहात तत्कालीन माननीय सदस्य श्री.केशवराव धोंडगे यांनी अनेकदा सरकारला उद्देशून हा शब्द वापरलेला आहे. तो रेकॉर्डवरुन काढता येणार नाही.

श्री.पाशा पटेल : सभापती महोदय, तुम्ही कधीकधी स्वत:ला शेतकरी म्हणवता. एक गोष्ट लक्षात ठेवावी, आम्ही 30-30, 35-35 वर्षे लोकांमध्ये काम करुन याठिकाणी आलो आहोत. उपटसूंभ नाही. आम्ही बोलताना भान ठेवून बोलतो. या सभागृहाची ऊंची, या सभागृहाची गरिमा लक्षात ठेवून बोलत असतो. आमच्या तोंडून निघालेला शब्द 100 टक्के सत्य मानून घ्यावा. वाईट वाटते असे बोलायची भानगड करु नका. सभापती महोदय, विदर्भातील सहा जिल्हे. प्रत्येक गोष्टीमध्ये विदर्भातील सहा जिल्हे असे म्हटले गेले आहे. काय वाटणार? सहा जिल्हयात गायी वाटणार, अवजारे वाटणार. सहा जिल्हयात काय काय वाटणार आहात? एवढे सगळे वाटून या आठवड्यातील परिस्थिती काय आहे? या आठवड्यात 25 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. एकाच आठवड्यात. काय देता? गायी देता. अवजारे देता. एक गोष्ट समजून घ्या. काहीही दिले तरी आत्महत्या थांबत नाहीत. याचा अर्थ कोणीतरी समजून घेतला पाहिजे. तुमच्या योजना या अत्यंत निकृष्ट आहेत. कामाच्या नाहीत. कुचकामी आहेत. खरा भाग वेगळा आहे. हे कधी समजणार? लोकांचा तुम्ही कृपा करुन अंत पाहू नका. एक गोष्ट सूर्य प्रकाशाइतकी स्वच्छ आहे. नम्रपणे मी एका गोष्टीचा उल्लेख करु इच्छितो. गायी दिल्या, म्हशी दिल्या म्हणून माणूस जगणार नाही. तो माणूस जे काम करतो त्या कामाची मजुरी 66 रुपये देणार असाल, त्याच्या शेतमालाला योग्य भाव देणार नसाल, 200-300 रुपये मदत सभागृहात जाहीर करणार असोल तर तो जगणार कसा? 2 हजाराची मरकी गाय, 2 हजाराची मरकी म्हैस देऊन गरीबी हटणार नाही. 100 एकर जमीन जाऊन एक धोतर मिळणार असा प्रकार आहे. गायी फुकट देत नाही. त्याचे नाव यादीत यायला निम्मे पैसे द्यावे लागतात. तो गरीब आहे म्हणून नाव यादीत येईल असा समज करुन घेऊ नका. हे रामराज्य नाही. निम्मे पैसे खर्च केल्याशिवाय काहीही मिळत नाही. म्हणून हे नाटक बंद करा. खऱ्याअर्थाने माणूस कसा जगेल ते बघा. तुम्ही अवजारे दिली. माझ्या शेताच्या बाजूला असलेल्या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल....

शेतकऱ्याला लॉटरी लागली. 8 हजाराची कडबा मशिन मिळाली. तो म्हणाला, तुम्ही वापरा आणि मी पण वापरतो. आम्ही ती मशिन आणली. तीन महिन्यात पत्रा निघून गेला. ती मी प्रदर्शनात ठेवली आहे. तिला चारही बाजूंनी काच लावणार आहे. तुम्ही दिलेल्या मशिनचा काय उपयोग? आता तर मजाच मजा आहे. आता कोणता निर्णय झाला? कोणतेही शेतीचे अवजार घेतले तर 50 टक्के अनुदान देणार. काय काय मशिन शोधून काढतील, अवजारे शोधून काढतील आणि शेतकऱ्यांच्या गळ्यात मारतील, किती कमिशन काढतील याची गॅरंटी नाही. असल्या बोगस गोष्टी वाटण्यापेक्षा शेतकऱ्यांने स्वत:च्या संसारासाठी, शेती वाढविण्यासाठी स्वत: चांगल्या कंपनीचे अवजार घेतले तर डायरेक्ट त्याला पैसे द्या. कशाला या भानगडी करता वाटाघाटीच्या. वाटाघाटीची वेळ आली की, प्रत्येकजण आशा करतो. मी बघितले आहे. मी एकदा गव्हाचे बियाणे वाटप सुरु झाले तेव्हा पाहिले. बियाणे वाटप करताना तलाठ्याची वेगळी आशा, ग्रामसेवकाची वेगळी आशा. बीडीओची वेगळी आशा. बियाण्यापेक्षा जास्त पैसे वाटपामध्ये गेले. म्हणून असा विचार का करीत नाही? डायरेक्ट शेतकरी अवजारे विकत घेईल त्याला डायरेक्ट पैसे द्या तरच तो जगणार आहे.

3एच.1...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल .....

महोदय, पीक कर्जाच्या वाटपाबाबत सांगावयाचे झाले तर पीक कर्ज वाटपाची पध्दत शासनाने बदलली पाहिजे. कारण एके काळी दोन-तीन-चार हजार रुपये पीक कर्ज देऊन भागत होते. कारण त्या काळात शेती ही बैलांवर तसेच घरातील बियाण्यावर होत होती. घरातीलच बियाण्याचा वापर त्या काळात होत होता, संकरित बियाणे नव्हते त्यामुळे तेवढी रक्कम पूर्ण होत होती. परंतु आता बैलही राहिले नाहीत. संपूर्ण देशाचा विचार केला तर सन 1951 मध्ये देशात 17 कोटी हेक्टर एवढी ज्वारीची लागवड होत होती ती आता 10 कोटी हेक्टरवर आली आहे. म्हणजेच 7 कोटी हेक्टरने हा पेरा कमी झालेला आहे. अशीच अवस्था राहिली तर जनावरे मिळणार नाहीत, शेती देखील पिकणार नाही म्हणून याबाबत शासनाने विचार करावा. आता मात्र शेती ही बैलावर होत नसून यंत्रावर पिकविली जात आहे व त्यासाठी जास्त पैसा लागणार आहे. वास्तविक शेती पिकविण्यासाठी पीक कर्जही नाही, अनुदानही नाही तसेच त्यासाठी बजेटची तरतूदही नाही. म्हणजेच जे पीक कर्ज देणार आहात, शेतीसाठी आवश्यक त्या ज्या ज्या वस्तू किंवा पैसा देणार तो पूर्णपणे खर्च झाला पाहिजे याकडे शासनाने लक्ष देण्याची गरज आहे.

महोदय, अल्पसंख्यांकांच्या बाबतीत मी असे निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, या शासनाला अल्पसंख्यांबद्दल खूप प्रेम असल्याचा देखावा केला जातो. त्याबाबत दोन तीन बाबी मी पुराव्यासह शासनाच्या लक्षात आणून देण्याचा प्रयत्न करणार आहे. अल्पसंख्यांकांसाठी शासनाने पहिली ते दहावीपर्यंतच्या मुलांना शिष्यवृत्ती देण्याचा कार्यक्रम सुरु केला. वास्तविक ही शिष्यवृत्तीची रक्कम शाळा सुरु झाल्यानंतर वर्षभर मुलगा शाळेत यावा म्हणून सुरुवातीलाच द्यायची असते पण गेल्यावर्षी परीक्षा संपल्यानंतर अशी रक्कम शासनाने वाटप केलेली आहे. यावर्षी सुध्दा आतापर्यंत एक रुपया सुध्दा शिष्यवृत्तीपोटी वाटप करण्यात आला नाही. अशा प्रकारे अर्थसंकल्पात तरतूद केली जाते आणि खालच्या स्तरावर मात्र पैसा मिळतच नाही, किंबहुना वेळेवर दिला जात नाही. हा पैसा मिळणार की नाही हे देखील समजत नाही. म्हणून शासनाने हा पैसा आमच्या नावावर जो टाकलेला असतो तो वेळेवर कसा दिला जाईल याकडे लक्ष दिले पाहिजे.

महोदय, गणवेश वाटपाची योजना इयत्ता पहिली ते चौथीपर्यंत राबविली जाते. या मुलांना शाळा सुरु झाल्यानंतर कपडे वापरण्यासाठी मिळतील अशी अपेक्षा असते पण ही रक्कम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल.....

कोणाच्याही हातात मिळाली नाही. उपस्थिती भत्ता देण्याची योजना देखील शासनाने सुरु केली आहे. पाचवी ते सातवीपर्यंतच्या मुलांसाठी उपस्थिती भत्ता दिला जातो परंतु तो वेळेवर मिळत नाही, कदाचित मिळणार की नाही याची देखील गॅरंटी नाही, याचाही शासनाने विचार करावा.

महोदय, यानंतर अल्पसंख्यांकांच्या संस्थांना प्रत्येकी दोन-दोन लाख रुपये देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे पण अजूनही त्या निधीचे वाटप झालेले नाही आणि होईल की नाही हे मला माहीत नाही. कारण 31 मार्च संपत आला तरी देखील कोणताही निधी मिळाला नाही. तो का मिळाला नाही याची माहिती घ्यावी व लवकरात लवकर हा निधी देण्यात यावा.

महोदय, अजून भयानक आणि क्लेशदायक बाब अशी आहे की, उच्च व्यावसायिक शिक्षणासाठी 25 हजार रुपये एवढी शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय या शासनाने घेतला परंतु मागील वर्षीची संपूर्ण रक्कम शिल्लक असून ती पूर्ण खर्च झालेली नाही. यावर्षी काय परिस्थिती होणार हे माहीत नाही. तेव्हा या बाबीचाही शासनाने विचार करावा.

महोदय, पंतप्रधानांच्या 15 कलमी योजनेतूनन अल्पसंख्यांकासाठी जी योजना आहे त्याबाबत तर विचार करण्यासाखीच परिस्थिती आहे. आमच्या भागात श्री. अब्दुल हाफ़िज सिद्दीकी नावाच्या एका मुलाने माहितीच्या अधिकारामध्ये मागविली की या योजनेमध्ये कोणत्या प्रकारच्या सवलती आहेत ?

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल...

यामध्ये दोन योजना आहेत. पहिली योजना मदरसा /मकतब योजना आहे. मदरसा/मकतबामध्ये शिक्षण घेणा्-या शाळा बाहय विद्यार्थ्यांठी महात्मा फुले उच्च प्राथमिक शिक्षण हमी योजने अंतर्गत कार्यक्रम आहे. यासंदर्भात माझ्याकडे महाराष्ट्र शिक्षण परिषदेचे पत्र आहे. यापत्रामध्ये सांगण्यात आले आहे की, सन 2008-2009 या करिता हंगामी वसतिगृहासाठी 4870 प्रती विद्यार्थी, प्रती हंगाम, निवासी सेतूशाळेसाठी रुपये 3400/- प्रती विद्यार्थी 100 दिवसांसाठी. सन 2008-09 साठी मदरसा व मक्तबासाठी स्वतंत्रपणे रु. 1535/- प्रती विद्यार्थी/प्रती वर्ष इतकी तरतूद मंजूर करण्यात आली आहे. दिनांक 14 व 15 ऑक्टोबर रोजीच्या बैठकीत दिलेल्या सूचनांनुसार ज्या मदरसा व मक्ताब स्वत:च्या धार्मिक शिक्षणाबरोबर महाराष्ट्र शासनाचा प्रचलित अभ्यासक्रम स्वीकारायला तयार असतील त्यांनाच सशिअ अंतर्गत महात्मा फुले योजनेप्रमाणे रु 1535/- प्रती विद्यार्थी/प्रती वर्ष या प्रमाणे तरतूद दिली जाईल.

सभापती महोदय, माहितीच्या अधिकाराखाली जी माहिती आलेली आहे ती माहिती मी आपल्याला वाचून दाखवितो. मदरसा/मकतब योजनेच्या, मुद्दा क्रमांक 4 च्या अनुषंगाने कळविण्यात येते की, तालुकास्तरावरुन प्राप्त झालेल्या मदरसा-मकतब प्रस्तावास मान्यता घेण्यासाठी सदरील संचिका माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.बीड यांच्याकडे सादर केली असता सदरील कालावधीमध्ये आदर्श आचारसंहिता जिल्हयात सुरु असल्यामुळे सदरील प्रस्तावास मुदतीमध्ये मान्यता मिळू शकली नाही. सन 2009-10 मध्ये सदरील योजनेस आर्थिक तरतूद उपलब्ध झालेली नाही. त्यामुळे प्रस्ताव पडताळणी करण्यात आले नाहीत.

मुद्दा क्रमांक -5 च्या अनुषंगाने कळविण्यात येते की, सन 2008 मध्ये कोणत्याही प्रस्तावास मान्यता मिळालेली नाही. म्हणजे माहितीच्या अधिकाराखाली असे सांगावयाचे आणि वरुन लोकमत या वर्तमानपत्रात मोठ मोठया जाहिराती देऊन सांगतात की, आम्ही तुम्हाला हे देतो, ते देतो. परंतु प्रत्यक्षात मात्र अल्पसंख्याकांसाठी काहीही दिले जात नाही.

सभापती महोदय, अल्पसंख्याक बहुल शहरासांठी विविधांगी विकास कामाच्या संदर्भात शासनाची एक योजना आहे. यासंदर्भात माहितीच्या अधिकाराखाली जी माहिती आलेली आहे ती

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल...

पुढील प्रमाणे आहे. अल्पसंख्याक बहुल क्षेत्रामध्ये क्षेत्रविकास योजना राबविण्याबाबत प्रस्ताव पाठविणे साठीचे आदेशप्रत या कार्यालयास प्राप्त झालेली नाही. परंतु जिल्हाधिकारी कार्यालय बीड यांनी दिलेल्या तोंडी सूचनेनुसार प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यामुळे आदेशाप्रत उपलब्ध करुन देता येत नाही. म्हणजे आंधळं दळतं आणि कुत्र पीठ खातं असच सर्व काही चालले आहे. या सर्व गोष्टीकडे शासनाचे काहीही लक्ष नाही असे दिसते.

सभापती महोदय, आपल्याकडे अल्पसंख्यांक दिन साजरा केला जातो. माहितीच्या अधिकाराखाली आम्हाला अशी माहिती मिळाली आहे की, मराठवाडयातील 5 जिल्हयात अल्पसंख्यांक दिन राबविलाच गेलेला नाही. हे शासन केवळ गोरगरिबांचा जीव घेते आणि या ठिकाणी मोठ मोठे आकडे वाचून दाखवून गरिबांची दिशाभूल केली जात आहे. मोठ मोठया आकडयाने आमचे पोट भरणार नाही त्यामुळे मी अर्थसंकल्पाचा आणि आपल्या सर्व कामांचा निषेध करतो. आपण ज्या काही योजना आणता त्या योजनांच्या माध्यमातून गरीब जनतेच्या हाताला काही तरी लागेल असे काम करा एवढी विनंती करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली (विधान सभेने निवडलेले): सभापती महोदय, माननीय वित्त मंत्र्यांनी मांडलेल्या 2010-2011 सालच्या अर्थसंकल्पावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्याच्या सुवर्ण् महोत्सवी वर्षात जो अर्थसंकल्प सादर करण्यात आला आहे त्याचे मी मनापासून स्वागत करतो त्याचबरोबर कोकणातील धार्मिक स्थळांच्या विकासासाठी अर्थसंकल्पात तरतूद केली त्याबद्दल मी माननीय वित्त मंत्र्याना धन्यवादही देतो.सभापती महोदय, कोकणातील परशुराम तीर्थक्षेत्राचा विकास करण्यासाठी , तसेच भराडी देवीला दक्षिणेची काशी समजली जाते आणि भराडी देवी तीर्थक्षेत्राचा विकास करण्याकरता शासनाने दोन कोटी रुपये दिले आहेत त्याबद्दल मी माननीय वित्त मंत्र्यांना मनापासून धन्यवाद देतो.देवगड तालुक्यात कुणकेश्वर येथे शिव मंदीर असून त्याच्या विकासासाठी 2 कोटी रुपये शासनाने दिले आहेत त्याबद्दल मी माननीय वित्त मंत्र्यांना धन्यवाद देतो.कोकणामध्ये धार्मिक स्थळे भरपूर आहेत. महाराष्ट्रातील विविध धार्मिक स्थळाच्या विकासासाठी ज्याप्रमाणे पैसे दिलेले आहेत त्याप्रमाणे कोकणातील या धार्मिक स्थळासाठी शासनाने निधी दिला आहे. तेव्हा अंगणेवाडी व कुणकेश्वर दोन्ही तीर्थक्षेत्रे चांगल्या प्रकारे विकसित करण्यासाठी अधिक निधी शासनाने द्यावा अशी मी शासनाला विनंती करतो.

सभापती महोदय, कोकणातील मत्स्यव्यवसायाला चालना देण्यासाठी रत्नागिरी येथे दोन वर्षाचा मत्स्यव्यवसाय अभियांत्रिकी अभ्यासक्रम सुरु करण्यात आला आहे याबद्दल मी माननीय वित्त मंत्र्यांना धन्यवाद देतो. अशाच प्रकारचा अभ्यासक्रम कोकणातील पाचही सागरी जिल्हयामध्ये सुरु करावा अशी मी या चर्चेच्या निमित्ताने मागणी करीत आहे.

सभापती महोदय, कोकणातील पाच सागरी जिल्हयात तीस ठिकाणी जे.टी.बांधंणे व मासे सुकविण्यासाठी ओटा बांधणे वा मासेमारीसाठी मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देणे इत्यादीसाठी या अर्थसंकल्पात 70 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे कोकणातील पाचही जिल्हयासाठी समान पैसे मिळावेत आणि ज्या ठिकाणी जेटी बांधण्याची मच्छिमारांची मागणी आहे त्याप्रमाणे अग्रक्रम ठरवून त्या ठिकाणी जेटी बांधण्यात याव्यात अशी मागणी मी या निमित्ताने करतो. मत्स्यव्यवसायाच्या माध्यमातून दर वर्षी 1600 ते 1800 कोटी रुपयांचे परकीय चलन शासनाला मिळत असते.गेल्या पाच वर्षात मत्स्य दुष्काळ अधिकृतपणे जरी जाहीर करता आला नसला तरी मत्स्य दुष्काळामुळे कोकणातील मच्छिमार अडचणीमध्ये आलेले आहेत. मत्स्य दुष्काळ

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली..

जाहीर करण्यासंबंधीचे जे निकष ठरविण्यात आले आहेत ते निकष बदलण्याची आवश्यकता आहे असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, मच्छिमारी करण्यासाठी समुद्रात एक ट्रॉलर जातो तेव्हा त्यातील मत्स्याची किंमत विचारात घेंतली जाते आणि समुद्र किनारी एकूण किती ट्रॉलर्स आहेत याचा हिशोब करुन मोजमाप केले जाते त्यानंतर निकषात बसत नसल्यामुळे मत्स्यदुष्काळ जाहीर करता येत नाही असे सबंधित विभागाचे अधिकारी आपल्याला असे सांगतात. त्यामुळे मत्स्य दुष्काळ जाहीर करण्यासबंधीचे निकष बदलण्यात यावेत अशी माझी शासनाला विनंती आहे.या चर्चेच्या निमित्ताने मला असे सांगावयाचे आहे की, कोकणातील पाचही जिल्हयामध्ये मोठया प्रमाणावर मच्छिमार बाधव असून त्यांना न्याय देणे आवश्यक आहे. शेतक-यांना ज्याप्रमाणे 25 हजार रुपयापासून 50 हजार रुपयापर्यंत बिन व्याजी कर्ज दिले जाते त्यापमाणे् मच्छिमार बांधवांना देखील बिन व्याजी कर्ज दिले गेले पाहिजे.

सभापती महोदय, सागरी किना-यावर मासे मिळत असल्यामुळे त्यांच्यावर प्रक्रिया करणारे दोन कारखाने कोकणामध्ये देण्याचे शासनाने मान्य केलेले आहे त्यात वाढ करुन प्रत्येक जिल्हयात हे प्रक्रिया करणारे कारखाने सुरु करावेत असे मला सुचवावयाचे आहे.

सभापती महोदय, शेतक-यांना कर्जमाफी देण्यात आली आहे परंतु मच्छिमारांसाठी मात्र कर्ज माफी दिली गेली नाही तेव्हा त्याचा देखील विचार करण्यात यावा अशी मी या चर्चेच्या निमित्ताने विनंती करतो.

सभापती महोदय, गड आणि किल्ल्याच्या संदर्भात सांगावयाचे म्हणजे कोकणातील सिंधुदूर्ग जिल्हयातील रांगणागडासाठी एक कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आलेली आहे.कोकणातील या पाच जिल्हया पासून मुंबईपर्यंत एकूण 107 किल्ले आणि गड आहेत परंतु त्याकडे शासनाने लक्ष दिले नाही हे किल्ले आणि गड इतिहास प्रेमी आणि पर्यटकांना खुले करण्याच्या दृष्टीने चांगल्या प्रकारचे नियोजन करण्यात यावे तसेच या गड किल्ल्याच्या विकासासाठी चांगला कार्यक्रम आखून जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन द्यावा अशा प्रकारची विनंती मी या चर्चेच्या निमित्ताने शासनाला करतो.

नंतर श्री.सरफरे

अशुद्धीसह प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली....

सभापती महोदय, कोकणातील रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या तीन जिल्हयांमध्ये परिचारिका प्रशिक्षण केंद्र मंजूर केल्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो. जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने जलस्वराज्य प्रकल्प सुरु करण्यात आले. या प्रकल्पाव्दारे जवळपास 1254 कोटी रुपये यावर्षी खर्च करणार आहोत. आता त्याचा दुसरा टप्पा सुरु आहे. काल माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत व माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे कोकणातील विविध योजनांवर बोलले होते. परंतु या योजनांवर कुणाचाही अंकुश नाही. भारत निर्माण, जल स्वराज्य योजनांच्या माध्यमातून केंद्र सरकारकडून कोटयावधी रुपये राज्य सरकारकडे येतात. परतु त्यावर जिल्हा परिषद किंवा विधीमंडळातील सदस्यांचे नियंत्रण असावे अशी विनंती मला करावयाची आहे.

सभापती महोदय, सावंतवाडी, वेंगुर्ला व मालवण या तालुक्यांना पाणीपुरवठा करण्यासाठी तिलारी प्रकल्पामधून 3 वर्षामध्ये 125 कोटींच्या योजना राबविण्याचे ठरविण्यात आले आहे, त्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो. कोकण किनारपट्टीवरील भागासाठी पाण्याची अडचण आहे त्या माध्यमातून शासनाने 125 कोटी रुपये देण्याचे कबूल केले आहे, त्याबद्दल मी धन्यवाद देतो. सभापती महोदय, बांबूच्या लागवडीबाबत आतापर्यंत गडचिरोली या जिल्हयाचा उल्लेख केला जातो. कोकणामध्ये साडे सहा लाख हेक्टर पडीक जमीन आहे. त्याठिकाणी अतिशय चांगल्या प्रकारे बांबूची लागवड करता येणे शक्य आहे. त्यामुळे बांबू लागवडीला जास्तीत जास्त चालना देण्याबाबतचे धोरण ठरवित असतांना कोकणाला प्राधान्य द्यावे अशी विनंती करतो.

सभापती महोदय, या राज्यामध्ये आलेल्या चक्री वादळामुळे, अवेळी पावसामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी 246 कोटींची तरतूद करण्यात आली. त्या अनुषंगाने मला असे सुचवावयाचे आहे की, कोकणामध्ये मोठया प्रमाणामध्ये वणवा लागतो, त्यामधून मोठया प्रमाणात बागायती क्षेत्र नष्ट होते. त्याकरिता शासनाने या गोष्टीला आळा कसा घालता येईल यासाठी प्रयत्न करावेत अशी विनंती करतो.

सभापती महोदय, कोकणातील पाटबंधारे योजनांसाठी गेली दहा वर्षे निधी मिळालेला नाही. या अर्थसंकल्पामध्ये कोकणातील पाटबंधारे प्रकल्पांसाठी 7558 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. परंतु यावर्षी आपण कोकणातील प्रकल्पांसाठी किती निधी देणार आहात हा प्रश्न आहे? याचे उत्तर माननीय वित्तमंत्र्यांनी दिले पाहिजे. काल माननीय वित्तमंत्र्यांनी माननीय राज्यपालांची परवानगी मिळाल्यानंतर साडे तीनशे कोटी रुपये देऊ असे सांगितले. परंतु साडे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MMP/

श्री. राजन तेली....

तीनशे कोटी रुपये हे ठेकेदारांची देयके देण्यासाठी खर्च होतील. त्यामधून आपण नवीन कामे केव्हा सुरु करणार आहात? यासंबंधी भूमिका जाहीर करण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, खार भूमी विकास योजनेची अंमलबजावणी करतांना कोकणातील चारही जिल्हयांवर सातत्याने अन्याय होत आहे. त्याकरिता आपण खार भूमी विकास महामंडळ स्थापन करावे अशी मी मागणी करतो. माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांनी मुंबई-गोवा या महामार्गाच्या चौपदरीकरणाचा उल्लेख केला आहे. त्याबाबत मला असे सुचवावयाचे आहे की, ज्याप्रमाणे आपण कोकण रेल्वेची कामे एकाच वेळी 52 ठिकाणी सुरु केली त्याप्रमाणे या महामार्गाच्या चौपदरीकरणाची कामे सुध्दा एकाच वेळी सर्व ठिकाणी सुरु करावीत अशी विनंती करतो. सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. वंदना चव्हाण (पुणे स्थानिक प्राधिकारी संस्था) :सभापती महोदय, या अधिवेशनाच्या प्रारंभी या राज्याचे महामहिम राज्यपाल यांनी आपल्यापुढे राज्याचा रोड मॅप आराखडा सादर केला. त्या अनुषंगाने माननीय वित्तमंत्र्यांनी या सभागृहामध्ये एक चांगला अर्थसंकल्प मांडल्याबद्दल मी त्यांचे मनापासून अभिनंदन करते, त्यांना धन्यवाद देते व त्यांच्या अर्थसंकल्पाला पाठिंबा देते.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्याचा विकास होऊन हे राज्य देशाच्या पातळीवर अव्वल क्रमांकावर आणण्यासाठी आणि पहिल्या पसंतीचे हे राज्य करण्यासाठी या राज्यामध्ये कृषी, औद्योगिक क्षेत्रामध्ये पायाभूत सुविधा निर्माण करुन सर्व क्षेत्रामध्ये हे राज्य अग्रेसर रहाण्यासाठी विविध योजना हे शासन राबवीत आहे. राज्यामध्ये सर्वांगीण विकासाला चालना देऊन शिक्षण, व सार्वजनिक आरोग्याच्या सुविधांकडे अधिक लक्ष देण्यात आले आहे. सभापती महोदय, शासनाच्या अर्थ व सांख्यिकी संचालनालयातर्फे महाराष्ट्राची आर्थिक पहाणी अहवाल सभागृहाला सादर करण्यात आला आहे. तो पाहिल्यानंतर महाराष्ट्र सरकारने या राज्यामध्ये फार उत्तम काम केल्याचे दिसून येत आहे. त्या अनुषंगाने या राज्य सरकारने या अर्थसंकल्पाव्दारे राज्यातील उपेक्षित घटकांना न्याय देण्याचा निश्चितपणे प्रयत्न केल्याचे दिसून येत आहे. यानिमित्ताने मी केवळ नागरी विकास व महिलांच्या प्रश्नांच्या संदर्भातील दोन-तीन महत्वाच्या मुद्यांवर माझे विचार व्यक्त करणार आहे. नागरी विभागामध्ये पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी सन 2005 सालापासून जेएनएनयूआरएम अंतर्गत निवाऱ्यासाठी मोठया प्रमाणामध्ये निधी शासनाकडे यावयास लागला आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.वंदना चव्हाण . . . .

महाराष्ट शासनाच्यादृष्टीने पाहिले तर एकूण 12 हजार कोटी रुपयांचे 51 प्रकल्प मंजूर झालेले आहेत. लहान आणि मध्यम शहरांसाठी जवळजवळ 1083 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झालेला आहे. त्याचप्रमाणे यावर्षी देखील 1840 कोटी रुपयांची तरतूद देखील आपल्या अंदाजपत्रकामध्ये करण्यात आलेली आहे. पूर्वी शहरांच्या विकासासाठी फक्त महानगरपालिकेचा निधीच वापरला जात असे. पण आता केंद्र शासनाने जवाहरलाल नेहरु अर्बन रिन्युअल मिशनच्या माध्यमातून हे पैसे देण्यास सुरुवात केल्यानंतर, राज्य शासनाला देखील कम्पलसरी काही निधी या शहरांसाठी द्यावा लागतो. पण हे करीत असताना मला आपल्या निदर्शनास आणावयाचे आहे, कारण शेवटी अंदाजपत्रकावर बोलत असताना काही त्रुटी रहातात, त्या निदर्शनास आणण्यासाठी किंवा काही सूचना करावयाच्या असतात तर त्यासाठी ही चर्चा एक माध्यम असते. त्यादृष्टीने मला माननीय अर्थमंत्र्यांच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, जेएनएनयुआरएम साठी आलेला जो निधी असतो, त्यामधील 50 टक्के निधी केंद्र शासनाकडून येतो आणि 30 टक्के निधी राज्य शासनाकडून यावा लागतो आणि उरलेला 20 टक्के हा त्या-त्या शहरांमधील महानगरपालिका असतील किंवा शहरे असतील तर त्यांनी तो उभा करावयाचा असतो. याठिकाणी मला आवर्जून निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, पुणे महानगरपालिकेच्या माध्यमातून जे काही झालेले आहे, तेच कदाचित इतर शहरांमध्येही झाले असेल की, जेएनएनयुआरएम साठी राज्य शासनाकडून जो 30 टक्के निधी यावयास हवा होता, तो येत नाही आणि महानगरपालिकांसमोर एक टांगती तलवार रहाते की, ज्या वेळेला आपण एवढे मोठमोठे प्रकल्प हाती घेतो, तेव्हा आपल्याला राज्य शासन हे पैसे देणार आहे की नाही ? आज पीएमटी, आता पीएमपीएल झालेले आहे, बी.आर.टी.रुट झालेले आहेत, जेएनएनयुआरएम अंतर्गत रस्त्याची कामे झालेली आहेत. केंद्र शासनाचे पैसे महानगरपालिकेकडे आले आहेत, पण अजूनही राज्य शासनाचे पैसे मिळत नाहीत आणि ते येतील की नाही याचीही शाश्वती नाही. त्यामुळे यादृष्टीने राज्य शासनाने काही ठोस निर्णय घेतले आणि आपली भूमिका मांडली पाहिजे.कारण हे पैसे द्यावेच लागतील,परंतु महानगरपालिकांना याबाबतची क्लॅरिटी असणे अत्यंत महत्वाचे आहे. झोपडपट्टी हे सुध्दा शहरांच्यादृष्टीने एक मोठा प्रॉब्लेम झालेला आहे. मला एका गोष्टीचा आनंद आहे आणि मला माननीय अर्थमंत्र्यांचे मनापासून अभिनंदन करावयाचे आहे की, जेव्हा या सिमेंटच्या जंगलामध्ये लोक मायग्रेट होऊन येतात, तेव्हा त्यांना रहाण्यासाठी जागा

. . . .3 एल-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.वंदना चव्हाण . . . .

नसते आणि आता झोपडपट्टीमुक्त शहरे करण्यासाठी राजीव आवास योजनेचा एक प्रकल्प मांडण्यात आला आहे आणि त्यादृष्टीने एक संचालनालय देखील होणार आहे. माननीय मंत्री महोदयांच्या एक निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, एस.आर.ए.योजना, स्लम रिहॅबिलीटेशन ॲथॉरिटी स्थापन झाली, तेव्हा त्यांच्या माध्यमातून स्लम रिहॅबिलीटेशनचे काम लवकर व्हावे असा उद्देश होता. मात्र तसे होत नाही आणि ते का होत नाही ? याचा विचार केला पाहिजे. यासाठी आपल्याला काही निकष लावावे लागतील. काही ठिकाणी डेव्हल्परचा खूप फायदा होत आहे. म्हणून ती स्लम रिहॅबिलीटेशन स्किम पुढे जात नाही. काही ठिकाणी असे सांगितले जाते की, त्या ठिकाणी रहाणाऱ्यांची मंजुरी घेतल्यावर मग ही योजना राबवावयाची, हे बरोबर आहे. पण नेमकी स्किम आणि पॅरोमीटर्स् काय असले पाहिजेत हे व्यवस्थित ठरविले पाहिजे, तरच खऱ्या अर्थाने या योजना मार्गी लागतील. नाहीतर आपण पैसे देऊन सुध्दा योजना झाली नाही किंवा घरे झाली नाही तर त्याचा काही फायदा होणार नाही असे मला आवर्जून वाटते.

सभापती महोदय, ग्रामीण भागामध्ये स्वच्छता अभियान राबविले जाते. मला असे वाटते की, आता शहरांमध्ये सुध्दा स्वच्छता अभियान राबविण्याची अत्यंत गरज आहे. रस्ते, त्यावरील वाहतूक, पाणी असेल, नद्यांचे नाले झालेले आहेत, नदी असेल तर त्यामध्ये शुध्द पाणी दिसतच नाही. तसेच आवाजाचे प्रदूषण फार मोठया प्रमाणात वाढलेले आहे. पाणी असेल तर पाणी दिसते, पण आवाज असेल तर तो ऐकू येते मात्र हवेचे प्रदूषण होते तेव्हा ते ऐकावयास किंवा पहावयास मिळत नाही. त्याचा फक्त आपल्या आरोग्यावर परिणाम होत असतो. म्हणून स्वच्छतेचा अभाव हा थेट आपल्या आरोग्यावरच परिणाम करतो. यादृष्टीने हवेचे प्रदूषण रोखण्यासाठी ठोस पावले उचलणे गरजेचे आहे. सुप्रीम कोर्टाने भुरेलाल कमिटी स्थापन केली. त्या अनुषंगाने पब्लिक ट्रान्सपोर्ट चांगल्या प्रकारे सुधारावी यासाठी सुध्दा पुढाकार घेतलेला आहे. असे दिसून येते की, पब्लिक ट्रान्सपोर्टसाठी मुंबई शहरामध्ये खूप मोठया प्रमाणात तरतुदी झालेल्या आहेत आणि तशा त्या होणेही गरजेचे आहे. पण इतर शहरांमध्ये देखील अशा तरतुदी होणे आवश्यक आहे, त्यासाठी व्यवस्थित इंटीग्रेटेड प्लॅन होणेही अत्यंत गरजेचे आहे. पुणे शहराच्या अनुषंगाने एक बाब सांगते आणि ती बाब इतर शहरांना सुध्दा लागू होईल. प्रत्येक शहराला एक डेव्हल्पमेंट प्लॅन असतो जेणेकरुन आपल्याला ओपन स्पेस किती आहे ? बांधकामासाठी किती स्पेस आहे ? शाळेसाठी ...

. . . .3 एल-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

किती रिझर्वेशन असावे यापध्दतीचा आराखडा मांडला जातो. मोठमोठया शहरांमध्ये ओपन स्पेस कमी होऊ लागल्या आहेत. मग स्थानिक स्वराज्य संस्थेच्या लेव्हलला महानगरपालिकेमध्ये काही व्हेस्टेड इंटरेस्टमुळे त्याठिकाणी अकॉमोडेशन रिझर्वेशनला कन्व्हर्ट केले जाते. मला असे वाटते की, राज्य शासनाने या अनुषंगाने ज्या-ज्या ओपन स्पेस असतील त्याला ॲक्वायर करावयाचे असेल तर त्यासाठी काहीतरी ठोस पॉलिसी करणे गरजेचे आहे. स्थानिक स्वराज्य लेव्हलला त्या पॉलिसी होतातच.

यानंतर कु.थोरात . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.वंदना चव्हाण....

पण त्यामध्ये काही व्हेस्टेड इंटरेस्ट असल्यामुळे इतर शहरांना समवेत घेऊन एक पॉलिसी निर्माण करण्याची गरज आहे. जेणेकरुन पैसे द्यावयाचे की काही टीडीआर द्यावयाचा याबाबतीत काही पॉलिसी तयार करणे गरजेचे आहे. आरक्षणासाठी पैसे देण्यासाठी आज महानगरपालिकांकडे पैसे नाहीत. याबाबतीत पुण्याचेच उदाहरण परत द्यावयाचे झाले तर एक हजार हेक्टर इतकी जमीन आम्ही हिलटॉप हिलस्लोप, बायोडायव्हर्सिटी पार्कसाठी आरक्षित केली. पूर्वी या हिलटॉप हिलस्लोपचे झोनिंग होत होते. आता त्यामध्ये आरक्षण टाकण्यात आलेले आहे जेणेकरुन याठिकाणी झोपडपट्टी होऊ नये. पण ज्यावेळी या जागेचे आरक्षण करण्यात येते त्यावेळी पैसे कोठून आणावयाचे हा प्रश्न उदभवतो. आज डेव्हलपमेंट प्लॅन ज्यावेळेला राज्य शासनाकडे रॅटिफिकेशनसाठी येतो त्यावेळेला वारंवार हाच प्रश्न येतो की, बायोडायव्हर्सिटी पार्कसाठी जमीन कशी ॲक्वायर करणार? त्यासाठी काही ठोस पॉलिसी राज्य शासनाकडून अशा मोठया शहरांसाठी करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, मला याठिकाणी कचऱ्याच्या संदर्भात एक मुद्दा मुद्दाम मांडावयाचा आहे. काल याठिक्राणी कचऱ्याच्या संदर्भात खूप मोठया प्रमाणात चर्चा करण्यात आली. मला असे वाटते की, काही पॉलिसीज डीसेंट्रलायझेशनच्या दृष्टीने महत्वाच्या आहेत. कारण लॅन्डफिल्ड साईड्स आता नाहिशा होणार आहेत. वैज्ञानिकदृष्टया आता त्या होऊ शकत नाहीत. म्हणून डीसेंट्रलाईज कुठली टेक्नॉलॉजी चांगली आहे याचा विचार करुन त्यासाठी लागणारी बजेट प्रोव्हिजनसुध्दा होणे गरजचे वाटते आणि ती पुढच्या काळात होईल अशी अपेक्षा ठेवते.

सभापती महोदय, महिलांच्या बाबतीत मला याठिकाणी एकच मुद्दा मांडावयाचा आहे. महिला धोरण हे सर्वप्रथम महाराष्ट्रात झाले. पुरोगामी असा महाराष्ट्र मानला जातो. बालविकास धोरण, कल्याणकारी योजना, महिला आर्थिक विकास योजना अशा अनेक योजना महाराष्ट्र शासनाने मोठया प्रमाणात पुढे आणलेल्या आहेत. महाराष्ट्रात महिला बचतगट मोठया प्रमाणात झालेले आहेत. पण या बचतगटाच्या माध्यमातून महिला ज्या वस्तु बनवतात त्याला खऱ्या अर्थाने मार्केट मिळत नाही. कामधेनू योजनेसारखी एक योजना आहे ज्याच्यामध्ये शासकीय आणि नीम शासकीय ऑर्गनायझेशन्सनी 50 टक्के माल विकत घ्यावयाचा आहे पण खऱ्या अर्थाने या ऑर्गनायझेशन्स हा माल विकत घेत नाहीत. म्हणून या संदर्भात शासन काय ठोस पावले उचलणार आहे याकडे लक्ष देण्याची गरज आहे. ...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. वंदना चव्हाण....

सभापती महोदय, भृण हत्येच्या संदर्भात मी बोलत नाही. पण त्याबाबतीत शासनाला लक्ष द्यावे लागणार आहे.

सभापती महोदय, पर्यटन विकासाच्या दृष्टीने अनेक स्मारके आणि अनेक तीर्थस्थळांसाठी बजेट प्रोव्हिजन केलेली आहे. महाराष्ट्र राज्य हे कृषि प्रधान राज्य आहे. उद्योगप्रधान राज्य आहे पण ते पर्यटनाच्यादृष्टीने कसे पुढे येईल याबाबतीत लक्ष देण्याची आवश्यकता आहे. कारण पर्यटनातून फार मोठया प्रमाणात पैसे येऊ शकतात. केरळने त्यांच्या किनारपट्टीचा उत्तम प्रकारे वापर केलेला आहे त्यामुळे कोस्टल पर्यटनातून केरळाला खूप पैसा येतो. त्यादृष्टने महाराष्ट्र शासनानेसुध्दा स्मारके आणि तीर्थस्थाने डेव्हलप करत असताना ते टारगेट ठेवले पाहिजे एवढे मुद्दे मांडून मी माझे भाषण पूर्ण करते.

..3...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर अर्थसंकल्पावरील चर्चेत या सभागृहातील ज्येष्ठ सन्माननीय सदस्य आपले विचार मांडतील. 31 मार्चच्या आतमध्ये आपल्याला यासंदर्भातील सगळे काम उरकायचे असते. या सोपस्काराची कल्पना मलाही आहे. आपण महाराष्ट्राचा हा अर्थसंकल्प सादर केलेला आहे. महाराष्ट्राच्या साडेअकरा करोड जनतेविषयी त्यांच्या मूलभूत सुविधा, ध्येय धोरण यावर आपण चर्चा करणार आहोत. या सन्माननीय सभागृहातील सदस्यांचा अनुभव जास्त आहे तर काही लोकांचे शिक्षण जास्त आहे. पण या अर्थसंकल्पावरील चर्चेला फक्त दोन दिवसांचा कालावधी देण्यात आलेला आहे. तसेच प्रत्येक सदस्याला याठिकाणी बोलण्यासाठी फक्त दहा मिनिटांचा वेळ देण्यात आलेला आहे आणि तेवढया वेळात त्यांनी आपले विचार मांडावयाचे आहेत. सभापती महोदय, या सभागृहाच्या बाहेर गेल्यानंतर या सन्माननीय सदस्यांनी लोकांना काय प्रतिक्रया द्यावयाच्या? मी दहा मिनिटात पूर्ण महाराष्ट्रावर बोललो. मी पाच मिनिटात आपली सर्व गाऱ्हाणी शासनासमोर ठेवली असे सांगावयाचे काय? सभापती महोदय, 31 मार्चच्या आत हा कारभार उरकण्यासाठी माननीय मंत्रिमहोदयांनी बरोबर 25 ताराखेला हा अर्थसंकल्प येथे मांडलेला आहे. त्यानंतर दोन दिवसात पूर्ण महाराष्ट्राच्या कारभारावर याठिकाणी बोलायला सांगण्यात येत आहे. सभापती महोदय, यासंदर्भात मी पहिली मागणी अशी करतो की, या नंतर येणाऱ्या अर्थसंकल्पावर जास्तीत जास्त अभ्यास करण्यासाठी आणि जास्तीत जास्त बोलण्यासाठी वेळ द्यावा, जेणेकरुन आम्हाला जनतेला न्याय देता येईल. ज्यांनी आम्हाला या सभागृहात पाठविलेले आहे त्या पक्षाचे विचार, आमच्या प्रमुखांचे विचार आणि त्यांच्या असलेल्या मागण्या पाच आणि दहा मिनिटात मांडून या अकरा करोड जनेतेचे प्रश्न सोडवले जाणार नाहीत. सभापती महोदय, माझ्या या मागणीच्या संदर्भात या सभागृहातील सर्व सदस्यांचे एक मत होईल असे मला वाटते. शहरीकरणाचा आणि ग्रामीण भागचा विचार करता हे प्रश्न दोन मिनिटात सुटणार नाहीत.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर .....

या राज्यात काँग्रेस आघाडीचे सरकार सतत तिसऱ्या वेळी बहुमत मिळवून सत्तेवर आले. महत्वाची बाब म्हणजे हे वर्ष महाराष्ट्र राज्य स्थापनेचे सुवर्ण महोत्सवी वर्ष असल्याने या वर्षीच्या अर्थसंकल्पाबाबत सर्वांना उत्सुकता होती. या पूर्वीची परिस्थिती अशी होती की, अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर दूरचित्रवाहिन्यांचे प्रतिनिधी हा अर्थसंकल्प कसा आहे याबाबत एखाद्या फूटपाथवर भाजी विकणाऱ्या महिलेची प्रतिक्रिया घ्यावयाचे. कॉलेजमधील मुलांची प्रतिक्रिया घ्यावयाचे. वृध्द लोकांची प्रतिक्रिया घ्यावयाचे. उद्योजकांची प्रतिक्रिया घ्यावयाचे. डॉक्टर्स, इंजिनिअर्स अशा लोकांची प्रतिक्रिया घ्यावयाचे. परंतु यावेळी अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर आपल्याकडे कोणत्याही दूरचित्रवाहिनीचे प्रतिनिधींनी ढुंकूनही बघावयास तयार नाही. कोणत्याही वृत्तपत्राने त्याची दखल घेतली नाही. या अर्थसंकल्पाबाबत, आपल्या ध्येयधोरणाबाबत शासन गंभीर आहे असे दिसून येत नाही. लोक म्हणत असतील की, आपण या आघाडी सरकारला तिसऱ्यांदा निवडून दिले यामध्ये आपण चूक केलेली आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामधून तसेच माननीय मंत्रिमहोदयांनी आपल्या अर्थसंकल्पीय भाषणातून असे सांगितले की, आम्हाला निर्विवाद बहुमत मिळाले. या सरकारला तिसऱ्या वेळी जे बहुमत मिळाले त्याचे सर्व श्रेय खऱ्या अर्थाने निरनिराळ्या पॅकेज डीलला आहे. खानदेशसाठी पॅकेज दिले. कोकणासाठीपॅकेज दिले. त्यामध्ये मोठमोठे आकडे दिले. कोकणासाठी 5300 कोटी रुपयांचे पॅकेज मिळाल्यानंतर लोकांना असे वाटले की आपल्याकडे काही सुधारणा होतील परंतु लोकांना आता समजले आहे की, मागच्या वर्षात जे पैसे देणार होते त्यातील एक रुपया सुध्दा देण्यात आलेला नाही. लोकांना आता कळावयास लागले आहे. या पॅकेजेसच्या मोहापायी लोकांनी मते दिली परंतु ती मते खऱ्या अर्थाने वाया गेलेली आहेत असे या अर्थसंकल्पामधून आरशासारखे स्पष्ट दिसते. या अर्थसंकल्पामध्ये जो आकड्यांचा आणि शब्दांचा खेळ दाखविला आहे त्यावरुन असे दिसते की, सध्या असलेले 1 लाख 85 हजार कोटी रुपयांचे कर्ज 2 लाख कोटी रुपयांपर्यंत जाईल. या व्यतिरिक्त शासनाने 36 हजार कोटी रुपयांच्या कर्जाला हमी दिलेली आहे. सहकारी साखर कारखाने, पतपेढ्या, को-ऑपरेटिव्ह बँका यांना शासनाने हमी दिलेली आहे. ज्या संस्थाचालकांनी आपल्या नातेवाईकांना भरभरुन कर्जे दिलेली आहेत त्यांना शासनाने हमी दिलेली आहे. 17 साखर कारखाने असे आहेत की ज्यामध्ये 14 कारखाने माननीय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MMP/

श्री. किरण पावसकर ....

मंत्रिमहोदयांचे आहेत. त्यांनी घेतलैल्या कर्जाचा त्यांना पाठपुरावा करता येत नाही म्हणून शासन हमी देते. स्वत: कर्जामध्ये बुडालेले शासन त्यांना 36 हजार कोटीच्या कर्जाला हमी देत आहे.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पात काय आहे याबाबत सांगावयाचे झाले तर तुम्ही आम्ही भाऊ भाऊ, वाटेल तेवढे कर्ज घेऊ, वरचे मिळाले तर वाटून खाऊ अशा पध्दतीचा अर्थसंकल्प मांडलेला आहे. महाराष्ट्र हे जगातील किंवा देशातील असे राज्य असेल की ज्या ठिकाणी मूल जन्माला आल्यानंतर बाराव्या दिवशी त्याला नाव मिळेल परंतु ते मूल जन्माला येताना कर्जाचा वाटा घेऊनच जन्माला येईल. या पध्दतीने राज्यावरील कर्जाचा डोंगर वाढत चाललेला आहे. गेल्या काही वर्षात स्थापन झालेले छत्तीसगड राज्य प्रगतिपथावर आहे. परंतु महाराष्ट्र राज्य पिछाडीवर आहे. कोट्यवधी रुपयांचे कर्ज असलेल्या राज्याचे मंत्रिमंडळ बिनधास्त आहे. राज्यातील 33 टक्केच्या आसपास लोक दारिद्र्यरेषेखाली आलेले आहेत. राज्यातील 33 टक्के जनता दारिद्र्यरेषेखाली असताना या ठिकाणी बंगल्यांचे नूतनीकरण चालले आहे. या ठिकाणी परदेश दौरे चालू आहेत. याचा कोणी विचार करीत नाही. माननीय मंत्रिमहोदयांकडे जी खाती आहेत त्या खात्यातील रिक्त पदे पाहिली तर महाराष्ट्रातील एकही मंत्री आपल्या खात्यामधील रिक्त पदे भरु शकले नाहीत. आमच्या खात्यामध्ये कोणालाही डेप्युटेशनवर पाठवू नका, आम्ही ते काम करु असे कोणीही सांगत नाही. मी काही आकडेवारी देऊ इच्छितो. वेगवेगळ्या हॉस्पिटल्समध्ये काम करणारे 1856 लोक बदली कामगार म्हणून काम करीत आहेत. मी त्या हॉस्पिटल्सची यादी देऊ शकतो. जे.जे. हॉस्पिटलमध्ये 601 लोक काम करीत आहेत. कामा हॉस्पिटलमध्ये 170 लोक काम करीत आहेत. सेंट जॉर्जेस हॉस्पिटलमध्ये 130 लोक काम करीत आहेत. अंबेजोगाई येथील हॉस्पिटलमध्ये 413 लोक काम करीत आहेत. 20-20 वर्षे ते अशा पध्दतीने काम करीत आहेत. आपल्याला कधी कायम करतील या विवंचनेत हे 1800 लोक पडलेले आहेत. ते ज्यावेळी कामाला लागले त्यावेळी त्यांचे वय 20 ते 25 वर्षे असेल. आता त्यांचे वय 45 वर्षे झाले असेल. यानंतर ते परमनंट होणार की नाही, त्यांना ग्रॅच्युईटी मिळणार की नाही, ते सेवानिवृत्त कधी होणार ? सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांची 32 पदे रिक्त आहेत. ती पदे अजून भरलेली नाहीत. त्या ठिकाणी 7-8 वर्षे वैद्यकीय अधिकारी नाहीत.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर...

शिधावाटप विभागातील मुंबई व ठाणे विभागामधील 66 टक्के लिपिकांच्या जागा रिक्त आहेत. परिमंडळ-5 मध्ये 680 पदे रिक्त आहेत. मग शिधावाटप अधिकारी असेल, शिधावाटप निरीक्षक असेल, लिपिक असेल ही पदे भरलेली नाहीत. पोलीस विभागातील हजारो पदे रिक्त आहेत. एखादी घटना घडल्यानंतर सुरक्षा व्यवस्थेवर बोलत असताना व्हीआयपींच्या सुरक्षा व्यवस्थेमुळे पोलिसांवर ताण पडतो असे बोलले जाते. परंतु राज्यात 49 हजार पोलिसांची पदे रिक्त आहेत ही वस्तुस्थिती आहे. देशामध्ये महाराष्ट्र राज्य पोलीस विभागातील रिक्त पदांबाबत क्रमांक 1 वर आहे. परंतु वर्तमानपत्रातून छापून येत असते की, सुरक्षा व्यवस्था आमदार, खासदारांसाठी आहे की जनतेसाठी आहे ? पण 49 हजार रिक्त पदे आहेत ही खरी त्यातील गोम आहे. मुंबईमध्ये मरोळ, नायगांव याठिकाणी मागील 7 वर्षात भरती झालेली नाही. म्हणून मनुष्यबळाचा तुटवडा निर्माण झाला आहे.

सभापती महोदय, राज्यातील 13 कामगार विमा रुग्णालयांमध्ये 1200 कर्मचा-यांची पदे रिक्त आहेत. या रुग्णालयांची खाटांची संख्या 3 हजार इतकी आहे. परंतु त्यापैकी 1000 ते 1200 खाटा वापरल्या जातात. बाकीची कोणतीही व्यवस्था या रुग्णलयामध्ये नाही. तेथील मशिनरी 10 वर्षांपासून तशीच पडून राहिली आहे. एका प्रश्नाच्या संदर्भात शासनाकडून अशी माहिती देण्यात आली आहे की, केंद्र सरकारकडे ही रुग्णालये चालविण्यासाठी निधीची मागणी केली जात आहे. ही रुग्णालये बंद होण्याच्या मार्गावर आहेत. या योजनेचे 75 लाख लाभार्थी आहेत आणि 18 लाख विमा कर्मचारी आहेत. या कामगारांना एकाही पैशाचा फायदा होत नाही. तरी देखील आम्ही येथे अर्थसंकल्पावर चर्चा करीत आहोत.

सभापती महोदय, मुंबई शहराबाबत बोलावयाचे झाले तर या अर्थसंकल्पात केवळ 200 कोटींची तरतूद आघाडी सरकारने केलेली आहे. खरे तर हा मुंबईचा अपमान आहे. काही प्रमुख वक्त्यांनी आपल्या भाषणात असे म्हटले की, स्व.राजीव गांधी यांचा जन्म या मुंबईत झाला. परंतु त्यांनीच 25 वर्षांपूर्वी असे म्हटले होते की, केंद्राकडून राज्यात 1 रुपया पाठविल्यावर त्यातील केवळ 15 पैसे खालच्या लोकांपर्यंत पोहोचतात. परंतु सध्या 15 पैसे पोहोचत नाहीत उलट त्याच्या

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ SBT/

श्री.किरण पावसकर....

डोक्यावर कर्ज ठेवले जात आहे, अशी या मुंबई शहरातील लोकांची परिस्थिती आहे. याच मुंबई शहरातून केंद्र सरकारला 60 ते 70 हजार कोटी रुपयांचा महसूल जातो. पण या मुंबईतील सुरक्षा व्यवस्थेसाठी राज्य सरकारकडून 1200 कोटी रुपयांची मागणी केली जाते, इतकी लाचारीची वेळ महाराष्ट्र राज्यावर आलेली आहे. या शहरातील जलवाहिन्या बदलण्यासाठी केंद्र सरकारकडे निधीची मागणी केली होती, परंतु तो निधी अद्याप मिळालेला नाही. सभापती महोदय, राज्याला कर्ज मुक्त करावयाचे असेल तर कोणताही देश किंवा राज्य घ्यावे. या अर्थसंकल्पावर बोलताना त्या राज्याचे जे मॅन्यूफॅक्चरर्स असतात ते खऱ्या अर्थाने उत्पादक असतात. जे रिसर्च व डेव्हपमेंट करतात, जे नवीन उत्पादन तयार त्यांच्यामुळे राज्याची भरभराट होते. परंतु ज्यांनी राज्याच्या तिजोरीवर डल्ला मारुन बीओटी तत्वावर रस्ते बांधले, राज्याच्या तिजोरीतून धरणे बांधली, राज्याच्या तिजारीतील पैशातून ऊर्जा प्रकल्प बांधले ते कंत्राटदार मात्र करोडपती होत आहेत. हे कंत्राटदार विमानांची खरेदी करीत आहेत, हेलिकॉप्टर्सची खरेदी करीत आहेत आणि त्यामधून मंत्री फिरत आहेत. त्यामुळे जे उत्पादक आहेत ते आपला उद्योगधंदा बंद करुन महाराष्ट्रातून निघून जात आहेत.

सभापती महोदय, या राज्यामध्ये 3 लाख 25 हजार कामगार बेकार झाले आहेत. राज्यात बीओटी तत्वावर काय चालले आहे ते समजत नाही. राज्यातील सार्वजनिक मालमत्तेचे मालक कोण आहेत ते समजत नाही. ज्यांना बीओटी तत्वावर काम दिले जाते ते कंत्राटदारांना काम देतात आणि मोकळे होतात. त्यामुळे हे कंत्राटदार करोडपती होत आहेत. मुंबईतील फियाट कंपनी बंद झाली आहे, हिंदुस्थान कंपनीची वाट लागली. या कंपनीत असलेले कंत्राटदार करोडपती झाले. या कंत्राटदारांचा सरकारमध्ये असलेल्या लोकांना गराडा पडलेला आहे. त्यामुळे बीओटी तत्वाचा राज्याला जो कलंक लागला आहे तो पुसल्याशिवाय महाराष्ट्र सरकारचे एक रुपयाचेही कर्ज कमी होणार नाही. हे सांगण्यासाठी कोणाही तज्ज्ञाचे मत मागविण्याची गरज नाही.

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

यानंतर श्री.शिगम.....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यासाठी तुम्हाला तज्ज्ञांची गरज लागणार नाही. सरकारच्या पैशातून मोठ्या झालेल्या व्यक्ती ह्या राज्याला मोठे करु शकत नाहीत. आपल्या पैशातून माणसे मोठी झालेली आहेत.

सभापती महोदय, तीर्थक्षेत्रांचा विकास व्हायला हवा असेच मी म्हणेन. पण तीर्थक्षेत्रांचा विकास करताना जसे मंत्र्यांची पदे भरताना सांगलीला एक, बारामतीला एक, उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र असे प्राधान्य दिले जाते त्या प्रमाणे तुम्ही कोकणाला दोन-दोन कोटी आणि दुस-या देवस्थानाला 5, 10 किंवा 300 कोटी दिलेत. तर मग आपापसातील भांडणे तुम्ही देवापर्यन्त कशाला नेलीत ? आज तुम्ही ज्या पध्दतीने देताय त्याच पध्दतीने द्या. भराडी देवीला जाणा-या यात्रेकरुंची संख्या एवढी जास्त असूनही त्यासाठी फक्त दोन कोटी दिलेले आहेत...(अडथळा)...मागे किती दिले गेले हे मी दाखवू शकेन. परंतु तुम्ही जे दिलेत ते देताना भेदभाव का केलात ?कापूर, गंध, अगरबत्ती या सर्व वस्तू करमुक्त केलेल्या आहेत. ज्या भावनेने आपण तीर्थक्षेत्रांसाठी निधीचे वाटप केलेले आहे, ज्या पध्दतीने धूप, कापूर अगरबत्ती यांना करमुक्त केलेले आहे त्यावरुन असे वाटत आहे की, सरकारने मागच्या 10 वर्षात ज्या काही चुका केलेल्या आहेत त्यांचे क्षालन होण्यासाठी हे सरकार देवभक्तीला लागलेले आहे. आमच्या मालवणीमध्ये अशी म्हण आहे की, "करुन करुन भागलो आणि देवपूजेक लागलो." अशा प्रकारे सरकार वागत नाही ना, असा एक विचार मनात येतो.

सभापती महोदय, मी संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनातील हुतात्म्याविषयी बोलणार आहे. महाराष्ट्र राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात माननीय अर्थमंत्र्यांना महाराष्ट्र आंदोलनातील 106 शहिदांचा विसर पडला ही अत्यंत दुर्दैवाची गोष्ट आहे. 106 हुतात्म्यांमुळे महाराष्ट्र राज्य स्थापन झाले. मी आमदार झालो आणि बाकीचे मंत्री झाले. ह्याची खरी पुण्याई कोणाची असेल तर ती 106 हुतात्म्यांची आहे. त्यांना विसरुन चालणार नाही. सुवर्ण महोत्सवी वर्ष आता लवकर संपेल. या वर्षात सरकारने काय केले ? 1987 साली शंकरराव चव्हाण राज्याचे मुख्यमंत्री असताना त्यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनातील 106 हुतात्यांना स्वातंत्र्य सैनिकांचा दर्जा दिला. हा दर्जा दिल्यानंतर या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये आपण त्यांना 5 लाखापर्यन्त मदत करावी अशी मागणी मी मागील अधिवेशनामध्ये देखील केली होती. या आंदोलनातील एक सत्याग्रही हुतात्मा सिताराम

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. किरण पावसकर...

घाडीगावकर यांचे ज्येष्ठ बंधू दत्ता घाडीगावकर यांची अशी मागणी आहे की, 106 हुतात्म्यांचा नामोल्लेख असलेले एक राजपत्र प्रसिध्द करावे. घाडीगावकर हे अविवाहीत होते.दत्ता घाडीगावकर हे पालनकर्ते होते. आज दत्ता घाडीगावकर हे वृद्ध आहेत. त्यांना आणि इतर हुतात्म्यांच्या कुटुंबियांना सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त दोन ते तीन लाख रु.चे खास अनुदान देण्यात यावे अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, केन्द्र सरकारकडून आलेला निधी पडून राहिलेला आहे. त्याकडे मी सरकारचे लक्ष वेधू इच्छितो. महाराष्ट्र सरकारकडे निधीची कमतरता आहे. अशा वेळी ओबीसी विद्यार्थ्यांसाठीचे 1200 कोटी, शालेय पोषण आहाराचे 288 कोटी, सायका योजनेचे 700 कोटी असा केन्द्र सरकारकडून आलेला निधी पडून आहे. या विषयी अर्थसंकल्पामध्ये कोणतीही मॅचिंग तरतूद केलेली नाही. बेरोजगारांची मोठी फौज होत चालली आहे. नवीन कारखाने येण्याचे बंद आहेत. राज्यात असलेले कारखानेही बंद झालेले आहेत. या संदर्भात सरकारला चांगल्या मनाने उपाययोजना करावयाची असेल, महाराष्ट्र कर्जमुक्त करण्याची सरकारची मानसिकता असेल तर सर्वप्रथम आपल्याला राज्य भ्रष्टाचार मुक्त करावा लागेल. राज्यात भ्रष्टाचार कसा होतोय याचे मी आपणास एक उदाहरण देतो. सार्वजनिक बांधकाम विभागाने असे दाखविलेले आहे की, मुंबई उच्च न्यायालयाच्या इमारतीसाठी 1600 कोटी रु. खर्च झालेला आहे. ही इमारत 1837 सालामध्ये 44 लाखामध्ये बांधली गेली. आता मागील 5 वर्षामध्ये या इमारतीवर 1600 कोटी रुपये खर्च झालेला आहे. वरळी-वांद्रे हा सागरी पूल बांधण्यासाठी सुध्दा 1600 कोटी रु. लागलेले आहेत. 5 वर्षामध्ये मुंबई उच्च न्यायालयाच्या इमारतीसाठी एवढा खर्च दाखविला जात असेल तर मग उच्च न्यायालयाने न्याय मागण्यासाठी कोणत्या न्यायालयात जावे हा देखील एक प्रश्नच आहे.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर.....

आपण भ्रष्टाचाराच्या गोष्टी करीत असतो. या राज्यामध्ये सुनील जोशी किंवा पोस्टमास्टर जनरल यांच्यासारखे भ्रष्टाचारी निघाले, त्यांची प्रॉपर्टी मोजण्यासाठी दोन दोन दिवस लागले. भ्रष्टाचाराने पोखरलेल्या महाराष्ट्राला जर आपण त्यापासून थांबविले नाही तर महाराष्ट्रावरचे कर्ज कमी होणार नाही. आज असलेले 2 लाख कोटी रुपयांचे कर्ज 4 लाख कोटी रुपयांवर जाईल आणि आपण मात्र त्यावर चर्चा करीत बसू. विकासासाठी ठोस धोरण आखावयाचे असेल तर समुद्रमार्गे होणाऱ्या कार्गो आणि प्रवासी वाहतुकीसाठी विचार झाला पाहिजे. यासाठी जास्त खर्च येणार नाही. गुजराथ राज्यात जो कार्गो येतो त्या तुलनेत 20 टक्के कार्गो समुद्रमार्गे आपल्या राज्यात जात नाही. गुजराथ राज्याने जेटी बांधल्या, मुंद्रा पोर्ट उभारले. परंतु आपला कार्गो 20 टक्के सुध्दा जात नाही. निसर्गाने उपलब्ध करुन दिलेली जी समुद्र व्यवस्था आहे तिचा वापर सरकार करु शकते.

सभापती महोदय, मुंबईच्या विकासाबद्दल बोलत असताना फक्त एफएसआयमध्ये सरकार गुंतले आहे हेच प्रकर्षाने जाणवते. मागील वेळी मी या मुद्याबाबत बोललो होतो. डीसी रुल्सच्या कलम 33(7) अंतर्गत इमारतींची पुनर्बांधणी व कलम 33(24) अंतर्गत वाहनतळाची व्यवस्था करण्यात येते. त्यामध्ये खूप मोठा भ्रष्टाचार होत आहे. सरकारवर पाकिस्तानमधील अतिरेक्यांकडून होणारा मारा, एकीकडून आयएसआय आणि एफएसआयचा मारा होत आहे. सरकारला आयएसआय आणि एफएसआयच्या माऱ्यापासून वाचविले तर यापुढे चांगला अर्थसंकल्प मांडला जाऊ शकेल आणि ध्येयधोरणांसाठी, मिडियाला, तज्ज्ञांना चांगला अर्थसंकल्प मांडल्याचे पहावयास मिळेल.

सभापती महोदय, गतवर्षी दिलेल्या अनेक आश्वासनांची पूर्तता झालेली नाही. 3.25 लाख बेरोजगारांना नोकरी मिळालेली नाही. जिल्हा योजनेमध्ये 500 कोटी रुपयांची वाढ होणार होती, ती वाढ झालेली दिसून येत नाही. नक्षलग्रस्त भागासाठी 1386 कोटी रुपयांचा कृती आराखडा बनविला जाणार होता, तो आराखडा अद्याप बनलेला नाही. 136 कोटी रुपये ऊर्जा क्षेत्राच्या पायाभूत सुविधांसाठी दिले जाणार असे सांगितले होते, तो निधी अद्याप दिलेला नाही. रस्ते व पूल यासाठी 2451 कोटी रुपये देऊ असे सांगितले होते, तो निधी दिल्याचे दिसून येत नाही. मागील अर्थसंकल्पात आश्वासित केलेल्या योजनांसाठी एक रुपया सुध्दा मिळाला नसेल तर या

..3..

श्री.किरण पावसकर.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अर्थसंकल्पात मांडलेल्या योजना राबविण्यासाठी कदाचित पुढची पाच वर्षे खर्ची पडतील. मी याठिकाणी ज्या काही सूचना केल्या व मागण्या केल्या आहेत त्या मंत्रीमहोदय मान्य करतील अशी अपेक्षा करतो आणि माझे संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र!

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: विनियोजन (लेखानुदान) विधेयक

मु.शी.: **L.A.BILL No.XXVIII OF 2010.**

(A BILL TO PROVIDE FOR THE WITHDRAWAL OF CERTAIN SUMS FROM AND OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE FOR THE SERVICES OF A PART OF THE FINANCIAL YEAR 2010-2011.)

श्री.विजय वडेट्टीवार (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2010 चे वि.स.वि.क्रमांक 28 राज्याच्या एकत्रित निधीतून 2010-2011 या वित्तीय वर्षाच्या काही भागांतील कामांकरिता विवक्षित रकमा काढून घेण्यासाठी तरतूद करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असताना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधान परिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

(खंड 2 ते 3, अनुसूची, खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

उपसभापती : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

नंतर 3आर.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: अर्थसवंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

मु.शी.: सन 2010-2011 च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

(चर्चा पुढे सुरु ....

श्री. जैनुद्दीन जव्हेरी (वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : महोदय, सन 2010-11 च्या अर्थसंकल्पावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.....

उपसभापती : सन्माननीय सदस्यांनी कृपया थांबावे. प्रथम मला वेळेचे नियोजन कसे करता येईल यासाठी सभागृहाचा कौल घ्यावयाचा आहे. सभागृहात अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा सुरु आहे. अजून बऱ्याच सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे. तसेच आज अर्थसंकल्पावरील चर्चेचा दुसरा व शेवटचा दिवस असल्याने माननीय मंत्री महोदयांचे उत्तर देखील आजच होणार आहे. अशा परिस्थितीत सभागृहानेच निर्णय घ्यावयाचा आहे.

(काही सन्माननीय सदस्य बोलण्याची परवानगी मागत असतात.)

उपसभापती : सभागृहात चर्चा करीत असताना विरोधी पक्षासाठी जेवढा वेळ दिलेला होता त्यापेक्षा त्यांनी कमी वेळ घेतल्याचे माझ्याकडे असलेल्या रेकॉर्डवरुन समजते. तसेच सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी देखील मागणी केलेली आहे, अशा परिस्थितीत ही चर्चा लवकर संपण्याची चिन्हे नाहीत.

श्री. दिवाकर रावते : महोदय, सभागृहात कामकाजाची वेळ वाढवून मिळावी अशी मागणी मी कामकाज सल्लागार समितीमध्ये केली होती. पण शासनाची अगतिकता अशी आहे की, 25 तारखेला अर्थसंकल्प सदनाला सादर केला आणि तो 31 तारखेच्या आत पास झाला पाहिजे. अशा परिस्थितीत सत्ताधारी पक्षाकडून तरी आवरते घेणे आवश्यक असते. कारण माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर जे मुद्दे मांडले जातात त्याचीच पुनरावृत्ती अर्थसंकल्पावरील चर्चेमध्ये होत असते. अशा परिस्थितीत विरोधी पक्ष शासनाची परिस्थिती समजून घेतो मग सत्ताधारी पक्षाने ती समजून घेणे आवश्यक आहे.

श्री. सुनील तटकरे : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जैनुद्दीन जव्हेरी यांचे भाषण संपल्यानंतर दोन्ही बाजूकडिल सन्माननीय सदस्यांची इच्छा असेल तर मी उत्तराला सुरुवात करतो.

....2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : महोदय, मी आपला अत्यंत आभारी आहे. कारण अखंड महाराष्ट्राच्या बजेटवर बोलण्याची संधी आपण मला दिली. महाराष्ट्र शासनाने सन 2010-11 चा अर्थसंकल्प मांडला त्याबाबत मी शासनाचे समर्थन करण्यासाठी उभा आहे. शासनाने हा अर्थसंकल्प अखंड महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी सादर केला तो स्वागतायोग्य आहे. पण काही अर्थतज्ज्ञ, मिडिया तसेच पत्रकार टीका करीत आहेत की, हा अर्थसंकल्प काही नेते मंडळी तसेच काही जिल्ह्यांपुरताच मर्यादित आहे. माझ्या मते ही गोष्ट खरी नाही. अनेक आमदार, वैदर्भीय जनता, विदर्भाचा बॅकलॉग असून या विदर्भाला मात्र या बजेटमध्ये काही खास तरतूद नाही असे म्हणतात, पण ते खरे नाही. विदर्भातील संपूर्ण बॅकलॉग दूर झाला असे विदर्भातील मंत्री महोदयांनी सांगितले. मंत्र्यांनी म्हटले म्हणजे खरेच आहे. तसेच अनेक ज्येष्ठ सदस्य म्हणतात विदर्भाला खूप पैसे दिले आहेत. विदर्भातील शेतकरी आत्महत्त्या करीत नाहीत. सिंचन क्षमता पूर्ण झाली आहे. विदर्भातील बेकारी ही आता समस्य नाही. विदर्भात सर्वात जास्त वीज उत्पन्न होते.....

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जैनुद्दीन जव्हेरी .....

विदर्भात सर्वात जास्त वीज तयार होते पण तिथे लोडशेडींग नाही, विदर्भात अनेक उद्योग आहेत पण तेथे पोल्यूशन नाही, विदर्भातील काही जिल्हे नक्षलग्रस्त होते परंतु आता तिथे नक्षली समस्या राहिली नाही, विदर्भात दुष्काळ नाही, विदर्भातील तीर्थस्थानामुळे व पर्यटनामुळे मुबलक पैसा मिळाला याबाबत काही शंका नाही, विदर्भाबाबत काही म्हणावे ते बरोबर नाही, विदर्भासाठी अनेक पॅकेज दिले, त्यातील पूर्ण पैसे मिळाले, सर्व कामे झाली यात काही शंका नाही. हे वर्ष अखंड महाराष्ट्राचे सुवर्णमहोत्सवी वर्ष असल्यामुळे महाराष्ट्र शासनाची ही अपेक्षा आहे की, अर्थसंकल्पाचा फायदा व त्यामधील योजना सर्व जिल्हयातील गरिबांच्या हितासाठी आणि विकासासाठी आहेत. काही अर्थ तज्ञ काही बोलत असले तर त्यांना बोलू द्या, वेळ पडली तर शासन विदर्भाचा विकास झाला म्हणून श्वेत पत्रिका काढण्यास मागे पुढे पाहणार नाही अशी माझी अपेक्षा आहे. अखंड महाराष्ट्राचा विकास आणि बजेटचे स्वागत करतो व मला आपण बोलण्यास संधी दिल्याबद्दल मी आपले आभार व्यक्त करुन माझे दोन शब्द संपवितो.

जय बजेट, जय विदर्भ.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे (अर्थमंत्री) :सन्माननीय सभापती महोदय, सन 2010-11 च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये शिवसेनेचे गटनेते श्री. दिवाकर रावते, विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर, सर्वश्री जयंत पाटील, गुरुनाथ कुलकर्णी, हेमंत टकले, अरुण गुजराथी, रामदास कदम, डॉ. नीलम गो-हे, श्रीमती मंदाताई म्हात्रे, वंदनाताई चव्हाण, श्री. किरण पावसकर, जैनुद्दीन जव्हेरी, राजन तेली आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी या चर्चेत भाग घेतला.

सन 2010-11 चा अर्थसंकल्प सादर केल्यानंतर वेगवेगळया प्रतिक्रिया या माध्यमातून व्यक्त केलेल्या आहेत. विशेष करुन पर्यटनाच्या क्षेत्रामध्ये, तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी राज्य सरकारने भरीव तरतूद केलेली आहे. यासंदर्भात सन्माननीय सदस्यांनी काही भावना व्यक्त केलेल्या आहेत. मला आपल्या मार्फत एवढेच सांगावयाचे आहे की, तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी तरतूद करीत असतांना कुठलाही अजेंडा नजरेसमोर ठेवून आम्ही तीर्थक्षेत्र विकासासाठी तरतूद केलेली नाही. कापूर, धूप यावर करमाफी देत असतांना काही सन्माननीय सदस्यांनी टीकाटिप्पणी झाली. तीर्थक्षेत्राच्या संदर्भात बोलत असतांना मी आताच विधानसभेत उत्तर दिले आहे. महाराष्ट्रातील सांस्कृतिक जडणघडण, आध्यात्मिक विचारांची जोड अनादी काळापासून या महाराष्ट्राला मिळालेली आहे. या महाराष्ट्राच्या तीर्थस्थळासाठी काही भरीव तरतूद करण्याचे राज्यशासनाने ठरविले. महाराष्ट्रातीलच नव्हेतर देशाच्या कानाकोप-यातील अनेक भाविक या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी येत असतात, नतमस्तक होतात. भाविक तीर्थस्थळाला येवून नतमस्तक होत असतांना त्यांच्या जीवनात एक त-हेचे समाधान निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. या ठिकाणी काही सन्माननीय सदस्यांनी टीका टिप्पणी करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केलेला आहे. मी नम्रपणे एवढेच सांगू इच्छितो की, अशा तीर्थक्षेत्रांचा विकास करीत असतांना निवडणुकीच्या माध्यमातून अशा प्रकारची भूमिका कधीच स्वीकारलेली नाही.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे.....

वादग्रस्त विषय निर्माण करुन त्या निमित्ताने भारतातील आणि राज्यातील जनतेला आकर्षित करण्याचा प्रयत्न देखील राज्य सरकारने कधी केला नाही. 90 च्या दशकात राज्यात आणि देशात जे काही राजकारण झाले होते ते आपण सर्वानी पाहिले आहे. अर्थसंकल्पात कापूर आणि धूपाला कर सवलत दिली गेली परंतु त्यावर देखील टीका करण्यात आली होती.खालच्या सभागृहात उत्तर देत असतांना मी असे सांगितले की, महाआरतीच्या नावाखाली महाराष्ट्रामध्ये ठीक ठिकाणी एक प्रकारचा विद्वेष निर्माण करण्याचा प्रयत्न त्या कालखंडात करण्यात आला होता. आरती करीत असतांना लागणा-या कापूर आणि धूपावर राज्य शासनाने करमाफी दिली असेल तर त्याबाबत एवढी टीका टिप्पणी करणे योग्य आहे असे मला वाटत नाही. प्रभू रामचंद्राला वनवासात पाठविण्याची भूमिका त्या कालखंडात जरुर स्वीकारली होती . महाराष्ट्राचे अराध्य दैवत असलेल्या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी अशा प्रकारची भरीव तरतूद करुन त्या ठिकाणी येणा-या भाविकांना सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न या अर्थसंकल्पात करण्यात आला आहे. त्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद करीत असतांना काही महसूली तुट जरुर आहे. ही तूट भरुन काढण्याचा प्रयत्न देखील शासनाच्या माध्यमातून प्रयत्न केला जाईल. सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशी राज्य सरकारने स्वीकारल्या होत्या व त्यावेळी महसुली जमा आणि खर्च यामध्ये तफावत निर्माण

झाल्यानंतर ही तफावत दूर करण्यासाठी काही कालावधी जावा लागणार आहे. केन्द्र सरकारमध्ये देखील अनेक वेळा तुटीचा अर्थसंकल्प सादर केला होता. राज्य सरकारपुढे देखील अशा प्रकारची परिस्थिती निर्माण झाल्यानंतर एकंदर राजकोषिय स्थिती विचारात घेता काही वेळा अर्थसंकल्पात तूट दर्शवत विकासाची कामे शीघ्रगतीने प्रयत्न करणेसुध्दा आवश्यक असते. आज देखील सिंचनाच्या क्षेत्रात भरीव तरतूद करण्याचा प्रयत्न राज्य सरकारने केला आहे. राज्यातील .सिंचनाचे क्षेत्र वाढावे यासाठी ही तरतूद करण्यात आलेली आहे. राज्यामध्ये 50 वर्षापूर्वी कृषी औद्योगिक रचनेचा पाया अत्यंत योग्य पध्दतीने रचला गेला होता , कृषी क्षेत्र तसेच कृषी औद्योगिक व्यवस्था, कृषी अर्थव्यवस्था जर आपण पाहिली तर आज देखील ग्रामीण भागामध्ये ती मजबूत पायावर उभी आहे असेच आपल्याला दिसून येईल. सन्माननीय श्री.शरद पवार केन्द्रीय कृषी मंत्री

झाल्यानंतर शेतक-याच्या शेती मालाला सर्वात जास्त दर दिला. गेल्या चार पाच वर्षापासून गहू,

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे.....

तांदूळ इत्यादीचे दर जर आपण पाहिले तर देशाच्या आणि राज्याच्या कृषी मालाच्या दरात मोठया प्रमाणावर वाढ झाल्याचे आपल्याला निश्चितपणे दिसून येईल. 450 रुपये क्विंटल दराचा भात आज एक हजार रुपये क्विंटलपर्यंत जाऊन पोहोचला आहे.गव्हाचे विक्रमी उत्पादन करणा-या शेतक-याच्या दृष्टीकोनातूनसुध्दा योग्य पध्दतीचे निर्णय घेण्यात आले आहेत. महाराष्ट्राच्या पुरोगामी शासनाने शेतक-यांवरील कर्ज माफ करण्याचा निर्णय घेतला होता. 1978 साली मुख्यमंत्री असतांना श्री.शरद पवार यांनी शेतक-यांवरील कर्ज माफ केले होते त्यानंतर 1980 साली सुध्दा शेतकऱ्यावरील कर्ज माफ केले होते. आपला देश कृषी प्रधान असून आपली अर्थव्यवस्थां कृषी प्रधान आहे. देशातील 60 ते 65 लोकांचे उत्पन्न कृषीवर अवलंबून असल्यामुळे देशातील शेतक-यांवरील कर्ज माफ करण्याचा निर्णय अत्यंत क्रांतिकारक आहे.राज्य सरकारने सुध्दा महाराष्ट्रातील उर्वरित शेतक-यांना न्याय देण्याच्या दृष्टीकोनातून त्यांच्यावरील कर्ज माफ करण्याचे धोरण स्वीकारले होते. अर्थसंकल्पाच्या भाषणात मी असे सांगितले होते की,"जी कर्जमाफीची योजना जाहीर करण्यात आली होती तिला सहा महिन्याची मुदतवाढ देण्यात येईल." राज्यातील शेतक-यांना 25 हजार रुपयांपर्यंत बिन व्याजी कर्ज उपलब्ध करुन देत असतांना ही मर्यादा 50 हजार रुपयापर्यंत वाढवून देण्याचा क्रांतिकारक निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. महाराष्ट्रातील शेतक-यांना न्याय देण्याच्या दृष्टीकोनातूनच हा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. हे मी आपल्याला सांगू इच्छितो. शेतक-याना बी बियाण्यांचे वाटप करण्यासंबंधी वा अनुदानावर सुधारित अवजारांचे वाटप करण्यासंबंधी शासाने चांगले निर्णय घेतलेले आहेत. कृषी पत धोरणं् राज्य सरकारने अत्यत योग्य पध्दतीने स्वीकारलेले आहे.कृषी क्षेत्रात अमुलाग्र बदल या निमित्ताने होत असतांना ठिबक पध्दतीच्या सिंचनासाठी शेतक-यांना 50 टक्के अनुदान दिले जात होते त्यातील 40 टक्के केन्द्र सरकारकडून दिले जात होते परतु आता केन्द्र सरकारने असे घोषित केले आहे की या वर्षापासून 50 टक्के अनुदान देण्यात येईल.राज्य सरकार दहा टक्के अनुदान देत होते त्यामध्ये देखील वाढ करण्याचा निर्णय राज्य सरकाराकडून निश्चितपणे घेतला जाईल आणि सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या निमित्ताने ग्रामीण अर्थव्यवस्थेला एक प्रकारची ताकद देण्याच्या दृष्टीकोनातून प्रयत्न केले जातील. ग्रामीण भागातील शेतकरी असो शेतमजूर असो वा अन्य कोणी

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे.....

असो त्याला न्याय देण्याच्या दृष्टीकोनातून काही पावले उचलण्याचा राज्य सरकार निश्चितपणे प्रयत्न करत आहे.

सभापती महोदय, उद्योग क्षेत्राच्या बाबतीत देखील राज्याने नेत्रदीपक प्रगती केली आहे. रिझर्व्ह बॅकेने नुकताच जो अहवाल प्रसिध्द केला होता त्यात असे म्हटलेले आहे की,महाराष्ट्रामध्ये जवळपास 14 टक्क्याच्या आसपास गुंतवणूक झालेली आहे. गुजराथ हे दोन नंबरचे राज्य आहे त्या ठिकाणी 14 टक्क्याच्या जवळपास गुंतवणूक झालेली आहे. गेल्या आठ दहा वर्षात औद्योगिक क्षेत्रात प्रचंड प्रमाणावर गुंतवणूक झालेली आहे. लोकशाही आघाडीचे सरकार तिस-यांदा सत्तेवर आलेले आहे. गेल्या दहा वर्षात लोकाभिमुख काम करण्याची भूमिका राज्य सरकारने प्रामाणिकपणे स्वीकारल्यानंतर महाराष्ट्रातील दहा कोटी जनतेने पुन्हा आम्हाला सत्तेवर काम करण्याची संधी त्या निमित्ताने दिली आहे.....

नंतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे...

हे करीत असतांना महाराष्ट्राच्या औद्योगिक धोरणाला वेगळया प्रकारची चालना देण्याचे धोरण राज्य सरकारने स्वीकारले. गेल्या अनेक वर्षापासून औद्योगिक धोरण स्वीकारले जात असतांना महाराष्ट्रातील भागामध्ये उद्योगधंदे कसे निर्माण होतील यासाठी प्रयत्न झाले. आणि म्हणून विदर्भाच्या परिसरामध्ये असेल, मराठवाडयाच्या परिसरामध्ये असेल, नाशिकच्या परिसरामध्ये असेल, पुण्याच्या परिसरामध्ये असेल, मुंबई-ठाणे ही औद्योगिक नगरी म्हणून गेल्या अनेक वर्षापासून, स्वातंत्र्यपूर्व काळापासून प्रसिध्द आहे. परंतु या नंतरच्या काळात प्रचंड प्रमाणात औद्योगिक गुंतवणूक करण्याच्या दृष्टीकोनातून राज्य सरकारने सकारात्मक पावले उचलली. रोजगाराचे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीकोनातून प्रयत्न झाले. यामध्ये काही जणांना प्रत्यक्ष तर काही जणांना अप्रत्यक्षपणे रोजगार मिळाला. उद्योगधंदे वाढीला लागण्यासाठी यामध्ये छोटा किंवा मोठा व्यावसायिक असेल मग तो हॉटेलवाला किंवा पानवाला असेल, जो कुणी व्यवसाय करीत असेल त्या व्यावसायिकाला सुध्दा साधनसंपत्ती मिळण्याच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्राने पूरक औद्योगिक धोरण स्वीकारले. व त्या माध्यमातून औद्योगिकरणाला वेगळी चालना देण्याचे चित्र निर्माण झाल्याचे आपल्याला दिसते. अनेक वेळा असा प्रश्न विचारला जातो की, एवढे मोठे औद्योगिक धोरण आपण जाहीर करता, त्यासाठी लागणारी वीज तुमच्या राज्यामध्ये आहे काय? ही गोष्ट खरी आहे की, राज्यामध्ये विजेचा तुटवडा आहे, म्हणून गेल्या दहा वर्षात या राज्य सरकारने काही पावले उचलली आहेत. याबाबत मी पूर्वीच्या तपशिलामध्ये जाऊ इच्छित नाही. कोणत्या कालावधीमध्ये वीजेच्या तुटवडयामुळे भारनियमनाचा प्रश्न निर्माण झाला? याबाबत राजकीय प्रश्न या ठिकाणी उपस्थित करुन मला सभागृहाचा वेळ घ्यावयाचा नाही. त्यामुळे गेल्या काही वर्षापासून वीजेच्या क्षेत्रामध्ये अधिक वीज निर्माण करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात आला. सन 2009-10 या आर्थिक वर्षामध्ये जवळपास 1500 मेगावॅट क्षमतेचे उत्पादन करण्यामध्ये आपण यशस्वी होऊ शकलो आहोत. आणि या वर्षी सुध्दा वीज निर्मिती करण्याच्या बाबतीत याच पध्दतीने नियोजन करण्याचे आपण ठरविले आहे. यावर्षी सुध्दा किमान 1 हजार मेगावॅट क्षमतेचे वीजेचे उत्पादन आपल्याला करता येऊ शकेल. सन 2011 सालामध्ये सुध्दा वीजेचे उत्पादन करण्याच्या दृष्टीने योग्य पध्दतीचे नियोजन केले आहे. राज्याच्या अर्थसंकल्पामध्ये वीज निर्मितीकरिता 20 टक्के भागभांडवल आपल्याला उपलब्ध करुन द्यावयाचे आहे त्याबाबत पुरेशी तरतूद उपलब्ध करण्याचे काम आपण हातामध्ये घेतले आहे. आणि म्हणून या राज्याचा अर्थमत्री म्हणून राज्यातील 10 कोटी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे....

जनतेला या सर्वोच्च सभागृहाच्या माध्यमातून नम्रपणे सांगू इच्छितो की, सन 2012 सालापर्यंत हे राज्य निश्चितपणे वीज भारनियमन मुक्त होईल. हे राज्य भारनियमन मुक्त करीत असतांना येत्या तीन-चार वर्षामध्ये या राज्यात कोणत्याही प्रकारे वीजेचा तुटवडा निर्माण होणार नाही याची खबरदारी घेण्याचा आपण प्रयत्न केला. हे राज्य आपल्याला प्रगतीच्या मार्गावर न्यावयाचे असेल तर सर्वदूर क्षेत्रामध्ये आपली होत असलेली वाटचाल, सर्व क्षेत्रातील योजनांसाठी चांगल्या प्रकारे निधीची उपलब्धता करुन देणे आमचे कर्तव्य राहणार आहे. राज्यामध्ये जलसिंचनाचा साठा वाढीला लागला पाहिजे म्हणून आपण आज मोठया प्रमाणावर तरतूद केली आहे. एका विशिष्ट खात्यासाठी वाढीव तरतूद केली जाते, अशी वर्तमानपत्रामधून टीका केली जाते. त्या खात्याचे माननीय मंत्री हे माझे नेते जरुर आहेत. परंतु त्या खात्याच्या माध्यमातून महाराष्ट्रातील जलसिंचनाचा साठा मोठया प्रमाणावर कशापध्दतीने वाढीला लागेल हा दृष्टीकोन नजरेसमोर ठेवून काही योजना स्वीकारल्या आहेत. सभापती महोदय, यासदंर्भात माननीय राज्यपाल महोदयांनी दिलेल्या निदेशाच्या अनुषंगाने आम्ही या निधीचे वाटप योग्य प्रमाणात करण्याचा प्रयत्न करीत आहोत. आणि म्हणून हा आर्थिक अनुशेष संपुष्टात आणण्याच्या दृष्टीकोनातून राज्य सरकार निश्चितपणे यशस्वी होईल. आज आपण विदर्भासाठी 3200 कोटी रुपयांची तरतूद केली आहे, गोदावरी सिंचन विकास महामंडळासाठी आवश्यक असणारी तरतूद उपलब्ध करुन देण्यात आली. माननीय राज्यपाल महोदयांनी दिलेल्या निदेशानुसार तापी सिंचन विकास महामंडळासाठी आवश्यक असणारा निधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने पावले उचलण्यात आली आहेत. सभापती महोदय, कृष्णा खोरे सिंचन महामंडळाच्या माध्यमातून कृषी क्षेत्रामध्ये होणारा बदल स्वीकारला गेला. त्या परिसरातील वेगवेगळया योजनांना निधी उपलब्ध करुन देण्याची तरतूद निश्चितपणे करण्याचे धोरण आपण स्वीकारले आहे.

सभापती महोदय, सर्व शिक्षा अभियानाच्या माध्यमातून वेगवेगळया स्वरुपाचे काम हातामध्ये घेतले जात असतांना त्याला आवश्यक असणारी पुरेशी तरतूद आपण केली आहे. त्याचप्रमाणे 13 व्या वित्त आयोगाच्या शिफारशी स्वीकारल्यानंतर केंद्र सरकारकडून आपल्याला भरपूर निधीचा वाटा मिळणार आहे. एका बाजूला हा निधी मिळत असतांना आणि दुसऱ्या बाजूला केंद्र सरकारच्या विविध योजनांशी सांगड घालीत असतांना त्यासाठी आवश्यक असणारी तरतूद अर्थसंकल्पामध्ये करण्याची भूमिका राज्य सरकारने स्वीकारली आहे. सभापती महोदय, इंदिरा आवास घरकुलांची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे...

योजना राबवीत असतांना सामान्यातील सामान्य माणसाला, दारिद्रय रेषेखालील माणसाला अन्न, वस्त्र व निवारा या त्यांच्या मूलभूत गरजा आहेत असे आपण स्वातंत्र्यपूर्व काळापासून मानत आलो आहोत. ग्रामीण भागात, खेडयात राहणारा आमचा गरीब बांधव असेल, मुंबईच्या झोपडपट्टयांमध्ये राहणारा गरीब बांधव असेल त्याला स्वत:चे हक्काचे घर मिळण्याकरिता 70 हजार रुपयांची मर्यादा घालीत असतांना त्यामध्ये राज्य सरकारने स्वत:वर फार मोठा भार घेतला आहे. याबाबत दिल्ली येथे अर्थमंत्र्यांच्या झालेल्या परिषदेमध्ये मी माननीय केंद्रीय अर्थमंत्र्यांना विनंती केली.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

केंद्र शासनाचा सहभाग प्रत्येक घरकुलांमागे 27 हजार रुपयांचा आहे. राज्य शासनाने हे अनुदान 70 हजार रुपयांपर्यंत नेले आहे. त्यातील काही हिस्सा केंद्र शासनाने उचलावा अशी विनंती केली होती. मला केंद्रीय अर्थमंत्री माननीय श्री.प्रणव मुखर्जी यांचे मनापासून आभार मानावयाचे आहेत कारण त्यांनी जवळपास 12 हजारापर्यंत अतिरिक्त तरतूद वाढविली आणि राज्य शासनाने घेतलेल्या क्रांतिकारी निर्णयामध्ये केंद्र शासन सुध्दा कुठेतरी सहभागी होत आहे, अशा प्रकारची भावना देशभरामध्ये निर्माण करण्याच्या दृष्टीने सुध्दा एक प्रयत्न झाला. इंदिरा आवास योजना आणि राजीव गांधी आवास योजना यांच्या अंतर्गत सुध्दा घरकुलांचा कार्यक्रम क्रांतीकारी पध्दतीने राबविला जाईल. ग्रामीण भागातील जे अल्प-भूधारक असतील, दारिद्र्यरेषेखालील सर्वसामान्य माणूस असेल मग तो कोणत्याही घटकातील असो, त्याला त्याचे घर उभे करण्यासाठी सुध्दा आम्ही आवश्यक तो निधी उपलब्ध करुन दिलेला आहे.

सभापती महोदय, मला सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेबांना नम्रपणे दुसरी गोष्ट सांगावयाची आहे की, आतापर्यंत जिल्हा वार्षिक आराखडा अडीच हजार कोटींचा होता. पण त्यात यावर्षी 54 कोटीची भरीव वाढ केली आहे. 3750 कोटी रुपयांचा आराखडा तयार करीत असताना प्रत्येक जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी मग ते कोणत्याही पक्षाचे असले तरी देखील ते लोकप्रतिनिधी आहेत. मग ते कदाचित महानगरपालिकेचे, नगरपालिकेचे किंवा जिल्हा परिषदेचे सदस्य असतील. त्यांना आपापल्या भागामध्ये नेमकी कोणती विकासाची कामे व्हावयास पाहिजेत, त्यासंदर्भातील त्यांच्या भावना काय आहेत? हे जाणून घेणे आवश्यक आहे.कारण प्रत्येक जिल्ह्याची भौगोलिक परिस्थिती वेगळी आहे. प्रत्येक जिल्ह्यातील गरजा वेगळया असू शकतात. अशा वेळी आपण या निमित्ताने फार मोठया प्रमाणात निधीची वाढ केली आहे. स्व.यशवंतराव चव्हाणसाहेबांनी 50 वर्षापूर्वी जिल्हा नियोजनाच्या घटकाबाबत काय करावे ते शिकविले आणि गेल्या 50 वर्षामध्ये त्यांचा निर्णय संपूर्ण देशभरामध्ये स्विकारला गेला. यावर्षी आपण महाराष्ट्र राज्याचे सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करीत असताना, आम्ही जिल्हा नियोजनाच्या माध्यमातून जवळपास 1250 कोटी रुपयांची भरीव तरतूद करुन प्रत्येक जिल्ह्याला फार मोठया प्रमाणात निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.रावतेसाहेब, मी एका गोष्टीची निश्चितपणे खबरदारी घेतलेली आहे.अनेक वेळा योजना राबविल्या जात असताना,त्यावर योग्य प्रमाणात खर्च होतो की नाही याचे मुल्यमापन

. . . .3 व्ही-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे . . . .

बऱ्याच वेळा केले जात नाही. याबाबत अनेक वेळा टिकाटिपणी होत असते. यासाठी सुध्दा आम्ही राज्यस्तरीय 26 कोटी रुपयांची तरतूद ठेवली आहे. जिल्हा स्तरावर नाविन्यपूर्ण योजना साडेचार टक्के घ्यावयाच्या आहेत. अशा वेळी त्या-त्या जिल्ह्याचा जो नियतव्यय असेल, त्यानुसार त्या जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधी साडेचार टक्क्याच्या योजना ठरवू शकतात.पण त्या जिल्ह्यांमध्ये देखील या योजना योग्य पध्दतीने राबविल्या गेल्या आहेत की नाही याबाबतीत अकाऊंटीबिलीटी असणे हे आमचे कर्तव्य आहे आणि ही भावना मनामध्ये ठेऊन त्याचे मुल्यमापन करण्यासाठी सुध्दा आम्ही जिल्हा पातळीवर निधी उपलब्ध केला आहे. राज्य स्तरावर 26 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध केला आहे. जेणेकरुन या प्रत्येक योजनांचे मुल्यमापन एका त्रयस्थ व्यवस्थेच्या मार्फत करता येईल आणि त्यामध्ये काही उणीवा राहिल्या असतील, दोष राहिले असतील तर ते दुरुस्त करता येतील. जनतेसाठी निर्माण केलेल्या प्रत्येक योजना या त्यांच्या घरापर्यंत, त्यांच्या दारापर्यंत, त्यांच्या वाडी पर्यंत योग्य प्रकारे पोहोचतात की नाही हे समजावे यासाठी आम्ही एक नाविन्यपूर्ण उपक्रम हातामध्ये घेतलेला आहे.मानव विकास निर्देशांक हा आपल्या राज्यातील चिंतेचा विषय आहे. राज्यातील दरडोई उत्पन्न 54 हजार, 55 हजार, 57 हजाराच्या आसपास आहे. अनेक वेळा टीका होते की, दरडोई उत्पन्नाबाबत विचार करीत असताना मुंबई, पुणे, नागपूर इ.शहरांमधील दरडोई उत्पन्न अधिक आहे.पण ग्रामीण भागातील जनतेचे दरडोई उत्पन्न कमी आहे.पण जेव्हा आपण राज्यातील सरासरी दरडोई उत्पन्न सांगत असतो, तेव्हा संपूर्ण राज्य नजरेसमोर ठेऊनच दरडोई उत्पन्नाची सरासरी सांगावी लागते. पण राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये दरडोई उत्पन्नाचे प्रमाण कमी आहे याची शासनाला निश्चितपणे जाणीव आहे. आम्ही गेल्या तीन वर्षापासून "मानव विकास मिशन"सुरु केले आहे. यासाठी दरवर्षी 60 ते 65 कोटी रुपयांची तदतूद केली होती आणि काही जिल्ह्यांमध्येच त्या-त्या कामांसाठी योजना राबविल्या होत्या.महाराष्ट्र राज्याचे हे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. अशा वेळी लोकांच्या समोर संयुक्त जाहीरनामा घेऊन जात असताना 2014 सालापर्यंत दरडोई उत्पन्न 1 लाखापर्यंत पोहोचेल असे अभिवचन आम्ही जनतेला दिले आहे आणि जनतेनेही ते मनापासून स्विकारले आहे म्हणूनच लोकशाही आघाडीचे पूर्ण बहुमतातील सरकार स्थानापन्न झाले आहे. अशा वेळी या कामांसाठी गेली तीन वर्षे 60-65 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला जात आहे. मात्र आम्ही यावर्षी 500 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिला आहे.तसेच...

. . . .3 व्ही-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे . . . .

सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेब मी आपल्याला सांगू इच्छितो की, आम्ही 172 जिल्ह्यां-मध्ये हे मिशन प्रभावीपणे राबविण्याची भूमिका घेतली आहे. त्या माध्यमातून वेगवेगळया योजना, त्यासाठी वेगवेगळे निकष ठरवत असताना त्या-त्या जिल्ह्यातील मानव विकास निर्देशांक अधिक कसा वाढेल यादृष्टीने आम्ही या वर्षापासून नवीन उपक्रम सुरु केलेला आहे.मी पहिल्या वर्षी अर्थसंकल्प मांडत असताना 500 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. अशा वेळी याची यशस्वीता तपासून दरवर्षी प्रत्येक तालुक्यात आम्ही मुल्यमापन करु आणि आवश्यकता वाटली तर दरवर्षी या निधीमध्ये देखील भरीव वाढ करण्यात येईल असे अभिवचन या सर्वोच्य सदनाच्या मार्फत मी महाराष्ट्रातील जनतेला देऊ इच्छितो. शेवटी राज्यातील विकास व्हावा, दरडोई उत्पन्न वाढावे एवढेच केवळ एक उद्दिष्ट आम्ही डोळ्यासमोर ठेवलेले नाही तर सामाजिक व्यवस्थेचेही आव्हान आहे अशा प्रकारची भूमिका मनामध्ये ठेवत या कामाकडे अधिक लक्ष केंद्रीत करण्याचा आम्ही प्रयत्न केलेला आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे...

कृषि असेल, औद्योगिकक्षेत्र असेल, सहकार क्षेत्र असेल शिक्षणाच्या क्षेत्रामध्येसुध्दा सर्वशिक्षा अभियानापासून राज्य सरकारच्या ज्या आवश्यक तरतुदी आहेत त्या उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला आहे. अंगणवाडीचा एक क्रांतीकारी, चांगला कार्यक्रम संबंध राज्यभरामध्ये शासनाने हाती घेतलेला आहे. केंद्र सरकारच्या तेराव्या वित्त आयोगाकडून जसा राज्य शासनाला निधी मिळणार आहे तसे नाबार्डकडे अर्थसहाय्य मागून जवळपास दर वर्षी 200 कोटी रुपये अधिक केंद्र सरकारडून मिळणाऱ्या वाटयातून जवळपास चारशे ते पाचशे कोटी रुपयाचे अंगणवाडयांचे बांधकाम दरवर्षी संबंध राज्यामध्ये हाती घेतले जाणार आहे. हे करीत असताना या अंगणवाडयांच्या बांधकामाचा टाईप प्लॅन तयार केलेला आहे. पूर्वी लाख ते सव्वा लाख रुपयात अंगणवाडी बांधली जायची आज 4 लाख 25 हजार रुपये खर्च करुन एका अंगणवाडीचे बांधकाम करण्यात येणार आहे. ज्या ठिकाणी लहान-लहान मुले शिकतात. वय वर्षे दोन ते चार वर्षाची मुले ज्यावेळी अंगणवाडीमध्ये जातात त्यावेळी त्यांच्यासाठी असणारी सगळी व्यवस्था जणूकाय प्राथमिक शाळेतील पहिल्या वर्गामध्ये मी गेलेलो आहे अशा प्रकारची भावना या निरागस बालकाच्या मनामध्ये त्या व्यवस्थेच्या मार्फत निर्माण करण्याच्या दृष्टिकोनातून चांगली तरतूद या निमित्ताने केलेली आहे.

सभापती महोदय, पूरक पोषण आहाराच्या बाबतीतसुध्दा केंद्र सरकारने निधी वाढवून दिलेला आहे त्यासाठी आवश्यक असणारा राज्य सरकारचा निधी देण्यात येत आहे. तसेच अंगणवाडयांच्या बांधकामाचा कार्यक्रम हातामध्ये घेऊन एक स्वागतार्ह पाऊल राज्य सरकारने उचललेले आहे.

सभापती महोदय, राज्याच्या वेगवेगळया भागाचा समतोल विकास साधन्याच्या दृष्टिकोनातून एका बाजूला प्रयत्न करत असताना तीर्थक्षेत्रांच्या बाबतीत जशी अधिक तरदूत करण्यात आलेली आहे तशाच पध्दतीने ज्या ज्या सत्पुरुषांनी या महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक व कलेच्या जडणघडणीमध्ये योगदान दिले आहे.त्यांची स्मारके त्या त्या ठिकाणी उभी करुन त्यातून एक वेगळा संदेश नवीन तरुण पिढीच्या मनामध्ये निर्माण करावा या दृष्टिकोनातून या निमित्ताने एक कार्यक्रम राज्य शासनाने हातामध्ये घेतलेला आहे. हे करीत असतांनाच मी मघाशी सभागृहामध्ये घोषित केल्याप्रमाणे आणखी काही स्मारके करण्यच्या दृष्टिकोनातून प्रयत्न निश्चितपणाने केला जाईल त्याबद्दल दुमत असण्याचे काही कारण नाही. आमचे सहकारी श्री. हेमंत टकले यांनी

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे...

याठिकाणी एक सूचना केली. त्यांनी माझ्याशी चर्चा केली की, विज्ञानाच्या क्षेत्रामध्ये प्रगती व्हावी म्हणून महाराष्ट्र राज्य विज्ञान परिषदे या संस्थेसाठी तरतूद करण्यात यावी. त्याप्रमाणे महाराष्ट्र राज्य विज्ञान परिषदेसाठी यावर्षी एक कोटी रुपयाची तरतूद करण्याचा प्रयत्न निश्चितपणाने केला जाईल्.

सभापती महोदय, अपंग, मतीमंद नाहीत पण काही गतीमंद बालके आहेत. या बालकांची संख्या सुध्दा वाढत आहे.या गतीमंद बालकांसाठी शिक्षणाचा एक वेगळा विभाग अपंग कल्याण कार्यालयामार्फत करुन त्यासाठी सुध्दा आवश्यक असणारी तरतूद उपलब्ध करण्याचा प्रयत्न या वर्षापासूनच निश्चितपणाने केला जाईल.

सभापती महोदय, याठिकाणी अनेक वेळा टीका झाली. सन्माननीय सदस्य श्री. तावडेसाहेब या ठिकाणी उपस्थित नाहीत ते माझे मित्र आहेत. श्री. पावसकरजी आपणही कोकणातील आहात. अंगणेवाडीच्या यात्रेला आपण सगळेजण जाता. कुणकेश्वरच्या दर्शनाला सुध्दा आपण सगळेजण जाता. पण तावडे साहेबांनी याबाबतीत टीका करावी याचे मला दु:ख झाले. ते दर वर्षी अंगणेवाडीच्या यात्रेला जातात. फोटो काढतात आणि सांगतात की, आम्ही तेथे पवित्र भावनेने..

श्री. दिवाकर रावते (बसून) : त्यांनी अनुदान वाढवून मागितले होते.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, एका बाजुला टीका कशी झाली हे सांगितले पाहिजे. कुणकेशवरच्या देवस्थानाच्या बाबतीत, ते कोकणातील असल्यामुळे त्यांनी टीका का करावी हे मला कळले नाही. मी राजकीय बोलत नाही. जे चुकीचे बोलले जाते,त्यामुळे समाजामध्ये वेगळया प्रकारची भावना निर्माण होऊ शकते. कारण आपण या ठिकाणी एका राजकीय पक्षाचे प्रतिनिधी म्हणून बोलतो. समाजामध्ये एक वेगळया प्रकारचे आदराचे स्थान आपल्याला प्राप्त होते. सभापती महोदय, मला माहीत आहे, अर्थसंकल्पावर टीका करण्यासाठी काही राहिले नसल्यामुळे असे काही तरी शोधण्याचा, दुर्बीन लावून शोधण्याचा त्यानिमित्ताने प्रयत्न झालेला आहे. पण तो करीत असताना आपण कुठे चुकतो आहोत याचे भान न राहिल्यामुळे कदाचित असे काही तरी घडले असेल. (अडथळा) मला आनंद आहे. तावडे साहेबांचे आणि माझे चांगले संबंध आहेत.

श्री. दिवाकर रावते (बसून) : ते जाणीवपूर्वक असे बोलले नसतील.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे : आपण सांगत आहात त्याप्रमाणे ते बोलले असतील. ठीक आहे. कोकणसाठी तरतूद करण्यात आली हे खरे आहे. कोकणच्या पर्यटनाला अधिक न्याय दिला गेला. 720 कि.मी. चा समुद्रकिनारा कोकणला मिळाला आहे.गोवा आणि केरळची अर्थव्यवस्था पर्यटनावर उभी असेल तर महाराष्ट्राला 720 कि.मी. चा समुद्र किनारा या कोकणपट्टीला मिळाला आहे त्या कोकणाला आम्ही थोडेसे झुकते माप दिले तर कोणाला काही गैर वाटण्याचे कारण नाही. कोकणची माणसे साधीभोळी आहेत. पण निर्धारपूर्वक काम करीत असताना महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यामध्ये असलेल्या सगळया राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरण झाले. मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाचा उल्ले्ख केला तर त्याचे दु:ख,त्याचे एवढे शल्य वाटण्याचे काही कारण असू शकत नाही. त्या चौपदरीकरणावरुन केवळ कोकणची माणसे प्रवास करणार आहेत असे नव्हे. सागरी महामार्गासाठी तरतूद केली. कोकणच्या माणसाला समुद्राचे आकर्षण नाही कारण आम्ही येथेच जन्माला आलेलो आहोत पण बाहेरची महाराष्ट्रातल्या अन्य भागातील देशातल्या अन्य भागातील जगभरातील पर्यटक जर का गोव्याला जात असतील तर गोव्यापेक्षा खचितच अधिक चांगला नैसर्गिक समुद्र किनारा माझ्या कोकणच्या किनारपट्टीला मिळालेला आहे आणि त्यातून मिळणारे परकीय चलन हे राष्ट्राच्या आणि राज्याच्या उत्पन्नामध्ये भरीव पध्दतीने वाढ करण्यासाठी निश्चितपणाने उपयोगी ठरु शकते. म्हणून कोकणाला आज जो न्याय दिलेला आहे तो केवळ कोकणासाठी दिलेला नाही तर राज्याच्या एकंदर जडणघडणीच्या दृष्टिकोनातून गेल्या अनेक वर्षामध्ये दुर्दैवाने जे घडू शकले नाही. पण माननीय श्री. पवार साहेबांनी मला ही संधी दिली. मी त्यांचा ऋणी आहे. म्हणूनच मला पहिल्याप्रथम अर्थसंकल्प मांडण्याची संधी मिळाल्यानंतर ज्या भागाला गेली अनेक वर्षे जो न्याय मिळू शकत नव्हता तो देण्यासंबंधीची भूमिका त्या निमित्ताने घेण्यात आली.

यानंतर श्री. बरवड...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपी नोंद

श्री. सुनील तटकरे ....

माननीय पवार साहेबांनी मला संधी दिली त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. म्हणून पहिल्याप्रथम मला अर्थसंकल्प सादर करण्याची संधी मिळाली. त्या भागाला गेल्या अनेक वर्षात जो न्याय मिळू शकत नव्हता तो देण्यासंबंधीची भूमिका या निमित्ताने घेतलेली आहे.

उपसभापती : मी मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, हे सांगताना आपली छाती अभिमानाने फुगली पण या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांची उंची आपोआप वाढलेली मी बघितली.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय आज कोकणाबद्दल भरभरुन बोलत आहेत की, हे दिले, ते दिले तरी आज कोकणाला काही मिळाले नाही याबद्दल चर्चा आहे. कोकणाला काही मिळाले नाही म्हणून चर्चा उपस्थित केलेली आहे.

श्री. सुनील तटकरे : सन्माननीय सदस्यांच्या नियम 260 अन्वये असलेल्या प्रस्तावाला जवळपास मी आता उत्तरच देत आहे त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी जेव्हा नियम 260 अन्वये दिलेल्या प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात करतील त्यावेळी ते एका वाक्यात सांगतील की, आमचे समाधान झाले आहे त्यामुळे आता चर्चेची गरज नाही. त्याचेच उत्तर मी आज या निमित्ताने देण्याचा प्रयत्न करीत आहे.

उपसभापती : मला तेच सांगावयाचे होते. उद्याची चर्चा मला टाळावयाची होती.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, या ठिकाणी मेडिकल कॉलेजचा उल्लेख झाला पण आपणा सर्वांना माहीत आहे की, मेडिकल कॉलेजमधील प्रवेश सर्वांसाठी आहे. त्या ठिकाणी केवळ रायगडमधील विद्यार्थ्यांनाच प्रवेश मिळेल असे नाही. आज वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये गुणवत्तेच्या आधारावरच प्रवेश मिळत असतो. त्या भागामध्ये इतकी वर्षे वैद्यकीय महाविद्यालय सुरु झालेले नव्हते. ते सुरु करण्याचा प्रयत्न या निमित्ताने झालेला आहे. सागरी महामार्गावरील पूल करण्यासंबंधीची भूमिका, मुंबईमधील वेगवेगळ्या विकासाच्या कामाच्या बाबतीत एमएमआरडीए, एमयूआयपी, एमयूटीपीचे प्रकल्प मी नगरविकास राज्यमंत्री असताना मांडले त्यावेळी सुध्दा त्याबाबतीत थट्टा केली गेली होती पण आज त्यातील बरेचसे प्रकल्प पूर्ण होऊन कार्यान्वित झाले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे .....

मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, एमएमआरडीएचा निधी सुध्दा एमएमआरडीएच्या कार्यक्षेत्रामध्ये आणि विशेषकरुन ठाणे आणि रायगड जिल्ह्याच्या कार्यक्षेत्रामध्ये अधिकाधिक देण्याच्या दृष्टीकोनातून जाणीवपूर्वक प्रयत्न केले जातील हे सुध्दा मी नम्रतेने सांगू इच्छितो. कारण मुंबईवर असलेला भार जर आम्हाला कमी करावयाचा असेल तर ठाणे रायगड असेल, वसई-विरारचा डहाणूपर्यंतचा पट्टा असेल, या बाजूला भिवंडी पर्यंतचा पट्टा असेल, रायगड जिल्ह्यातील कर्जत, खालापूर, पेण पासून अलीबाग पर्यंतचा पट्टा असेल, जो पट्टा आज मुंबई महानगर प्रदेशामध्ये मोडत आहे त्या प्रदेशामध्ये सुध्दा एमएमआरडीएमार्फत अधिकाधिक निधी देण्याच्या संदर्भात सुध्दा भूमिका घेतली जाईल. शिवडी ते न्हावा शेवा जो ट्रान्स हार्बर लिंक ब्रिज आहे त्याचे काम याच वर्षी सुरु करण्याचे नियोजन आम्ही निश्चितपणे केलेले आहे. येत्या तीन वर्षामध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून हा पूल पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाईल. जवळपास 8 हजार कोटी रुपये खर्चाच्या या पुलाचे बांधकाम झाल्यानंतर त्याचा फायदा केवळ रायगड जिल्ह्यालाच होणार नाही. आज आम्हाला लाभलेल्या किनारपट्टीमध्ये जी बंदरे विकसित होत आहेत, रेवसचे बंदर असेल, दिघीचे बंदर असेल, रत्नागिरीच्या परिसरामधील जयगडचे बंदर असेल, पलीकडे वेंगुर्ल्याच्या परिसरामधील रेडीचे बंदर असेल, या सगळ्या परिसरातील बंदरे विकसित होत असताना मालाची निर्यात आणि आयात करण्याच्या दृष्टीकोनातून ही महत्वपूर्ण बंदरे जेव्हा विकसित होतील त्यावेळी येणारा माल, त्यातून मिळणारे परकीय चलन हे देशाच्या आणि राज्याच्या उत्पन्नासाठी अत्यंत महत्वपूर्ण ठरणार आहे. म्हणून दिघी बंदरापासून जोडणारा रस्ता पुण्यापर्यंतझाला तर तो केवळ रायगड जिल्ह्यासाठी झाला असे म्हणणे म्हणजे रायगड जिल्ह्यावर अन्याय करण्यासारखे आहे. मी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांना सांगू इच्छितो की, शिवसृष्टीची कल्पना रायगडमध्ये एवढ्यासाठीच घेतली गेली की, रायगडला शिवाजी महाराजांची समाधी आहे आणि ज्या पायथ्याशी जिजामातेचे वास्तव्य राहिले त्या पायथ्याशी आम्ही शिवसृष्टी निर्माण केली तर त्याबाबत टीका करणे योग्य नाही. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी टीका केली नाही.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : माननीय अर्थमंत्र्यांनी विधानसभा सभागृहात केलेले भाषणच या ठिकाणी करु नये. या ठिकाणी वेगळे मुद्दे मांडलेले आहेत.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या जे सांगत आहेत त्याचा अर्थ पाचाडला केलेल्या शिवसृष्टीचे सन्माननीय सदस्या डॉ. नीलमताई गोऱ्हे यांनी स्वागतच केले असे मी मानतो. याचा अर्थ त्यांच्या पक्षामध्ये सुध्दा याबाबतीत मतभिन्नता आहे एवढीच मला या ठिकाणी जाणीवपूर्वक नोंद करावयाची होती. तेवढ्यासाठीच मी बोललो. आपण बोललात ते बरे झाले. म्हणजे खाली एक आणि इकडे एक अशी भूमिका आहे. जी भूमिका आहे ती स्पष्ट करावी एवढीच याच्या पाठीमागची भावना आहे. सोयीनुसार भूमिका घेऊन कधी काही होत नाही. हेअर पिनला सवलत दिल्याबद्दल टीका झाली. कापूर, धूप याबाबत सवलत दिल्याबद्दल टीका झाली. याबाबत या सभागृहात टीका झाली नाही याचा मला आनंद आहे. याचा अर्थ या वरिष्ठ सभागृहाने या सवलतींचे मनापासून स्वागत केले असे मी या निमित्ताने मानतो. या सुवर्णमहोत्सवी वर्षामध्ये अर्थसंकल्प मांडत असताना आम्ही कोणतीही गडबड केली नाही. पण हे करीत असताना जरुर जी तूट आली ती तूट भरुन काढण्याचा निश्चितपणे प्रयत्न केला जाईल. यामध्ये दुमत असण्याचे कारण नाही. कारण हे राज्य गेली अनेक वर्षे आम्ही शिस्तीमध्ये चालविण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न केलेला आहे. गेल्या तीन वर्षामध्ये आम्ही एकही रुपयाचा ओव्हरड्राफ्ट घेतलेला नाही.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे.....

जे कर्ज राज्यावर आहे त्या कर्जाची व व्याजाची नियमितपणे परतफेड करण्यासाठी केंद्र सरकारने रिझर्व्ह बँकेच्या माध्यमातून राज्याला वित्तीय मर्यादा घालून दिलेली आहे. त्या वित्तीय मर्यादेपर्यंत विकसित असलेल्या राज्याचा अधिक सर्वांगीण विकास करण्यासाठी ही पावले उचलण्याचा प्रयत्न यानिमित्ताने केलेला आहे.

सभापती महोदय, या सरकारने आरोग्य विभागाची सुध्दा काळजी घेतलेली आहे. पूर्वी जीवनदायी योजना अस्तित्वात होती. आता राजीव गांधी जीवनदायी योजना सुरु करण्याचे प्रस्तावित केलेले आहे. ही योजना दारिद्रय रेषेखालील लोकांपर्यंत सीमित होती. या योजनेची व्याप्ती वाढविण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. ही योजना सुरु करीत असताना नवीन 6 जिल्हयांची निवड केलेली आहे. या योजनेची सफलता लक्षात घेऊन कालांतराने राज्यातील सर्वच जिल्हयांमध्ये ही योजना राबविण्याचे प्रयत्न केले जातील. यावर्षी या योजनेसाठी 250 कोटींची तरतूद केलेली आहे. (अडथळा) सभापती महोदय, जे.जे.रुग्णालयातील तो विभाग बंद पडलेला नाही. मी जीवनदायी योजनेबाबत बोलत आहे. परंतु आपण म्हणता त्याप्रमाणे जी कामे राहिली असतील त्यासाठी निधीची निश्चित व्यवस्था केली जाईल. यासंदर्भात मंत्री महोदयांबरोबर बोलून आणि त्यासाठी निधीची तरतूद केली जाईल. ग्रामीण भागाचे आपण सर्वजण लोकप्रतिनिधी आहोत. मुंबईचे लोकप्रतिनिधी आहोत. तरी सुध्दा ग्रामीण भागाचे आपण सर्वजण नेतृत्व करीत आहोत. ग्रामीण भागातील नगरपालिकांच्या दृष्टीकोनातून नगरोत्थान अभियान शासनाने सुरु केले आहे. त्याचबरोबर मोठया लोकसंख्येच्या ज्या ग्रामपंचायती आहेत, त्या ग्रामपंचायतींचे उत्पन्न पाहिले तर लोकसंख्येच्या प्रमाणामध्ये त्या ग्रामपंचायती प्राथमिक सुविधा देऊ शकत नाहीत. अशा ग्रामपंचायतींसाठी 'इको फ्रेण्डली व्हिलेज' नावाची योजना आखून त्यासाठी 250 कोटींची तरतूद केली आहे. ती करीत असताना जिल्हा नियोजन विकास मंडळाच्या माध्यमातून मोठया शहराच्या ग्रामपंचायतींना अधिक निधी देण्याचा प्रयत्न केला आहे. सध्याचा नागरीकरणाचा वेग प्रचंड वाढला आहे. नागरीकरणाची टक्केवारी मोठी असलेले हे राज्य आहे. परंतु महाराष्ट्रामध्ये ग्रामीण भागातील लोकसंख्या तालुक्यांच्या ठिकाणी वाढत आहे. त्या ग्रामपंचायतींचे मर्यादित उत्पन्न लक्षात घेता त्यांना ताकद व शक्ती देण्याचा प्रयत्न केला आहे.

सभापती महोदय, मच्छिमार बांधवांच्या हिताच्या योजना राबवित असताना एनसीडीसीच्या

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

श्री.सुनील तटकरे.....

माध्यमातून वेगवेगळया मच्छिमार बंदरांचा विकास केला जात आहे. कोकणातील या बंदरांचा कालबध्दरितीने विकास करण्याचे लक्ष्य ठेवलेले आहे. परंतु मच्छिमारांच्या व्यक्तिगत लाभाच्या योजना राबवित असताना मच्छिमारांचा विकास अधिक कसा होऊ शकेल यासाठी योग्य ती तरतूद केलेली आहे. त्याचप्रमाणे मराठवाडयातील बीड-परळी रेल्वे मार्गासाठी आवश्यक असलेल्या भूसंपादनाच्या कामासाठी आवश्यक असलेला निधी गेल्या वर्षी केला होता. यावर्षी सुध्दा त्यासाठी प्रावधान केले जाईल. महाराष्ट्रातील सर्व भागामध्ये सर्व पध्दतीच्या योजना राबविण्याच्या दृष्टीकोनातून राज्यात निश्चित प्रयत्न केले जातील एवढेच यानिमित्ताने सांगतो. या सभागृहात अर्थसंकल्पावर चर्चा चालू असताना विधानसभा सभागृहात सुध्दा चर्चा चालू होती. त्यामुळे ज्या सन्माननीय सदस्यांनी आपली मते मांडली होती त्याची नोंद सन्माननीय अर्थ राज्यमंत्र्यांनी घेतली आहे. आपण केव्हाही मला त्यासंबंधी बोलू शकता. सत्ताधारी पक्षाचे सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी मिळाली नसेल तर तेही मला भेटून बोलू शकतात. ज्या कल्याणकारी योजना असतील त्याबाबत मला जरुर सांगावे, त्या योजनांबाबत सुध्दा विचार केला जाईल.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, आमच्या मुद्यांना मंत्री महोदयांकडून उत्तर मिळाले नाही, त्यामुळे आमच्या मुद्यांचे उत्तर सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात यावे.

श्री.सुनील तटकरे : सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले हे आमचे मित्र आहेत.

श्री.भाई जगताप : छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकासंबंधी मी बोललो होतो. त्यासंबंधी मंत्री महोदयांनी बोलले तर बरे होईल.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी शासनाच्यावतीने जाणीवपूर्वक प्रयत्न केला जाईल. सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी या सदनात अनेक वर्षे काम केलेले आहे. त्यांनी सुध्दा राज्याचा अर्थसंकल्प मांडलेला आहे. राज्याच्या निरनिराळया विकासाच्या कामासाठी आपल्याकडून सहकार्य मिळत राहो अशी मी आपल्याला विनंती करतो. माननीय सदस्यांच्या भागातील ज्या समस्या असतील, जे प्रश्न असतील त्या मला सांगाव्यात, आपल्याला न्याय देण्याचा प्रयत्न केला जाईल एवढेच या प्रसंगी सांगतो. पुन्हा या अर्थसंकल्पाच्या चर्चेमध्ये ज्या सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला त्या सर्वांचे मी मनापासून आभार मानतो आणि माझे दोन शब्द संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

------- यानंतर श्री.शिगम.

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय अर्थमंत्र्यांचे संपूर्ण भाषण मी ऐकले. त्यांनी आपल्या भाषणामध्ये शेतक-यांबद्दल एक शब्दही काढला नाही. आत्महत्या करणा-या शेतक-यांना दिलासा देणारे कोणतेही विधान केले नाही. पॅकेजमध्ये झालेल्या भ्रष्टाचाराबाबत काय कारवाई करणार हे त्यांनी सांगितले नाही, मराठवाडा, विदर्भ या भागातील अनुशेषाच्या बाबतीत काही बोलले नाहीत, वैधानिक विकास मंडळांच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी भावना व्यक्त केल्या, पण त्याबाबतीत काही सांगितले नाही. ग्रामपंचायतींच्या उत्पनाबद्दल सांगितले,परंतु शेतक-यांच्या उत्पन्नाबाबत, त्याच्या उत्कर्षाबाबत काही बोलले नाहीत. म्हणून त्यांनी केलेल्या अर्थहीन भाषणाचा आम्ही निषेध करुन सभात्याग करतो.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य बहिर्गमन करतात.)

श्री. संजय केळकर : व्हॅटचे टॅक्स ऑडिट हा राज्यातील व्यापारी आणि उद्योजकांच्या दृष्टीने महत्वाचा विषय आहे. 30 मार्च ही व्हॅट टॅक्स ऑडिटची शेवटची तारीख आहे. 704 नंबरचा फॉर्म अतिशय क्लिष्ट आहे. ही टॅक्स ऑडिटची मुदत जून पर्यन्त वाढवावी अशी व्यापारी आणि उद्योजकांची मागणी आहे. ती मुदत आपण वाढवावी अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. सुनील तटकरे : सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी माझ्या भाषणानंतर बहिर्गमन केले नाही याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा मांडला त्याची शासनाला जाणीव आहे. त्याबाबतीत विचार करण्यात येत आहे.

उपसभापती : अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा आता संपली आहे.

श्री. सय्यद जमा : सभापति महोदय, मेरा पॉइंट ऑफ इन्फोरमेशन है. कई माननीय सदस्यों को बोलने का मौका नहीं मिला, लेकिन वित्त मंत्री महोदय ने जिस तरह से अपनी बात रखी, उससे हमारी व्यथा कम हो गई, इसके लिए बहुत धन्यवाद. कोंकण के लिए, विदर्भ के लिए और महाराष्ट्र के बाकी क्षेत्रों के लिए महाराष्ट्र शासन ने स्पेशल पॅकेज घोषित किए हैं. नागपुर अधिवेशन के आखिरी दिन 23 दिसम्बर को माननीय मुख्यमंत्री जी ने 10 हजार करोड़ रुपए का पॅकेज दिया था और इस पर 3 साल में अमल होना था. मुझे केवल इतनी जानकारी चाहिए कि 10 हजार करोड़ की एक तिहाई राशि का इस बजट में समावेश है या नहीं ?

उपसभापति : ही माहिती सन्माननीय सदस्यांनी मंत्री महोदयांच्या दालनात जाऊन घ्यावी.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभागृहापुढील कामकाजासंबंधी

उपसभापती : सन 2010चे वि.प.वि.क्रमांक 3 - महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ विधेयक हे उद्या मांडण्याची परवानगी द्यावी अशी माननीय मंत्री महोदयांनी विनंती केलेली आहे.

--

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विधेयकाच्या शीर्षकासंबंधी

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आमच्याकडे जी विधेयके आलेली आहेत ती कशा पध्दतीने छापून आलेली आहेत हे मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो.

माझ्याकडे मुंबई प्राथमिक शिक्षण (सुधारणा) विधेयक आहे. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की "A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY PRIMARY EDUCATION ACT, 1947"

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

सभापती महोदय, राज्य शासनाच्या नितीबद्दल मला काही कळत नाही आणि कोण उत्तर देणार आहे ते देखील समजून येत नाही. बॉम्बेचे मुंबई झाल्यानंतरची परिस्थिती वेगळी आहे. पण ज्यावेळेला द्विभाषिक राज्य रद्द होऊन महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली त्यानंतर अनेक कायदे होते त्यामध्ये बॉम्बे प्रोव्हीन्स असा उल्लेख होता. 1980 साली त्यामध्ये आवश्यक ते बदल करण्यात आले. माझ्याकडे शासनाचे 1980 सालचे राजपत्र आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, Whereas, it is expedient to amend the certain enactment and change their short title from "Bombay Act" to 'Maharashtra Act'. पण अद्यापही बॉम्बेचा मुंबई असा बदल झालेला नाही. महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर अनेक कायदे बॉम्बे ॲक्ट या नावाने ओळखले जात होते त्यामध्ये "बॉम्बे" ऐवजी "महाराष्ट्र" असा बदल करण्यात आला. हा बदल 1980 साली झाला. "बॉम्बे" ऐवजी "मुंबई" असा बदल 5 सप्टेंबर, 1997 रोजी झाल्यानंतर सुध्दा आज राज्याला 50 वर्षे झाली, सुवर्ण महोत्सवी वर्षात पदार्पण करीत असताना कौतुक केले जात आहे, स्वत:च्या पाठीवर थाप मारुन घेणे चालले आहे. मुलभूत कायद्याबद्दल सभागृहात चर्चा झाली पाहिजे आणि जी विधेयके सभागृहासमोर येतात त्या विधेयकामधील मुलभूत गाभा का विसरला जातो? अधिकारी वर्ग अशा पध्दतीने का वागत आहे? विधीमंडळाला प्रश्न आहे की, विधीमंडळाचे सचिव अशा प्रकारचे विधेयके सभागृहासमोर आणतात कसे? या बिलात सुध्दा असे म्हटले आहे की, "...further to amend the Bombay Primary Education Act, 1947" हा "बॉम्बे" शब्द बदलला पाहिजे. "बॉम्बे" ऐवजी "महाराष्ट्र" किंवा "मुंबई" असा बदल करा. या सुधारणा न होता विधेयके मांडली जात आहेत. माझी आपल्याला विनंती आहे की, सरकारकडून विधीमंडळामध्ये कायदे मांडताना संबंधित मंत्रीमहोदयांनी त्या बाबतीत उपसूचना मांडावी किंवा आम्हाला उपसूचना मांडू द्यावी व ती मंजूर करावी. असे न करता विधेयक खालच्या सभागृहाने मंजूर केले म्हणून तुम्ही करा अशा प्रकारे विधेयक घटनेच्या चौकटीत राहून मांडता येणार नाही. खालच्या सभागृहात मंजूर झाले म्हणून या सभागृहात मंजूर करण्याचा आग्रह धरता येणार नाही, हे चुकीचे आहे. कायदा आहे तो योग्य पध्दतीनेच सभागृहासमोर आला पाहिजे. कायद्याचा अपभ्रंश आहे. त्या कायद्यात बदल झालेला असताना तो अशा पध्दतीने मांडता येणार नाही. पुढील सर्व विधेयके चर्चेला घ्यायची की नाही हा प्रश्न निर्माण होतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके : मी त्या संदर्भात उत्तर देतो. आश्वासन देतो.

श्री.दिवाकर रावते : कायदा आश्वासनात बोलत नाही. माझ्याकडे राजपत्र आहे.

श्री.प्रकाश सोळंके : राजपत्र बरोबर आहे. तुम्ही परवा जे राजपत्र दाखविले त्यामध्ये फक्त चार कायद्यांचा उल्लेख आहे.

श्री.दिवाकर रावते : उर्वरित कायद्यांमध्ये बदल का केला नाही हे मी विचारतो आहे.

श्री.प्रकाश सोळंके : मी तेच सांगत आहे. मुंबई मुद्रांक शुल्क विधेयक पुढील अधिवेशनात आणू, तोपर्यंत ते विधेयक थांबवू.

श्री.दिवाकर रावते : तोपर्यंत ते विधेयक रोखून ठेवणार आहात का?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी उपस्थित केलेला मुद्दा आहे त्याबाबत राज्यमंत्री महोदय उत्तर देतील. प्राथमिक शिक्षणाचे विधेयक खालच्या सदनात मंजूर झालेले आहे. आता प्रस्तावित केलेले विधेयक आहे ते विधेयक मान्य करावे. या व्यतिरिक्त सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला जो विषय आहे त्या संदर्भात मंत्रीमहोदय उत्तर देतील. माझी एकच विनंती आहे की, खालच्या सदनात हे विधेयक मंजूर झालेले आहे. हे विधेयक या सभागृहाने मंजूर करावे. त्याबद्दल भाष्य करावे. या व्यतिरिक्त जो मुद्दा उपस्थित केला आहे त्याला मंत्रीमहोदय उत्तर देतील.

श्री.दिवाकर रावते : तुम्ही कायदा बनविला आहे. इतर गोष्टी मी समजू शकतो. हा कायदा समजून घ्या. पुढील अधिवेशनात कशाला? आज रात्रभर बसू. संपूर्ण मंत्रालय कामाला लावा आणि उद्या हे विधेयक सभागृहापुढे आणा व मंजूर करुन घ्या. कायद्याबाबत तडजोड करता येणार नाही. महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर 1980 साली "बॉम्बे ॲक्ट" ऐवजी "महाराष्ट्र ॲक्ट" असा बदल झाला. हे अधिकारी झोपले होते का? मला कळून येत नाही.

श्री.हर्षवर्धन पाटील : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना मी सांगू इच्छितो की, तडजोडीचा प्रश्न नाही.

श्री.दिवाकर रावते : खालच्या सभागृहात मंजूर झाले म्हणून वरच्या सभागृहात चालणार नाही. खालच्या सभागृहात चूक झाली असेल तर ती वरच्या सभागृहात होऊ देणार नाही.

अशुद्धीत्र प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील : महोदय, सभागृहात वारंवार अशा प्रकारचा विषय येत असतो. त्याचे कारण म्हणजे जे जुने कायदे आहेत त्यामध्ये "बॉम्बे" हा शब्द मोठ्या प्रमाणात वापरला गेला आहे. यासंबंधीची एक प्रोसिजर आहे. म्हणून सन्माननीय सदस्यांच्या भावनांचा आदर ठेवून लवकरात लवकर यासंबंधी जो बदल करण्याची गरज आहे तो करण्यात येईल. माझी विनंती एवढीच आहे की, आज हे विधेयक मंजूर करावे, यानंतरची प्रोसिजर शासन पूर्ण करुन आवश्यक तो बदल नक्कीच करण्यात येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, अशा पध्दतीमुळे सभागृहात चुकीचा पायंडा पडतो असे मला वाटते. म्हणून जे कायदेशीर असेल तेच सभागृहात मान्य करावे. शासनाने दोन दिवसांनी हे विधेयक सभागृहात मान्यतेसाठी आणावे आम्ही ते मंजूर करण्यास तयार आहोत.

उपसभापती : मुद्रांक शुल्कासंसबंधीचे विधेयक या सभागृहात जवळपास तीन चार वेळा येऊन गेले आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी तीन चार वेळा मागणी केली की, "बॉम्बे" असा जो उल्लेख आहे त्याऐवजी "महाराष्ट्र" असा उल्लेख असावा. कारण संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाल्यानंतर सन 1980 मध्येच जुन्या कायद्यातील "बॉम्बे" हा शब्द वगळून "महाराष्ट्र" असा शब्दप्रयोग करण्यासंबंधीची सुधारणा झालेली आहे. त्यानंतर पुढील कायद्यांमध्ये ज्या ज्या ठिकाणी "बॉम्बे" असा शब्दप्रयोग असेल तेथे "महाराष्ट्र" असा बदल करावा अशी दुरुस्ती झालेली आहे. सन्माननीय सदस्यांनी इतक्या वेळा विनंती केल्यानंतर देखील शासनाकडून ते होत नाही. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सुध्दा हीच बाजू मांडलेली आहे. मला वाटते एक-दोन दिवस उशिर झाला तरी हरकत नाही पण सुधारणा करुन विधेयक मान्यतेसाठी आणले तर विरोधी पक्षाची ते विधेयक पास करण्याची तयारी आहे.

श्री. दिवाकर रावते : महोदय, मूळ कायद्यामध्ये ज्याचे नाव "बॉम्बे" आहे त्याऐवजी "महाराष्ट्र" अशी सुधारणा झालीच आहे. परंतु त्यानुसार दुरुस्ती झालेली नसताना "बॉम्बे मुद्रांक अधिनियम" असेच यायला पाहिजे. अशा प्रकारचा बदल अथवा भाषांतर सुध्दा जोपर्यंत कायद्यात बदल होत नाही तोपर्यंत करता येणार नाही. .....अडथळा.....मंत्री महोदय आपण अधिकाऱ्यांची पापं आपल्या डोक्यावर का घेऊन फिरत आहात हेच मला समजत नाही. अशाप्रकारे आम्हाला अपमानित करण्यासाठी, पायाखाली तुडविण्यासाठी हे अमराठी अधिकारी करीत आहेत काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

याचा खुलासा झाला पाहिजे. सन 1980 मध्ये या राज्यात जे जे कायदे "बॉम्बे" नावाने होते मे "महाराष्ट्र" या नावाने झाले पाहिजेत यासंबंधीची सुधारणा झालेले राजपत्र माझ्याकडे आहे. त्यात असे म्हटले आहे की, "Change their short title from 'Bombay Act' to 'Maharashtra Act'." मग आतापर्यंत हे का केले नाही ? आता 2010 साल उजाडत आहे, 30 वर्षे झाली परंतु त्यात कोणताही बदल केला नाही. राज्यकर्ते रेटून नेतात म्हणून अधिकाऱ्यांचे फावते आहे. परंतु राज्यकर्ते म्हणून आपणच फशी पडणार आहात. अशा प्रकारे प्रशासकीय अधिकाऱ्यांचे दोष आपण अंगावर घेऊ नका. कोर्टात कायद्यातील एका शब्दाने माणसाला फाशी होते किंवा एका शब्दाच्या अर्थाने फाशीची शिक्षा झालेला सुटू शकतो, बाकीचे तर सोडूनच द्या. मी गेल्या चार पाच अधिवेशनांपासून बोलत आहे तरी देखील काहीच फरक पडत नाही. म्हणून सुवर्ण महोत्सवी वर्षात तरी अशा प्रकारची तडजोड सभागृहात चालणार नाही. राज्याच्या अस्मितेची ही तडजोड खपवून घेतली जाणार नाही. बिल चार दिवस उशिरा मंजर झाले तरी चालेल, रात्रभर बसून ते मंजूर करुन देऊ. आम्ही विधेयकाला विरोध करण्यासाठी अथवा ते नापास करण्यासाठी बसलो नाहीत. पण योग्य असेल तरच मंजुरी दिली जाईल अन्यथा अशा प्रकारच्या चुकीच्या विधेयकांना मान्यता दिली जाणार नाही. माझा माननीय सभापतींच्या कार्य पध्दतीवर आणि त्यांच्या सदसदविवेक बुध्दीवर ठाम विश्वास आहे. परंतु एखाद्या अयोग्य गोष्टीबद्दल मंत्री महोदयांनी निवेदन करणे चुकीचे आहे. माननीय संसदीय कार्य मंत्री ज्येष्ठ सदस्य आहेत.....

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

सभापती महोदय, मुद्रांक शुल्क विधेयक खाली संमत झाले म्हणून ते वर संमत केले तर तो या सदनाचा अवमान होईल. वरच्या सभागृहात बदलले म्हणून खालच्या सभागृहात किती तरी विषय बदलले आहेत याची आपल्याला कल्पना असेलच.

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री. रावते यांचा माझ्यावर जो विश्वास आहे त्या विश्वासाला तडा जाणार नाही अशा प्रकारचे आपण काही तरी करा.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, हे सभागृह आपल्या विश्वासावरच चालते. 1980 साली आपण जे गॅझेट प्रकाशित केले त्या गॅझेटमध्ये "बॉम्बे"चे कन्व्हर्शन "महाराष्ट्र" असे केलेले आहे. या ठिकाणी दोन विषय आहेत. बॉम्बेचे जे ॲक्ट आहेत त्याचे कन्व्हर्शन "महाराष्ट्र कायदा" असा करावा असा एक प्रश्न आहे आणि काही कायद्याचे नाव "बॉम्बे ॲक्ट"च्या माध्यमातून "मुंबई" करावे असे दोन विषय या ठिकाणी आहेत. माझी सदनाला विनंती आहे की, या ठिकाणी सन्माननीय सदस्यांचा मुद्दा अतिशय रास्त आहे. खाली हे विधेयक मंजूर झाले म्हणून वरच्या सभागृहात हे विधेयक मंजूर करावे असे मी म्हटलेलेच नाही. खालच्या सभागृहात हे विधेयक मंजूर झालेले आहे म्हणून वरच्या सभागृहात हे विधेयक मंजूर करावे असे मी म्हणालो आहे. त्यामुळे या विधेयकाच्या निमित्ताने माझी सभागृहाला विनंती आहे की, मुद्रांक शल्कच्या संदर्भात जे विधेयक आहे त्यामध्ये राज्य सरकारच्या महसूल विभागाचे सुध्दा काही विषय आहेत. या विधेयकावर चर्चा होऊ द्या, चर्चेशिवाय विधेयक मंजूर करा असे मला म्हणावयाचे नाही. आपल्याकडे आता मुद्रांक शुल्कचे जे विधेयक आहे ते सभागृहाने संमत करावे आणि या अधिवेशनाचे सत्र संपण्यापूर्वी जेथे जेथे आपल्याला "बॉम्बे"चे "मुंबई" करावयाचे आहे, जेथे जेथे "बॉम्बे"चे "महाराष्ट्र" करावयाचे असे जे दोन विषय आहेत त्यासंदर्भातील सुधारित प्रस्ताव हे अधिवेशन सत्र संपण्यापूर्वीच यासभागृहात आणला जाईल.

श्री. दिवाकर रावते : आपण जेवढे कायदे करीत आहात त्याच्या सर्व सुधारणा या ठिकाणी सदस्यांना मिळाल्या पाहिजेत. विधेयक पास होईल तेव्हा होईल. या सदनाने सुधारणा मंजूर केल्यानंतर राजपत्र आणि प्रोसिजर बाद होत असतात. हे सभागृह सर्वोच्च आहे. या कायद्याच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

संदर्भात मी सुधारणा मांडली आणि ती सुधारणा मंजूर झाली तर ती कॅरी होणार की, नाही ? माननीय गुजराथी साहेब आपण मला गाईड करावे असे वाटते. मी सर्व जबाबदारी सभापती महोदयांवर टाकत नाही.

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात माझ्या दोन बाबी आहेत. एक तर कायदा व्हॅलीड नसेल आणि उद्या हायकोर्टात केस गेली तर नेमक्या कोणत्या ॲक्ट खाली म्हणजे हा "बॉम्बे" आहे की, "मुंबई" आहे किंवा "महाराष्ट्र" आहे, असा प्रश्न निर्माण होईल. आपल्याला हा कायदा आजच्या आज मंजूर करुन घ्यावयाचा असेल तर ताबडतोब सरकारी सुधारणा आणावयाची, त्याचे नाव आताच आपण बदलून घेऊ, एकमताने सुधारणा मंजूर करुन घेऊ असे करुन हे विधेयक सुध्दा पास करता येईल. त्यामुळे या विधेयकाच्या अनुषंगाने ज्या दोन बाबी आहेत त्यासंदर्भातील निर्णय सभागृहाने करावा असे मला वाटते.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी प्रस्ताव मांडलेला आहे की, एक तर तुम्ही सुधारणा मांडा नाही तर आम्ही सुधारणा मांडतो. एक मुखाने या कायद्यापुरता तो पास करुन घ्या. बाकी तुम्हाला जे काही करावयाचे असेल ते करा. माझ्याकडे "महाराष्ट्र राज्य विशेष सुरक्षेच्या संदर्भात विधेयक आहे. परंतु राजपत्रात या विधेयकातील "विशेष" शब्द आलेला नाही आणि आमच्याकडे आलेल्या विधेयकामध्ये "विशेष" शब्द आहे. शब्दाचा कोणी विचार करीत नाही.

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, 1958 चे विधेयक मंजुरीसाठी सभागृहापुढे आलेले आहे. या विधेयकात "मुंबई मुद्रांक सुधारणा विधेयक" असा उल्लेख आहे. त्यासंदर्भात सन्माननीय सदस्यांनी आक्षेप घेतलेला आहे. मला या विधेयकाच्या निमित्ताने सांगावयाचे आहे की, महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेच्या अगोदर मुंबई राज्य होते.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सगळया कायद्यांमध्ये " मुबई " असा उल्लेख करण्यात आला होता . संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापने नंतर बऱ्याचशा कायद्यांमध्ये सुधारणा झाली आणि मुंबईच्या ठिकाणी महाराष्ट्र असा बदल करण्यात आला होता. मात्र या कायद्यातील मुंबई हे नाव बदलावयाचे राहून गेले आहे ही वस्तुस्थिती खरी आहे. हे अधिवेशन संपताच "मुंबई" ऐवजी "महाराष्ट्र" अशी या कायद्यात सुधारणा केली जाईल परंतु सध्या या कायद्यात ज्या सुधारणा सुचविण्यात आलेल्या आहेत त्या महाराष्ट्रातील जनतेच्या हिताच्या दृष्टीने अतिशय आवश्यक आहेत त्यामुळे मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की या कायद्यात सुधारणा सुचविणारे विधेयक त्यांनी मंजूर करावे आणि हे अधिवेशन संपल्यानंतर आणि पुढच्या अधिवेशनाच्या अगोदर मुंबई ऐवजी महाराष्ट्र अशी या कायद्याच्या नावामध्ये सुधारणा केली जाईल श्री.दिवाकर रावते :सभापती महोदय, मघाशी संसदीय कार्य मंत्र्यांनी असे सागितले की हे अधिवेशन संपण्याच्या अगोदर या कायद्याच्या नावात सुधारणा केली जाईल.

श्री.नारायण राणे : तेवढा वेळ नाही.

श्री.दिवाकर रावते : हे अधिवेशन संपण्यास अजून 15 - 20 दिवस आहेत.

श्री.नारायण राणे : त्या दृष्टीने देखील प्रयत्न करु.

श्री.दिवाकर रावते : आम्ही सर्व सन्माननीय सदस्यानी अशी सुधारणा मांडली आहे की एवढया कायद्यापुरती "बॉम्बेचा" उल्लेख "मुंबई" करण्याच्या दृष्टीने आम्ही सर्वजण ती सुधारणा सर्वानुमते मंजूर करतो अशा प्रकारे सुधारणेसह जर हे विधेयक मंजूर झाले तर सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यानी सागितल्याप्रमाणें तो कायदा कोणीही चॅलेंज करणार नाही.आम्ही "बॉम्बे स्टॅम्प ॲक्ट" हा कायदा मंजूर केला की "मुंबई स्टॅम्प ॲक्ट" मंजूर केला हे स्पष्ट होणे आवश्यक आहे. कायद्याच्या दृष्टीने एक एक शब्द अतिशय महत्वाचा असतो तेव्हा या विधेयकापुरती आम्ही सुधारणा आणण्या पेक्षा शासनानेच ती सुधारणा आणावी . म्हणंजे आपण कायद्याच्या भाषेतच विधेयक मंजूर करु . या विधेयकाच्या निमित्ताने बाकीच्या कायद्याच्या नावात सुधारणा करण्याची बाब देखील पुढे आलेली आहे. माननीय महसूल मंत्र्यांनी असे सांगितले की, बाकीच्या कायद्यातील बदल नंतर करण्यात येईल. परंतु त्या संदर्भात आम्ही असे सांगत आहोत की अधिवेशन संपायला अजूनही बरेच दिवस बाकी आहेत तेव्हा पुढच्या अधिवेशनात ही सुधारणा न

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करता आताच्या अधिवेशनातच ती करण्यात यावी याबाबतीत आम्ही आग्रही आहोत. ही सुधारणा आताच करण्यासाठी रात्रभर मंत्रालयातील सबंधितांना कामाला लावण्यात यावे. सामान्य प्रशासन विभागाने हे काम करावयाचे असल्यामुळे त्या अधिका-यांना रात्रभर कामाला लावा आणि हे अधिवेशन संपण्यापूर्वी ज्या कायद्यात असा बदल करण्याचे काम साचलेले असेल ते सर्व काम पूर्ण करु या. राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात हा अस्मितेचा विषय शासनाने मार्गी लावावा अशी सर्वच सन्माननीय सदस्यांची भावना आहे .त्याचबरोबर या कायद्याच्या नावात बदल करण्याच्या दृष्टीने शासनाने सुधारणा मांडावी व त्या सुधारणेसह हे विधेयक आपण मंजूर करु व त्यामुळे आपण योग्य पध्दतीचा कायदा पास करु अशा प्रकारे सार्वभौम सभागृहाने जर ही सुधारणा मंजूर केली तर इट इज अबॉव्ह ऑल प्रोसिजर होईल. माननीय मंत्री महोदयांना अशी विनंती करतो की त्यांनी अशा प्रकारची सुधारणा आणावी म्हणजे कायदा योग्य पध्दतीनेच आपण मंजूर करु. इंग्रजीमध्ये बॉम्बे या शब्दा ऐवजी "मुंबई स्टॅम्प ॲक्ट" अशी सुधारणा शासनाने करावी .

श्री.नारायण राणे :सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सुधारणा आणण्याच्या बाबतीत सूचना केली आहे.परंतु विधान सभेत हे विधेयक असेच्या असेच मंजूर झालेले आहे. सान्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे मुंबई ऐवजी महाराष्ट्र असा बदल करण्याचा आम्ही या अधिवेशनाच्या काळात प्रयत्न करु. हा बदल तीन चार दिवसात होईल किंवा पंधरा दिवसात होईल परंतु आता हे विधेयक थांबवू नये अशी माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे.

श्री.पाडुरंग फुंडकर : सन्माननीय मंत्री महोदयांना मी विनंती करतो की , आताच्या आता एक ओळीची सुधारणा सुचवली तर लगेच ती मंजूर करु .

श्री.नारायण राणे : खालच्या सभागृहात पुन्हा जावे लागेल.

श्री.पांडुरंग फुंडकर : खालच्या सभागृहात जाता येईल. त्यामध्ये काही अडचण येईल असे मला वाटत नाही. या सुधारणे पुरते हे विधेयक पुन्हा खालच्या सभागृहात मंजूर करुन घेता येईल. एक ओळीची सुधारणा माननीय मंत्री महोदयांनी आणावी त्याला आम्ही सर्वजण पाठिंबा देण्यास तयार आहोत." बॉम्बे " ऐवजी "मुंबई" असा बदल करण्याबाबतची सुधारणा या विधेयकासह मांडावी.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील : तशी सुधारणा आणता येणार नाही. सुधारणा आणण्याच्या संदर्भात आपण सूचना केली आहे. "बॉम्बे" हा शब्द असलेले विधेयक खालच्या सभागृहातून मंजूर करुन आता हे विधेयक वरच्या सभागृहात आणलेले आहे. आता "बॉम्बे" या शब्दा ऐवजी "महाराष्ट्र" असा बदल करावयाचा आहे. "बॉम्बे" ऐवजी "मुंबई" असा बदल त्यात करावयाचा नाही. या संदर्भात माननीय महसूल मंत्र्यांनी देखील खुलासा केलेला आहे.तेव्हा आता जे विधेयक मांडण्यात आलेले आहे ते विधेयक मंजूर करावे आणि ज्या ज्या कायद्यामध्ये बॉम्बे हा शब्द आहे त्यात बदल करण्यासाठी हे सत्र संपण्यापूर्वी विधेयक मांडून सुधारणा करण्याचा शासनाचा प्रयत्न राहील.

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते यांना मी सांगू इच्छितो की, या विधेयकाच्या संदर्भात आता बरीचशी चर्चा झाली आहे. स्वत: मंत्री महोदय सभागृहात आले आणि पुढच्या अधिवेशनामध्ये किंवा शक्यतो हे अधिवेशन संपण्यापूर्वी ही दुरुस्ती करण्यात येईल असे त्यांनी आपल्याला आश्वासित केलेले आहे . सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी यापूर्वीही मराठी भाषेच्या संदर्भात आग्रह धरला होता आणि तो आग्रह सभागृहाने मान्य केला होता . माननीय मंत्रीमहोदयांनी या ठिकाणी येऊन आश्वासन दिलेले आहे त्याचबरोबर माननीय संसदीय कार्य मंत्र्यांनी देखील मान्य केलेले आहे. तेव्हा मी आपल्याला विनंती करतो की .....

नतर श्री.सरफरे

अशुधारित प्रत / शीघ्रलेखाची नाही

उपसभापती....

या मुद्रांक शुल्क विधेयकाच्या बाबतीत माननीय महसूल मंत्र्यांनी आश्वासन दिले आहे. त्यामुळे त्यांचा मान राखून आपण हे विधेयक मांडण्यास अनुमती द्यावी...

श्री. दिवाकर रावते (बसून बोलतात) : आपल्याला कायद्याच्या बाबतीत तडजोड कशी करता येईल?

उपसभापती : परंतु त्यांनी आता मान्य केले आहे. आणि त्यांनी हे मान्य केल्यामुळे व सभागृहाला आश्वासन दिल्यामुळे ते आश्वासनाची पूर्तता करतील याची मला खात्री आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हे विधेयक सभागृहापुढे मांडीत असतांना त्याबरोबरच सुधारणा मांडली व ती मंजूर केली तर त्यास आपली हरकत काय आहे?

श्री. दिवाकर रावते (बसून बोलतात) : उद्या विधेयक घ्यावयाचे आहे असे आपण म्हणालो...

श्री. प्रकाश सोळंके : हे विधेयक सोमवारी घ्यावयाचे आपण कबूल केले आहे...

श्री. दिवाकर रावते (बसून बोलतात) : आपण उद्या विधेयक घेतो असे म्हणालो, विधेयक उद्या घेण्यास हरकत नाही..

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मी हे विधेयक मांडल्यानंतर आपण बोलावे...

पृ.शी.: मुंबई मुद्रांक (सुधारणा) विधयेक

L.A. BILL No. LV OF 2009

(A BILL FURTHER TO AMEND THE BOMBAY STAMP ACT, 1958)

श्री. प्रकाश सोळंके (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी विधानसभेने संमत केल्याप्रमाणे स□ 2009 चे वि.स.वि. □मां□ 55 मुंबई मुद्रांक अधिनियम, 1958 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असतांना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) व्दारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक विचारात घेण्याबाबत महाराष्ट्र विधानसभेस शिफारस केली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MMP/

श्री. प्रकाश सोळंके....

सभापती महोदय, या विधेयकाच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांना अधिक सोई-सवलती मिळाव्यात या उद्देशाने हे विधेयक आणले आहे. मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 च्या कलम 6 खालील परंतुकामध्ये सुधारणा करण्यासाठी हे विधेयक आणले आहे. सद्याच्या तरतुदीप्रमाणे प्रमुख दस्तावेजावर रितसर मुद्रांक शुल्क आकारल्यानंतर त्या दस्तावेजाच्या प्रतिसंलेखावर किंवा दुसऱ्या प्रतीलिपीवर 10 रुपये मुद्रांक शुल्क घेण्याची तरतूद दि.10.12.1085 सालापासून अस्तित्वात आहे. त्या संदर्भात सुचविलेल्या सुधारणेप्रमाणे मुबई मुद्रांक अधिनियम 1958 च्या अनुसूची एक मधील अनुच्छेद 27 नुसार प्रतिसंलेख किंवा दस्तावेजाच्या दुसऱ्या प्रतिलिपीवर दि.7.12.2005 पासून मुद्रांक शुल्क आकारण्याचे दर 100 रुपये आहे. त्यामुळे अनुच्छेद 27 मधील सुधारणेबरोबर कलम 6 मध्ये 100 रुपयांची सुधारणा करण्याची आवश्यकता होती. ती अनवधानाने करावयाची राहिली असल्यामुळे ही विंसगती दूर करण्यासाठी या विधेयकामध्ये आपण सुधारणा प्रस्तावित केली आहे.

सभापती महोदय, त्याचप्रमाणे आपण या विधेयकामध्ये नवीन कलम 10 क समाविष्ट करण्याच्या उद्देशाने ही सुधारणा आणली आहे. सद्याच्या तरतुदीप्रमाणे नोटरी यांच्याकडे साक्षांकित करावयाच्या दस्तावेजासाठी नोटेरियल स्टॅंपच्या स्वरुपामध्ये 25 रुपयांची नोटरी तिकिटे चिकटवावी लागतात.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके . . . .

आपल्या राज्यात काही ठिकाणी बनावट नोटेरिअल स्टॅम्पचे प्रकरण उघडकीस आल्यामुळे बनावट नोटोरिअल स्टॅम्प मुद्रकाच्या विक्रीस आळा बसावा व शासन महसुलाची गळती थांबावी यासाठी नोटोरिअल स्टॅम्पचे पैसे रोखीने किंवा डिमांड ड्राफ्टने अथवा पे-ऑर्डरने शासनाकडे जमा करण्यासाठी ही सुधारणा आपण आणलेली आहे. जेणकरुन बोगस तिकीटांना आळा बसण्यासाठी मदत होईल. कलम 48 (1) मध्ये प्रोव्हीजो, परंतुक यामध्ये सध्याची तरतूद अशी आहे की, "बिल्डरने ग्राहकाला मिळकतीचा ताबा देण्यास नकार दिला तरच करारनाम्यासाठी भरलेल्या मुद्रांक शुल्काचा परतावा देण्याची तरतूद सध्या आहे."परंतु कलम 48 (1) मधील परंतुकाप्रमाणे सध्या करारास मानीव खरेदी खत समजून मुद्रांक शुल्क आकारले जाते. असे करार रद्द झाल्यास खरेदी करणारा विकासक यांनी ताबा देण्याचे नाकारले या कारणाशिवाय इतर कारणासाठी मुद्रांक शुल्काचा परतावा देय नाही. त्यामुळे खरेदीदाराने ज्या उद्देशाने मुद्रांक शुल्क भरलेले असते, त्याचा मूळ उद्देश साध्य होत नाही. सामान्य खरेदीदाराना भरलेले मुद्रांक हे भूर्दंड ठरु लागलेले आहे. खरेदीदारांना बिल्डरचा नकार मिळविणे हे अत्यंत जिकीरीचे झालेले आहे. कलम 48 (1) प्रमाणे केवळ बिल्डरने ताबा देण्यास नकार दिला तरच परतावा देण्यात यावा असे विहित करण्यात आले होते. परंतु साठेखत रद्द होण्यासाठी अनेक कारणे असू शकतात. जसे आर्थिक व्यवहार पूर्ण न होणे, ठरल्याप्रमाणे सदनिकेचे काम न होणे, बांधकामास विलंब लागणे, कर्ज मंजूरीबाबत अडचणी निर्माण होणे अशा कारणांमुळे सदर करार रद्द झाल्यास खरीददार जनतेस न्याय मिळावा म्हणून सदर सुधारणेमुळे अन्य कारणास्तव रद्द झालेल्या कारणामुळे परतावा मिळू शकेल यासाठी ही सुधारणा . . ..

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : टाईम लिमिट काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, यासाठी जे काही टाईम लिमिट ठरलेले आहे, त्यामध्येच. पूर्वीच्या कायद्याप्रमाणे जे टाईम लिमिट ठरलेले आहे त्यामध्ये आपण बदल केलेला नाही. परंतु अनेक कारणे आहेत, त्यामध्ये निश्चितपणे वाढ केलेली आहे. मुद्रांक अधिनियम 1958 च्या अनुच्छेद 36 (अ) (1) (अ) यामध्ये मुंबई शहर आणि उपनगर जिल्ह्यातील संमती आणि परवानगी म्हणजे लिव्ह ॲण्ड लायसन्स्च्या कराराने दिल्यास त्याचे वार्षिक सरासरी भाडे प्रतिपूर्ती ठेव किंवा डिपॉझिटची रक्कम अडीच लाखापेक्षा अधिक होत नसेल तर कालावधीचे प्रत्येक बारा ...

. . . .4 एफ-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके . . . .

महिने व त्याच्या भागासाठी 750 इतके मुद्रांक शुल्क घेण्याची तरतूद आहे. तसेच आपण जर पुणे आणि ठाणे शहराचा विचार केला तर त्याठिकाणी 500 रुपये असा दर आहे. मुंबई आणि उपनगर याठिकाणी 750 रुपये म्हणजे दीडपट दर आहे, तो कमी करुन 750 रुपयावरुन 600 रुपये आणि व्यवसायिक मिळकतीसाठी 1500 रुपयावरुन 1200 रुपये करण्यासाठी ही सुधारणा येथे आणलेली आहे. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांन विचारले की,वेळेची मर्यादा काय आहे ? तर आपल्याला याचा परतावा दोन वर्षापर्यंत देता येतो. यासंदर्भात प्रामुख्याने सर्वसामान्य जनतेला अधिक सोयी मिळाव्यात म्हणून हे विधेयक आणलेले आहे म्हणून मी सभागृहाला अशी विनंती करतो की, आपण सर्वांनी या विधेयकाला एकमताने पाठिंबा द्यावा.

प्रश्न प्रस्तुत झाला.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या विधेयकावर चर्चा करण्यापूर्वी कायद्याच्या नावातील बदलाच्या संदर्भात केवळ आपली विनंती आणि माननीय मंत्रिमहोदयांनी दिलेला शब्द असे मी याठिकाणी म्हणतो कारण आश्वासन म्हणणे बरोबर होणार नाही. सभापती महोदय, अशी तीन वेगवेगळया विषयाची विधेयके माझ्याकडे आहेत. 1980 सालापासून ही प्रक्रिया अपूर्ण ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांच्या बाबतीत मला अत्यंत तीव्र शब्दात निषेध नोंदवावयाचा आहे. ही प्रक्रिया सरकारच्या पातळीवरुन वेगवेगळया उच्च खात्याचे जे सचिव आहेत त्या सचिवांचा कारभार आणि त्यांची कारकीर्द ही वर्षामध्ये मोजली गेल्यानंतर त्यांना प्रधान सचिवांचे प्रमोशन द्यावे लागते आणि त्या प्रधान सचिव पदाचा त्यांना पगार द्यावा लागतो. पूर्वी असे नव्हते. एकच प्रधान सचिव आणि बाकीचे सगळे सचिव सेवाज्येष्ठतेनुसार प्रत्येक खात्याचा सचिव हे प्रधान सचिव म्हणून पद लावतो कारण ते त्या ग्रेडला पोहचलेले असतात. मला त्यांच्या बद्दल आदर आहे कारण त्यांच्या ज्येष्ठतेचा प्रशासनाला अनुभव मिळत असतो त्या अनुभवातून प्रशासन चांगले चालावे अशी अपेक्षा असते पण नेमके मुंबई आणि महाराष्ट्राच्या अस्मितेबाबत हे अधिकारी गाफील असतात. या आठवडयामध्ये मला संधी मिळाल्यानंतर मी दोन गोष्टी उघडकीस आणणार आहे. मराठी पायदळी तुडविण्याचे कारस्थान या महाराष्ट्राच्या राजधानीमध्ये हे अधिकारी कसे करीत असतात हे येत्या दोन आठवडयात मी वेगवेगळया माध्यमातून मांडणार आहे. सभापती महोदय, हा विषय सरकारवरील टीकेचा नसून सरकारमध्ये बसलेले माझे जे सहकारी आहेत त्यांच्याही अस्मितेचा हा विषय आहे. इच्छा असून सुध्दा अधिकारी जाणीवपूर्वक ते करीत नसतील तर त्यांच्यावर योग्य निर्बंध घालणे हा महत्वाचा भाग आहे. दुर्दैवाने म्हणा किंवा सुदैवाने म्हणा हे प्रशासकीय खाते माननीय मुख्यमंत्र्यांकडे असल्यामुळे त्यांचा त्यांच्यावर अंकुश असण्याची अत्यंत आवश्यकता आहे. म्हणून मी याठिकाणी श्री. अजित पवार यांना विनंती करतो की, तुम्ही माननीय मुख्यमंत्र्यांच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या सुवर्णमहोत्सवी वर्षामध्ये हे अत्यंत गांभीर्याने घेतले पाहिजे.

सभापती महोदय, मी आपल्या विनंतीला मान देऊन माननीय मंत्रिमहोदयांनी शब्द दिल्यामुळे हा चुकीचा कायदा जरी असला तरी खालच्या सभागृहात तो मंजूर होऊन आलेला असल्यामुळे व हे आर्थिक बिल असल्यामुळे या सभागृहात ते मंजूर करण्यात यावे अशी विनंती केल्यामुळे मी या विधेयकावर बोलायला उभा आहे. परंतु ही चूक पुन्हा अपेक्षित नाही हे गृहीत

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

धरुन मी याठिकाणी बोलत आहे. कुठल्याही परिस्थितीमध्ये याच्यामध्ये तडजोड असता कामा नये, आणि हे आपल्यालाही मान्य असेल असे माझे मत नाही. सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी हा कायदा मांडतांना याला जी कलम 6 ची सुधारणा याठिक्राणी त्यांनी साळसूदपणाने सांगितली. त्यावेळी माननीय मंत्रिमहोदयांनी असे म्हटले की, हे जनतेच्या हिताचे आहे. म्हणून मी असे म्हटले की, जनतेच्या हिताचे आहे तर आपण ती मंजूर करु. पण दहा रुपयाची तरतूद एका ठिक्राणी आहे आणि बाकीच्या ठिकाणी 100 रुपयाची तरतूद आहे ती समपातळीवर यावी म्हणून ती दहा रुपये केली असती तर 90 रुपये जनतेचा फायदा झाला असता आणि ती फायद्याची तरतूद झाली असती.. परंतु राहिलेली चूक सुधारण्याकरिता आणि ती समपातळीवर आणण्याकरिता ती शंभर रुपये करण्याचे निवेदन केलेले आहे. त्यात जनतेचा फायदा नाही तर जनतेकडून शासनाला महसूल मिळेल, हा विषय आहे.

सभापती महोदय, या विधेयकामध्ये "नवीन कमलम 10क समाविष्ट करणे" हा चांगला विषय आहे.विधेयकामध्ये शुध्द मराठीमध्ये 'बनावट' असे लिहिले आहे पण सवयीप्रमाणे आपण 'बोगस' हा शब्द वापरलेला आहे. कारण बदमाशी करणाऱ्या माणसाला बोगस म्हटले की आपण काय करतो हे बरोबर समजते. तू बनावट आहेस म्हटल्यानंतर त्याला कळत नाही पण तू बोगस आहेस म्हटल्यानंतर त्याला बरोबर कळते. म्हणून तुम्ही तो शब्द याठिकाणी चपलखपणे वापरलेला आहे. तुमच्या खात्याच्या कारभाराच्या संदर्भात हा शब्द चपलख आहे. म्हणूनच सभापती महोदय, मी या खात्यातील बनावटगिरीच्या काही गोष्टी येथे सांगण्याचा प्रयत्न करणार आहे. त्या गोष्टी ऐकल्यानंतर मी कुठल्या खात्याचे मंत्रीपद सांभाळतो असा आपल्याला नक्की प्रश्न पडेल, अशी परिस्थिती आहे. या मुद्रांक शुल्क कार्यालयामध्ये काही कर्मचाऱ्यांची मोनोपली आहे.मोनोपली हा शब्द वापरला की तो बरोबर कळतो. पण त्यांचे अधिराज्य आहे असे म्हटले की, ते कळत नाही. (अडथळा) सभापती महोदय, मक्तेदारी आहे वगैरे हे सगळे शब्द माहीत आहेत पण शुध्द मराठी शब्द 'मोनोपली' हा वापरला की ते लगेच लक्षात येते. (अडथळा) मी नेहमी शुध्द मराठी असे सांगतो तेव्हा त्याचा अर्थ लगेच लक्षात येतो. सन्माननीय सदस्य श्री. कुलकर्णी साहेबांना ते माहीत आहे.

यानंतर श्री. बरवड..

अशुद्धित प्रत / मुद्रणासाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

अत्यंत विदारक आणि दुर्दैवी सत्य या ठिकाणी मांडताना मला अत्यंत दु:ख होत आहे. या सरकारी कार्यालयामध्ये नक्की काय चालले आहे ? तिकडचे अधिकारी बदलले जात नाहीत. फक्त तांत्रिकदृष्ट्या या टेबलावरुन त्या टेबलावर आणि त्या टेबलावरुन या टेबलावर बदली केली जाते. कार्यालयाच्या बाहेर बदली होत नाही आणि कमविण्याची शिकस्त चालू असते. माझ्याकडे सगळी नावे असली तरी मी काही नावे उद्धृत करणार आहे. शितावरुन भाताची परीक्षा केल्यानंतर करपलेला भात काढून टाकता येतो याची मला जाणीव आहे आणि आपण ते कराल अशी अपेक्षा आहे. माननीय मंत्रिमहोदय त्याबाबतीत नक्कीच दखल घेतील. माननीय राज्यमंत्र्यांना फार त्रास पडणार नाही याची मला खात्री आहे. त्या ठिकाणी श्री. अनिल देशमुख नावाचे कनिष्ठ लिपिक आहेत. ते 1999 ते 2009 पर्यंत त्याच ठिकाणी आहेत. दुय्यम निबंधक, मुंबई शहर येथे मूल्यांकन कारकून म्हणून तीन वर्षे ते होते. या पदावर त्यांची प्रतिदिन कमाई 25 हजार रुपये होती. मग एवढा लाभांश मिळत असताना तेथून कोण उठणार आणि जा म्हणून सांगण्याची कोणाची हिंमत आहे ? कारण एवढी माया जमविल्यानंतर जा म्हणून सांगणाऱ्याचे तोंड बंद करण्याचे सामर्थ्य त्या अधिकाऱ्याकडे येत असते. असे अनेक अधिकारी आहेत. तीन वर्षे झाल्यानंतर त्यांची बदली केली पाहिजे. पण तेही हुशार आणि त्या काळातल्या बदली करणाऱ्याचे तोंड बंद करण्याचे त्यांचे सामर्थ्यही मोठे म्हणून त्यांची बदली त्याच भागामध्ये निपटारा विभाग म्हणजे डिस्पॅचमध्ये फक्त तीन महिन्यांकरिता केली. ते फक्त तीन महिने तिकडे गेले आणि पुन्हा एकदा दस्तऐवजाची सूची दोन मध्ये नोंदणी करण्याच्या ठिकाणी त्या टेबलावर ते बसले. त्यांची बदली बाहेर झाली नाही. उंबरठा ओलांडावयाचा नाही. लक्ष्मी उंबरठ्याच्या आत आहे, ती दरवाजात उभी रहात नाही, तिला बाहेर काढावयाचे नाही, तिला आपल्या घरी घेऊन जायचे म्हणून उंबरठा ओलांडावयाचा नाही. त्यानंतर या संबंधित महोदयांची तेथून नोंदणी तथा मुद्रांक उपमहानिरीक्षक, मुंबई यांच्या कार्यालयात म्हणजे तेथेच बदली झाली. त्या ठिकाणी प्रतिदिन उत्पन्न 1 लाख रुपये आहे. काय माया आहे त्या ठिकाणी ? त्या ठिकाणी हे सन्माननीय गृहस्थ 5 वर्षे होते. त्यांना आशीर्वाद कोणाचे होते ? आमचे मित्र वरच्या दर्जाचे आय.ए.एस.अधिकारी आहेत त्यांची मर्जी त्यांच्यावर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

आहे. मग ते मुख्यमंत्री कार्यालयात आले. मुख्यमंत्री कार्यालयात गॉडफादर आहे म्हटल्यानंतर आपली बदली कोण करणार ? त्यांच्या मेहरबानीने ते तिकडे पाच वर्षे राहिले. श्री. रामराव शिनगारे हे मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी तथा नोंदणी महानिरीक्षक, पुणे यांच्या नियंत्रणाखाली हे सर्व चालते. त्यानंतर तिथून त्यांची बदली मुंबई शहर दुय्यम निबंधक कार्यालय (2) मध्ये म्हणजे त्याच ठिकाणी झाली. वर एवढा आशीर्वाद असल्यावर काय करणार ? त्या ठिकाणी ते टोकन बुकींग क्लार्क म्हणून अडीच वर्षे होते. त्या ठिकाणी सुध्दा प्रतिदिन 15 हजार रुपये उत्पन्न आहे. परत त्याच ठिकाणी दुय्यम निबंधक तथा प्रशासकीय यांच्या कार्यालयात ते गेले. जून 2009 ते आतापर्यंत वरिष्ठ कारकून म्हणून ते प्रशासन विभागात आहेत. आपल्याला पत्ताही असेल की नाही हे मला माहीत नाही. परंतु एक व्यक्ती सातत्याने आपल्या टेबलावर बसून गडगंज माया कमवितो आणि त्या मायेचा तो कसा उपयोग करतो हे पुढे सांगितल्यानंतर आपल्याला आणखी जबरदस्त धक्का बसेल. एकाच जिल्ह्यामध्ये तीन वर्षाकरिता नियुक्ती असा कायदा आहे. तीन वर्षात बदली केली पाहिजे. आपण श्री. अण्णा हजारे यांना शब्द देऊन आला आहात. कायदा आहे पण तो पाळला जात नाही म्हणून श्री. अण्णा हजारे पुन्हा उपोषणाला बसले. बदली या एका प्रकरणावरुन श्री. अण्णा हजारे यांनी सरकाला हलविले आणि मग आपल्याला गुडघे टेकून श्री. अण्णा हजारे यांच्यापुढे जावे लागले. यापुढे आम्ही कोणालाही तीन वर्षाच्या पुढे त्या टेबलावर ठेवणार नाही असा शब्द आपण श्री. अण्णा हजारे यांना दिला आणि कायद्यात तरतूद केली. पण यांना श्री. अण्णा हजारे सुध्दा लागू पडत नाहीत. ते त्याच ठिकाणी आहेत.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

सभापती महोदय, ते खास मर्जीतील असल्यामुळे तेथून का हलत नाहीत असा प्रश्न पडलेला आहे. त्या व्यक्तीचे ऐकून आपल्याला सर्व व्यवहार पार पाडावयाचे आहेत हे तेथे येणा-यांना माहिती असल्यामुळे कोणी काही बोलत नाही. कारण वरपर्यंत हात पोहोचलेल्या माणसाला कोण काय बोलणार ? त्यांचे हात कोठपर्यंत पोहोचले आहेत हे मात्र कोणी सांगू शकत नाही. माननीय मंत्री महोदयांची याची किती कल्पना असेल ते मला माहीत नाही. कारण सरकारे आली आणि गेली, अनेक महसूल मंत्री बदलले परंतु या व्यक्तीची बदली होत नाही. दुय्यम निबंधक कार्यालय, मुद्रांक महानिदेशक यांच्यासाठी ते श्री.रामराव शिनगारे आता तेथे बसून काय करतात तर सर्व कार्यालयातील संबंधितांची माया जमविण्याचे काम करतात. म्हणजे हिशेब करतात. ही एकूण 17 कार्यालये आहेत. प्रत्येक कार्यालयात 6 करकून आहेत. दुय्यम निबंधक दर आठवडयाला 10 हजार रुपये घेऊन जातो. 40 हजार गुणिले 30 याप्रमाणे 1 लाख 20 हजार रुपये होतात. त्याठिकाणी पोस्टींगचे द्यावे लागतात. ते पैसे कोण घेतात हे शासनाने शोधले पाहिजे. याच कार्यालयामध्ये श्रीमती सुजाता मोरे नावाच्या आमच्या भगिनी काम करतात. दुय्यम निबंधक कार्यालय, मुंबई हे त्यांचे कार्यालय आहे. कनिष्ठ लिपिक म्हणून त्यांनी तेथे 11 वर्षे काम केले आहे. त्यांची केवळ दोन दिवसांसाठी तांत्रिक बदली उपनगरामध्ये दाखविण्यात आली. तेथे त्या गेल्या नाहीत, हे पडताळून पहावे. एक शब्द इकडे तिकडे चुकणार नाही. शासन त्या कार्यालयाला आवश्यक तेवढा कर्मचारी वर्ग दिला जातो की नाही याची मला कल्पना नाही. हे सर्व माहितीच्या आधारे मी मिळविले आहे. पण ही माहिती देण्याचे नाकारले होते. सभापती महोदय, या कार्यालयात नोंदणी करण्याचा प्रचंड ओघ आहे आणि हे सर्व कामकाज तेथील 2-3 व्यक्ती बळकावून बसल्या आहेत. ते कोणाला येऊच देत नाहीत. मी म्हणतो खायचे असेल तर सर्वांनी मिळून खा. परंतु आमच्याशिवाय कोणी खायचे नाही. त्याठिकाणी या 2-3 माणसांची मोनोपोली आहे. या मंडळींनी अधिकृतपणे खाजगी नोकर ठेवले आहेत. ते तेथे टेबल टाकून बसले आहेत. त्यांना रोज 200 ते 400 रुपये पगार आहे. सुजाता मोरे यांच्याकडे मुंबई शहरातील दस्तऐवजासाठी गणेश नावाचा माणूस आहे. मुंबई उपनगरसाठी राजेश नावाचा माणूस आहे. मी

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ SBT/

श्री.दिवाकर रावते....

आडनावे सांगत नाही. महाराष्ट्रातील जुन्या दस्तऐवजासाठी जितू आणि त्याची पत्नी काम करीत आहेत. महाराष्ट्रा बाहेरील दस्तऐवजासाठी 3 खाजगी मुली ठेवलेल्या आहेत. डिस्पॅच बटवडयासाठी मामा नावाचा एक शिपाई आहे. तो जुने दस्तऐवज काढावयाचे, त्याचा बटवडा करुन ते जुन्या लोकांना द्यावयाचे, त्याचे पैसे घ्यायचे. तेथे भोजने नावाचा शिपाई आहे त्याचा हा मामा आहे. म्हणजे सगळे लोक विश्वासातील ठेवले आहेत. त्यांना बाहेरचे कोणी नको. एक दस्तऐवज दिला की, 100 रुपये मिळतात. हे जे बोगस कारकून ठेवले आहेत त्यांचे माझ्याजवळ 8-10 फोटो आहेत त्यातील मी केवळ दोन फोटो आपल्याला दाखवितो. हे लोक सरकारी दस्तऐवज हाताळत आहेत. सरकारी दस्तऐवजी हाताळण्याचा कोणालाही अधिकार नाही. मंत्री महोदयांना मी सांगेन की, आपण तेथे जाऊन पहावे. त्या लोकांऐवजी आपले सहकारी कर्मचारी खातील. परंतु त्यांनी बाहेरच्या लोकांना नोकरीला ठेवले आहे. मुद्रांक कार्यालयाच्या संदर्भातील जनतेच्या हितासाठी हे विधेयक आणले आहे असे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. यासंदर्भात तक्रार झाल्यानंतर 4 दिवसाच्या तपासणीच्या वेळी हे लोक बाहेर होते. तपासणी झाल्यानंतर पुन्हा आतमध्ये सर्व पूर्ववत व्यवहार सुरु आहेत.

सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेतील एक झाडू कामगार आहे. तो कामगार सकाळी आपली हजेरी लावतो. हजेरी लावल्यानंतर मुद्रांक कार्यालयामध्ये येतो. ही सर्व कामे तो स्वत: करतो.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते...

ही सगळी कामे ते तेथे करतात. ते बाहेर मुलाच्या नावाने झेरॉक्स मशीन चालवितात. तेथे काम करतात. बाकीची सगळी कामे ते करतात आणि पगार महापालिकेचा घेतात. या चार लोकांच्या बाहेर आमचा कारभार जाता कामा नये. या विधेयकामध्ये बोगस शब्द व्यवस्थित वापरलेला आहे. हे जे प्रकार मुद्रांक कार्यालयात चालतात त्याबाबत संबंधितांचे फोटो माननीय मंत्री महोदयांनी मागितले तर ते त्यांना देण्याची माझी तयारी आहे. सभापती महोदय, आता या कार्यालयामध्ये परिस्थिती अशी आहे की, जर ही सर्व मंडळी बाहेर गेली तर सरकारी कर्मचा-यांना या कार्यालयातील कोणताही दस्तऐवज सापडणार नाही, त्यांना काहीही मिळणार नाही. 20-25 वर्षापूर्वी नोंदणी झालेले दस्तऐवज अजूनही लोकांना मिळालेले नाहीत. ते अजूनही सापडत नाहीत. मी दोन वर्षापूर्वीची गोष्ट सांगतो. मी 1978-79मध्ये ॲग्रीमेंट रजिस्टर केले होते. त्याची रिसिट माझ्याकडे होती. मी ते मागण्यासाठी गेलो त्यावेळी मला सांगण्यात आले की, ते ॲग्रीमेंट पुण्याला गेलेले आहे. त्यानंतर मी सोनावणे साहेबांना फोन केला. त्यांनी मला रिसिटचा फॅक्स करण्यास सांगितले. मी फॅक्स केल्यानंतर त्यांनी मला सांगितले की, डॉक्युमेंट माझ्या टेबलावर आहे. त्यांनी माझे डॉक्युमेंट शोधून दिले. त्यांच्या कार्यक्षमतेबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. अशा प्रकारे कोणीही त्यांच्याकडे डॉक्युमेंटची मागणी केली तरी ते त्यांना मिळेल. मला हे सांगावयाचे आहे की, ही डॉक्युमेंटस त्या लोकांनाच माहीत आहेत. बाकी कुणालाही ती माहीत नाहीत. सरकारी कार्यालयामध्ये चालणारे हे जे प्रकार मी सांगितलेले आहेत त्याबाबत माननीय मंत्री महोदय कोणती कारवाई करणार आहेत. देशमुख, सुजाता मोरेताई हे कोण आहेत ? सहायक निबंधक, अंधेरी येथे हे लोक 12 वर्षे काम करीत आहेत. त्यांची बदली होत नाही. ही बदली का होत नाही ? तर हे सर्व आणि दुय्यम निबंधक अशी 12 मंडळी आहेत. यांना सरकारी वसाहतीमध्ये गेस्टहाऊसप्रमाणे दोन सदनिका दिलेल्या आहेत. ही सर्व मंडळी येऊन तेथे राहातात. त्यांची उठण्या-बसण्याची,सर्व व्यवस्था वावरे नावाचे शिपाई करतात. दुपारी ते तेथे जातात आणि प्रत्येकाचे भरलेले पाकीट घेतात. पाकीट तेथे आणून ठेवलेले असते. त्यातील पैसे कुठे जात नाहीत. या पैशाची जेथे इन्व्हेस्टमेंट करायची असेल तेथे करुन त्याच्या चिठ्ठया आणून ठेवल्या जातात. एवढी उत्तम प्रकारे सेवा करणारा माणूस असेल तर त्याला 12 वर्षे कोण हलविल ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते...

सभापती महोदय, गोंदालाही लाज वाटावी अशा रितीने 10-10, 12-12 वर्षे ही माणसे चिकटून राहातात. कारण त्यांना तेथे लक्ष्मीदर्शन होते आणि ते सोडायला ते तयार नाहीत. सन्माननीय मंत्री महोदयांनी बॉम्बे या शब्दासंबंधी सभागृहामध्ये शब्द दिलेला असल्यामुळे त्यासंदर्भातील कार्यवाही ते करतील. त्याबद्दल प्रश्न नाही. त्यामुळे माननीय मंत्री महोदयांनी विनंती केल्यानंतर त्यांचा मान ठेवून मी या चर्चेमध्ये भाग घेतला.

...नंतर श्री. भोगले...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

सभापती महोदय, ज्यावेळेला हे विधेयक आले त्यावेळेला काही गोष्टी या स्वयंपूर्ण आणि मी सर्वस्व आहे असे समजून करता त्यावेळी या सार्वभौम सभागृहाचा अवमान होतो. सभापती महोदय, मुद्रांक अभिनिर्णय अधिनियमाच्या कलम 31 मधील उचित मुद्रांकासंबंधी अभिनिर्णय या नियमाबाबत मी बोलत आहे. या कायद्यामध्ये स्पष्ट तरतूद आहे. हे कलम म्हणजे ॲडज्युडिकेशन संदर्भातील आहे. हे कलम स्वेच्छा अभिनिर्णयाशी संबंधित आहे. स्वेच्छा हा शब्द महत्वाचा आहे. बाजारमूल्याच्या आधारे जे मुद्रांक शुल्क प्रदेय आहे किंवा कसे आणि मुद्रांक शुल्क यथामूल्य तत्वावर प्रदेय आहे किंवा कसे या संदर्भात अधिनियमाच्या अनुसूची 1 मध्ये उल्लेख केलेल्या सर्व दस्तऐवजांना लागू आहे. हे मँडेटरी नाही. ऐच्छिक आहे. स्वेच्छानिर्णय आहे. मी ॲडज्युडिकेशन करुन घ्यायचे की नाही याचे कारण काय? शासनाने रेडी रेकनर दिलेला आहे. रेडी रेकनरमधील ठरलेल्या दराप्रमाणे मुद्रांक शुल्क कार्यालयातील कारकून नेमला आहे त्याचे मुद्रांक शुल्क काढून देण्याचे काम आहे. त्याला ॲडज्युडिकेशन केलेच पाहिजे असे नाही. समजा मी अभिनिर्णय करुन घेतले आणि समजा तो चुकला तर शासनाला पुन्हा कायद्यात अधिकार आहे. जे मुद्रांक शुल्क कमी घेतले असेल ते रिकव्हर करण्याचा शासनाला अधिकार आहे. ॲडज्युडिकेशन बरोबरच असते असे नाही. मुद्रांक शुल्क कार्यालयात असलेल्या कारकुनाने रेडी रेकनर कायद्यातील तरतुदीप्रमाणे ॲडज्युडिकेशन केल्यानंतर पर्यायी वाद निर्माण होत नाही. ही तरतूद कायद्यामध्ये आहे. हा कायदा विधीमंडळाने बनविलेला कायदा आहे. विधीमंडळाने कायदा केला आणि त्याची अंमलबजावणी करण्याचे काम त्यांच्याकडे दिले आहे. कलम 31 नुसार स्वेच्छा हा शब्द असतानाही संबंधित अधिकाऱ्यांनी एक सर्क्युलर काढले. कायद्यापुढे जाऊन बंधन निर्माण करता येईल का? सर्क्युलर काढून कायदेशीर बंधन निर्माण करता येईल का हा प्रश्न उपस्थित होतो. फक्त 3 कारकून आणि एक दुय्यम निबंधक आहे. तुमच्याकडे पुरेसा स्टाफ नाही. दुय्यम निबंधक म्हणजे सब रजिस्ट्रार, मुद्रांक जिल्हाधिकारी अभिनिर्णयाचे काम करतात. दस्त नोंदणीची मागणी रोज 100 ते 150 आहे. हा कर्मचारीवर्ग रोज जास्तीत जास्त 30 ते 40 प्रकरणे हातावेगळी करु शकतात. या पलिकडे करता येत नाहीत. मी स्वत: त्या कार्यालयात गेलो होतो. प्रत्यक्ष त्यांच्याशी चर्चा केल्यानंतर असे लक्षात आले की, कितीही प्रयत्न करावयाचे म्हटले तरी शक्य नाही. ते कार्यालयात सकाळी 9 ते रात्री 10 वाजेपर्यंत

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

बसतात. लवकर घरी जात नाही. माया आहे. त्यामुळे लवकर घरी जात नाहीत. रोज 30 ते 40 प्रकरणे निकाली काढतात. कोर्टात खटले वाढतात तसे रोज 50 -60 प्रकरणे वाढत आहेत. माझे प्रकरण लवकर करावयाचे म्हटले तर माझा रेट 10 रुपयांवरुन 100 रुपये होतो. माझे प्रकरण लवकर करुन द्या म्हटल्यानंतर भ्रष्टाचारास वाव मिळतो. ही मंडळी हुशार आहेत. अव्वाच्या सव्वा पैसे मिळतात. मुंबईमध्ये ॲडज्युडिकेशन करणे किती महत्वाचे आहे हे मंत्रीमहोदयांना नक्की माहिती आहे. सभापती महोदय, आपल्यालाही माहिती असेल. रिअल इस्टेटशी जे संबंधित आहेत त्यांना याची सगळी कल्पना असते. माझे डॉक्यूमेंट अर्जंट असेल तर मी किंमत देतो. 1 लाख, 2 लाख, 5 लाख रुपये देतो. It is need of time. भ्रष्टाचाराला वाव देणारी ही व्यवस्था तुमच्याकडे आहे. भ्रष्टाचाराचे दर कसे आहेत? ते दर 1 लाखापासून 10 लाखापर्यंत आहेत. साधे डॉक्यूमेंट असेल तर 10 हजार रुपये.

4एल.1...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

10 हजाराच्या खाली काहीच नाही. हे सगळे कसे चालू आहे हे सर्वांना माहीत आहे. अशा प्रकारे सर्कुलर काढण्यात आले, सूचना पत्र काढण्यात आले व त्या माध्यमातून असा बदल करण्यात आला. तसेच "अनुज्ञेय चटई क्षेत्राबाबत संबंधित महानगरपालिकेच्या सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र" असेही यात म्हटले आहे. तेव्हा अशा प्रकारे सर्कुलर काढता येते काय हा माझा पहिला प्रश्न आहे. माझे म्हणणे असे आहे की, ज्याप्रमाणे मी कायद्यातील कलम वाचून दाखविले तसेच या कायद्यामध्ये कलम 69-नियम करण्याचा अधिकार, यातील पोट कलम (4) मध्ये दिलेला आहे "या कलमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम (जो 31 वा नियम मी वाचला तो) तयार करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर राज्य विधिमंडळाचे एक अधिवेशन किंवा लागोपाठची दोन अधिवेशने मिळून एकूण 30 दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता चालू असलेल्या राज्य विधिमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल. म्हणजेच सुधारणा असेल तर ती सभागृसमोर 30 दिवसाच्या आत आली पाहिजे. मुंबई मुद्रांक अधिनियम, 1958 आणि इंग्रजी मध्ये "Bombay Stamp Act & Rules, 1958" असे नाव दिलेले आहे. प्रत्येक सभागृहासमोर मान्यतेसाठी ठेवण्यात येईल. ज्या अधिवेशनात तो कायदा अशा रितीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगत नंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी जर कोणता फेरबदल करण्याकरिता दोन्ही सभागृहास मतैक्य होईल किंवा नियम करु नये म्हणून दोन्ही सभागृहांचे मतैक्य होईल व असा निर्णय शासकीय राजपत्रात अधिसूचित करतील तर तो नियम अशा सूचनेच्या तारखेपासून अशा फेरबदल केलेल्या स्वरुपात अमलात येईल किंवा यथास्थित मुळीच अमलात येणार नाही. तथापि असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे तो नियम केला यापूर्वी केलेला किंवा करण्याचे वगळलेल्या अशा कोणत्याही गोष्टीची विधिग्राह्यतेस बाधा येणार नाही." याचा अर्थ असा आहे की, माननीय मंत्री महोदयांनी हे जे सूचना पत्र आणि सर्कुलर काढले आहे तो अधिकार त्यांना नाही. "स्वेच्छा" हा शब्द त्यांनी यामध्ये टाकण्याचा प्रयत्न केला. वास्तविक खात्याच्या सचिवांनी ही बाब निदर्शनास आणून देण्याची गरज होती. त्यानंतर माननीय मंत्री महोदयांनी माननीय राज्यपालांकडे तशी विनंती करुन यासंबंधी राजपत्र काढण्याची गरज होती आणि लगतच्या अधिवेशनात तशी सुधारणा आणणे आवश्यक होते. त्यानंतर ती सुधारणा कायद्यात रुपांतरित झाली असती असे हा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

कलम 69 सांगतो. असा कायदा असताना सुध्दा आपल्या हातात विधिमंडळाचे अधिकार घेऊन अशा सर्कुलरच्या माध्यमातून "स्वेच्छा" शब्द काढून हा बदल करण्यात आला हे योग्य नाही. कारण तो एक प्रकारे आमच्या अधिकाराचा, या सभागृहाचा हक्क भंग असून मी संबंधित अधिकाऱ्यांवर हक्कभंग आणण्याची परवानगी माननीय सभापतींकडे मागत आहे, त्याचे रुलिंग आम्हाला पाहिजे. अशा अधिकाऱ्यांवर हक्कभंग आणण्याचा मी निर्णय घेतला असून त्यासाठी आपली मान्यता पाहिजे. यामध्ये मंत्री महोदयांच्या खात्याचा किंवा मंत्रिमंडळाचा संबंध आहे असे मी म्हणत नाही पण ही बाब सचिवांच्या माध्यमातून तसेच मंत्री महोदयांच्या माध्यमातून सभागृसमोर येणे आवश्यक होते. पण तसे न करता गेली 11-12 वर्षे आम्ही आहोत आमचे टेबल, आम्हीच पाहणार, आम्हीच निर्णय घेणार असा जो प्रकार चालू आहे ते योग्य नाही. अशा प्रकारचे सर्कुलर काढून राज्यातील जनतेची लूट करण्याचे काम होत असेल, मालमत्तेच्या संदर्भात जनतेची लूट होणार असेल तर ते योग्य नाही. कारण शासनाकडे जनतेला लाखो-करोडे रुपये भरावयाचे असतात.....

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

शासन जी काही 1 लाख, 2 लाख, 3 लाख स्टँप ड्यूटी आकारते ती भरावीच लागते. आमदारांनी सुध्दा स्टँप ड्यूटी भरलेलीच आहे. आम्ही आमदार आहोत म्हणून आम्ही स्टँप ड्यूटी भरणार नाही, आमची स्टँप ड्यूटी माफ करावी किंवा त्यामध्ये आम्हाला सूट मिळावी म्हणून आम्ही महसूल मंत्र्यांना भेटलो नाही. कायदा असेल तर तो सर्वांनी स्वीकारलाच पाहिजे. आम्ही लाखो रुपये भरावयाचे परंतु ते भरण्यास सुध्दा आम्हाला सरळ संधी मिळू नये ? आमची वसुली झाल्याशिवाय आम्ही तुम्हाला सरळ करु देणार नाही. म्हणजे यांच्या टेबलाची वसुली महत्वाची. पहिले त्यांचा रेव्हेन्यू स्टँप लावावयाचा, अधिका-यांनी थुकी लावली की, मग आम्हाला जे काही लाखो रुपये भरावयाचे ते आम्ही भरावयाचे. या सूचनापत्रामध्ये म्हटले आहे की, "तसेच अनुज्ञेय चटई क्षेत्राबाबत संबंधित महानगरपालिका, म्हाडा प्राधिका-याचे प्रमाणपत्र बंधनकारक असेल." म्हणजे माझ्या जागेचे जे चटईक्षेत्र आहे त्याचे बाजार मूल्य ठरवितांना अनुज्ञेय चटईक्षेत्र निर्देशांक, भाडयाने व्याप्त असलेली जागा असेल तर ती मी महानगरपालिकेकडून सर्टीफाईड करुन आणावयाची. ॲप्रुव्ह झालेला प्लॅन लावलेला असतो. संबंधित महापालिकेने किंवा म्हाडाने ते कागदपत्र दिले पाहिजे. महापालिकेला या महाशयांनी जे पत्र लिहिले आहे त्याची प्रत माझ्याकडे आहे. त्यामध्ये त्याने म्हटले आहे की, "अशा प्रकारचे कोठलेही नाहरकत प्रमाणपत्र देऊ नका." म्हणजे म्हाडा प्रमाणपत्र देत नाही आणि महापालिकेने देऊ केले तर त्यांना देऊ देत नाही. माझ्या कागदपत्राचे काम काहीही करुन पूर्ण झाले पाहिजे म्हणून तुम्ही काही तरी करा असे म्हटले की, मग हे काम करण्यास तयार होतात आणि लाखाचे पाच लाख रुपये घेतात. भ्रष्टाचाराचे मार्ग शोधून काढण्यासाठी माणसाला कोठे कोठे लुटायचे यासाठी त्यांनी मार्ग तयार करुन ठेवलेले आहेत. लोकांच्या हिताकरिता हे विधेयक आणले जात आहे असे सांगत असतांना लोकांची लाखो रुपयांची लूट करण्यासाठी व्यवस्थित सापळे तयार केलेले आहेत. अशा सापळयांची बेकायदेशीर मांडणी या कार्यालयात निर्माण करण्यात आलेली आहे. यासंदर्भात त्या अधिका-याने जे पत्र दिलेले आहे ते आणि कायद्याच्या संदर्भातील हक्कभंग मी आणणार आहे. महापालिकेला सांगायचे असे करु नका, म्हाडाला लिहायचे की, असे करु नका. तेथून कागदपत्र येत नाही म्हटल्यावर तुझे काम मी लवकर करुन देतो म्हणणून दाम दुप्पट पैसे वसूल करण्याचे काम या कार्यालयात सुरु

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

आहे. दामदुप्पटीने पैसे वसूल करण्याची तरतूद या विधेयकात आहे. लोकांच्या हिताकरिता कायदे करीत असतांना मंत्रीमहोदय या सभागृहाच्या माध्यमातून सांगतात की, जनतेच्या कल्याणासाठी कायदा करीत आहोत परंतु त्या ठिकाणी तुमचे बसलेले स्टँप ऑफिसर लाखो लोकांची, लाखो रुपयांची लूट करीत आहेत. आपले अधिकारी 11-11,12-12 वर्षे एकाच पदावर कसे काय राहू शकतात? अशा प्रकारे जी बोगसगिरी सुरु आहे त्या बोगसगिरीला कोण थांबविणार आहे ? मुद्रांक शुल्क स्टँपींग करण्याकरिता जी बोगसगीरी होते ती बोगसगिरी थांबविण्याकरिता तुम्ही प्रयत्न केलेले आहेत. विधेयकात बनावटगिरी शब्द आहे तर आपण त्याला बोगसगिरी म्हटलेले आहे. शासनाच्या प्रामाणिक हेतूला हरताळ फासवणारी ही जी मंडळी आहे त्यांचे तुम्ही काय करणार आहात? हा मुद्दा उपस्थित झालेला आहे. सरकारी कार्यालयात खाजगी लोक कामावर ठेवून दस्तऐवज हाताळणारी ही जी बेकायदेशीर मंडळी आहेत त्यांच्यावर तुम्ही कोणते गुन्हे दाखल करणार आहात ? हे विधेयक आज न आणता उद्या आणा असे मी मंत्रीमहोदयांना सांगणार होतो, मंत्रीमहोदयांना फोन करणार होतो, 11.00 वाजता कार्यालयात घेऊन जाणार होतो, त्या ठिकाणी बसलेली सर्व बोगस मंडळी तुम्हाला दाखविणार होतो व त्यानंतर येथे विधेयकावर चर्चा करणार होतो. आता ही मंडळी उद्या पासून गायब होऊन जातील म्हणून मी कॅमे-याने त्यांचे फोटो काढून ठेवलेले आहेत. कॅमे-याने फोटो काढले असते तर ते त्या मंडळींना समजले असते म्हणून मी मुद्दाम मोबाईलने फोटो काढलेले आहेत. अर्थसंकल्पाच्या संदर्भात माननीय तटकरें साहेबांचा आम्हाला काही बाबतीत प्रामाणिकपणा जाणवला. शेतक-यांच्या संदर्भात ते भावनेच्या भरात मुद्दा विसरले असतील. आम्ही या ठिकाणी प्रतिकात्मक वॉकआऊट केला नव्हता. शेतक-यांच्या संदर्भात ते भावनेच्या भरात एक शब्द देखील बोलले नाहीत. भराडी देवी, अमुक देवी, ते तमुक असे ते बोलले. हे विधेयक उद्या संमत करु असे बोललो होतो कारण त्या ठिकाणी मी माननीय मंत्रीमहोदयांना मुद्दाम घेऊन जाणार होतो.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते ....

माननीय मंत्री महोदय जर माझ्या बरोबर आले असते तर मी त्यांना घेऊन जाणार होतो परंतु त्यांना जर मी बरोबर घेऊन गेलो असतो तर त्यांना सगळयांनी पटकन ओळखले असते माननीय राज्य मंत्री मराठवाडयातील असल्यामुळे मुंबईमध्ये त्यांचा चेहरा परिचयाचा नाही त्यामुळे त्यांना कोणीही ओळखले नसते. सन्माननीय महसूल मंत्री श्री. नारायण राणे यांना जर मी बरोबर घेऊन गेलो तर त्यांना सगळयांनी ओळखले असते..

सभापती महोदय, स्टॅम्प ऑफिसमध्ये दुय्यम निबंधकांनी दोनशे आणि चारशे रुपये पगारावर कर्मचा-यांना नोकरीवर ठेवले आहे हे मी त्यांना दाखविणार होतो आणि नंतरच या विधेयकावर बोलणार होतो.. सुदैवाने माझ्याकडे फोटोसुध्दा आहेत.उद्या पासून ते लोक गायब होतील हे मला माहीत आहे. ते इतके निर्ढावलेले आहेत की कदाचित ते गायब देखील होणार नाहीत. आमच्या विरुध्द कोणी काही करु शकत नाही असे त्यांना वाटत असते.

सभापती महोदय, मघाशी मी कलम 31 चा उल्लेख केला होता स्वेच्छाधिकार तुम्हाला आहेत परंतु हे अधिकार तुम्हाला कोणी दिले म्हणून एका वकीलाने नोटीस दिली होती. ती पुढील प्रमाणे आहे. " To, Shri Ramrao Shingare, Inspector General of Registration & Controller of Revenue Maharashtra State, Gr. Floor, New Administration Bldg. Opp. Council Hall, Sadhu Vasvani Chowk, Pune: 411 001. Respected Sir, Reference : Your Reckoner of Market Value, for the year 2010- Point of Legal Justification." या विषयाखाली एका वकीलाने श्री.शिंगारे यांना नोटीस दिली असून.त्या नोटीशीत त्यांनी असे म्हटले होते की, " Referring to Section 31 of the Bombay Stamp Act of 1958 (amended up-to-date)..." आता पर्यंत हा ॲक्ट अमेन्ड झालेला आहे. त्यात पुढे असेही म्हटलेले आहे की, "...again in the foot note therein is clearly stated 'this section relates to Adjudication and adjudication is optional (and not compulsory)....." ही कायद्यातील तरतूद आहे. त्यात पुढे असे म्हटलेले आहे की, "....for all documents assessed under Scheduled I of the Bombay Stamp Act, Whether as per Market Value Stamp duty is to be levied/paid as per

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

principles of Market Value or not? And this Provision is Optional...."पुढे त्यात असे म्हटलेले आहे की, "...therein the Ready-Reckoner foot-note above cited makes Adjudication compulsory. A Provision in R/R cannot overside the Section in the Act...." रेडी रेकनरप्रमाणे जरी हे सरक्युलर असले तरी कायद्यातील बदल तुम्हाला बदल करता येत नाही. त्या नोटीसीमध्ये त्यांनी पुढे असेही म्हटलेले आहे की, " Thus the authority drafting and publishing the R/R has overridden the powers entrusted to him putting the public at large at irreparable inconvenience,. Monetary loss etcetera. It is prayed that the said foot note be immediately withdrawn and cancelled and the copy of withdrawing the said order be sent to me within 48 hours of receipt of this letter by Registered Post on my residential address given herein below. And if necessary the authority thus overriding his jurisdiction (for reasons best known to himself and the sheepish members of the public who suffered a colossal Monetary Loss be given price he deserves)...." त्यानंतर त्याच्या खाली त्यांनी फुट नोट अशी लिहिली आहे की, "If I do not get any reply by Registered P/O I will be constrained to take every lawful step I deem necessary in Public Interest.". एका वकीलाने 25 फेब्रुवारी 2010 रोजी अशी नोटीस दिली आणि 48 तासात मला उत्तर देण्यात यावे असे कळविले होते.परंतु अजुनही त्यांना उत्तर दिले गेले नाही . संबंधित व्यक्तिचे मन इतके निर्ढावलेले आहे. माननीय मंत्रिमहोदांवर त्यांचा एवढा विश्यास असला पाहिजे की, आपले कोणी वाकडे करु शकत नाही किंवा आपण कोणाशी कसेही वागलो तरी माननीय मंत्री महोदय आपले काही करु शकत नाही असा त्यांचा समज आहे काय ? कशाच्या आधारावर एवढया मस्तवालपणाने आणि मग्रुरपणाने ते जनतेशी खेळत आहेत.कंपलसरी ॲडज्युडिकेशन हा शब्द टाकून विधीमंडळाने जो कायदा केलेला आहे त्या कायद्याचा भंग त्यांनी केलेला आहे.अशा प्रकारच्या अधिका-याच्या विरुध्द माननीय मंत्री महोदयांना जी काही कारवाई करावयाची असेल ती त्यांनी करावी .परंतु माझ्या हिशोबाने त्यातील आणखी तांत्रिक बाबी शोधून काढून .....

नंतर श्री.सरफरे

अशुद्धित प्रत / शीघ्रलेखीकाची नाही

श्री. दिवाकर रावते....

यामधून आपल्या विधीमंडळाचा अधिक्षेप होत असेल, आमच्या अधिकारांवर गदा आणली जात असेल तर माझ्या हिशेबाने त्यातील तांत्रिक बाबी शोधून मला हक्कभंग देता येईल. आणि तो द्यावयाचा की नाही याबाबत माननीय सभापतींबरोबर चर्चा करुन मी ठरविणार आहे. सांगण्याचा मुद्दा असा की, इतक्या मुजोरपणे आम्हाला गृहीत धरुन हे सर्व चालले आहे. आणि म्हणून मी हे डॉक्युमेंट माहितीच्या अधिकाराखाली मागितले आहे. आज अशी परिस्थिती आहे की, जो कुणी डॉक्युमेंट मागेल त्याच्या घरी डायरेक्ट जाऊन त्याचे तोंड बंद करुन टाकायचे. आपली बदली करुन घेण्याकरिता 50 ते 60 लाख रुपये देणाऱ्या या माणसांकडे आपुलकी कशी असणार? आणि म्हणून मी अपरिचित असलेल्या नावाने माहितीच्या अधिकाराखाली अर्ज टाकला. त्या अर्जावर अशा ठिकाणच्या अड्डयाचा पत्ता टाकला की, त्याठिकाणी जाणेही कठीण होईल. सभापती महोदय, आम्हाला माहिती मिळविण्यासाठी एवढा त्रास सहन करुन जनतेला पारदर्शक प्रशासन मिळावे याकरिता या सदनामध्ये आम्ही चर्चा करतो, आमच्या तक्रारी मांडतो. प्रशासनामध्ये पारदर्शकता आणण्यासाठी आम्ही उपाय सुचविण्यामध्ये कमी पडलो तर सरकारने त्याबाबत आपले उपाय सुचवून अधिक चांगल्या प्रकारची पारदर्शकता जनतेला द्यावी, याकरिता या विधेयकावर आम्ही चर्चा करावयास मागतो. त्यानिमित्ताने या ठिकाणी मला भरपूर काही गोष्टी मांडावयाच्या होत्या. मुद्रांक शुल्क कार्यालयामध्ये भरपूर काही दडले आहे, हे तर हिमनगाचे टोक आहे.

सभापती महोदय, मी मघाशी हे सर्व आपल्याला सांगितले आहे. कलम 48 च्या सुधारणेमध्ये किती कालमर्यादा दिली आहे? याबाबत मी मंत्रिमहोदयांना विचारले. डी-रजिस्ट्रेशन करावयाचे असेल, म्हणजे नोंदणी रद्द करुन शुल्क परत करणे याकरिता कलम 48 मध्ये आपण स्पष्टीकरण करावयास हवे होते. परंतु तुम्ही त्याबाबत काहीही सांगितले नाही. त्यामुळे कलम 48 मध्ये काय म्हटले आहे हे माझ्याकडे आहे, मला ते माहीत आहे. "कलम 47 खाली सूटमोकळ मिळविण्यासाठी खाली दिलेल्या कालावधीमध्ये अर्ज करण्यात येईल" असे याठिकाणी म्हटले आहे. "खंड (क) (5) मध्ये उल्लेखिलेल्या प्रकरणांत संलेखाच्या तारखेपासून सहा महिन्याच्या आत परंतु, ज्या बाबतीत अनुसूची 1 च्या, अनुच्छेद 25 अन्वये, ज्यावर मुद्रांक शुल्क भरले आहे असा, स्थावर मालमत्तेच्या विक्रीचा करारनामा, नोंदणी अधिनियम, 1908 याच्या तरतुदींन्वये, नोंदणी करिता सादर करण्यात आलेला असेल आणि विक्रेत्याने, अशा करारनाम्याचा विषय, वस्तू असलेल्या स्थावर मालमत्तेचा ताबा स्वाधीन करण्यास नकार दिला असेल तर, संलेखाच्या दिनांकापासून दोन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MMP/ KTG/ KGS/

श्री. दिवाकर रावते....

वर्षाच्या आत अर्ज करता येईल", "ज्या संलेखाच्या बदली दुसरा संलेख निष्पादित करुन दिलेला असेल, असा कोणताही संलेख अपरिहार्य परिस्थितीमध्ये रद्द करण्यासाठी सोडून देता येत नसेल, त्या प्रकरणी बदली संलेख निष्पादित करुन दिल्याच्या तारखेनंतर सहा महिन्याच्या आत, अन्य कोणत्याही प्रकरणी मुद्रांक खरेदी केल्याच्या तारखेपासून सहा महिन्याच्या आत" असे याठिकाणी म्हटले आहे. यामध्ये दोन गोष्टी स्पष्ट होतात. एक म्हणजे मी स्टँप पेपर खरेदी केला, तो सहा महिन्यात व्हॅलिड झाला नाहीतर तो पेपर सरेंडर करुन पैसे परत घ्यावयाचे. दुसरे असे की, मी ज्यावेळी दस्तावेज रजिस्टर करतो त्यावेळी एक लाख, 2 लाख, किंवा 3 लाख इतकी फी भरलेली असते. परंतु काही प्रकरणांमध्ये अशी परिस्थिती निर्माण होते की, त्या प्रकरणी कोर्टामध्ये केस दाखल होते. विकासकाकडून त्याठिकाणी इमारत उभी केली जाते, त्या इमारतीमध्ये खरेदी केलेल्या सदनिकेचे डॉक्युमेंट रजिस्टर केलेले असते, परंतु कोर्टाच्या स्थगिती आदेशामुळे ती इमारत बांधकाम न होता तशीच पडून रहाते. आणि सदनिका खरेदी केली तरी त्याच्या ताब्यात येत नाही. मग अशी परिस्थिती होते की, त्याने कुठे रहावयाचे? पाच-सहा वर्षे झाली तरी त्याला नवीन जागा मिळत नाही, आणि विकासकही त्याला जागा देत नाही. अशावेळी जागा खरेदी करणारा विकासकाला म्हणतो की, तुझे ॲग्रिमेंट रद्द कर आणि माझे पैसे मला परत दे. त्यावेळी विकासकाकडून त्याला पैसे परत मिळतात. परंतु मधल्या कालावधीत दोन वर्षे गेल्यामुळे त्याने भरलेले मुद्रांक शुल्क त्याला परत मिळत नाही. ती रक्कम कमी नसते, ती लाखाच्या घरामध्ये असते.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / शीघ्रलेखनासाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . ..

सभापती महोदय, सर्व दस्तऐवज रजिस्टर करावयाचे असते, त्याबाबतीत 10 रुपयांचे सरसकट 100 रुपये केले. हे सर्व एका पातळीवर आणले. ठीक आहे, तो काही मोठा विषय नाही. जेथे 100 रुपये भरावयाचे होते, तेथे लोक 100 रुपये भरत होते. या सदनामध्ये सोसायटीच्या प्रॉपर्टी ट्रान्सफरच्या संबंधात एक विधेयक आणले होते आणि ते खूप गाजले. मी एकटा त्या विधेयकाच्या विरोधामध्ये होतो. पण मी विधेयकाच्या विरोधात नव्हतो, तर कशासाठी विरोध होता ? त्यावेळी माननीय तत्कालीन मुख्यमंत्री श्री.विलासरावजी देशमुख यांनी माननीय आमचे दादा म्हणजे सन्माननीय सदस्य श्री.उल्हासदादा पवार यांच्यामार्फत एक उप सूचना आणली होती, सरकारी उपसूचना आणली होती.

श्री.मोहन जोशी (खाली बसून) : रावतेसाहेब, माननीय श्री.उल्हासदादा पवार आहेत काय?

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय सदस्य श्री.उल्हासदादा पवार यांना बोलवावे. मी काही त्यांच्या विरोधात बोलत नाही. त्या विधेयकाच्या बाबतीत तर मोठा इतिहास आहे. सन्माननीय सदस्यांना सदनामध्ये बोलवावे, काही हरकत नाही, असे नाही. सन्माननीय सदस्य श्री.उल्हासदादा पवार येथे नाहीत म्हणून मी त्यांचे नाव घेतो असे नाही. तर त्यावेळी सदनामध्ये जे घडलेले आहे ते सांगत आहे. तेव्हा सन्माननीय सदस्यांना सदनामध्ये लवकर बोलवावे म्हणजे त्यांनी काय पाप केले आहे, ते त्यांना कळेल. त्यावेळेला मी सांगत होतो की, हे पाप करु नका, अधिकृतपणे सांगत आहे जोशीबुवा.

श्री.मोहन जोशी (खाली बसून) : मी फक्त तुम्हाला जाणीव करुन दिली.

श्री.दिवाकर रावते : जोशीबुवा, मी तुम्हाला अधिकृतपणे सांगत आहे. त्यावेळी माझा असा मुद्दा होता की, मुद्रांक शुल्क ठरविण्याचा अधिकार स्टॅम्प ऑफीसरचा, मुद्रांक शुल्क अधिकाऱ्याचा आहे. त्याच्याकडे रेडी रेकनर आहे. एखाद्या मालमत्तेचे हस्तांतरण करण्याकरता किती मुद्रांक शुल्क भरावयाचे त्याच्या व्हॅल्युएशनबाबत, ॲज्युडीकेशनबाबत मी मुद्दा मांडला,पण आमच्या माननीय मुख्यमंत्र्यांचा हट्ट होता की, ही बाब सहकार मंत्र्यांकडे आली पाहिजे. यामध्ये माननीय श्री.पतंगराव कदम यांना माझा विरोध होता. माझे म्हणणे होते की, ज्याचे काम आहे ते त्यानेच केले पाहिजे आणि ते काम महसूल विभागामध्येच असले पाहिजे असा माझा त्यावेळी हट्ट होता.परंतु मूळ विधेयकाप्रमाणे माननीय मुख्यमंत्र्यांचा हट्ट होता की,हे काम सहकार विभागाकडे गेले पाहिजे आणि

. . . .4 पी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . ..

त्यावेळी माननीय श्री.पतंगराव कदम हे सहकार मंत्री होते. ते मला म्हणाले की, अरे,दिवाकर तु माझा मित्र आहेस ना, तर मी म्हणालो की, येथे मित्राचा काय प्रश्न आहे ? हा कायद्याचा प्रश्न आहे. ते म्हणाले की, नाही, नाही ते असे आहे . . . . त्यावर मी त्यांना सांगितले की, मी देखील सहकार खात्याचा मंत्री होतो, त्यामुळे मला सहकार खात्याच्या मर्यादा माहिती आहेत.तुम्ही सहकार खात्याकडे जेव्हा कन्व्हीन्स करण्याचा, हस्तांतरीत करण्याचा अधिकार देत आहात, तेव्हा ते कसे ठरविणार आणि ते जर सहा महिन्यामध्ये झाले नाही तर डीम्ड टू बी . . .. यावर केवढे मोठे रामायण झाले. या एका विधेयकावर चर्चा करण्यासाठी सकाळी 11.00 वाजता सभागृहाची बैठक झाली होती आणि संपूर्ण सभागृह भरलेले होते. मग माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख आले. मग त्यांनी ॲमेंडमेंट मांडावयाची, मी त्यावर चर्चा करावयाची. आमच्या महसूल खात्याचा जो अधिकार आहे, पण तो त्यांच्या इच्छेखातर ही उप सूचना मंजूर करुन तो अधिकार सहकार खात्याकडे दिला. आता अशी परिस्थिती आहे की, हे विधेयक मंजूर होऊन दोन वर्षे झाली आहेत. त्यावेळी सन्माननीय माजी सदस्य श्री.मधु चव्हाण आणि माझे भांडण झाले होते. मी एकटाच या विधेयकाच्या विरोधामध्ये होतो. काही लोक नव्हतीच. 25-25 लाख रुपये घेऊन बिल्डर फिरत आहेत. मी म्हटले की, याठिकाणी 25 लाख रुपयांची थैली घेऊन लोक फिरतात कसे ? आमदारांनी साधी बॅग आणली तर ती तपासली जाते. मी विचारले की, तुम्हाला कसे कळले की, त्यामध्ये 25 लाख रुपये आहेत ? We do not have that, या बँगेमध्ये 25 लाख रुपये आहेत. 24 लाख रुपये नाहीत, 26 लाख रुपये नाहीत हे कसे कळले ? कारण हुंगल्यानंतर कळेल यासाठी जो सहावा सेन्स असावा लागतो, तो आपल्याकडे नाही. मग तुम्हाला हे कसे कळले असे मी तेव्हा रागावून बोललो होतो. म्हणजे गरीब लोकांचे काय होणार ? सन्माननीय सदस्य भयंकर रागवावयाचे. गरीब लोक, अमुक लोक वगैरे. मला या विषयामध्ये जे काही थोडे समजते, जे काही ज्ञान, अक्कल आहे, त्यावरुन माझे म्हणणे होते की, असे केले तर हे न घडणारे काम आहे. म्हणून काम घडेल असे काही करु या आणि त्यासाठी ते काम महसूल विभागाकडे ठेवावे असा माझा आग्रह होता. माझा त्या बिलाला विरोध नव्हता. कायद्याच्या तरतुदीप्रमाणे हे विधेयक मंजूर झाल्यानंतर नियम समितीपुढे ठेऊन त्याचे नियम तयार करावयास पाहिजे होते आणि त्यानंतर ते सहा महिन्यामध्ये मंजूर व्हावयास पाहिजे. ही कायदेशीर तरतूद आहे, वैधानिक तरतूद आहे. परंतु

. . . .4 पी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . ..

आजही त्याचे नियम तयार झालेले नाहीत. मी माननीय महसूल मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, मी तुमच्या विभागाच्या महसूल सचिवांना भेटलो. तसेच सहकार विभागाच्या सचिवांना देखील स्वत: भेटलो. तसेच गृह विभागाच्या सचिवांना देखील भेटलो. यामध्ये तीन विभाग समाविष्ट आहेत. या तीन विभागाच्या सचिवांना सांगितले की, हे एवढे सगळे रामायण झाले, याबाबत आक्षेप घेण्यात आले. पण आता नियम तरी करावेत. कारण बऱ्याच प्रॉपर्टीज् ट्रान्सफर व्हावयाच्या आहेत. पण अजूनही त्याचे नियम तयार झालेले नाहीत आणि ते नियम तयार होऊच शकत नाहीत.

यानंतर कु.थोरात . . ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

महसूल खात्याचे अधिकारी सहकारकडे आहेत. सहकार खात्याचे डी.डी.आर.असे म्हणतात की, मी मुद्रांक शुल्क कसे काय ठरवणार? त्यामुळे ही अशी सगळी गडबड निर्माण झालेली आहे. राज्यकर्तेच ज्यावेळेला असा गोंधळ निर्माण करतात त्यावेळेला एखादे काम कसे ठप्प होते याबाबतीत मी आज येथे सांगणार आहे. लोकांच्या हिताकरिता विधेयक आणल्यानंतर त्यामध्ये अशा काही विचित्र अमेंडमेंट करुन राज्यकर्तेच हा गोंधळ निर्माण करतात तेव्हा मला असे वाटते की, त्यावेळेला हे जाणीवपूर्वक झालेले असावे, आपण ही तरतूद अशा प्रकारे करु की, नियमच होणार नाही. याठिकाणी ते विधेयक मंजूर झाले तेव्हा मी स्वत: सांगत होतो की, जरा थांबा. माझे म्हणणे ऐका. पण तसे झाले नाही. मुंबई शहरातील कर निर्धारण बदलून, प्रॉपर्टी टॅक्स बदलून तो भांडवली मूल्यावर आधारित करण्याचे हे विधेयक आहे. सभापती महोदय, त्यावेळी आमदारांच्या समितीपुढे मी घसा कोरडा करुन सांगितले की, हे करु नका. यामुळे गोंधळ होईल. मुंबई शहरात मराठी माणूस राहू शकणार नाही. हा कर प्रचंड वाढेल. आज पाचशे रुपये भरणाऱ्या माणसाला दोन ते तीन हजार रुपये भरावे लागतील. पण त्यावेळेला नाही, नाही, ते असे आहे, तसे आहे.असे सांगण्यात आले. त्यानंतर मग मला सांगितले की, नवीन लोकांचा प्रश्न बरोबर आहे. पण जुन्या लोकांना शंभर रुपये टॅक्स असेल तर तो 140 रुपये होईल, तो डबल होणार नाही. कायद्याप्रमाणे हजार रुपयाचे दोन हजार रुपये होणर असतील तर हजार रुपयाचे 1400 रुपये द्यावे लागतील ते डबल होणार नाहीत. सभापती महोदय, त्या विधेयकाच्या संदर्भात सगळया आमदारांमध्ये फुट पाडली. शहरामधील लोक प्रॉपर्टी टॅक्स कमी भरतात आणि उपनगरातील लोक जास्त भरतात अशा प्रकारची एक फूट पाडण्यात आली. उपनगरातील जे आमदार त्या समितीमध्ये होते ते म्हणाले नाही, नाही, हे झालेच पाहिजे. मी म्हटले, माझे म्हणणे जरा ऐका. मी त्या खात्यामध्ये बारा वर्ष नोकरी केलेली आहे. सभापती माहेदय, या मुंबई शहरामध्ये राहणारे लोक जुन्या चाळीमध्ये रहात आहेत. आता त्या अनेक इमारती पुरातनवास्तू खात्याच्या अंतर्गत आलेल्या आहेत.आता त्यांच्यावर होर्डिंग्स् लावता येणार नाहीत. त्या इमारतीवरील होर्डिंग्स् कोर्टाने काढून टाकायला लावले आहेत. त्यामुळे त्या इमारतींच्या बाबतीत आता काहीही करता येणार नाही. त्या इमारती तशाच जपाव्या लागतील. सभापती महोदय, शंभर वर्षापासून माझ्या पिढयांपिढया या

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

जागेमध्ये राहतात त्यामुळे त्या काळातील कायद्याप्रमाणे माझ्या घराचे भाडे आहे. एवढया वर्षापासून मी मुंबई महानगरपालिकेला जे भाडे भरलेले आहे त्यातून मुंबईचा विकास होत आहे. मी काल मुंबईमध्ये आलो व एक फ्लॅट बोरिवलीमध्ये घेतला, एक फ्लॅट कांदिवलीमध्ये घेतला. माझे शंभर वर्षाचे तीन पिढयांचे या मुंबईतील वास्तव्य आणि आता नव्याने फ्लॅट घेतलेल्या व्यक्तीचे वास्तव्य याची तुलना कशी होईल.? आजच्या रेडी रेकनरप्रमाणे तेथे रेट लावण्यात येतात पण माझे घर जुने आहे म्हणून मला कमी रेट लावण्यात येतो. त्यावेळेला मी असे सांगितले की, 1960,1970,1980,1990 आणि 2000 या प्रत्येक साली बांधलेल्या इमारती, त्यांना मिळालेले नाहरकत प्रमाणपत्र आणि ज्यांचे ॲसेसमेंट झालेले आहे त्यांचे रेट माझ्यापुढे ठेवा. तेव्हा असे लक्षात आले की, एक एप्रिल या तारखेला या वर्षात बांधलेल्या इमारतीची जी रेटेबल व्हॅल्यू काढण्यात आलेली आहे ती उपनगरातील कमी आहे आणि मुंबईतील जास्त आहे. कारण येथे रेट जास्त आहेत. त्या रेटमुळे हे सगळे निर्माण झालेले आहे. ही फसवेगिरी होती पण भावनेच्या आहारी गेलेल्या आमच्या सन्माननीय सदस्यांना कळलेच नाही. ठीक आहे. मी त्यावेळी याला विरोध केला. मी याठिकाणी हे एवढयाचकरिता सांगितले की, शासनाने या मुंबईची फसवणूक केलेली आहे. सभापती महोदय, या खात्याचे सचिव अत्यंत हुशार आहेत. मुंबईतील मराठी माणसाचे कसे वाटोळे होईल असा पध्दतशीर प्रयत्न करण्यात आलेला आहे, असा माझा आक्षेप आहे. सभापती महोदय, काल-परवा मुंबईच्या महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पामध्ये रेटेबल व्हॅल्यू वाढविली आहे. मी आज 100 रुपये टॅक्स भरत असेल तर तो 125,130 रुपये होईल. म्हणजे आता माझा हा टॅक्स बेसिक झाला. त्याचवेळेला महसूल खात्याने मुंबईतील रेडीरेकनरची किंमती वाढविली.

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

म्हणजे ज्या फ्लॅटची किंमत रेडी रेकनरमध्ये 50 लाख रुपये होती ती आता रेडी रेकनरमध्ये 70 ते 80 लाख रुपये करुन टाकली. म्हणजे दर वाढविले. 5 हजाराचा दर 7 हजार केला, 7 हजाराचा 9 हजार केला, 9 हजाराचा 11 हजार केला. म्हणजे आता जागेच्या किमती वाढल्या. मुळात असेसमेंट वाढल्यामुळे, रेटेबल व्हॅल्यू वाढल्यामुळे माझ्या जागेचा मुंबई महापालिकेचा टॅक्स वाढला. आणि आता भांडवली मूल्यावर करावयाचे म्हटल्यानंतर भांडवली मूल्य सुध्दा वाढवून ठेवले. हे माझ्या लक्षात आल्यानंतर जरी मी माझ्या या सगळ्या तात्विक हिशेबाकरिता त्या विधेकाच्या विरोधात होतो तरी मुंबई महापालिकेमध्ये आमची सत्ता असतानाही त्यांना सांगितले की, हे ताबडतोब मार्चच्या आत मंजूर करा. आपले विधेयक या ठिकाणी मंजूर होऊन तेथे गेले. त्यांनी ते मंजूर केले. ते 1 एप्रिलपासून इफेक्टमध्ये यावयास पाहिजे पण येत नाही. आमच्या हुशार सचिवांनी लगेच सांगितले की, त्याबाबतीत नियम करावे लागतील. त्यासाठी माजी ज्येष्ठ सनदी अधिकारी श्री. सुखथनकर यांची नियम बनविण्याकरिता समिती नेमली. आता ते नियम वर्ष दीड वर्षाने होतील. मग हे नियम स्थायी समितीपुढे जातील आणि त्याला मान्यता मिळाल्यानंतर तो कायदा अंमलात येईल. त्यामध्ये दीड वर्ष जाईल आणि पुढच्या वर्षी यांच्या रेडी रेकनरचा दर पुन्हा वाढलेला असेल. म्हणजे माझ्या फ्लॅटचे भांडवली मूल्य वाढले. आपल्या सगळ्या आमदारांनी आता या ठिकाणी फ्लॅट घेतल्यामुळे त्यांच्या लगेच लक्षात येईल की, मी आज घेतलेल्या जागेची किंमत 40 लाख रुपये असेल तर वाढलेल्या रेडी रेकनरप्रमाणे ती किंमत 50 ते 55 लाख रुपये झालेली आहे. आणखी वर्ष दीड वर्षाने म्हणजे पुढच्या वर्षी आपण रेडी रेकनरचे दर बदलल्यानंतर ती 40 लाखाची जागा 60 लाखावर जाणार आहे. जागेची किंमत हा वेगळा विषय झाला. आज जर ते झाले असते तर 40 लाखाच्या किंमतीवर माझा टॅक्स बसला असता आणि मग मी आज जर एक हजार रुपये भरत असलो आणि नवीन पध्दतीने जर 3 हजार रुपये टॅक्स येत असेल तर मला फक्त 1400 रुपयेच भरावे लागले असते. पण महापालिकेने मुळातच माझे एक हजार रुपयांचे पंधराशे रुपये करुन ठेवले. आपल्या रेडी रेकनरची किंमत वाढली आणि मी आज भरत असलेला कर नकळत मला दुप्पटीने भरावा लागणार. हे कारस्थान प्रशासकीय माध्यमातून निर्माण केले.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

एवढे त्याचे डोके चालते. सभापती महोदय, मुंबईच्या बाबतीत या अधिकाऱ्यांचे काय चालले आहे याबाबत मी मुंबईच्या संदर्भातील चर्चेच्या वेळी व्यवस्थित बोलीन. मुंबईच्या मराठी माणसाला मुंबईच्या बाहेर काढण्याचे पध्दतशीर कारस्थान त्यांना आर्थिकदृट्या दुर्बल करुन चालले आहे. बाकीच्या गोष्टी सोडा. आम्हाला ते परवडणार नाही. मी अधिकृतपणे आमदार म्हणून बोलत आहे. अशा प्रकारे जर मूल्यांकन वाढत राहिले तर मला कर भरणे परवडेल काय हा प्रश्न निर्माण झालेला आहे. आज मुंबई शहरामध्ये एका सामान्य मध्यमवर्गीय कुटुंबाला 25 हजार रुपयांच्या खाली घर चालविता येत नाही. हे वाढल्यानंतर त्याचे जर या पध्दतीने महिन्याला 5 हजार रुपये वाढले, जर पाणीपट्टीचे पैसे वाढले, डिझेलचे दर वाढतात म्हणून दर वाढले आणि त्यांच्या पगारातील 60 टक्के भाग जर असाच गेला तर आपल्या मुलाबाळांसह, त्यांच्या शिक्षणासह मुंबईच्या या परिस्थितीमध्ये त्यांना वावरावयाचे असेल तर त्याच्यासाठी अत्यंत विचित्र परिस्थिती निर्माण केली. अशा परिस्थितीमध्ये मला कुटुंब जगवावयाचे असेल तर हे शहर सोडणे बरे आहे, येतील ते पैसे घेऊन बाहेर जावे अशी वेगळ्या प्रकारची परिस्थिती या मुद्रांक शुल्क वाढविण्यामुळे आणि रेडी रेकनरचे दर वाढविण्यामुळे निर्माण झाली आहे. मी अत्यंत तळमळीने हे सांगत आहे. हा विषय टीकेचा नाही. हा विषय अस्तित्वाचा आहे. हा विषय केवळ माझ्या अस्तित्वाचा नाही तर आपण आणि आम्ही सगळे कोणत्याही पक्षाचे असलो तरी आपणा सगळ्यांच्या अस्तित्वाचा हा प्रश्न आहे. कारण कुटुंब चालवित असताना सगळ्यांच्या व्यथा सारख्याच आहेत. राज्यकर्त्यांकडून जर अधिकारी असे काम करुन घेणार असतील तर कठीण जाणार आहे. हे विधेयक मंजूर करीत असताना मी दोन गोष्टी माननीय मंत्रिमहोदयांच्या नजरेस आणल्या आहेत. 12-13 वर्षे गोंदाला चिकटलेल्या माणसांचे काय करणार ? तसेच बोगस माणसे नेमलेली आहे. जे कारकून नेमलेले आहेत त्यांची नावे सुध्दा मी वाचून दाखवली. तीन मुली डेलीवेजेसवर ठेवलेल्या आहेत. सगळे 200 आणि 400 रुपयांच्या डेलीवेजेसवर काम करीत आहेत हा क्रिमिनल गुन्हा आहे. ज्यांनी करावयास लावले त्यांचाही विचार केला पाहिजे. खूप कमावले आता तुरुंगात जा अशी परिस्थिती निर्माण करणार काय हा प्रश्न मी या विधेयकाच्या निमित्ताने निर्माण करीत आहे. उत्तरात काय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/

श्री. दिवाकर रावते .....

सांगावयाचे ते माननीय मंत्रिमहोदयांनी सांगावे पण या नियमामध्ये बदल करण्याचा या विधिमंडळाचा अधिकार जर आपल्या अधिकाऱ्यांनी घेतला असेल तर तो बरोबर नाही, योग्य नाही. ते परिपत्रक ताबडतोब रद्द करा. आम्ही ॲडज्युडिकेशनला जातोच. ते कंपल्सरी नसले तरी लोक जातात आणि करुन घेतात. ते जरा सेफ असते म्हणून लोक करतात. पण ते स्वेच्छेवर असताना ते जाणीवपूर्वक त्यांनी काढणे आणि विधिमंडळाचे अधिकार हाती घेणे हे अयोग्य आहे. अशा प्रकारचे मत मी आपल्यापुढे मांडत असून आपण याची योग्य ती दखल घ्यावी अशी आपल्याला विनंती करुन माझे भाषण संपवितो.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 यात आणखी सुधारणा करण्यासाठी वि.स.वि.क्रमांक 55 सभागृहासमोर आले आहे. या विधेयकाला पाठिंबा देत असताना माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, या विधेयकामध्ये 4 सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. पहिली सुधारणा कलम 6 बाबत आहे. दुस-या सुधारणेद्वारे नवीन 10 (क) कलम समाविष्ट करण्यात आलेले आहे. तिसरी सुधारणा कलम 48 ला करण्यात आली आहे. चौथी सुधारणा अनुसूची एक च्या अनुच्छेद 36 क ला करण्यात आली आहे. नवीन कलम 10 (क) समाविष्ट केले आहे त्याबद्दल मी प्रथम मंत्री महोदयांचे अभिनंदन करीन. या सुधारणेच्या संदर्भात असे नमूद केले आहे की, "अलिकडे, बनावट मुद्रांक वापरण्याचे प्रकार उजेडात येत आहेत. खोटया मुद्रांकांच्या वापरास आळा घालण्यासाठी, उक्त अधिनियमामध्ये नवीन कलम 10-क समाविष्ट करुन याद्वारे लेखप्रमाणित मुद्रांक शुल्क कोणत्याही शासकीय कोषागारात किंवा उप कोषागारात किंवा प्रधान मुद्रांक कार्यालय, मुंबई येथे रोखीने किंवा दर्शनी धनाकर्षाद्वारे किंवा प्रदानादेशाद्वारे भरता येईल." सभापती महोदय, चिकट मुद्रांकामुळे किती प्रमाणामध्ये नुकसान होऊ शकते याची मी आकडेवारी देईन. 'महाराष्ट्राची आर्थिक पाहणी' या पुस्तकाच्या पान क्रमांक 50 वर ही आकडेवारी दिलेली आहे. सन 2006-07 मध्ये मुद्रांक व नोंदणी शुल्कापोटी 6,416 कोटी उत्पन्न मिळाले होते. सन 2007-08 मध्ये हेच उत्पन्न 8,550 कोटी रुपये झाले. म्हणजे एका वर्षामध्ये 2 हजार कोटींनी हे उत्पन्न वाढले. सन 2006-07 मध्ये त्यानंतरच्या वर्षात 8,500 कोटी रुपयांवरुन केवळ 8,600 कोटी रुपये झाले. म्हणजे मागील वर्षात 2 हजार कोटींनी उत्पन्न वाढले असताना, पुढील वर्षात केवळ 50 कोटींनी वाढले आहे. तसेच सन 2009-10 या वर्षात हे उत्पन्न 9,600 कोटी झाले म्हणजे 1000 कोटींनी वाढले. म्हणून ज्या वर्षात उत्पन्न कमी झाले ते वर्ष मला ॲब्नॉर्मल वाटते. यासंदर्भात शासनाच्या माध्यमातून तपासणी करण्यात यावी. त्या वर्षात इतके उत्पन्न कमी का झाले हे तपासले पाहिजे. राज्याच्या महसुलामध्ये मुद्रांक शुल्काचा मोठा वाटा असतो. राज्याच्या एकूण उत्पन्नामध्ये व्हॅटचे उत्पन्न 53 टक्के आहे. परंतु मुद्रांक शुल्काचे उत्पन्न 18 टक्क्यांवर आलेले आहे. राज्यातील महसुलाचे दुसरे साधन म्हणजे मुद्रांक शुल्क हे आहे. ते आणखी वाढविणे ही काळाची गरज आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ KGS/

श्री.अरुण गुजराथी.....

सभापती महोदय, अनुसूची एक च्या अनुच्छेद 36 क ची सुधारणा करुन शासनाने सामाजिक न्याय देण्याचा विचार केलेला आहे. मुंबई शहर जिल्हा व मुंबई उपनगर जिल्हयांसाठी या अनुच्छेदाखालील शुल्काचे विद्यमान विनिर्दिष्ट दर हे पुणे व ठाणे यांसारख्या मोठया शहरांसाठी विनिर्दिष्ट केलेल्या दरांपेक्षा खूप जास्त होते. ते या दोन शहरातील दरापर्यंत आणले आहेत. सध्या रेडी रेक्नरप्रमाणे स्टॅम्प डयूटी वसूल केली जाते. रेडी रेक्नर किंवा स्टॅम्प डयूटीची योजना अस्तित्वात असली तरी ती फूलप्रूप नाही असे माझे मत आहे. एखाद्या इमारतीमध्ये 4 माळे असतील तर त्याच्यातील फ्लॅटच्या किंमती वेगवेगळया असतात. एका इमारतीतील चौदाव्या व पंधराव्या मजल्यावरील फ्लॅटच्या किंमती वेगळया असतात. त्यामुळे ही योजना आणखी फूलप्रूप कशी करता येईल यासाठी शासनाच्या माध्यमातून प्रयत्न झाले पाहिजेत.

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

यानंतर श्री.शिगम.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अरुण गुजराथी...

सभापती महोदय, रेटेबल व्हॅल्यू आणि कॅपिटल व्हॅल्यूच्या संदर्भात मी सांगेन की, अनेक शहरामध्ये कॅपिटल व्हॅल्यूच्या माध्यमातून महानगरपालिका वसुली करते. आपण रेटेबल व्हॅल्यूच्या माध्यमातून वसुली करतो. कॅपिटल व्हॅल्यूचे काय परिणाम होतील हे आज तरी आपल्याला सांगता येणार नाही. त्यासंदर्भात निर्णय घेतला पाहिजे. नियमांच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी उल्लेख केला. प्रत्येक कायद्यामध्ये नियम करण्याच्या संदर्भातील अधिकार दिलेले आहेत. माझ्या हातामध्ये वि.प.वि.क्रमांक 3 महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ विधेयक आहे. या विधेयकामधील खंड 22 मध्ये नियम करण्याचे अधिकार दिलेले आहेत. या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, राज्य सरकारने राज्यासंबंधीचे जेवढे कायदे केलेले आहेत त्यातील किती कायद्यांचे नियम करणे बाकी आहे याची तपासणी करणे आवश्यक आहे. मघाशी सन्माननीय सदस्यांनी यासंदर्भातील नियम वाचून दाखविला. त्या चर्चेमध्ये मी जाऊ इच्छित नाही. माझे एवढेच सांगणे आहे की, हा कायदा फूलप्रूफ करण्याच्या दृष्टीने ज्या चार सुधारणा या ठिकाणी आणलेल्या आहेत त्या योग्य असून त्यांना सभागृह निश्चित पाठिंबा देईल. परंतु माझी अशी विनंती आहे की, हा कायदा फूलप्रूफ करण्याच्या दृष्टीने एखादी समिती किंवा दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती नेमण्याच्या संदर्भात विचार करता आला तर त्यास प्रत्यवाय नाही. एक चांगले असे विधेयक या ठिकाणी आणलेले आहे. या विधेयकाच्या माध्यमातून आपले उत्पन्न वाढेल अशी मी अपेक्षा करतो. माननीय महसूल मंत्री श्री. नारायण राणे साहेब याठिकाणी उपस्थित आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, ज्याप्रमाणे ऑनलाईन इन्कम टॅक्स भरण्याची व्यवस्था केलेली आहे त्याप्रमाणे ऑनलाईन टॅक्सेशन सुरु करता येईल का याचा विचार करावा. पुढच्या काळामध्ये पेपरलेस कॅश किंवा पेपरलेस मनी अशी पध्दत सुरु होईल. करदात्याला जितक्या सुविधा देता येतील तितक्या देण्याचा विचार करावा. एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन 2009चे वि.स.वि. क्रमांक 55 - मुंबई मुद्रांक (सुधारणा) विधेयक यावर अगदी थोडक्यात बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, जनतेच्या आणि राज्याच्या हित्याच्या दृष्टीने 4 सुधारणा विधेयकामध्ये आहेत. सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी सांगितल्या प्रमाणे मुद्रांक शुल्काच्या माध्यमातून राज्याला 18 टक्के उत्पन्न मिळते. परंतु हे उत्पन्न मिळत असताना त्यामध्ये फार मोठ्या प्रमाणात गळती होते. ज्या ज्या ठिकाणी नागरीकरण झालेले आहे त्या ठिकाणी रेडीरेकनरनुसार मुद्रांक शुल्क आकारले जाते आणि ते भरलेही जाते. मी गेल्या 8 महिन्यापासून ठाणे शहर आणि ठाणे जिल्ह्यातील वाढत्या नागरीकरणाच्या अनुषंगाने या मुद्रांक शुल्कासंबंधीचा अभ्यास करीत होतो. हा अभ्यास करीत असताना मी 10 केसेस तपासल्या आणि त्या केसेसमध्ये रेडीरेकनर प्रमाणे मुद्रांक शुल्क भरलेले नसल्याचे मला आढळून आहे. यासंदर्भात मी माननीय मंत्री महोदयांना पत्र पाठविले. त्यानंतर 21 हजार केसेसची तपासणी करण्यात आली. मी ज्या 10 केसस तपासल्या त्या 10 केसेसमध्ये 1 कोटी 74 लाख रुपये मुद्रांक शुल्क लपविण्यात आल्याचे म्हणजे ते कमी भरल्याचे निदर्शनास आले. या मुद्रांक शुल्काच्या माध्यमातून राज्याला 100 कोटी रुपये उत्पन्न मिळेल असा माझा दावा आहे. अधिकारी आणि बिल्डर यांच्या संगनमताने मुद्रांक शुल्क कमी भरण्यात येते. मी तपासलेल्या 10 केसेसमध्ये 1.74 कोटी मुद्रांक शुल्क कमी भरल्याचे निदर्शनास आले. या संदर्भात मी पाठपुरावा केल्यानंतर 90 हजार केससची तपासणी करण्याचे ठरविलेले आहे अशा प्रकारचे उत्तर मला देण्यात आले. ठाणे जिल्ह्यातील घोडबंदर रोड हा एक भाग झाला. मी पाचपाखाडीतील ज्या केसस दिल्या. त्यामध्ये 1 कोटी 74 लाखाची रिकव्हरी निघाली.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / शिक्षणासाठी नाही

श्री.संजय केळकर....

सभापती महोदय, राज्य शासन ज्यावेळी राज्याच्या हिताकरिता आणि जनतेच्या हिताकरिता एखादे विधेयक आणते त्यावेळी ही जी गळती आहे, मुद्रांक शुल्काच्या माध्यमातून या राज्याला मोठया प्रमाणात उत्पन्न मिळते या उत्पन्नाच्या साधनाला कोणी छेद देत असेल तर माझी विनंती आहे की, कठोरपणे याची तपासणी व्हावयास पाहिजे. लोकसभा निवडणुकीच्या अगोदर मी हा विषय उपस्थित केला होता. परंतु प्रत्येक वेळी मला उत्तर दिले जाते की, तपासणी केली जात आहे. त्यामुळे या राज्याच्या उत्पन्नामध्ये जी भर पडणार आहे ती कमी होणार आहे. या निमित्ताने माझी मागणी आहे की, ठाण्याच्या मुद्रांक शुल्क कार्यालयातील 90 हजार प्रकरणे तपासण्यात यावीत. या जिल्हयातील वाढत्या नागरिकीकरणामुळे मोठया प्रमाणात मुद्रांक शुल्काची चुकीच्या पध्दतीने आकारणी झालेली आहे. ही सगळी प्रकरणे तपासण्याच्या दृष्टीने कालबध्द कार्यक्रम आखण्यात यावा. अशा चुकीच्या प्रकरणात दंड आकारुन चालणार नाही. त्यांनी राज्याचे नुकसान केलेले आहे. त्यांच्यावर दंडात्मक कारवाई न करता संबंधितांविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल केले पाहिजेत अशी माझी मागणी आहे. वाढत्या नागरिकरणामध्ये हे फार मोठे उत्पन्नाचे साधन असताना राज्य सरकार याकडे का दुर्लक्ष करीत आहे? या अधिकाऱ्यांकडे का दुर्लक्ष केले जात आहे? संगनमताने असे प्रकार करणाऱ्या ज्या टोळया आहेत त्यांच्याकडे का दुर्लक्ष केले जात आहे? या संदर्भात मंत्रीमहोदयांनी खुलासा करावा. या विधेयकातील चारही सुधारणा राज्याच्या हिताच्या आहेत. त्याबद्दल आमचा आक्षेप नाही. परंतु प्रत्यक्ष अपेक्षित रिकव्हरी होत नाही, त्यामध्ये जी गळती होते त्याला चाप लावण्यासाठी कालबध्द कार्यक्रम आखावा आणि ठाणे जिल्हयाबाबत जो विषय मांडला त्या संदर्भात कोणत्या प्रकारची कारवाई करणार आहात याचा खुलासा मंत्रीमहोदयांनी करावा अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, सदनामध्ये सन 2009 चे विधानसभा विधेयक क्रमांक 55, मुंबई मुद्रांक अधिनियम 1958 यात आणखी सुधारणा करण्यासाठी हे विधेयक मांडण्यात आले आहे. या विधेयकावर बोलताना सन्माननीय सदस्य शिवसेना गटनेते श्री.दिवाकर रावतेजी, सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी, सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी आपले विचार मांडले आहेत.

सभापती महोदय, या विधेयकाच्या सुरुवातीलाच शीर्षकामध्ये "बॉम्बे स्टॅम्प ॲक्ट" असा उल्लेख केलेला आहे. त्यामधील "बॉम्बे" या शब्दाला विरोध झाला आणि "बॉम्बे"ऐवजी "महाराष्ट्र" अशी सुधारणा केली जाईल असे मी सन्माननीय सदनाला सांगितल्यानंतर सदनाने ते मान्य केले त्याबद्दल मी सदनाचा अतिशय ऋणी आहे. मुख्यत: सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेजींचा देखील ऋणी आहे. मी सुरुवातीलाच म्हणालो की, जनतेच्या दृष्टीने हे विधेयक हिताचे आहे. कारण या विधेयकामध्ये ज्या सुधारणा प्रस्तावित केल्या आहेत त्या सुधारणांमध्ये काही ठिकाणी मुद्रांक दरामध्ये कपात केलेली आहे. लिव्ह लायसन्ससंबंधी 750 ऐवजी 600 रुपये दर निश्चित केला असून पुणे व अन्य शहरांमध्ये जे दर आहेत त्यानुसार दरामध्ये सुधारणा केली आहे. कलम 6 ची जी सुधारणा प्रस्तावित केली आहे. कलम 6 मधील अनुच्छेद 27 अन्वये मुद्रांक शुल्क 100 रुपये आकारण्यात येत आहे. कलम 4, 6, 27 चा उपयोग एकाच कामासाठी केला जात असला तरी एका ठिकाणी मुद्रांक शुल्क 10 रुपये तर दुसऱ्या ठिकाणी मुद्रांक शुल्क 100 रुपये असा फरक होता. यामध्ये एकरुपता असावी म्हणून 100 रुपये दर करण्यात आला आहे. इतर ज्या तीन सुधारणा आहेत त्या सुधारणांचा फायदा सर्वसामान्य जनतेच्या दृष्टीने हिताचा आहे.

(नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे .....

त्याबद्दल कोणताही आक्षेप घेतला नाही, सर्वांनी स्वागतच केले आहे. सन्माननीय सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी यांनी या विधेयकावर बोलत असताना असा प्रश्न विचारला की, सन 2007-08 मध्ये मुद्रांकापोटी राज्याला या वर्षात कमी उत्पन्न मिळाले, यापूर्वीच्या वर्षात मात्र 2 हजार कोटींनी उत्पन्न वाढले आहे परंतु तेच उत्पन्न मात्र यावर्षी फक्त 1 हजार कोटींनीच वाढले आहे. सन्माननीय सदस्य व्यवसायाने सी.ए. असून त्यांना उलाढाल किंवा आर्थिक चढ-उतार यासंबंधीची चांगली जाण आहे. जगाबरोबरच देशात, राज्यात आणि मुंबईत सुध्दा आर्थिक मंदी आली व त्याचा परिणाम प्रामुख्याने मोठ्या प्रमाणात या रिअल इस्टेटवर झाला म्हणून हे उत्पन्न घटल्याचे दिसून येत आहे. परंतु अन्य शहरांच्या तुलनेत मुंबईत तेवढा मंदीचा परिणाम जाणवला नाही. एकंदरित राज्याचा विचार केला तर नक्कीच उत्पन्न कमी झालेले आहे. यावर्षात पुन्हा 1 हजार कोटीने मुद्रांकापोटी मिळणारे उत्पन्न वाढलेले आहे. तसेच सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे 53 टक्के व्हॅटमधून राज्याच्या तिजोरील जवळपास 18 टक्क्याचा महसूल येत असल्याने या विधेयकाकडे जास्त लक्ष दिले जाते. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी विधेयकावर आपले विचार मांडत असताना काही सूचना तसेच आक्षेपही केले आहेत. असे आक्षेप घेताना त्यांनी बरीच टीकाही केली आहे. त्यांनी काही उदाहरणे तसेच फोटो दाखविले आणि पुन्हा आपल्याकडेच ठेवून घेतले. ते फोटो तसेच पुरावे माझ्याकडे आपल्यामार्फत पाठवून द्यावेत. सन्माननीय सदस्य सभागृहातील एक ज्येष्ठ सदस्य आहेत म्हणून माझी त्यांच्याकडून एवढीच माफक अपेक्षा आहे की, ज्यावेळेस आपण आरोप करतो तेव्हा त्यासंबंधीचे पुरावे सादर करावे लागतात. त्यांनी म्हटले की, "हा 10 हजार घेतो, तो 1 लाख घेतो, 2 लाख घेतो" कदाचित असे असेलही, मी ते खोटे असल्याचे म्हणणार नाही परंतु जबाबदार व्यक्तिनी अशा प्रकारे आरोप केल्यानंतर त्याचे पुरावे दिले तर या सभागृहाचे पावित्र्य सुध्दा राखले जाईल. त्यांनी सांगितल्याप्रमाणे स्टॅम्प डयुटीच्या कार्यालयात ज्या घटना घडतात त्यासंबंधी सभागृहात जे चित्र उभे केले त्या अनुषंगाने मी एवढेच सांगणार आहे की, मी स्वत: जातीने याप्रकरणी लक्ष देईन. काल काय झाले यापेक्षा काळजीपूर्वक लक्ष देणे महत्वाचे आहे व ते दिले जाईल. तसेच सन्माननीय सदस्यांनी केलेली टीका एक मार्गदर्शक स्वरुपाची आहे असे समजून भविष्यात आपला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे .....

ज्येष्ठपणाचा मान ठेवून पुराव्यानिधी माहिती दिली तर त्या ज्येष्ठपणाला सुध्दा अधिक महत्व येईल, एवढेच मी सांगू इच्छितो. त्याचबरोबर मी असेही म्हणेन की मुद्रांक शुल्क वसूल करणाऱ्या विभागात जास्तीत जास्त सुधारणा करुन राज्याचे उत्पन्न वाढावे या स्तुत्य हेतूने हे विधेयक आणलेले आहे. यासंबंधी झालेली टीका देखील एक मार्गदर्शक स्वरुपाची आहे असे समजून बाकीच्या टीकेकडे मी जात नाही.....

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे.....

सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सेक्शन 31 वर आपले विचार व्यक्त केलेले आहेत. या सेक्शन अनुसार अधिका-यांकडे जाऊन स्टँप ड्यूटी भरावी लागते. कलम 31 नुसार अर्ज करणे ऑप्शनल आहे असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. सन्माननीय सदस्यांनी जे विचार व्यक्त केलेले आहेत ते योग्य आहेत त्यामुळे त्याबद्दल मला काही म्हणावयाचे नाही. टेनंट ऑक्यूपाय प्रॉपर्टीच्या बाबतीत मूल्यांकनाच्या सवलतीचा फायदा द्यावयाचा असेल तर दुय्यम निबंधकांच्या हातून चुका होण्याचा संभव आहे, मूल्यांकन कमी जास्त होण्याचा संभव असल्यामुळे रेडीरेकनरमध्ये जी टीप दिलेली आहे, सन्माननीय सदस्यांना यासंदर्भात जी.आर.काय आहे असे वाटले. खरे म्हणजे ती टीप त्या उद्देशानेच दिलेली आहे. दुय्यम निंबधकांकडून चुका होऊ शकतात त्यामुळेच ती टीप दिलेली आहे व त्यामुळेच ती सूचना केलेली आहे, एवढेच मी सन्माननीय सदस्यांच्या नजरेस आणतो. कलम 48 नुसार सूट अधिक वाढविली आहे. पूर्वी फ्लॅट ताब्यात दिला नाही तर पैसे परत केले जात होते. परंतु आता दोन वर्षाची मुदत ठेवलेली आहे. यामध्ये आपण अनेक कारणांचा समावेश केलेला आहे. त्यामुळे ग्राहकांच्या दृष्टीने, फ्लॅट घेणा-यांच्या दृष्टीने ही अतिशय फायदेशीर गोष्ट झालेली आहे. ग्राहकांच्या हिताचीच गोष्ट आपण या विधेकायमध्ये समाविष्ट केलेली आहे. फ्लॅट घेणा-याला कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये व दुस-या बाजूने राज्याचे उत्पन्न वाढावे, असा स्तुत्य हेतू आमचा आहे. फ्लॅट घेणा-याला फायदा व्हावा, ग्राहकाला फायदा व्हावा, म्हणूनच आम्ही 1958 च्या कायद्यामध्ये सुधारणा आणलल्या आहेत. सन्माननीय सदस्यांनी "बॉम्बे"या शब्दाऐवजी "मुंबई" या शब्दाचा उल्लेख करावा, अशी सूचना केलेली आहे, त्यासंदर्भात मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, महाराष्ट्र विधान परिषदेचे जे नियम आहेत त्या नियमानुसार एकाच अधिवेशनात दोनदा सुधारणा करता येत नाहीत त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी जी मागणी केलेली आहे ती मागणी या अधिवेशनानंतर पूर्ण करण्यात येईल. हे विधेयक जनतेच्या हिताच्या दृष्टीने, ग्राहकांच्या हिताच्या दृष्टीने अतिशय उपयुक्त आहे, सोयीचे आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे.....

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे तो मुद्दा तपासून घेण्यात येईल. त्यांच्या म्हणण्यानुसार अशा प्रकारे शासनाचे उत्पन्न बुडत असेल तर त्यासंदर्भात पूर्ण चौकशी करुन योग्य ती कारवाई करण्यात येईल, एवढेच मी या प्रसंगी सांगतो व या विधेयकाला सर्वांनी एकमताने पाठिंबा द्यावा, अशी विनंती करतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांनी माझ्या ज्येष्ठतेबद्दल आदर ठेवल्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. आपल्यालाही ज्ञात आहे की, भ्रष्टाचाराचे पुरावे तुम्हीच काय, ब्रम्हदेव जरी समोर आले तरी ते सुध्दा देऊ शकणार नाहीत. ही सत्य बाब संपूर्ण मुंबई अनुभवते आहे. ही गोष्ट आपल्याला नवीन नाही. हा भ्रष्टाचार कोणीच थांबवू शकत नाही परंतु हा भ्रष्टाचार आपण कमी करु शकतो. मी जी सूचना केली त्या संदर्भात मंत्री महोदय दखल घेणार आहेत असे त्यांनी आताच सांगितलेले आहे. दोन नंबरने पैसे खाणा-या माणसाचे पुरावे आपण देऊ शकत नाही, पण महानगरपालिकेला पाठविलेल्या पत्राची प्रत, मी काढलेले सर्व फोटो आणि आपल्याला अजून जे काही पाहिजे ते माननीय सभापतीमहोदयांच्या माध्यमातून जरुर पाठवेन. या ठिकाणी जो भ्रष्टाचार सुरु आहे त्याबाबत कारवाई होईल, अशी मी आपल्याकडून अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, मला आपल्याकडून एक अपेक्षा आहे. हे विधेयक मला लावून धरता आले असते परंतु आततायीपणा कुठल्या गोष्टीत करावा, किती करावा, याला काही मर्यादा असतात त्यामुळे मी थांबलो. विधेयक मंजूर करुन घेण्याच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी तसेच आपण स्वत: विनंती केल्यामुळे हे विधेयक मंजूर करण्याच्या संदर्भात मी आपल्याला शब्दही दिला होता. परंतु सभापती महोदय मला आपल्याला अशी विनंती करावयाची आहे की, प्रत्येक विधेयकाच्या संदर्भात रोज रोज "बॉम्बे"चे "मुंबई" करा असे मी म्हणत राहायचे काय? त्यामुळे माननीय सभापती महोदयांच्या दालनात माननीय मुख्यमंत्री महोदय, माननीय संसदीय कार्यमंत्री श्री.हर्षवर्धन पाटील, मुख्य सचिव श्री. डांगे यांच्या सोबत या विषयाच्या संदर्भात एक बैठक घ्यावी. त्या बैठकीत मी सुध्दा येईन. या विधेयकामध्ये ज्या सुधारणा करावयाच्या आहेत त्यासाठी आपल्याला

अशुद्धीत पत्र / शीघ्रलेखी नोंद

श्री. दिवाकर रावते.....

बराच वेळ लागणार आहे. सर्व खात्याकडून माहिती जमा करावयाची असेल तर त्यासाठी बराच वेळ जाईल. त्यामुळे आपल्या दालनात बैठक घेऊन या विषयी जर काही कालमर्यादा ठरवली तर बरे होईल. महाराष्ट्र राज्याच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात निर्णायक भूमिका घेतली तर ती जनतेच्या दृष्टीने उपयुक्त ठरु शकेल, अशी मी आपल्याला विनंती करतो.

उपसभापती :ठीक आहे. बैठक बोलविण्यात येईल.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

(खंड 2 ते 5 (दोन्ही सम्मिलित), अनुसूची, खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही)

उपसभापती : ज्या अर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही. त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

सभा□ह्यापुढील □म□ज संपलेले आहे. सभा□ह्याची बैठ□ आता स्थ□□ होऊ□ उद्या बुधवार, दि□□ 31 मार्च 2010 रोजी दुपारी 12.00 वाजता पु□: भरेल.

(सभा□ह्याची बैठ□ सायंकाळी 7 वाजू□46 मि□टां□□ बुधवार, दि□□ 31 मार्च 2010 रोजीच्या दुपारी 12.00 वाजेपर्य□त स्थ□□ झाली)

धन्यवाद

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही